शनिवार
२७
डिसेंबर २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : २९२
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत



दिप्ती शर्माने टी-२० मध्ये घडविला इतिहास
(पान ७ वर)

## थोडक्यात

### लुथरा ब्रदर्सच्या कोठडीत वाढ



**पणजी :** गोव्यातील मापुसा न्यायालयाच्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांनी सौरभ आणि गौरव लुथरा यांच्या पोलिस कोठडीत २९ डिसेंबरपर्यंत वाढ केली आहे. गौरव आणि सौरभ हे गोव्याच्या रोमियो लेन येथील बर्च नाईट क्लबचे मालक आहेत. क्लबला लागलेल्या आगीमुळे त्यांना १० दिवसाच्या पोलास कोठडीची सुनावण्यात आली होती. ज्याची मुदत आज संपली असली तरी न्यायालयाने त्यांच्या कोठडीत २९ डिसेंबरपर्यंत वाढ केली आहे. सौरभ आणि गौरव लुथरा यांचे वकील पराग राव यांनी सांगितल्यानुसार, तपास अधिकाऱ्यांना सहकार्य करायचे असल्यामुळे या अतिरिक्त पोलीस कोठडीसाठी कोणताही विरोध दर्शवला गेला नाही. सध्या लुथरा ब्रदर्स अंजुना पोलिसांच्या ताब्यात आहेत. क्लबला आग लागली तेव्हा हे भाऊ प्रत्यक्ष स्थळी उपस्थित नसले तरी अंजुना पोलिसांनी त्यांच्या विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

### जो हिंदू हित की बात करेगा...-नितेश राणे



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी भाजपने आता पूर्णपणे आक्रमक पवित्रा घेतला असून, पक्षाचे फायरब्रँड नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी या लढाईचे सूत्र स्पष्ट केले आहे. ''जो हिन्दू हित की बात करेगा, वही आमची मुंबई पर राज करेगा!!'' अशा शब्दांत नितेश राणे यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले असून, मुंबईची सत्ता आता केवळ हिंदूंच्या हिताचे रक्षण करणाऱ्यांच्याच हाती राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. नितेश राणे हे सातत्याने हिंदूंच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे नेते म्हणून ओळखले जातात. मुंबईच्या कानाकोपऱ्यात हिंदू समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांनी नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे.

### पतीने पत्नीचा फोन फोडणे गैर नाही



**जबलपूर :** कोणत्याही पतीला आपली पत्नी व्यभिचारात गुंतलेली पाहणे सहन होणार नाही. अशा परिस्थितीत रागाच्या भरात पत्नीचा मोबाईल फोडणे आणि तिचा प्रियकराशी असलेला संपर्क तोडणे हे मानवी स्वभावानुसार स्वाभाविक आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने पतीला कौटुंबिक न्यायालयाने दिलेला घटस्फोटाचा निर्णय कायम ठेवला. दाम्पत्याचा विवाह २००६ मध्ये झाला होता. पतीने पत्नीच्या अनैतिक संबंधांचे आरोप करत १७ नोव्हेंबर २०२१ रोजी कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला होता. पतीने पुरावा म्हणून पत्नीच्या मोबाईलमधून स्वतःच्या मोबाईलमध्ये घेतलेले काही आक्षेपार्ह फोटो आणि ते फोटो डेव्हलप करणाऱ्या फोटोग्राफरची साक्ष न्यायालयात सादर केली होती. कौटुंबिक न्यायालयाने हे पुरावे ग्राह्य धरून घटस्फोट मंजूर केला होता. या निर्णयाला पत्नीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पतीने आपला मोबाईल फोडला असून, सादर केलेले फोटो बनावट आहेत. पतीने सादर केलेले फोटो हे दुय्यम पुरावा आहेत. भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ६५-बी नुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र नसल्यामुळे हे इलेक्ट्रॉनिक पुरावे ग्राह्य धरले जाऊ नयेत, असा पत्नीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला होता.

# साहिबजादे मुघलांसमोर झुकले नाहीत : पंतप्रधान नरेंद्र मोदी

## भारत मंडपममध्ये 'वीर बाल दिवस' कार्यक्रम

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था

**नवी दिल्लीतील भारत मंडपम या ठिकाणी आज वीर बाल दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यात सहभागी झाले होते. पंतप्रधान मोदींनी यावर्षी शौर्य पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या मुलांशीही संवाद साधला. शाळकरी मुलांना संबोधित करताना, प्रत्येकाने साहिबजादांचे बलिदान लक्षात ठेवले पाहिजे. साहिबजादांनी मुघलांसमोर झुकले नाही, असे त्यांनी म्हटले.**




पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज देश वीर बाल दिवस साजरा करत आहे. आज आपण त्या शूर साहिबजादांचे स्मरण करत आहोत जे आपल्या भारताचा अभिमान आहेत. साहिबजादांचे बलिदान एक प्रेरणा आहे. भारताचा गौरवशाली भूतकाळ आहे; असा भूतकाळ असलेला देश काय साध्य करू शकत नाही? प्रत्येकाने साहिबजादांचे बलिदान लक्षात ठेवले पाहिजे. ते शूर साहिबजादे, ज्यांनी वय आणि परिस्थितीचे सर्व अडथळे तोडले. ते क्रूर मुघल साम्राज्याविरुद्ध खडकासारखे उभे राहिले, धार्मिक कट्टरता आणि दहशतवादाचे अस्तित्व हादरवून टाकले. ती लढाई भारताच्या मूलभूत आदर्श आणि धार्मिक कट्टरता यांच्यातील होती. त्या लढाईच्या एका बाजूला दहावे गुरु गोविंद सिंह जी होते आणि दुसऱ्या बाजूला क्रूर औरंगजेबाचे राज्य होते.

आमचे साहिबजादे त्यावेळी तरुण होते, परंतु औरंगजेबाच्या क्रूरतेचा त्यांना काहीही परिणाम झाला नाही. देशाला पुढे घेऊन जाईल. मला त्यांच्या कौशल्यांवर पूर्ण विश्वास आहे. वयाने कोणीही मोठे किंवा लहान नाही. लहान वयातही महान गोष्टी साध्य करता येतात. आजचे तरुण स्वप्न पाहतात आणि ती पूर्ण करतात. २०३५ पर्यंत देश गुलामगिरीच्या मानसिकतेपासून मुक्त होईल.

### मुलांना देण्यात येणारे पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारत मंडपम येथे २० मुलांना पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले. या मुलांची निवड १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून करण्यात आली होती. १४ वर्षीय क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी दिल्लीत आहे, त्यामुळे तो विजय हजारे स्पर्धेत मणिपूरविरुद्ध आजचा सामना खेळत नाही. राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांमध्ये फिरोजपूरचा श्रवण सिंग आहे, ज्याने ऑपरेशन सिंदूर दरम्यान सीमेवर सैनिकांना चहा आणि नाश्ता दिला होता. मुलांना देण्यात येणारे पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारत मंडपम येथे २० मुलांना पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले. या मुलांची निवड १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून करण्यात आली होती. १४ वर्षीय क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी दिल्लीत आहे, त्यामुळे तो विजय हजारे स्पर्धेत मणिपूरविरुद्ध आजचा सामना खेळत नाही. राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांमध्ये फिरोजपूरचा श्रवण सिंग आहे, ज्याने ऑपरेशन सिंदूर दरम्यान सीमेवर सैनिकांना चहा आणि नाश्ता दिला होता. तमिळनाडूचा ब्योमा आणि बिहारचा कमलेश कुमार या दोन मुलांना मरणोत्तर पुरस्कार देण्यात आला, त्यांच्या पालकांनी पुरस्कार स्वीकारले.

# शरद पवार गट आता एनडीएमध्ये येणार!

## संजय शिरसाट यांची भविष्यवाणी

मुंबई, दि. २६ वृत्तसंस्था



राज्यामध्ये महापालिका निवडणूका जाहीर करण्यात आल्या आहेत. यामुळे राजकीय समीकरणे आणि युतीमध्ये बदल झाला आहे. मुंबईमध्ये वर्चस्व मिळवण्यासाठी ठाकरे बंधूंनी युती केली आहे तर काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. पुण्यामध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या आहेत. याचबरोबर मुंबईमध्ये भाजप आणि शिंदे गट एकत्र आला आहे. यावरुन आता शरद पवार गट आता एनडीएमध्ये येणार असल्याची भविष्यवाणी संजय शिरसाट यांनी केली आहे. यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय शिरसाट म्हणाले की, भाजपा आणि शिवसेनेकडे इच्छुकांची गर्दी जास्त असल्याने चर्चा सुरू आहेत. कोणता प्रभाग सोडायचा आणि कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ नये ही आमची भूमिका आहे. इच्छुक जास्त आहेत आणि जागा कमी आहेत, म्हणून कोणती जागा घ्यायची आणि लढवायची ही चर्चा होणे गरजेचे आहे. आज किंवा उद्या आमची महायुतीची घोषणा होईल. दोन-चार जागेवर जे अडलेलं आहे, त्यावर मंत्री अतुल सावे आणि मी आज चर्चा करणार आहोत आणि योग्य निर्णय घेणार आहोत, असं संजय शिरसाट म्हणाले आहेत. पुढे ते म्हणाले की, युती बाबतची चर्चा आता अंतिम टप्प्यात आली आहे. कोण कुठे लढणार याची यादी एक-दोन दिवसात फायनल होईल. अतुल सावे आणि मी आज फायनल चर्चा करून, ती यादी भाजपा आणि शिवसेनेच्या वरिष्ठांना पाठवू आणि नंतर जाहीर केली जाईल. शरद पवार हे जास्त काही विरोधी पक्षात राहू शकत नाहीत. त्यांचा आतापर्यंतचा राजकीय प्रवास बघितला तर त्यांनी अनेक वेळा असे उलटे-सुलटे प्रयत्न केलेले आहेत, असे सूचक वक्तव्य संजय शिरसाट यांनी केले आहे. त्यामुळे आता शरद पवार हे देखील पुतण्याप्रमाणे एनडीएमध्ये सामील होणार का याची उत्सुकता लागली आहे. (पान २ वर)

# भारतीय पासपोर्टला मोठा धक्का!

## भारतीय पासपोर्ट कमकुवत; ८५ व्या स्थानावर घसरण

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था



नवीन वर्षाच्या आधी भारतीय पासपोर्टला मोठा धक्का बसला आहे. जागतिक क्रमवारीत भारतीय पासपोर्टची घसरण झाल्याचे पाहायला मिळत आहे. भारतीय पासपोर्ट आता ८५ व्या स्थानावर घसरला आहे. पूर्वी तो ८० व्या स्थानावर होता. भारतासोबतच अमेरिकेलाही यासंदर्भात मोठा धक्का बसला आहे.

हेन्ले पासपोर्ट इंडेक्स २०२५ ने एक नवीन यादी जाहीर केली आहे. या यादीनुसार जगभरातील देशांच्या पासपोर्ट विषयी माहिती देण्यात आली आहे.त्यानुसार अमेरिकन पासपोर्टलाही मोठा धक्का बसला असून, अमेरिकन पासपोर्ट १० व्या स्थानावरून १२ व्या स्थानावर पोहोचला आहे.जगात भारतीय पासपोर्टचे स्थान कमकुवत झाले आहे. गेल्या वर्षी जागतिक क्रमवारीत भारत ८० व्या स्थानावर होता. या वर्षी भारतीय पासपोर्ट पाच स्थानांनी घसरून ८५ व्या स्थानावर आला आहे. मात्र, सिंगापूरने सातत्याने आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. हेन्ले पासपोर्ट इंडेक्स २०२५ च्या यादीने जगभरातील पासपोर्टची क्रमवारी जाहीर केली आहे.

**५९ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास :** भारतीय पासपोर्टच्या क्रमवारीत घसरण झाल्यामुळे, भारतीय नागरिक आता जगातील फक्त ५९ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात. सिंगापूरचे नागरिक १९३ देशांमध्ये, दक्षिण कोरियाचे नागरिक १९० देशांमध्ये, जपानचे नागरिक १८९ देशांमध्ये आणि जर्मनी, इटली, स्पेन आणि स्वित्झर्लंडचे नागरिक १८७ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात.

### लाल किल्ला स्फोट : आरोपी एनआयए कोठडीत

**दिल्ली :** लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणातील दोन आरोपींची शुक्रवारी राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) कोठडीत रवानगी करण्यात आली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रशांत शर्मा यांनी तपास संस्थेला आरोपी यासिर अहमद दार याची आणखी दहा दिवस आणि दुसरा आरोपी डॉ. बिलाल नसीर मल्ला याची आठ दिवस चौकशी करण्याची परवानगी दिली. न्यायालयाने माध्यमांना या कारवाईचे वृत्तांकन करण्यास मनाई केली. एनआयएच्या तपासानुसार, १० नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्याबाहेर स्फोटकांनी भरलेली कार चालवणारा उमर-उन-नबी हा पंधरा जणांचा बळी घेणाऱ्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार होता. उमरचाही जागीच मृत्यू झाला.

# ग्रीन टीला यापुढे 'चहा' म्हणणे बेकायदा!

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था



ग्रीन टीला आता 'चहा' म्हणणे बेकायदेशीर आहे, असे केंद्र सरकारच्या भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) स्पष्ट केले आहे.

अरवलीच्या व्याख्येतील बदलाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारने 'चहा'ची व्याख्याही बदलली आहे. 'चहा' हा फक्त त्या उत्पादनासाठी वापरला जाऊ शकतो, जो कॅमेलिया सायनेन्सिस या वनस्पती पासून बनलेला असेल. तसेच एफएसएसएआयने फूड बिझनेस ऑपरेटर्स (एफबीओएस)ला कडक इशारा दिला आहे की, कॅमेलिया सायनेन्सिस वनस्पतीपासून न बनलेल्या पेयांना-जसे की औषधी वनस्पती किंवा फुलांपासून तयार केलेले यांना चहा म्हणणे बेकायदेशीर आहे. जर हर्बल टी किंवा ग्रीन टीला चहा म्हणून ब्रँडिंग केली गेली, तर ती भ्रामक जाहिरात आणि चुकीच्या लेबलिंगच्या अंतर्गत येईल. एफएसएसएआयने २४ डिसेंबरला जारी केलेल्या आदेशात सांगितले की, अनेक कंपन्या 'हर्बल टी', 'रुईबोस टी', 'फ्लॉवर टी' असे उत्पादन चहा म्हणून विकत आहेत, पण प्रत्यक्षात ही उत्पादने चहाच्या वनस्पतीपासून बनलेली नाहीत. यात कांगडा चहा, ग्रीन टी आणि इन्स्टंट टी यांसारख्या प्रकारांचा समावेश आहे. एफएसएसएआयने स्पष्ट केले की, हर्बल किंवा इतर वनस्पतीपासून बनलेले पेय या वनस्पतीपासून न बनल्यास त्यांना चहा म्हणणे चुकीचे आहे, तसेच प्राधिकरणाने मॅन्युफॅक्चरिंग, पॅकिंग, मार्केटिंग, आयात, विक्री आणि ई-कॉमर्ससंबंधी सर्व व्यवसायांना निर्देश दिले आहेत की अशा उत्पादनांसाठी 'टी' हा शब्द थेट किंवा अप्रत्यक्षरीत्या वापरू नये. तसेच ऑनलाइन विक्रेते आणि इतर सर्व एफबीओएसवर नियमांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले आहे.

# चीनला दणका; कोळसा खाण नियमांत सवलत

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था

देशातील स्थानिक उद्योगांना बळ देण्यासाठी आणि 'ईज ऑफ डूइंग बिझनेस'ला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने शुक्रवारी दोन ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. एकीकडे चीनमधून होणाऱ्या स्वस्त आयातीला रोखण्यासाठी 'अँटी-डंपिंग' शुल्क लागू करण्यात आले आहे, तर दुसरीकडे कोळसा आणि लिग्नाइट खाणी सुरू करण्याची प्रक्रिया अधिक सुटसुटीत करत प्रशासकीय जाचातून मुक्तता केली आहे.

चीनकडून होणाऱ्या स्वस्त आणि अयोग्य आयातीमुळे भारतीय उत्पादकांचे मोठे नुकसान होत होते. यावर लगाम लावण्यासाठी वित्त मंत्रालयाने चीनच्या दोन प्रमुख उत्पादनावर पुढील पाच वर्षांसाठी अँटी-डंपिंग शुल्क लागू केले आहे. कोल्ड-रोल्ड नॉन-ओरिएंटेड इलेक्ट्रिकल स्टील, यावर प्रति टन २२३.८२ ते ४१५ अमेरिकन डॉलर्सपर्यंत शुल्क लावण्यात आले आहे. रेफ्रिजरंट गॅस (-१३४) फ्रीज आणि एसीमध्ये वापरल्या जाणाऱ्या या गॅसवर प्रति टन ५,२५१ अमेरिकन डॉलर्सपर्यंत भरघोस शुल्क आकारले जाणार आहे. (पान २ वर)

# राष्ट्रपती मुर्मू पाणबुडीतून प्रवास करणार

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पाणबुडीतून प्रवास करणार आहेत. नियोजीत कार्यक्रमानुसार राष्ट्रपती रविवार २८ डिसेंबर २०२५ रोजी कर्नाटकमधील कारवार बंदरात येतील. तिथून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पाणबुडीत बसून चार दिवस प्रवास करतील.

या कालावधीत राष्ट्रपती गोवा, कर्नाटक आणि झारखंडमधील वेगवेगळ्या भागात जाऊन तिथे सरकारी कार्यक्रमांमध्ये सहभागी होतील. राष्ट्रपती मूर्मू यांच्या आधी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी राष्ट्रपती असताना १३ फेब्रुवारी २००६ रोजी आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम येथून पाणबुडीत बसून प्रवास केला होता. तर पाणबुडीतून प्रवास करण्याआधी राष्ट्रपती मुर्मू यांनी याच वर्षी २९ ऑक्टोबर रोजी राफेल आणि २०२३ मध्ये सुखोई ३० एमकेआय या दोन लढाऊ विमानांतून प्रवास केला आहे. राजधानीतून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २७ डिसेंबर रोजी गोव्यासाठी रवाना होतील, तिथून राष्ट्रपती २८ डिसेंबर रोजी कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्ह्यातल्या कारवार बंदरात पोहोचतील. कारवार बंदरात उभ्या असलेल्या पाणबुडीतून राष्ट्रपती पुढे चार दिवस प्रवास करतील. या प्रवासादरम्यान राष्ट्रपती वेगवेगळ्या भागात काही तासांसाठी थांबून सरकारी कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. राष्ट्रपती मुर्मू सोमवारी २९ डिसेंबर रोजी झारखंडमधील जमशेदपूर येथे ओल चिकी लिपीच्या शताब्दी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. संथाली या प्रादेशिक भाषेसाठी रघुनाथ मुर्मू यांनी १९२५ मध्ये ओल चिकी नावाची लिपी (पान २ वर)

# अखेर पाकच्या सरकारी विमान कंपनीचा लिलाव!

## उद्योगपती आरिफ हबीब यांची ४३०० कोटी रुपयांची बोली




कराची, दि. २६ वृत्तसंस्था

अनेक दिवसांपासून चर्चेत असलेली पाकिस्तानची सरकारी विमान कंपनी पाकिस्तान इंटरनेशनल एयरलाइंसच्या विक्रीची प्रक्रिया अखेर पूर्ण झाली आहे. इस्लामाबादमध्ये २३ डिसेंबर रोजी झालेल्या एका खुल्या लिलावात प्रसिद्ध उद्योगपती आरिफ हबीब यांनी बाजी मारली असून, तब्बल १३५ बिलियन पाकिस्तानी रुपये म्हणजेच भारतीय चलनात सुमारे ४३०० कोटी रुपयांची बोली लावून या एअरलाइन्सची मालकी मिळवली आहे.

आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या पाकिस्तानने आपली सरकारी एअरलाइन्स खासगी हातात सोपवण्याचा निर्णय घेतला होता. या लिलावासाठी आरिफ हबीब यांच्यासह लकी सिमेंट आणि खासगी विमान कंपनी एअरब्लू या तीन प्रमुख कंपन्या रिंगणात होत्या. सुरुवातीला या तिन्ही कंपन्यांनी सीलबंद पाकिटात आपल्या बोली सादर केल्या. जेव्हा हे बॉक्स उघडले गेले, तेव्हा आरिफ हबीब यांची ११५ अब्ज पाकिस्तानी रुपयांची बोली सर्वाधिक ठरल्याने याचा मालकी हक्क हबीब यांना मिळाला. २०२० मध्ये कराचीमध्ये पीआयएचे एक विमान कोसळून ९७ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. या अपघातानंतर सुरक्षेच्या कारणास्तव युरोपियन युनियन एव्हिएशन सेफ्टी एजन्सीने या एअरलाइन्स वर चार वर्षांसाठी बंदी घातली होती. अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच ही बंदी उठवण्यात आल्याने उड्डाणे पुन्हा सुरू झाली आहेत. त्यामुळे पीआयएची विक्री बंदी उठवल्यानंतर झाल्याने कंपनीचे मूल्य वाढले आणि लिलावाचा मार्ग मोकळा झाला. व्यावसायिक यशासोबतच आरिफ हबीब हे त्यांच्या सामाजिक कार्यासाठीही ओळखले जातात. आरिफ हबीब फाउंडेशनच्या माध्यमातून ते पाकिस्तानमध्ये आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक कल्याणाचे प्रकल्प राबवत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पाकिस्तान सरकारने त्यांना सितारा-ए-इम्तियाज या सर्वोच्च नागरी सन्मानाने देखील गौरवले आहे. सरकारी कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या वेळी त्या विकत घेऊन त्या फायद्यात (पान २ वर)

## निर्णय — २१५ किमी पेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी भाडेवाढ

# रेल्वेचा प्रवास महागला; दरवाढ लागू!

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था




भारतामध्ये मोठ्या प्रमाणात प्रवासासाठी रेल्वेचा वापर केला जातो. मोठ्या पल्ल्याच्या प्रवासासाठी रेल्वेचा पर्याय निवडला जातो. रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रत्येकासाठी ही बातमी महत्त्वाची आहे. यापुढे रेल्वेच्या तिकीट दरामध्ये बदल करण्यात आला आहे. रेल्वे मंत्रालयाने याबाबत अधिसूचना जारी केली आहे. पाच दिवसांपूर्वी रेल्वे मंत्रालयाकडून ही वाढ घोषित करण्यात आली आहे. यामुळे सामान्यांच्या खिशाला कात्री बसली आहे.

आजपासून म्हणजेच २६ डिसेंबरपासून, २१५ किमी पेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी, सामान्य वर्गात प्रति किमी १ पैसे आणि मेल/एक्सप्रेसमध्ये प्रति किमी २ पैसे भाडे वाढवण्यात आले आहे. हा निर्णय ५ दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आला होता आणि आता तो लागू करण्यात आला आहे. हा बदल २६ डिसेंबर रोजी किंवा त्यानंतर बुक केलेल्या तिकिटांवर लागू होईल. आधीच बुक केलेल्या तिकिटांवर कोणताही परिणाम होणार नाही. या वर्षीची ही दुसरी वाढ आहे, मागील भाडेवाढ जुलैमध्ये करण्यात आली होती. यामुळे रेल्वेचा प्रवास देखील महाग झाला आहे.

ही रेल्वे भाडेवाढ जास्त अंतर असलेल्या प्रवासासाठी करण्यात आली आहे. कमी अंतराचा प्रवास करणाऱ्या दैनंदिन वेतनधारक आणि व्यावसायिकांना लक्षात घेऊन, रेल्वेने सामान्य श्रेणीतील २१५ किमी पर्यंतच्या प्रवासाचे भाडे वाढवलेले नाही. रेल्वेने म्हटले आहे की, सामान्य श्रेणीतील गाड्यांमध्ये २१५ किमी पर्यंत प्रवास करणाऱ्यांच्या खिशावर कोणताही भार पडलेला नाही. तथापि, २१५ किमी पेक्षा जास्त प्रवासासाठी, सामान्य श्रेणीतील तिकिटांचे भाडे प्रति किलोमीटर एक पैशाने वाढवण्यात आले आहे.

### वाढलेले शुल्क २६ डिसेंबरपूर्वी तिकिटे बुक करणाऱ्यांना लागू नाही

तेजस राजधानी, राजधानी, शताब्दी, दुरांतो, वंदे भारत, हमसफर, अमृत भारत, तेजस, महामना, गतिमान, अंत्योदय, गरीब रथ, जन शताब्दी, युवा एक्सप्रेस, नमो भारत रॅपिड रेल आणि सामान्य उपनगरीय नसलेल्या सेवा (लागू असल्यास एसी, मेमू, डेमू वगळता) या प्रमुख रेल्वे सेवांचे सध्याचे मूळ भाडे मंजूर वर्गनिहाय मूलभूत भाड्यांनुसार सुधारित करण्यात आले आहे. रेल्वेने स्पष्टपणे सांगितले आहे की, भारतीय रेल्वेच्या या सर्व विशेष सेवा देखील या वाढीव भाड्यासाठी मात्र असणार आहेत. सुधारित दर या सर्व गाड्यांना लागू असतील; मात्र हे वाढलेले शुल्क २६ डिसेंबरपूर्वी रेल्वे तिकिटे बुक करणाऱ्यांना लागू होणार नाही. यानंतर करण्यात आलेल्या बुकिंगसाठी वाढीव शुल्क लागू करण्यात आले आहे.

## पान 1 वरून...

### शरद पवार गट आता एनडीएमध्ये...

भाजपची आणि आमची नैसर्गिक युती

शिरसाट म्हणाले की, अजित दादा सत्तेमध्ये आहेत. त्यांच्याकडे महत्त्वाचे पद आहे. त्यामुळे अजित दादा कोणीकडे जाणार नाहीत. परंतु शरद पवार एनडीए मध्ये येऊ शकतात. शरद पवार यांना एनडीएमध्ये घ्यायचं का नाही? हा निर्णय भाजपचे वरिष्ठ ठरवतील. राष्ट्रवादीची भाजप बरोबर आघाडी आहे आणि आमची युती भाजप बरोबर आहे. म्हणून भाजपची शरद पवार यांच्याबद्दल काय भूमिका असेल ती भाजपने ठरवावी. शरद पवार यांना एनडीए मध्ये घ्यायचं का नाही हे एनडीएच्या नेत्यांनी ठरवायचे आहे, आम्ही पहिल्यापासून सांगत आलो आहेत भाजपची आणि आमची नैसर्गिक युती आहे. इतर घटक पक्ष एनडीएमध्ये येत असतील तर त्याला भाजप जबाबदार राहील आम्ही नाही, असे देखील मत संजय शिरसाट यांनी व्यक्त केले आहे.

### चीनला दणका; कोळसा...

केवळ चीनच नव्हे, तर व्हिएतनाममधून आयात होणाऱ्या 'कॅल्शियम कार्बोनेट फिलर मास्टरबॅच'वरही (प्लास्टिक उद्योगातील कच्चा माल) शुल्क लावण्यात आले आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या 'डीजीटीआर' या तपास संस्थेच्या शिफारसीनंतर ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे भारतीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा निर्माण होईल. ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरता आणण्यासाठी सरकारने 'कोलियरी कंट्रोल रूल्स, २००४' च्या नियम ९ मध्ये सुधारणा केली आहे. या बदलामुळे कोळसा आणि लिग्नाइट खाणी सुरू करणे आता अधिक सोपे होणार आहे. यापूर्वी खाण सुरू करण्यासाठी किंवा १८० दिवसांहून अधिक काळ बंद असलेली खाण पुन्हा सुरू करण्यासाठी 'कोळसा नियंत्रक संघटनेची' पूर्वपरवानगी अनिवार्य होती. आता ही अट पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. आता संबंधित कोळसा कंपनीच्या बोर्डालाच खाण सुरू करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. मात्र, केंद्र आणि राज्य सरकारांच्या वैधानिक मंजुरीनंतरच बोर्डाला हा निर्णय घेता येईल. या सुधारणेमुळे अनावश्यक कागदपत्रांचा फेरा वाचणार असून, खाण कार्यान्वित होण्यासाठी लागणारा वेळ किमान दोन महिन्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. सरकारच्या या दुहेरी धोरणामुळे भारतीय स्टील उत्पादक आणि रासायनिक कंपन्यांना चिनी स्पर्धेपासून संरक्षण मिळेल, तर कोळसा खाण क्षेत्रात गुंतवणूक वाढून उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होईल.

### राष्ट्रपती मुर्मू पाणबुडीतून प्रवास...

तयार केली. या घटनेला १०० वर्षे झाल्याच्या निमित्ताने विशेष सोहळा होत आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे या कार्यक्रमाआधीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एक मोठी घोषणा केली आहे. भारताचे संविधान संथाली भाषिकांसाठी ओल लिपीत छापले जाईल, असे अमित शहांनी जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम होत आहे. जमशेदपूरमध्येच सोमवारी एनआयटीच्या १५ व्या दीक्षांत समारंभालाही राष्ट्रपती संबोधित करणार आहेत. राष्ट्रपती मंगळवार ३० डिसेंबर रोजी झारखंडमधील गुमला येथे आंतरराज्य जनसांस्कृतिक समागम सोहळ्यातील कार्तिक जत्रेला संबोधित करणार आहेत.

### अखेर पाकच्या सरकारी...

आणणे हे आरिफ हबीब यांच्या गुंतवणुकीच्या धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.

कोण आहेत आरिफ हबीब?

आरिफ हबीब हे पाकिस्तानमधील अत्यंत यशस्वी उद्योजक आणि आरिफ हबीब समूहाचे संस्थापक आहेत. विशेष म्हणजे त्यांचे मूळ धागेदोरे भारताच्या गुजरात राज्याशी जोडलेले आहेत. हबीब यांचे कुटुंब मूळचे गुजरातच्या जुनागढ जिल्ह्यातील बंटवा गावचे रहिवासी होते. मात्र १९४७ मध्ये फाळणीच्या वेळी त्यांचे कुटुंब आपली सर्व मालमत्ता आणि गुजरातचा चहाचा व्यवसाय सोडून पाकिस्तानमधील कराचीमध्ये स्थायिक झाले. आरिफ हबीब यांचा व्यावसायिक प्रवास एखाद्या चित्रपटाप्रमाणे आहे. त्यांनी १९७० मध्ये कराची स्टॉक एक्सचेंजमध्ये स्टॉक ब्रोकर म्हणून कामाला सुरुवात केली होती. पुढे आपल्या कष्टाने आणि बुद्धीने त्यांनी स्वतःचे साम्राज्य उभे केले. ते अनेक वेळा कराची स्टॉक एक्सचेंजचे अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. आरिफ हबीब समूह आज रिअल इस्टेट, सिमेंट, खत, ऊर्जा, पोलाद आणि वित्तीय सेवा अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. एवढ्या व्यावसायात सक्रिय असलेल्या हबीब यांची वैयक्तिक संपत्ती सुमारे ५०० दशलक्ष डॉलर्सच्या आसपास असल्याचा अंदाज आहे.

# ३,७९८ शाळांचे 'जिओ टॅगिंग' अपूर्ण!

» प्रक्रिया पूर्ण करण्याची १० दिवसांची मुदत » शिक्षण आयुक्तांचा कडक पवित्रा



**मुंबई, दि. २६** वृत्तसंस्था

'जिओ टॅगिंग' करण्याबाबत दिरंगाई होत असल्याने राज्यातील ३ हजार ७९८ शाळांचे अद्यापपर्यंत मॅपिंग झालेले नाही. याबाबत शिक्षण विभागाकडून वारंवार सूचना देऊनही विलंब होत असल्याने संबंधित शाळांना १० दिवसांमध्ये प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले. राज्यातील शाळांना भौतिक सुविधांसह शाळेच्या ठिकाणाचे 'जिओ टॅगिंग' करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार राज्यातील जवळपास १ लाख ४ हजार ३६७ शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले आहे. तर तब्बल ३ हजार ७९८ शाळांनी जिओ टॅगिंगसंदर्भात कोणतीही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. क्षेत्रीय कार्यालयांकडून याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही काही शाळांकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, त्यामुळे प्रशासनाकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. ज्या शाळांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी पुढील १० दिवसांमध्ये ती पूर्ण करावी, असे निर्देश शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांसह विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधितांनी शाळांचे मॅपिंग का करण्यात आले नाही, शाळा बंद असतील तर संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी पडताळणी करून याबाबतची माहिती 'युडायस'मध्ये अद्ययावत करावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. मॅपिंग न केलेल्या शाळांचा अहवाल सर्व शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांना सादर करावा. त्यानंतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी शिक्षण आयुक्तालयास एकत्रित अहवाल सादर करावा, असे निर्देशही शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांनी दिले. शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रासह 'टॅग' करून सर्व सुविधांची माहिती एकत्रित करण्यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर या संस्थेद्वारे 'महास्कूल जीआयएस मोबाइल ॲप्लिकेशन' विकसित करण्यात आले आहे. त्यात 'जिओ टॅगिंग'ची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबतच्या सूचना राज्यातील शाळांना एप्रिलमध्ये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्यातील १ लाख ४ हजार ३६७ शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले असून ३ हजार ७९८ शाळांचे जिओ टॅगिंग अद्यापही शिल्लक आहे. आता उर्वरित शाळांना येत्या दहा दिवसांत याबाबतची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

# आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी घेतला भरपूर आनंद



**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातूर, दि. २६ :** पातूर पंचायत समिती अंतर्गत खेट्री येथील जि. प. उर्दू शाळेत २४ डिसेंबर रोजी आनंद मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन विविध आकर्षक दुकाने थाटली होती. खाद्यपदार्थ, खेळणी, हस्तकला वस्तू तसेच शैक्षणिक साहित्याच्या दुकाने पाहून उपस्थितांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेले पदार्थ व वस्तू विक्रीस ठेवले, ज्यामुळे त्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक नियोजन व संघभावनेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. मेळाव्याला पालक, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचा सर्वांगीण विकास होतो. मेळाव्यामुळे शाळेच्या वातावरणात उत्साह व चैतन्य निर्माण झाले. यावेळी सरपंच जहूर खान, उपसरपंच शेख राजिक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मो. वाजीद, जिल्हा परिषद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक इकबाल हुसेन, शिक्षक मो. सलीम, रहीम खान, नजीम खान, तसेच पालक उपस्थित होते.

# राज्यस्तरीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेत ४०० खेळाडूंचा सहभाग

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत अकोला येथील जसनागरा पब्लिक स्कूल येथे राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धा नुकतीच झाली. त्यात राज्यातील ४०० खेळाडू सहभागी होते. राज्य बेसबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष इंद्रजीत नितनवार, महाराष्ट्र राज्य बेसबॉल असोसिएशनचे तांत्रिक अधिकारी अशोक सरोदे, अकोला जिल्हा बेसबॉल संघटनेचे सचिव नारायण बत्तुले, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश भट, निवड समिती सदस्य राज्य क्रीडा मार्गदर्शक रेवन्ना शेलार, प्रा संतोष खेंडे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीसवितरण झाले. मुलांच्या विभागात पुणे, कोल्हापूर, अमरावती, नाशिक यांनी अनुक्रमे पहिली चार बक्षीसे पटकावली. मुलींच्या विभागात पुणे, मुंबई, नाशिक व नागपूर यांनी पहिली चार बक्षीसे मिळवली.

पंच म्हणून आकाश साबणे (परभणी), विक्की सैरिसे (अमरावती), अकलिम शहा (अमरावती), तौफिक शहा (अमरावती), अभिजीत स्वर्गे (अमरावती), आरती भगत (कोल्हापूर), सायमा बाजवान (परभणी), रजत हिरोडे (अकोला), जहागीर शेख (लातूर) यांनी केले. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंच्या निवासाची व क्रीडांगणाची व्यवस्था जसनागरा पब्लिक स्कूलमध्ये करण्यात आली. स्पर्धेचे नियोजन जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सतीशचंद्र भट्ट, क्रीडा मार्गदर्शक श्रीमती डॉ. नलिनी जाधव, डॉ. अभिजीत फिरके, राजेश गावंडे (जिल्हा संघटक) श्रीमती मनीषा ठाकरे क्री. अ. निशांत वानखडे, गजानन चारसे यांनी परिश्रम घेतले.

# आरसेटी अकोलात 'ॲडव्हान्स मेकअप' प्रशिक्षण संपन्न; महिलांना स्वावलंबनाची संधी

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**डोंगरगाव, दि. २६ :** ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया ग्रामीण स्वरोजगार प्रशिक्षण संस्था, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले 'जनरल ईडीपी ॲडव्हान्स मेकअप' प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न झाले. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण १२ ते १७ डिसेंबर २०२५ या कालावधीत घेण्यात आले. सहा दिवस चाललेल्या या प्रशिक्षणात प्रशिक्षक अनिता पाटील यांनी आधुनिक मेकअप तंत्र, ब्राइडल मेकअप तसेच ब्युटी पार्लर व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिक स्वरूपात कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले. आरसेटीचे संचालक विद्या शंकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये फॅकल्टी श्वेता लोडम, रश्मी घाटोळ, पूनम देशमुख, धनंजय माजरे, शुभम शेगोकार यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रशिक्षणामुळे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आत्मविश्वास मिळाल्याचे मत सहभागी महिलांनी व्यक्त केले. आरसेटी अकोला मार्फत वर्षभर शिलाईकाम, ब्युटी पार्लर, कृषी व्यवसाय आदी विविध मोफत व्यावसायिक प्रशिक्षण राबविले जात असून इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आरसेटी अकोला येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# अकोला येथे कलाल समाजाचा भव्य मेळावा २८ डिसेंबरला

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २६ :** अकोला जिल्हा कलाल समाज कार्यकारिणीच्या वतीने येत्या रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी श्री नाना मंगलम, डाबकी रोड, अकोला येथे कलाल समाजाचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी व तालुका कार्यकारिणीचा परिचय करून देण्यासाठी नुकताच गुरुकृपा लॉन येथे स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला जिल्हा कलाल समाज मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजयराव लोहकपुरे, कार्यकारी अध्यक्ष भैय्यासाहेब उजवणे, कार्याध्यक्ष नानाभाऊ रुमाले, सरचिटणीस अमोल चिलात्रे, कोषाध्यक्ष अनिल खराटे, प्रसिद्धीप्रमुख नंदकिशोर शंकरपुरे, तसेच ज्येष्ठ सदस्य अरुण चवणे, दादा उजवणे, निळकंठ लोहकपुरे यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत सावजी महाराज यांच्या मूर्तीपूजन व दीपप्रज्वलनाने झाली. अकोला तालुका अध्यक्ष योगेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांनी मेळाव्याबाबत मार्गदर्शन केले. गुणवंत विद्यार्थ्यांनी गुणपत्रिका सादर कराव्यात व विवाह इच्छुकांनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले. यावेळी अकोला तालुका कार्यकारिणी अध्यक्ष योगेश राऊत, कार्याध्यक्ष योगेश चितोडे, उपाध्यक्ष अनिल काळे, सचिन खराटे, सरचिटणीस अण्णासाहेब उजवणे, सचिन बडोदे, प्रसिद्धीप्रमुख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अमोल चिलात्रे यांनी तर आभार रवी करोडदेव यांनी मानले.

# बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत महिला शिक्षिकांसाठी कायदेविषयक कार्यशाळा

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला, शिक्षण विभाग जिल्हा परिषद अकोला व गट शिक्षणाधिकारी कार्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह मुक्त भारत संकल्प अभियान (१०० दिवस) व बेटी बचाव बेटी पढाव उपक्रमांतर्गत दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी न्यू इंग्लिश हायस्कूल, अकोला येथे महिला शिक्षिकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन रोशनी बन्सल (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला) यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक गिरीश पुसदकर (जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, अकोला) यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य माधव मुंशी होते, तर प्रमुख पाहुणे रतनसिंग पवार (शिक्षणाधिकारी, अकोला) होते. मार्गदर्शन ॲड. संजय सेंगर, प्रांजली जैस्वाल, शुभांगी लाहुडकर, ॲड. मनिषा भोरे, गोपाल मुकुंदे, डॉ. प्रीती कोगदे व कल्याणकर यांनी केले. बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण अधिनियम, बालविवाह अधिनियम, बाल न्याय अधिनियम, सायबर सुरक्षितता व कौटुंबिक हिंसाचार अधिनियम यावर सविस्तर माहिती देण्यात आली. अकोला तालुक्यातील २८४ महिला शिक्षिकांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन वर्षा सरनाईक यांनी केले. विद्यार्थी सुरक्षितता व शासन निर्णय अंमलबजावणीवर आरती जाधव यांनी मार्गदर्शन केले व आभार मानले. सुनील लाडूलकर, आरती जाधव यांच्यासह योगिता साखरकर, प्रिया इंगळे, महेंद्र गनोदे व राम चतुरकर उपस्थित होते.

# पुरुष दास्यातून मुक्त झालेली महिला, मानसिक दास्यातून केव्हा मुक्त होणार? -सविताताई मुंडे




**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**नांदुरा, दि. २६ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृति दहन करून महिलांना पुरुष तसेच सामाजिक दास्यातून मुक्त केले. तिच महिला ९७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतरही मानसिक तसेच कर्मकांडातून कधी मुक्त होणार ? असा प्रश्न वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य सविताताई मुंडे यांनी उपस्थित केला. त्या वंचित बहुजन आघाडी जिल्हा शाखा बुलढाणाच्या वतीने आयोजित महिला मुक्ती दिन मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ ,सावित्रीमाई फुले, माता रमाई तसेच महापुरुषांच्या फोटोला माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष छायाताई बांगर यांनी आपल्या मनोगतात मनुच्या कायद्यामुळे स्त्रीला दाराचा उंबरठाही ओलांडता येत नव्हता. तीच स्त्री सातासमुद्रापलीकडे जाऊन पोहोचली असून देशाच्या पंतप्रधान व राष्ट्रपती पदालाही तिने गवसणी घातली आहे .याचे संपूर्ण श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या मनुस्मृति दहन व भारतीय संविधानाने महिलांना दिलेल्या अधिकारामुळे शक्य झाल्याचे सांगितले. यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या पार्वताबाई इंगळे, सुमनताई थाटे, डॉ. सुलोचना शिरसाट यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केले. यावेळी एकूण सात ठराव घेण्यात आले त्यामध्ये २५ डिसेंबर मनुस्मृति दहन दिवस हा भारतीय स्त्री मुक्ती दिन म्हणून जाहीर करावा, लोकसभेने ३३ व्या घटनादुरुस्ती द्वारे देशाच्या लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षण विधेयक मंजूर केले आहे .त्यामध्ये ओबीसी व मुस्लिम अल्पसंख्यांक महिलांसाठी विशेष तरतूद करण्यात यावी, महिलांचा सन्मान व सुरक्षितता आणि सक्षमीकरण या उद्देशानेच महिलांसाठी योजना आखण्यात पाहिजे, शासकीय शाळा बंद पडू नयेत यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, डॉ. संपदा मुंडे यांच्या संशयास्पद मृत्यूची निपक्ष चौकशी झाली पाहिजे, दिनांक ६ सप्टेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनाने केलेला कुणबी प्रमाणपत्र बदलाचा जीआर रद्द करण्यात यावा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कृषी मालाला हमीभाव देण्यात यावा, या ठरावांचा समावेश होता. वंचित बहुजन आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्ष विशाखा ताई सावंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक माळी भवन मंगल कार्यालयात दिनांक २५ डिसेंबरला झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रीतीताई शेगोकार तर संचलन मंगला पारवे व आभार प्रदर्शन सुनिता हेलोडे यांनी केले.

# आजपासून हडपसर ते नागपूर, पुणे ते नागपूर आणि हडपसर ते राणी कमलापती दरम्यान अतिरिक्त विशेष सेवा

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेद्वारे नागपूर ते हडपसर , नागपूर ते पुणे आणि हडपसर ते राणी कमलापती अतिरिक्त विशेष गाडी चालवण्यात येणार आहे. ही सेवा २८ डिसेंबरपासून सुरु होणार आहे. या निर्णयामुळे अकोलेकर प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार आहे. काही दिवसांपासन मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातर्फे प्रवाशांसाठी उत्सवाच्या निमित्ताने विशेष गाड्यांची घोषणा केली होती. राजकोट-महबूबनगर आणि ओखा-मदुराई या मार्गादरम्यान विशेष भाड्याने उत्सव विशेष गाड्या चालावण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून विशेष गाड्यांचे नियोजन केले. त्या 'ऑन डिमांड स्पेशल' म्हणून चालविण्याची घोषणा करण्यात आली. त्यानंतर वलसाड - बिलासपूर रेल्वे चालवण्याचा निर्णय घेण्यात आला. नंतर लोकमान्य टिळक टर्मिनस-सबलपूर दरम्यान विशेष गाडीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यांना अनारक्षित गाड्यांचा कलावधी वाढण्यात आला. आता हडपसर ते नागपूर, पुणे ते नागपूर आणि हडपसर ते राणी कमलापती दरम्यान अतिरिक्त विशेष सेवा सुरु होणार आहे. या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रक जाणून घेण्यासाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट देता येणार आहे. अशा आहेत गाड्या १) हडपसर ते नागपूर विशेष गाडी:- गाडी क्रमांक ०१२२२ विशेष २८, ३० डिसेंबर, १ जानेवारी आणि ४ जानेवारी रोजी हडपसर येथून १५.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता नागपूर येथे पोहचणार आहे. २) गाडी क्रमांक ०१२२१ ही रेल्वे २९ डिसेंबर ३१ डिसेंबर व २ जानेवारी रोजी नागपूर येथून १९.४० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ११.२५ वाजता हडपसर येथे पोहचेल. येथे राहणार थांबे आजपासून हडपसर ते नागपूर, पुणे ते नागपूर आणि हडपसर ते राणी कमलापती या गाड्यांचे थांबे निश्चित करण्यात आले आहे. यात उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव ,वर्धा आणि अजनीचा समावेश आहे. अशी आहे संरचना आजपासून हडपसर ते नागपूर, पुणे ते नागपूर आणि हडपसर ते राणी कमलापती या दरम्यान धावणाऱ्या गाड्यांची संरचना पुढील प्रमाणे आहे. ०२ प्रथम वातानुकूलित श्रेणी, ०४ द्वितीय वातानुकूलित श्रेणी, १२ वातानुकूलित तृतीय, आणि २ सामान्य द्वितीयसह गार्ड ब्रेक व्हॅन राहणार आहे.

## व्याख्यान

### स्मृती पर्वात संविधानात्मक मूल्यांवर मंथन-धर्मकीर्ती महाराज

# विषमतावादी व्यवस्था नष्ट करण्यासाठी 'समतेची फवारणी' गरजेची!

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



'गाडी, माडी आणि साडी'च्या मोहात अडकला समाज धर्मकीर्ती महाराजांनी आपल्या भाषणात सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर कडाडून प्रहार केला. 'महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर संघर्ष करून समाजाला अधिकार मिळवून दिले. मात्र, आजचा सुशिक्षित वर्ग केवळ स्वतःची 'गाडी', राहायला 'माडी' (घर) आणि बायकोला 'साडी' यातच अडकून पडला आहे. भ्रष्टाचाराच्या चिखलात अडकलेल्या या वर्गाला पुन्हा सामाजिक भान देण्याची गरज आहे,' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

**यवतमाळ, दि. २६ :** 'समाजातील विषमतावादी व्यवस्था मुळापासून उखडून टाकायची असेल, तर केवळ वरवरचे उपाय कामाचे नाहीत. त्यासाठी आता प्रत्येक नागरिकाच्या मनात 'समतेची फवारणी' करणे गरजेचे आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अपार कष्टाने पेरलेले समतेचे बीज आपल्याच हातून नष्ट होता कामा नये,' असे स्पष्ट प्रतिपादन परभणी येथील प्रसिद्ध व्याख्याते धर्मकीर्ती महाराज यांनी केले. येथील जमाते इस्लामी हिंद संघटनेच्यावतीने आयोजित 'महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पर्व' कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. 'संविधानिक मूल्यांची पुनर्स्थापना आणि भारतीय लोकशाहीचे भवितव्य' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. धर्मकीर्ती महाराज पुढे म्हणाले, 'इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने सामान्य माणसावर अन्याय करून त्याला प्रगतीपासून दूर ठेवले. आज दुर्दैवाने सामाजिक समतेसाठी लढणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. बहुजन समाजातील अनेक उच्चशिक्षित अधिकारी आणि कर्मचारी केवळ 'गाडी, माडी, साडी आणि भ्रष्टाचार' यांच्या दलदलीत लोटांगण घालत आहेत. स्वार्थापोटी आपण महापुरुषांचे विचार विसरत चाललो आहोत की काय, अशी भीतीदायक परिस्थिती निर्माण झाली आहे.' मुस्लिमांच्या सहकार्याचे स्मरण यावेळी प्राध्यापक सय्यद सलमान सय्यद शेरू यांनी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात मुस्लीम समाजाने दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. फुले आणि आंबेडकरांच्या कठीण काळात मुस्लीम सहकाऱ्यांनी त्यांना कशी खंबीर साथ दिली, याचे ऐतिहासिक दाखले त्यांनी पुराव्यानिशी सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्मृती पर्वाचे प्रवक्ता प्रा. बशीर खान यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. काशीपूर रहमान यांनी तर आभार अयाज खान यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एतेशयाम साहेब, मोहम्मद साजिद, हकीम मुमताज अहमद खान, रियाज हुसेन सिद्दिकी यांच्यासह जमाते इस्लामी हिंदच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या यवतमाळ शहरातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

### नाताळला महाराष्ट्र, केरळ राज्यात तोडफोड

**नवी दिल्ली :** देशभरात ख्रिसमस सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतानाच, छत्तीसगड, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि केरळमधून विरोध प्रदर्शन, तोडफोड आणि झटापटीच्या घटना घडल्या. काही ठिकाणी धार्मिक संघटनांकडून निषेध व्यक्त करण्यात आला, छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यातील आमाबेडा येथे धर्मांतराच्या घटनेच्या निषेधार्थ 'छत्तीसगड सर्व समाजा'ने राज्यव्यापी बंदची हाक दिली होती. दरम्यान, हरियाणातील गुरुग्राममध्ये हिंदू संघटनांच्या विरोधामुळे ख्रिसमस पार्टी रद्द करण्यात आली. महाराष्ट्रातील नवी मुंबईच्या दिघा परिसरात एका मोबाईल दुकानात घुसून अर्जुन सिंह या हिंदू युवकाला मारहाण करण्यात आली.अर्जुनने आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसवर 'मला ख्रिसमसच्या शुभेच्छा देऊ नका' असे लिहिले.

# वैष्णोदेवीच्या भाविकांसाठी नवे निर्बंध

## देवस्थान बोर्डाकडून घोषणा; नोंदणीनंतर २४ तासांत यात्रा पूर्ण करणे बंधनकारक



**जम्मू: दि. २६** वृत्तसंस्था

नव्या वर्षात यात्रा व्यवस्थापन अधिक चांगले करण्याच्या नावाखाली माता वैष्णोदेवी देवस्थान बोर्डाने येणाऱ्या भाविकांवर अनेक प्रकारचे निर्बंध लावण्याची घोषणा केली आहे. बोर्डाच्या या निर्णयांबाबत कुठे नाराजी तर कुठे समाधानाचे वातावरण आहे; मात्र बोर्डाचा दावा आहे की, हे सर्व बदल यात्रेच्या हितासाठीच आहेत.
गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी देवस्थानने काही बदल केले आहेत. नव्या निर्बंधांनुसार, भाविकांनी नोंदणीनंतर २४ तासांच्या आत माता वैष्णोदेवीची यात्रा पूर्ण करणे बंधनकारक असेल. बोर्डाचा दावा आहे की, कटरा ते माता वैष्णो देवी मंदिर परिसरापर्यंत भाविकांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी हे बदल करण्यात आले आहेत.
यासोबतच, बोर्डाने सर्व भाविकांना सूचना दिली आहे की, जे भाविक बाणगंगा येथून पायी यात्रा सुरू करतात, त्यांनी २४ तासांच्या आत पुन्हा बाणगंगाला रिपोर्ट द्यावा लागेल. त्यामुळे जर तुम्ही या नव्या वर्षात श्री माता वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जाण्याचा विचार करत असाल, तर आपल्या प्रवासाच्या वेळापत्रकावर पुन्हा एकदा नजर टाकणे गरजेचे आहे.
नव्या वर्षात आणि त्यानंतर होणारी भाविकांची प्रचंड गर्दी अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रित करण्यासाठी हे बदल केले आहेत. बोर्डाचा दावा आहे की, या मार्गदर्शक सूचनांनंतर यात्रेकरू समाधानी आहेत. काही भाविकांनी सांगितले की, नवे नियम यात्रा अधिक सुव्यवस्थित करतील. काही ठिकाणी नाराजीही व्यक्त केली जात आहे. याशिवाय, माता वैष्णोदेवी मंदिर परिसर ते भैरों घाटी दरम्यानच्या रोपवे तिकिटांसाठीही वेळ निश्चित करण्यात आली आहे. आता जे भाविक रोपवेचे तिकीट घेतील, त्यांना २ तासांच्या आत भैरों घाटीची यात्रा पूर्ण करावी लागेल.

## महत्त्वाचे

### झोपेत दहाव्या मजल्यावरुन कोसळला, पण ग्रिलमध्ये पाय अडकल्याने वाचला जीव

**सूरत:**गुजरातमधल्या सूरतमध्ये एक माणूस झोपेत १० व्या मजल्यावरुन खाली पडला तरीही त्याचा जीव वाचला आहे. कारण त्याचा पाय एका जाळीत अडकला त्यामुळे तो खाली आपटला नाही. देव तारी त्याला कोण मारी या उक्तीचा प्रत्यय या माणसाला आला आहे. घरात खिडकीजवळ नितीनभाई झोपले होते. ते झोपेतच खाली कोसळले. पण सुदैवाने त्यांचा पाय एका ग्रिलमध्ये अडकला. त्यानंतर अग्निशमन दलाला बोलवण्यात आलं आणि त्यांना सुखरुप सोडवण्यात आलं. सकाळचे साधारण ८ वाजले होते. सुरतमधले रहिवासी नितीनभाई अदिया हे त्यांच्या घरातल्या खोलीत खिडकीजवळ झोपले होते. झोपेतच ते खाली पडले. मात्र त्यांचं दैव बलवत्तर होतं त्यामुळे आठव्या मजल्यावरच्या ग्रीलमध्ये त्यांचा पाय अडकला आणि ते खाली आपटले नाहीत तर तिथेच अडकून पडले. आठव्या मजल्यावरच्या ग्रीलमध्ये त्यांचा पाय अडकला आणि ते उलट्या अवस्थेत तिथेच अडकले. ही घटना सुरतमधल्या जहांगीरपुरा भागातल्या टाइम्स गॅलेक्सी इमारतीत घडली. तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आलं. त्यांनी प्रयत्नपूर्वक नितीन भाईंना वाचवलं.

### राहुल गांधींवर भारतीय दुतावासाकडून पाळत ठेवली जात-सॅम पित्रोदा

**नवी दिल्ली :** राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांच्या दरम्यान भारतीय दुतावासांकडून त्यांच्यावर पाळत ठेवली जाते आहे. अनेकदा परदेशातील नेत्यांना भेटू नका असं त्यांना सांगितलं जातं. इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते सॅम पित्रोदांनी म्हटलं आहे आणि केंद्र सरकारवर आरोप केला आहे.
'भारतीय दुतावासाकडून राहुल गांधींवर नजर ठेवली जाते, राहुल गांधीचा परदेश दौरा हा काही अचानक ठरलेला नसतो. तो काही महिन्यांपूर्वी ठरलेला असतो. नियोजित दौरा असूनही राहुल गांधींवर भारतीय दुतावास पाळत ठेवतात.'' यानंतर सॅम पित्रोदा म्हणाले की राहुल गांधींनी जे वक्तव्य जर्मनीत केलं ते सत्य होतं. आपल्या देशात सत्य बोललं तर ते आंतरराष्ट्रीय पातळीवर जातं. परदेशात सत्य बोललं तर ते तेथील देशांत जातं, सत्य देशात बोललं गेलं काय किंवा परदेशात बोललं गेलं काय? ते सत्यच असतं त्याचे कुठलेही दुहेरी निकष नसतात असंही सॅम पित्रोदांनी म्हटलंय. राहुल गांधी हे जर्मनीला गेले होते कारण त्यांची प्रोग्रेसिव्ह अलायन्सच्या बैठकीत उपस्थिती होती.

# प्रत्येक कुटुंबात किमान तीन मुले हवीत: मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू

**तिरुपती दि. २६** वृत्तसंस्था



आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी लोकसंख्या वाढ आणि भारताचे जागतिक नेतृत्व यावर एक अत्यंत महत्त्वाचे आणि चर्चेत राहील असे विधान केले आहे. 'भारताला जर जागतिक महासत्ता बनायचे असेल, तर देशातील लोकसंख्या, ज्ञान आणि कौशल्य यांची सांगड आपल्या पारंपरिक मूल्यांशी घालणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन त्यांनी केले. विशेष म्हणजे, देशातील लोकसंख्येचे संतुलन राखण्यासाठी त्यांनी प्रत्येक जोडप्याला किमान तीन मुले असावीत, असा सल्ला दिला आहे.
नुकत्याच पार पडलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये बोलताना नायडू यांनी भारताच्या भविष्याचा आराखडा मांडला. आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्या विचारांशी सहमती दर्शवत नायडू म्हणाले की, 'जर आपल्या तरुणांचे टॅलेंट आणि आपली लोकसंख्या योग्य दिशेने आणि राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित झाली, तर भारताला जगातील सर्वोच्च शक्ती बनण्यापासून कोणीही रोखू शकत नाही.' यावेळी त्यांनी १९६१ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचेही कौतुक केले. हे विद्यापीठ भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचा अभिमान जपण्याचे प्रमुख केंद्र असल्याचे त्यांनी नमूद केले.

### गंगा-कावेरी जोडप्रकल्प हे देशाचे स्वप्न

लोकसंख्येसोबतच संसाधनांच्या नियोजनावरही त्यांनी भर दिला. राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाचे समर्थन करताना त्यांनी गंगा-कावेरी प्रकल्प हे देशाचे दीर्घकाळापासूनचे स्वप्न असल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्राथमिकतांमध्ये जलसुरक्षेचा समावेश आहे. सर्व राज्यांनी परस्पर सामंजस्याने हा प्रकल्प राबवल्यास शेती आणि उद्योगाला नवीन संजीवनी मिळेल. देशात पाण्याचे समान वाटप झाल्यास विकास प्रक्रियेला वेग येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारताची बौद्धिक ताकद नवीन नाही, हे सांगताना नायडू यांनी इतिहासातील अनेक दाखले दिले. ४,५०० वर्षांपूर्वीचे प्रगत नगररचना शास्त्र, तक्षशिला आणि नालंदा यांसारख्या विद्यापीठांनी जगाला गणित, खगोलशास्त्र आणि अर्थशास्त्राचे ज्ञान, हजारो वर्षांपूर्वी भारताने आध्यात्मिक आणि वैद्यकीय क्षेत्रात क्रांती यांचाही त्यांनी यावेळी दाखला दिला. चंद्राबाबू नायडू यांनी भारतीय आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांच्या उच्च उत्पन्नाचा उल्लेख करत हे भारताचे मोठे स्ट्रॅटेजिक ॲडव्हांटेज असल्याचे सांगितले. १९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर भारताने घेतलेली झेप पाहता, भारत लवकरच जगातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल आणि २०४७ पर्यंत आपण पहिल्या क्रमांकावर असू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## जपानमध्ये कंपनीत कामगारांवर हल्ला, १४ कामगारांना चाकूने भोसकले

**नवी दिल्ली दि. २६** वृत्तसंस्था



जपानमधील मिशिमा शहरातील एका कंपनीत १४ कामगारांवर चाकूने हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. हल्लेखोराने हल्ला करण्यासाठी रासायनिक 'स्प्रे'चा वापर केला. 'स्प्रे'चा मारा करून त्याने १४ कामगारांना चाकूने भोसकले. या हल्ल्यात सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमी झालेल्या कामगारांवर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. जपानमध्ये गुन्हे घडण्याचे प्रमाण कमी असून बंदुकीशी संबंधित कायदे कठोर आहेत. दरम्यान, मागील काही वर्षांत जपानमध्ये हिंसक घटना घडल्या आहेत.
अग्निशमन विभागाचे अधिकारी तोमोहारू सुगियामा म्हणाले, ''आज (शुक्रवारी) दुपारी साडेचार वाजता जवळील रबर कारखान्यात पाच ते सहा कामगारांवर हल्ला झाल्याची माहिती मिळाली. हल्लेखोराने हल्ला करताना 'स्प्रे'ने फवारणी केली. जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेतून रूग्णालयात दाखल केले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. रबर कारखान्यात कामगारांवर हल्ला करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.
खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा आरोपीवर दाखल करण्यात आला आहे. सुगियामा म्हणाले, १४ कामगारांपैकी ६ कामगारांना रुग्णवाहिकेतून रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना काय इजा झाली आहे, याबद्दल अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. दरम्यान, हा हल्ला 'योकोहामा रबर कंपनी'त झाला. ही कंपनी बस व ट्रकचे टायर बनवण्याचे काम करते.

## बांगलादेशमध्ये हिंदू युवकांची हत्या, भारताकडून तीव्र निषेध व्यक्त





**नवी दिल्ली : दि. २६** वृत्तसंस्था

बांगलादेशमध्ये उसळलेल्या हिंसाचारात हिंदूंवर अत्याचार करण्यात येत आहेत. मागच्या आठवड्यात दोन हिंदू युवकांची हत्या करण्यात आली. या घटनांचा शुक्रवारी भारताकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत बांगलादेशमध्ये अल्पसंख्याक समाजाविरुद्ध होत असलेल्या घटनांना अखंड शत्रुत्वाची संज्ञा दिली.
मागच्या आठवड्यात राजधानी ढाकापासून १०० किमी अंतरावर असलेल्या मैमनसिंग येथे जमावाने ३० वर्षीय दीपू चंद्र दास नावाच्या कामगाराची हत्या केली होती. त्याला मारहाण करतानाचा व्हिडीओही व्हायरल झाला होता. दीपूचा नग्नावस्थेतील मृतदेह झाडाला बांधून आल लावण्यात आली होती. इतक्या क्रूर पद्धतीने हत्या करताना जमाव आनंद साजरा करताना दिसत होता.परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत रणधीर जयस्वाल म्हणाले, ''बांगलादेशमध्ये हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्धांसह अल्पसंख्याकांविरुद्ध सुरू असलेला हिंसाचार गंभीर चिंतेचा विषय आहे. मैमनसिंगमध्ये एका हिंदू तरूणाला अतिशय क्रूर पद्धतीने मारण्यात आले. या निर्घृण हत्येचा आम्ही निषेध करतो. या घटनेतील गुन्हेगारांना शिक्षा होईल, अशी अपेक्षा करतो.

## लग्नाला नकार देताच झाडल्या गोळ्या

**गुरुग्राम:** लग्नाचा प्रस्ताव नाकारल्यामुळे एका २५ वर्षीय महिलेवर गोळीबार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. गुरुग्राममध्ये ही घटना १९ डिसेंबरच्या रात्री घडली असून, पीडितेवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी २५ डिसेंबर रोजी उत्तर प्रदेशातील बडौत येथून दोन संशयीत आरोपींना अटक केली. तुषार उर्फ जॉन्टी (वय २५) आणि शुभम उर्फ जॉनी (वय २४) अशी त्यांची नावे असून दोघेही दिल्लीच्या संगम विहारचे रहिवासी आहेत.
दिल्लीतील नजफगड येथील रहिवासी असलेल्या कल्पना (वय २५) ही गुरुग्राममधील एका क्लबमध्ये काम करते. तिचे पतीने पोलिसांत लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, १९ डिसेंबरच्या रात्री साधारण १ च्या सुमारास कल्पनाने त्याला फोन करून सांगितले की, संगम विहार येथील रहिवासी असलेल्या तुषारने तिच्यावर गोळी झाडली.

## बंगाली अभिनेत्री पर्णो मित्राची ६ वर्षांनंतर तृणमूलमध्ये घरवापसी

**नवी दिल्ली दि. २६** वृत्तसंस्था



बंगाली अभिनेत्री पर्णो मित्रा यांनी सहा वर्षांनंतर तृणमूल काँग्रेस पक्षात घरवापसी केली आहे. पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर पर्णो यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यांनी बंगाली टिव्ही सिरियल तसेच चित्रपटांमध्ये काम केले आहे. भाजपामध्ये जाण्याचा निर्णय चुकीचा होता, असे पर्णो यांनी म्हटले आहे.
बंगाली अभिनेत्री पर्णो मित्रा यांनी २०१९ मध्ये तृणमूल काँग्रेस पक्षातून बाहेर पडत भाजपामध्ये प्रवेश केला होता. २०२१ मध्ये पर्णो यांनी भाजपाकडून पश्चिम बंगाल विधानसभेची निवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा पराभव झाला. तृणमूल काँग्रेसच्या उमेदवाराने पर्णो यांचा पराभव केला होता. आता आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पर्णो यांनी भाजपातून ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षात घरवापसी केली आहे.भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय चुकीचा होता, असे पर्णो यांनी म्हटले आहे. पर्णो मित्रा म्हणाल्या, ''भाजपात प्रवेश करणं ही चूक होती. त्या चुका सुधारण्याची वेळ आता आली आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वात मी तृणमूल काँग्रेस पक्षात प्रवेश केला, त्यामुळे आजचा दिवस माझ्यासाठी महत्वाचा आहे. मी सहा वर्षांपूर्वी भाजपामध्ये प्रवेश केला होता. पण, गोष्टी योग्य पद्धतीने झाल्या नाहीत. भाजपात प्रवेश ही माझी चूक होती. त्या चुका सुधारण्याची वेळ आता आली आहे.'' दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये २०२६ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.

## महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ११, अंक ४३) गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर, २३-२९, २०२५/कार्तिक १-७, शके १९४७ (पृष्ठे ६, किंमत रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**भाग एक-अमरावती विभागीय पुरवणी**

अनुक्रमणिका


| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| भाग एक - शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ चार-अ ,चार-ब व चार-क, यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही | भाग एक-अ. (भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-६ |
| संकीर्ण अधिसूचना:नेमणुका इ. इ.,केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-६ | | |


**शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी**

नाही

**संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी**

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा. अ. क्र. ३१०.

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून**

**शुद्धीपत्र**

क्रमांक उविअ/भूसंपादन-कावि-४८४/२०२५.--

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २० ते २६ फेब्रुवारी, २०२५ मधील भाग-१ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १०९ मध्ये भूसंपादन प्रकरण क्रमांक एल. एक्यु-४७-काठी-१९-२०२४-२५ करीता अधिसूचना कलम ११ प्रकाशित झाली आहे. परंतु सदर प्रकरण थेट खरेदीने भूसंपादनाच्या कार्यवाहीकरीता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर भूसंपादन प्रस्ताव खाजगी जमीन थेट खरेदीचा असल्याने यात कलम ११ राजपत्रात प्रकाशित होणे आवश्यक नाही. सबब, सदर राजपत्रातील नमूद प्रकाशित कलम ११ रद्द समजण्यात यावी. थेट खरेदीकरीता असलेल्या सदर भूसंपादन प्रकरण क्रमांक एल. एक्यु-४७-काठी-१९-२०२४-२५ करीता निम्नलिखितप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**जाहिर सूचना**

क्रमांक उविअ-भूसंपादन-कदि-४८४-२०२५

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, अकोला, यांनी '' काटीपाटी संग्राहक बॅरेज लघु पाटबंधारे योजना'' प्रकल्पाच्या पोहोच रस्त्याच्या कामासाठी मौजे काटी, तहसील व जिल्हा अकोला येथील निम्नलिखीत जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी करण्यासाठीचा भूसंपादन प्रस्ताव सादर केल्यानुसार नमूद क्षेत्रातील भूधारकांची जमीन सरळ खरेदीने संपादित करण्यासाठी विचाराधीन आहे.

**जमिनीचे वर्णन**

थेट खरेदीचे भूसंपादन प्रकरण क्रमांक एल. एक्यू-४७-काटी-१९-२०२४-२५, गाव मौजे काटी, ता. जि. अकोला.

| अ.क्र. | गट नं. सर्वे नं. | गाव नमुना ७/१२ प्रमाणे लाभधारकाचे क्षेत्र | | | संपादित करावयाचे | भूधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडीचे क्षेत्र | पोटखराब क्षेत्र | एकूण क्षेत्र | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | | | (४) | (५) |
| | | हे. आर | हे. आर | हे. आर | हे. आर | |
| १ | ३ | ३.९० | ०.०१ | ३.९१ | ०.०६ | नारायण लहू दामोदर |
| २ | ४ पैकी | १.३७ | ०.०१ | १.३८ | ०.०४ | श्रीकृष्ण पुंडलिक प्रांजळे |
| ३ | ४ पैकी | ०.५१ | ०.०० | ०.५१ | ०.०२ | अशोक वामनराव प्रांजळे |
| ४ | १९ | ०.४५ | ०.०४ | ०.४९ | ०.०४ | मारोती संपत मराठे |
| ५ | १८ | १.९९ | ०.०३ | २.०२ | ०.०३ | पंकज सुरेश गावंडे |
| एकूण | | | | | ०.१९ | |

उपरोक्त नमूद मालमत्तांबाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध, गहाण उतर, ताबा, वारसाहक्क किंवा शासकीय, निमशासकीय, खाजगी वित्तीय संस्थेचा बोजा इतर कोणत्याही प्रकारचे असल्यास त्यांनी ही नोटीस जाहिर झाल्यापासून १० दिवसाचे आत आमचे कार्यालयात स्वतः जातीने अथवा वकीलामार्फत लेखी कागदोपत्री पुराव्यांसह लेखी हरकत नोंदवावी. नमूद कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास थेट खरेदीने भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त कोणत्याही प्रकारची तक्रार दखलपात्र ठरणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अकोला:
दिनांक ७ ऑक्टोबर, २०२५

**(अवाच्य),**
**उपविभागीय अधिकारी**
**तथा भूसंपादन अधिकारी, अकोला,**

## सौदीच्या वाळवंटातील बर्फवृष्टी भारतासाठी एक गंभीर इशारा?

**नवी दिल्ली दि. २६** वृत्तसंस्था



जगभरात हवामान बदलाचे गंभीर परिणाम पाहायला मिळत आहे. कुठे दुष्काळाची परिस्थिती आहे, कुठे पूरस्थिती आहे, तर अनेक भागांत अनैसर्गिक घटना घडताना दिसत आहेत. सौदी अरेबियातदेखील असेच काहीसे चित्र पाहायला मिळाले, ज्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. सौदी अरेबियाच्या वाळवंटात बर्फवृष्टी झाली आहे. सौदी अरेबियामध्ये हिमवृष्टी होणे ही तशी दुर्मीळ गोष्ट आहे, परंतु या हिवाळ्यात देशाच्या उत्तर भागात विलक्षण आणि चिंताजनक दृश्य पाहायला मिळाले. या अशा घटना सहसा थंड हवामान असलेल्या देशांमध्येच पाहायला मिळतात. सौदी अरेबियातील बर्फवृष्टी हा भारतासाठीही एक गंभीर इशारा मानला जात आहे, त्यामागील कारणे काय? जाणून घेऊयात
उत्तर सौदी अरेबियात झालेल्या आश्चर्यकारक हिमवृष्टीमुळे तबुक प्रांतातील डोंगररांगांचे रूप पूर्णपणे पालटून गेले आहे. समुद्रसपाटीपासून २,६०० मीटर उंचीवर असलेल्या 'जबेल अल-लॉझ'मधील 'ट्रोजेना' या पर्यटनस्थळावर बर्फाची पांढरी चादर पसरली आहे आणि या भागात हलका पाऊसदेखील पडत आहे. हाईल शहराच्या आसपासच्या परिसरासह हाईल प्रांतातही हिमवृष्टी झाली आहे. मध्यपूर्वेतील देशांसाठी ही एक दुर्मीळ घटना आहे.
तबुक आणि आसपासच्या डोंगराळ भागात तापमानाचा पारा कमालीचा खाली घसरला आहे, त्यामुळे प्रशासनाला हवामानाचा इशारा जारी करावा लागला. बर्फाच्छादित वाळवंटाचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले आहेत. हे व्हिडिओ केवळ तिथल्या सौंदर्यासाठी नव्हे, तर त्यातून मिळणाऱ्या संकेतांमुळे चर्चेत आले आहेत. वाळवंटातील या हिमवृष्टीने जगाला संकेत दिला आहे की, पृथ्वीच्या हवामान प्रणालीमध्ये काहीतरी मूलभूत बदल होत आहेत आणि त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. हवामान बदल ही आता केवळ भविष्यातील किंवा काल्पनिक भीती राहिलेली नाही, हे या घटनेने स्पष्ट केले आहे. हे बदल आता प्रत्यक्षात घडत आहेत,
हवामान बदल म्हणजे केवळ सर्वत्र उष्णता वाढणे असा होतो, असा मोठा गैरसमज आहे. अर्थ शास्त्रज्ञांच्या मते, वस्तुस्थिती याच्या अगदी उलट आहे. जसजशी पृथ्वी तापत आहे, तसतशी वातावरणात आर्द्रता आणि ऊर्जा साठवण्याची क्षमता वाढत आहे, ज्यामुळे हवामान चक्रांचा समतोल बिघडत आहे. याच कारणामुळे भारतासह संपूर्ण जगाला तीव्र उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी आणि अनपेक्षित ठिकाणी अचानक येणाऱ्या थंडीच्या लाटांचा सामना करावा लागत आहे. यावर्षी भारताने हा चिंताजनक कल प्रत्यक्ष अनुभवला आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात, उत्तर आणि मध्य भारतात उष्णतेच्या लाटा आल्या, ज्यानंतर उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि सिक्कीममध्ये ढगफुटीच्या विनाशकारी घटना घडल्या. हाच मान्सून काही भागात उशिरा पोहोचला आणि त्यामुळे या भागांत प्राणघातक पूरस्थिती निर्माण झाली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## महाराष्ट्रासाठी गौरवास्पद!

नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या विमानाने आकाशात झेप घेतली आणि अनेक विक्रमांची नोंद झाली. देशातील सर्वात मोठे ग्रीन फिल्ड विमानतळ प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी खुले झाले. देशातील एकाच शहरात दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ असण्याचा बहुमान मुंबईने पटकावला. महामार्ग, द्रुतगती मार्ग, उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि जलवाहतुकीने जोडलेले हे देशातील एकमेव विमानतळ आहे. जवळपास २८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नवी मुंबई विमानतळाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारले. १९९७ मध्ये या विमानतळाचा प्रस्ताव पुढे आला. २००७ मध्ये त्याला केंद्राने मान्यता दिली. दरम्यानच्या काळात झालेली सत्तांतरे आणि कोरोनाचा कालावधी, यामुळे विमानतळ आकारास येण्यास तीन वर्षांचा विलंब झाला. या विमानतळामुळे मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणारा भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. त्याचबरोबर कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांचा देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय प्रवास अधिक सुकर होणार आहे. सध्या प्रचंड मोठी वाहतूक कोंडी भेदत मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचावे लागते. जितका वेळ पुण्याहून मुंबईच्या वेशीपर्यंत येण्यासाठी लागतो तितकाच; किंबहुना त्याहीपेक्षा अधिक वेळ गर्दीच्या वेळेत मुंबईच्या वेशीवरून आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत पोहोचण्यासाठी लागतो. हा वेळ आता नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे वाचणार आहे. २०३२ पर्यंत या विमानतळावरून दरवर्षी तब्बल नऊ कोटी प्रवासी प्रवास करू शकणार आहेत. दुसरीकडे, अडीच दशलक्ष मेट्रिक टनांची मालवाहतूकदेखील या विमानतळावरून सुरू होईल. दोन समांतर धावपट्ट्या आणि चार टर्मिनल असलेले हे महाकाय विमानतळ येत्या काळात देशातील प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांपैकी एक असेल. देशातील कोणत्याही विमानतळावर नसतील इतक्या अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे हे विमानतळ महाराष्ट्रासाठी नक्कीच गौरवास्पद ठरेल. याच नवी मुंबईत जेएनपीटीसारखे आंतरराष्ट्रीय बंदर आहे. तिथून भारतीय उत्पादने जगभर जातात. विशेषतः, कृषी उत्पादने विदेशात पाठवण्यात हे बंदर सिंहाचा वाटा उचलते. आता या बंदराच्या जोडीलाच नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मालवाहतूक सुरू होईल. त्यामुळे भाजीपाला, फळे आणि मासे असा नाशिवंत माल विदेशात मोठ्या गतीने पोहोचू शकेल. एका विमानतळाच्या उभारणीमुळे परिसराचा काय कायापालट होऊ शकतो. हे पाहायचे असेल तर नवी मुंबईच्या थक्क होणाऱ्या प्रगतीकडे एक नजर फिरवावी लागेल. पायाभूत सुविधा, बांधकाम व्यवसाय, हॉटेल उद्योग, वैद्यकीय आणि शैक्षणिक सुविधा उभारण्यासाठी प्रचंड मोठी चढाओढ लागली आहे. अर्थात, याआधीच नवी मुंबईचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास सुरू झाला आहे. याशिवाय जगातील नामवंत विद्यापीठांनीदेखील नवी मुंबईमध्ये आपला परिसर उभारण्यासाठी महाराष्ट्र सरकारशी सामंजस्य करार केला आहे. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या येथे पाय रोवत आहेत. आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजाराची पायाभरणीदेखील झाली आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठे मोत्यांचे पार्क होऊ घातले आहे. भविष्यात नवी मुंबईसारखे शहर आंतरराष्ट्रीय नकाशावर झळकणार आहे. पायाभूत सुविधांतून कोणत्याही शहराच्या प्रगतीचा महामार्ग ठरत असतो. या शहराची वाटचाल त्यादृष्टीने वेगाने सुरू आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या प्रगतीला विशाल असे पंख लाभले आहेत. हे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होत असतानाच देशातील अनेक शहरांमध्ये मेट्रोचे जाळे विस्तारण्याचा निर्णय केंद्र आणि तेथील राज्य सरकारांनी घेतला आहे. राजधानी दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहराला मेट्रो मार्गामुळे बऱ्यापैकी दिलासा मिळाला आहे. आता हा मेट्रो मार्ग आणखी विस्तारणार आहे. १६ किलोमीटर लांबीच्या या विस्तारित मेट्रो मार्गावर १३ स्थानके तयार करण्यात येत आहेत. सध्या दिल्लीचे नाव वायू प्रदूषणाच्या बाबतीत जगभरात कुप्रसिद्ध आहे. या प्रदूषणाला रस्ते वाहतूक ४० टक्के कारणीभूत असल्याचा निष्कर्ष नुकताच काढण्यात आला आहे. हे प्रदूषण कमी करायचे असेल, तर धूरविरहित सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्यावे लागेल. दिल्लीत साडेतीन हजारांवर इलेक्ट्रिक बसेस धावतात. मात्र, मोठ्या लोकसंख्येच्या तुलनेत त्या अत्यंत कमी आहेत. रस्त्यांची मर्यादा लक्षात घेता एका ठराविक संख्येपर्यंतच या बसेस रस्त्यावर धावू शकतील. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा मोठा डोलारा मेट्रोवर अवलंबून असणार आहे. वातावरण प्रदूषणमुक्त राखण्यासाठी आणि जलदगतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास मेट्रोसारखा उत्तम पर्याय दुसरा नाही. त्यामुळेच दिल्ली मेट्रोच्या विस्तारीकरणाला केंद्र सरकारने १२,००० कोटींहून अधिक निधी देण्याचे ठरवले आहे. बंगळूरसारख्या महानगरातही कर्नाटक सरकारने मेट्रोचे जाळे विस्तारण्याचा निर्णय घेतला आहे. जपानच्या सहकार्याने बंगळूरमध्ये मेट्रो मार्गाची उभारणी सुरू आहे. पुढील वर्षी ३८ किलोमीटर, तर २०२७ पर्यंत १७५ किलोमीटरच्या मेट्रो मार्गाची उभारणी या शहरात केली जाईल. पर्यटन आणि माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांमुळे बंगळूरने आंतरराष्ट्रीय नकाशावर आपले स्थान निर्माण केले आहे. या शहराचे क्षेत्रफळ पाहता तिथे लोकसंख्येची दाटी अधिक आहे. खासगी वाहनांची संख्याही अधिक आहे. परिणामी, हे शहर सातत्याने वाहतूक कोंडीत अडकलेले असते. त्यावर उपाय म्हणून तेथे मेट्रो मार्गाचे जाळे अधिकाधिक पसरवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे जितके झपाट्याने हे जाळे विस्तारेल, तितकी या वाहतूक कोंडीतून नागरिकांची मुक्तता होईल. पुणे आणि नागपूर येथेही मेट्रो मार्ग शहराच्या विविध भागांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. नागपुरात दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सततच्या पाठपुराव्यांमुळे नागपूरची मेट्रो वेळेत सुरू झाली आणि त्याचे विस्तारीकरणही झपाट्याने होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पुणे मेट्रोसाठी सरकारने शंभर कोटींचे भाग भांडवल उभारण्यासाठी मंजुरी दिली. त्यामुळे या शहरातील मेट्रो मार्ग विस्तारण्यासाठी सज्ज झाला आहे. एकूणच देशातील मोठ्या शहरांत सार्वजनिक वाहतूक सुविधांची उभारणी झपाट्याने सुरू झाली आहे. यात प्राधान्याने महानगरांतील वाहनांमुळे होत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी मेट्रोसारखे पर्याय आणखी सक्षम करायला हवेत.



### लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### शब्द वैभव



आता रोज तुझीच भाषा
बोलतो मोठ्या गर्वाने
कारण रोज वाटते आशा
ती पुन्हा भेटेल नव्याने

तू भाषेचे शब्द भांडार
भावनांचा समुद्र आहेस
ईच्छांचा रोज भडीमार
दृष्टिकोनाने विशाल आहेस

खरा भाषा प्रेमी मित्र तू
तुझ्यामुळे शब्दवैभव आहे
नसता आला जीवनी तू
हे शब्दगीत व्यक्त होत आहे

### ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



ब्रम्हांडची व्याप्ती
समुद्राची खोली ।
अभंगाची बोली
''मन - वेडे'' ॥

पाण्यापेक्षा आहे
नितळ नितळ ।
क्षितीजाला तळ
''मन - वेडे'' ॥

अग्निपेक्षा तप्त
वाऱ्याच्याही पुढे ।
दृष्टी पलीकडे
''मन-वेडे'' ॥

आहे निर्विकार
निरामय आहे ।
निराकार आहे
''मन - वेडे '' ॥

---

चर्चा



नारायण येळगावकर
यवतमाळ, 9422941649

# आंबेडकरी कलापथक कालबाह्य झाले काय?




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायकाला' जन्म दिला आणि आंबेडकरी क्रांतिपर्वाची पहाट झाली. भीमयुगाचा प्रारंभ झाला. आंबेडकरी चळवळीला पंख फुटले. चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी वृत्तपत्रासारखी अन्य भूमी नाही, असे बाबासाहेब म्हणत. पण भूमीलाही काही अंगभूत मर्यादा असतातच. तशाच वृत्तपत्राच्या वाचक वर्गालाही होत्याच. कारण समग्र अस्पृश्य वर्गातून तेव्हा केवळ एक ते दीड टक्काच जनसमुदाय साक्षर होता. खरं तर इतक्या अल्पसंख्येसाठी वृत्तपत्र सुरू करणे मोठे धाडसाचे पाऊल. पण बाबासाहेबांनी ते उचलले आणि त्याचा तो प्रयोगही कमालीचा यशस्वी झाला.

'मूकनायक ', 'बहिष्कृत भारता'ची लोकप्रियता हळूहळू वाढू लागली. लोक त्याचं सार्वजनिक वाचन, चिंतन करू लागले. बुलडाणा जिल्ह्यातील भादोल्याच्या कोंडू साधूसारखे जिज्ञासू कार्यकर्ते आपल्या उच्चवर्णीय पुरोगामी मित्राकडून शिळे, कालचे पुरोगामी वृत्तपत्र मागवून एखाद्या सुशिक्षिताकडून वाचून समजून घेत आणि बाबासाहेबांची बातमी असली की तिच्याविषयी इतरांबरोबर चर्चा करीत. बाबासाहेबांच्या वृत्तपत्राची वाट पाहणारे असे अनेक कोंड साधू गावोगाव निर्माण होऊ लागले. शेवटी यालाही मर्यादा होतीच. कारण एकजण वाचून दहा जणांना सांगायचा हे मान्य केले तरी दहाच्या पलीकडे जो अफाट, अशिक्षित समाज होता त्याच्या प्रबोधनाच काय? त्याचेसाठी बाबासाहेब भव्य अशा सभा-परिषदांमधून आपली भूमिका स्पष्ट करीत. पण सभा संमेलनातील संदेशाचा सर्वांनाच अर्थबोध होण्याची शाश्वती नसते. अशा वेळी अशा निरक्षर साध्या भोळ्या समाजापर्यंत बाबासाहेबांचे धोरण कसे संक्रमित करायचे हा प्रश्न समाजातील संवेदनशील विचारवंतांना सतावू लागला. पण असे म्हणतात, अशावेळी चळवळ कुणाची वाट पाहत नसते. ती स्वतःच स्वतःचा मार्ग शोधीत असते. आताही नेमकं तेच झालं. अस्पृश्य महार समाजातील लोककलावंत, तमाशातील शाहीर मंडही स्वयंस्फुर्तपणे पुढे सरसावली. त्यांनी 'आंबेडकरी जलशा'ची स्थापना केली आणि चळवळीला प्रचंड गती मिळाली. मात्र, हेआंबेडकरी जलसे कसे जन्माला आले हे जाणून घ्यायचे असेल तर सत्यशोधक जलशाचा उगम आणि विस्तार कसा झाला हे जाणून घेणे मोठे उद्बोधक ठरेल.

सत्यशोधक जलसाः उगम आणि विस्तार क्रांतीबा फुल्यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंच्या नेतृत्वात सत्यशोधक समाजाचा प्रचार आणि प्रसाराची धुरा फुल्यांच्या निष्ठावंत अनुयायांनी आपल्या खांद्यावर घेतली. त्यासाठी ते व्यक्तिगत संपर्क, सभा, बैठका, मेळावे, चर्चासत्रे, प्रसिद्धिपत्रके, वार्षिक अधिवेशन आदी माध्यमातून फुल्यांचे तत्त्वज्ञान समाजाच्या तळागाळापर्यंत झिरपेल यासाठी झटू लागले. ही माध्यमही त्यासाठी तोकडी पडू लागली. त्यामुळे त्याला आणखी प्रभावी आणि व्यापक अशा साधनाची जोड हवी होती. मूलतः फुल्यांचं साहित्य हाच सत्यशोधक समाजाचा मूळ स्रोत होता. पण जो साहित्य वाचू शकतो, समजू शकतो त्यालाच त्याच आकलन होई. निरक्षरांचं काय? हा जो पुढे आंबेडकरी चळवळीत पेच निर्माण झाला होता तोच इथेही झाला. आता हा गुंता सोडवायचा कसा? हा प्रश्न फुल्यांच्या कार्यकर्त्यांपुढे निर्माण झाला. या प्रश्नावर चर्चा-चिंतन करताना कार्यकर्त्यांच्या असं लक्षात आलं की, या प्रश्नाचं उत्तर फुल्यांच्या साहित्य रचनेच्या धाटणीतच आहे. फुल्यांच्या समग्र साहित्याचा ७५टक्के भाग काव्य आणि नाट्य या दोन कलाप्रकारात बांधलेला आहे. फुले प्रामुख्याने कवनातून व्यक्त होतात किंवा नाट्य-संवादमय रचनामधून. शिवाजीचा पोवाडा आणि तृतीयरत्न हे नाटक त्याची साक्ष देतात. तुकोबांनी आपलं तत्त्वज्ञान अभंगातून, कबीरांनी दोह्यांतून सांगितल तर तथागतांनी धम्मपदातून आपला धम्म अशिक्षितांच्या गळी उतरविला. हे आदर्श फुल्यांपुढे होतेच. शिवाय शेक्सपिअर जगविख्यात झाला. तो त्याच्या नाटकांमुळे, हे हेही फुले जाणून होते. फुल्यांना हे ही ज्ञात होतं की काव्य, नाट्य, संगीत यांना स्वतःची भाषा असते. नाटकाच्या संदर्भात तर देहबोली (शारीरिक हावभाव) हीच त्याची भाषा खरी भाषा असते. त्यामुळे काव्य, संगीत आणि नाटकाला भाषेच्या मर्यादा नसतात. या माध्यमातून आपला विचार अडाणी जीवापर्यंतही सहज पोचविता येतो. या दृष्टीनेच कदाचित फुल्यांनी आपल्या साहित्य निर्मितीसाठी ही माध्यमं निवडली असावीत. ही बाब जेव्हा कलावंत कार्यकर्त्यांच्या लक्षात आली. तेव्हा त्यांनी काव्य-संगीत आणि संवाद (नाट्य) यांच्या सुंदर केमिस्ट्रीमधून जो एक नवाच कलाप्रकार जन्माला घातला. त्याच नाव होतं 'सत्यशोधकी' जलसा! तमाशा हा जरी तेव्हा शुद्रादीशुद्रांच्या हुकमतीचा लोकप्रिय प्रांत असला तरी त्यांनी तमाशापासून सत्यशोधकी जलशांची प्रेरणा घेतली असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारण तमाशा हा शतप्रतीशत रंजन प्रधान तर होताच शिवाय काही तमाशांना रगेल आणि रंगेलपणाचा अधिक सोस होता. त्यातील बराच विकृत भाग फुल्यांना जो सुसंस्कृत समाज निर्माण करायचा होता, त्याला सोसणारा नव्हता. म्हणूनच तमाशा हा सत्यशोधकी जलसाचा प्रेरणास्रोत कधीच होऊ शकत नाही.

सत्यशोधक जलसाची निर्मिती झाली ती अशा नितळ निर्मळविचारधारेतून ! विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात म्हणजे १९१० रोजी भीमराव महामुनी सारख्या निष्ठावंत सत्यशोधकी कलावंत-कार्यकर्त्यानं सत्यशोधकी जलशाचा पहिला प्रयोग केला आणि मग सत्यशोधक जलशांनी मागे वळून पाहिले नाही. हा अभिनव कला प्रकार लोकांनी प्रचंड उत्साहात स्वीकारला. त्याला गर्दी जमू लागली. सत्यशोधकी समाजाच्या प्रचाराला गती आली. जेधे-जवळकरांसारख्या मराठा नेत्यांनीही या चळवळीत उडी घेतली. बुलडाणा जिल्ह्यात फुल्यांचे आद्यचरित्रकार पंढरीनाथ पाटील स्वतः हाती तुणतुणे घेऊन सत्यशोधकी जलशाच्या मंचावर उभे राहिले. सत्यशोधकी समाजाची व्याप्ती आणि लोकप्रियता इतकी वाढली की, काँग्रेसने त्याची धास्ती घेतली. काँग्रेसवाल्यांनी मग क्लृप्ती करून जाळे (पान ५ वर)

---

राजकारण



डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

# मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराचे राजकारण!

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राचे राजकारण एका वेगळ्या वळणावर येऊन ठेपले. बाळासाहेब ठाकरेंच्या हयातीत झालेली भाजपा-शिवसेना युती त्यांच्या मृत्यूनंतर मात्र तुटायला सुरुवात झाली. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ते दिसले. शिवसेना मोठ्या भावाच्या भूमिकेत होती तोपर्यंत युतीत मतभेद कमी होते, मात्र जेव्हा भाजपा वाढली, केंद्रात आणि महाराष्ट्रात सत्तेत आली म्हणजेच मोठ्या भावाच्या भूमिकेत गेली तेव्हा मात्र दोन्ही पक्षातील मतभेदही वाढले. तरीही तेव्हा ते बहुमताकरिता एकत्रित राहिले. मुंबई महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या २२७ असून फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेली निवडणूक भाजपा आणि शिवसेनेने स्वतंत्रपणे लढवली. या निवडणुकीत शिवसेनेचे ८४ तर भाजपाचे ८२ नगरसेवक निवडून आले होते. दोन्ही पक्षाला बहुमत न मिळाल्याने भाजपाने शिवसेनेला पाठिंबा देवून शिवसेनेचा महापौर बनला. तत्कालीन फडणवीस सरकारला बहुमताकरिता शिवसेनेच्या पाठिंबाची तर मुंबई महानगरपालिकेत शिवसेनेला भाजपाच्या पाठिंबाची आवश्यकता होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर युती तुटली तरीही मुंबई महानगरपालिकेत मात्र युती कायम होती. मुंबई महानगरपालिकेचा कार्यकाल संपल्यानंतर लगेच एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेना फुटली आणि भाजपाच्या पाठिंब्याने एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. म्हणजेच मुंबई महानगरपालिकेचा कार्यकाल संपण्याची वाट एकनाथ शिंदे पाहत होते का ? उद्धव ठाकरेंनी दोन्ही काँग्रेस सोबत जाऊन मुख्यमंत्रीपद मिळविले म्हणून एकनाथ शिंदेंनी शिवसेना फोडली. मग एकनाथ शिंदेंनी अजित दादांच्या राष्ट्रवादीचा पाठिंबा का स्वीकारला ? आजही ते मित्रपक्ष आहेत.

मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. प्रत्येक पावसाळ्यात मुंबई तुंबते. तत्कालीन मित्रपक्षच एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप करीत आहेत. २०१७ ते २०२२ या पाच वर्षात शिवसेना-भाजपा युतीची सत्ता होती. तसेच यादरम्यान नगर विकास मंत्रालय एकनाथ शिंदेकडे होते. म्हणजेच या पाच वर्षात या महानगरपालिकेने घेतलेल्या सर्व निर्णयात शिवसेनेबरोबर भाजपाही सहभागी होती, तसेच तत्कालीन नगर विकास मंत्रालयाचे प्रमुख म्हणून एकनाथ शिंदेचाही पाठिंबा होता. तरीही या कालावधीत उद्धव ठाकरे यांनी मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप भाजपा आणि शिंदे यांची शिवसेना करीत आहे. मुंबई महानगरपालिकेत मोठा भ्रष्टाचार झाला असे गृहीत धरले तर या भ्रष्टाचारास सत्ताधारी असलेली शिवसेना, भाजपा आणि एकनाथ शिंदेही तेवढेच जबाबदार ठरतात. मग आरोप फक्त उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेवरच का? जेव्हा मुंबई महानगरपालिकेचा कारभार प्रशासकाकडे होता तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच होते. तिकडे महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असलेली काँग्रेस मुंबई महानगरपालिकेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप उद्धव ठाकरेंवर करीत आहे. अशाप्रकारे तत्कालीन सत्तेतील मित्रपक्ष आणि विरोधी पक्षातीलही मित्रपक्ष मुंबई महानगरपालिकेत झालेल्या भ्रष्टाचारावर चर्चा करून राजकारण तापवित असतात. भारतातील महापालिकांपैकी मुंबई महानगरपालिका ही सर्वात मोठा अर्थसंकल्प असणारी महानगरपालिका आहे, म्हणूनच ती आर्थिक राजधानी आहे. एखाद्या घटकराज्याइतकं बजेट मुंबई महानगरपालिकेचं असते. २०२५-२६ मध्ये ७४४२७ करोड रुपयांच बजेट आहे. म्हणूनच केंद्र व राज्यात सत्ता नसलेल्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला व दोन्ही काँग्रेसला तिथे सत्ता हवी आहे, तर दुसरीकडे भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेलाही तेथे सत्ता हवी आहे. भाजपाला स्वबळावर सत्ता प्राप्त करता यावी त्या दृष्टीने नियोजन सुरू असल्याने मित्र पक्ष असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेला जास्त जागा द्यावयास भाजपा तयार नाही.

शिवसेनेलाही सत्तेसाठी वाटाघाटी करता याव्यात इतक्या जागा हव्या आहेत. तिकडे शेवटी ठाकरे बंधूंनी युतीची घोषणा करून सत्ता मिळविण्याचे रणसिंग फुंकले. तब्बल १८ वर्षानंतर शिवसेना-मनसे युती झाली. महाविकास आघाडीतील काँग्रेस स्वबळावरचा नारा देत असली तरी ॲड प्रकाश आंबेडकरांसोबत चर्चा करीत आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीही चाचपणी सुरू आहे. आठवलेंचा पक्ष भाजपासोबत आहे. अशाप्रकारे महापालिकांच्या निवडणुका सत्ताधारी पक्षासाठी प्रतिष्ठेच्या, तर विरोधी पक्षासाठी अस्तित्वच्या बनल्या. सर्वच पक्ष मराठी मताचे राजकारण करीत असले तरी मुंबईत मराठी भाषिक किती उरले हे महत्त्वाचे ठरते. मराठी-अमराठी राजकीय वाद आहेच. उत्तरप्रदेश आणि बिहारी तसेच मुस्लिम एकेकाळी भाजपा व काँग्रेस सोबत होते. मात्र बदलत्या समीकरणांमध्ये त्यांची भूमिकाही महत्त्वाची ठरणार. सोबतीला हिंदुत्वाचे राजकारण आहेच. निवडणुका आल्या की सत्ताधारी पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप होतात. निवडणुका जिंकण्याकरिता भ्रष्टाचार हा प्रमुख मुद्दा असला तरी त्या भ्रष्टाचाराचे वाटेकरी कोण ? हे जनतेला चांगलेच माहीत असते. म्हणूनच मतदारही चार ते पाच हजार रुपयाला एक मत याप्रमाणे विकतो आणि राजकीय पक्ष ते विकत घेतात. अशाप्रकारे निवडणुका जिंकण्याकरिता मुंबई महानगरपालिकासारख्या ठिकाणी सत्ता हवी आहे. त्याकरिता मराठी माणसाचं हित किंवा मुंबईचे हित असा प्रचार होत असला तरी शेवटी हित मात्र राजकीय पक्षाचेच असते. गल्ली ते दिल्लीपर्यंत राजकीय आशीर्वादानेच भ्रष्टाचार चालतो, तरीही भ्रष्टाचारावरच कलगीतुरा रंगतो.

---

विचारमंथन



डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060

# राज्य घटनेला अभिप्रेत न्याय आणि वास्तव!

देशाची राजधानी दिल्ली येथील न्यू महाराष्ट्र सदन मध्ये लोकमत मिडिया समूहाच्या वतीने आयोजित सहाव्या लोकमत पार्लमेंटरी अवॉर्ड वितरण समारंभात भारताचे ५२ वे सेवानिवृत्त सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी ''संवैधानिक संस्थांपुढील आव्हाने'' या विषयावरील आपल्या भाषणात ''संविधानात अंतर्भूत असलेल्या मूल्यांप्रती आणि दूरदृष्टीप्रती कटिबद्ध राहून नागरिकांना राजकीय, आर्थिक व सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या दिशेने देशवासीयांनी सातत्याने पुढे जात राहावे असे आवाहन केले. त्यांनी पुढे म्हटले की, लोकशाहीची विधिमंडळ, न्यायपालिका आणि कार्यपालिका हे तिन्ही स्तंभ नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. संविधानाने नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचा अधिकार दिला आहे. संसदेकडून कायदे निर्मिती होत असतांना न्यायपालिकेने त्या कायद्यांचे व अधिकारांचे संरक्षण केले आहे. यामागचा उद्देश देशातील असमानता कमी करून समानतेला चालना देण्याचा आहे. कधी कधी लोकशाहीच्या चारही स्तंभामध्ये मतभेद निर्माण होतात. न्यायाधीशांनाही निर्णय घेतांना द्विधा अवस्था येते, मात्र सर्वांचा हेतू एकच असतो. नागरिकांना न्याय देण्याचा, त्यामुळे संविधानाच्या मूळ भावनेनुसार देशाला पुढे नेण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन कटिबद्ध राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.'' माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या भाषणाचा सदर वृतांत वाचला असता त्यांनी आजच्या वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते, त्यामुळे खंत वाटते.



**सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची संकल्पना :** ''सामाजिक न्याय म्हणजे समाजातील सर्व घटकांना स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर आधारित सर्वच क्षेत्रात समान संधी देणे आणि देशातील संपत्ती व संसाधनांचे योग्य वाटप होईल अशी धोरणे राबविणे आणि जाती आधारित भेदभाव संपुष्टात आणून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणे होय.'' तर ''आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येकाला शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि उत्पन्नाच्या बाबतीत समान संधी आणि संपत्ती, उत्पन्न व आवश्यक सेवा यांचे न्याय्य वाटप, कामाच्या ठिकाणी वेतन, रोजगार किंवा आर्थिक व्यवहारांमध्ये कोणताही भेदभाव न करणे होय.'' आणि ''राजकीय न्याय म्हणजे, नागरिकांना राजकीय प्रक्रियेत समान संधी आणि अधिकार मिळणे, ज्यात धर्म, वंश, लिंग किंवा सामाजिक स्थितीचा अडथळा नसावा, कायद्यापुढे सर्व समान असावे आणि सरकारने सर्वांसाठी निष्पक्षपणे काम करणे होय.'' भारतीय संविधानात समाजातील सर्व घटकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देण्याची जबाबदारी शासन संस्थेवर टाकली असून सरकारने त्यासाठी ध्येय धोरणे निर्धारित करून कार्यपालिकेने त्याची प्रामाणिक अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. जर शासन व प्रशासन याकामी कुचराई करत असेल तर न्यायव्यवस्थेने हस्तक्षेप करून लोकांना न्याय देण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे अशी संविधानात तरतूद केलेली आहे.

**आजचे वास्तव :** राज्य घटनेला अभिप्रेत सामाजिक न्यायाचा विचार केल्यास सरकार, प्रशासन, न्यायव्यवस्था खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय निर्माण व्हावा, समाजातील जातीय व धार्मिक भेदभाव संपुष्टात यावा आणि अस्पृश्यता नष्ट व्हावी यासाठी ठोस भूमिका घेतांना दिसतात का? हा गंभीर चिंतनाचा विषय आहे कारण जर असे असते तर आजही जातीवरून उच्चनीच भेदभाव करण्याची कोणाची हिंमत झाली नसती. तसेच मागासलेल्या जातींवर अनन्वित अत्याचार करून त्यांच्या हत्या घडवून आणल्या गेल्या नसत्या आणि ऑनर किलिंगचे प्रकार घडले नसते. अलिकडे सरकार सर्वच क्षेत्राचे खाजगीकरण करत असून शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सेवा भांडवलदारांच्या घशात घालत आहे. जिल्हा परिषद व सरकारी शाळा बंद करून बहुजन समाजाच्या शिक्षणाचे दरवाजे बंद करण्याचे धोरण राबवित आहे. देशात श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत चालली असून वांशिक आणि जातीय भेदभाव वाढत आहे. कामाच्या ठिकाणी आणि इतरत्र महिलांना अन्याय अत्याचाराला बळी पडावे लागत आहे. त्यामुळे आजची सामाजिक न्यायाची (पान ५ वर)

---

प्रासंगिक



प्रविण बागडे
नागपूर, मो. 9923620919

# धर्माच्या पलीकडे उभा असलेला गुरुनानक : माणुसकीचा जाहीरनामा

नानक या नावाचा अर्थ आहे, जो एकाग्र आहे, एक देव पाहतो आणि त्यावर विश्वास ठेवतो आणि द्वैत पाहत नाही. इतिहास साक्ष देतो की जेव्हा धर्म माणसांना जोडण्याऐवजी तोडू लागतो, जेव्हा ईश्वराचे नाव घेऊन माणसावर अन्याय होतो आणि जेव्हा सत्ता व अहंकार मानवतेवर कुरघोडी करताततेव्हाच गुरुनानक देवांसारखा महामानव जन्माला येतो. पंधराव्या शतकातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अराजकतेत गुरुनानक देवांनी जे विचार मांडले, ते त्या काळासाठीच नव्हे तर आजच्या सत्ता, पाखंड आणि द्वेषाच्या काळासाठीही सत्ताधाऱ्यांना आणि धर्मठेकेदारांना अस्वस्थ करणारे आहेत. १४६९ साली तलवंडी येथे जन्मलेल्या गुरुनानक देवांचे पहिलेच विधान ''एक ओंकार'' हे निव्वळ धार्मिक तत्त्वज्ञान नव्हते, तर तत्कालीन समाजरचनेवर केलेला थेट हल्ला होता. ''ईश्वर एक आहे'' ही श्रद्धा नाही, ही बंडखोरी आहे. जर ईश्वर एकच असेल, तर जात कशी? धर्म कसा? उच्च-नीचतेचा अधिकार कोणाला? गुरुनानकांनी प्रश्न विचारले; आणि प्रश्न विचारणे हीच खरी क्रांती असते.

आजही समाज प्रश्न विचारण्याऐवजी आंधळे अनुकरण करतो. गुरुनानकांनी मात्र कर्मकांड, तीर्थयात्रा, उपास-तापास आणि दिखाऊ भक्ती यांना निर्भीडपणे नाकारले. त्यांनी सांगितलेईश्वर बाहेर शोधू नका, तो तुमच्या कृतीत आहे. प्रामाणिक श्रम, सत्य वागणूक आणि करुणा हाच खरा धर्म. गुरुनानक देवांच्या विचारांचा सर्वात मोठा धोका म्हणजे जात, धर्म आणि लिंगभेदावर गुरुनानकांचा थेट वार ते विषमतेच्या मुळावर घाव घालतात. ''जिच्यापासून राजा जन्माला येतो, तिला कमी लेखायचे कसे?'' असा प्रश्न त्यांनी स्त्रीविषयक मानसिकतेला विचारला. पंधराव्या शतकात स्त्रीसमतेची अशी ठाम भूमिका घेणे म्हणजे सामाजिक बंडच होते.

आजही स्त्री, दलित, अल्पसंख्याक यांच्याविषयी बोलताना समाज गप्प बसतो. गुरुनानक मात्र गप्प बसले नाहीत. त्यांनी धर्माच्या नावावर चालणारी माणसामाणसातील दरी ठामपणे नाकारली. म्हणूनच गुरुनानक हे केवळ शीख धर्माचे संस्थापक नसून समतेच्या विचारांचे जागतिक प्रवर्तक आहेत. गुरुनानक देवांनी भारतभरच नव्हे तर मध्य आशिया, अरब देशांपर्यंत प्रवास केला. उदासी यात्रांमधून संवाद, संघर्ष आणि समन्वय, हिंदू-मुस्लिम संवाद साधला, मौलवींना प्रश्न विचारले, पंडितांच्या पाखंडाला आव्हान दिले. त्यांनी कुठेही तलवार उचलली नाही, पण शब्दांनी सत्ता हादरवली. आज जे संवादाच्या नावावर द्वेष पसरवले जातात, त्याच्या नेमक्या उलट गुरुनानकांचा मार्ग होतासंवादातून समन्वय.

गुरुनानक देवांची लंगर परंपरा ही भूक भागवणारी नाही, व्यवस्था बदलणारी क्रांती जगातील सर्वांत मोठी आणि शांत सामाजिक क्रांती आहे. एकाच पंक्तीत बसून राजा आणि रंक, सवर्ण आणि दलित, हिंदू आणि मुसलमान जेवतातयाहून मोठा समतेचा धडा कोणता? आजही गुरुद्वाऱ्यातील लंगर हा मानवतेचा जिवंत घोष आहे. आजच्या काळात जेव्हा गरीबांसाठी योजना फक्त कागदावर असतात, तेव्हा लंगर कृतीतून बोलतो. गुरुनानकांनी केवळ भाषण दिले नाही; त्यांनी व्यवस्था उभी केली. आज गुरुनानक असते तर, आजचा समाज धर्मांधतेने ग्रासलेला आहे. धर्म म्हणजे श्रद्धा न राहता राजकारण झाले आहे. देवाच्या नावावर दंगली, द्वेष, बहिष्कार होत आहेत. अशा काळात गुरुनानक देव असते तर त्यांनी स्पष्ट सांगितले असतेधर्म माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही.

गुरुनानक यांनी अनेक ठिकाणी संगत (धर्मशाळा) आणि पंगत (लंगर) सुरुवात केली. आजही संगत व पंगत मुळे गुरुनानकांचे अनुयायी प्रत्येक दिवशी एकत्र येतात आणि सबद-किर्तन करतात नानकदेव आपल्या गुरवाणीत म्हणतात की, 'नानक उत्तम निच न कोई' आपण ईश्वराच्या नजरेत सर्व समान आहोत कारण मानव जात एक आहे. तो खालच्या जातीचा, मी उच्च जातीचा हा भेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जात-पात नष्ट करण्यासाठी त्यांनी जो गुरु (लंगर) चा निशुल्क पायंडा पाडला तो वाखण्याजोगा आहे. आम्ही सर्व ईश्वरांची लेकरे आहोत हा अविभाव त्यांनी (लंगर) च्या रुपाने मग तो गरीब असो की श्रीमंत त्यांनी एकाच पंगतीमध्ये बसण्यास सर्वांना भाग पाडले. आजही ही प्रथा अखंड पणे गुरुद्वारामध्ये राबविली जाते या पासुन प्रत्येक मानवाने बोध घेतला पाहिजे. गुरूनानक यांनी कधीही 'देवांच्या ट्रिनिटी' वर विश्वास ठेवला नाही किंवा देव मानवी स्वरूपात जन्माला येऊ शकतो यावर विश्वास ठेवला नाही. शीख धर्मात त्यांनी हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्मांचा मेळ साधण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा, जातीभेद, कर्मकांड यावर त्यांचा कधीच विश्वास नव्हता. त्यांचे शब्द श्री गुरु ग्रंथ साहिब, पवित्र शास्त्रात समाविष्ट आहेत.

आज गुरुनानकांचे विचार सत्तेला अस्वस्थ करतात, कारण ते प्रश्न विचारायला शिकवतात. ते अंधश्रद्धेला आव्हान देतात. ते श्रमाला प्रतिष्ठा देतात. म्हणूनच गुरुनानक देव केवळ जयंतीपुरते स्मरणात ठेवण्याचे नव्हेत; ते रोजच्या आचरणात उतरवण्याचे आहेत. गुरुनानक देव हे इतिहासात अडकलेले संत नाहीत. ते वर्तमानाला आरसा दाखवणारे आणि भविष्याचा मार्ग दाखवणारे विचारवंत आहेत. आज जर समाजात शांतता, समता आणि बंधुता हवी असेल, तर गुरुनानकांचा विचार स्वीकारल्याशिवाय पर्याय नाही. गुरुनानक जयंती म्हणजे फक्त प्रकाशोत्सव नव्हे; ती आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण माणूस म्हणून किती प्रामाणिक आहोत, हे तपासण्याची संधी.

शीख एक देव, निर्माता आणि सर्व मानवजातीच्या समानतेवर विश्वास ठेवतात. गुरूनानक यांनी शिखांना कौटुंबिक जीवन जगायला शिकवले आणि तीन पटीचे बोधवाक्य पाळले ज्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात आणि त्यामध्ये देवाशी जोडण्यास मदत झाली: नाम जपो - प्रार्थना करा आणि देवाचे स्मरण करा. किरत करो - प्रामाणिक जीवन जगा. देशातील जेवढे संत होऊन गेलेत त्यांनी तथागत भगवान बुध्दांनी सांगीतलेल्या मार्गाचा अवलंब केल्याचे आम्हाला आढळून येईल. कोणताही संत बघा, कित्येक वर्षापूवी तथागतांनी सांगीतलेल्या उपदेशाचा प्रचार या देशातील संतानी आपापल्या परिने केले हे नाकारुन चालणार नाही. भारतीय अध्यात्मिक शिक्षक जे शीख धर्माचे पहिले गुरू गुरुनानक होते, एकेश्वरवादी धर्म हिंदू आणि मुस्लिम प्रभाव एकत्र करतो. अशा सत्याचा मार्ग दाखविणाऱ्या महान सतिगुरु श्री गुरुनानकदेवजींचा जन्म कार्तिक पौर्णिमा आणि गुरुनानक जयंती दिनी १५ एप्रिल १४६९ ला श्री नानकाना साहिब येथे आई तृप्ता देवी आणि वडील कालू खत्री यांच्या घरी झाला. ज्याला गुरुनानकचा प्रकाश उत्सव आणि गुरुनानकदेवजी जयंती असेही म्हणतात. एकता, श्रध्दा आणि प्रेमाचा संदेश देणारे शिख धर्माचे संस्थापक गुरुनानकददेव यांच्या जयंती निमित्त त्यांना शतः शत प्रणाम ! वाहेगुरु जी का खालसा वाहे गुरु जी की फतेह। सर्व शीख बांधवाना गुरुनानक जयंती च्या खूप खूप शुभेच्छा !

# आंबेडकरी कलापथक कालबाह्य झाले काय?

**पान ४ वरून...** टाकीत सत्यशोधकी समाजाच्या बिन्नीच्या कार्यकर्त्यांना काँग्रेसमध्ये ओढून घेतले. तेव्हापासून या चळवळीला गळती लागली. १९३० मध्ये सत्यशोधकी जलशांना उतरती कळा आली. १९१० ते १९३०हा सत्यशोधकी जलशांचा भरभराटीचा कालखंड होता. आंबेडकरी जलशांचा उदय आणि झंझावात १९३० साल उजाडलं तेव्हा भारतीय अवकाशात आंबेडकर नावाचा प्रज्ञासूर्य आपल्या कर्तृत्वाने तळपत होता. महाडच्या संग्रामाने नुकतेच त्यांचे नेतृत्व झळाळून उठले होते. १९३० सालच्या काही घटनांनी या महामानवाच्या नेतृत्वाला आणखी घुमारे फुटले. नाशिक येथे सुरू झालेला काळाराम मंदिर सत्याग्रह, कामठी (नागपूर) येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय 'डिप्रेस्ड क्लासेस' परिषदेचे अध्यक्षपद आणि इंग्लंड येथे होऊ घातलेल्या वर्तुळ परिषदेसाठी झालेली निवड या घटनांनी जणू काही बाबासाहेबांच्या नेतृत्वाला अधिमान्यताच मिळाली. नेमका अशा वेळी सत्यशोधक जलशांच्या अस्तामुळे हताश झालेल्या महार शाहीरांना डॉ. आंबेडकरात सांस्कृतिक चळवळीचा महानायक दिसू लागला. खरं तर गाणं महारांच्या रक्तातच होतं. तीच त्यांची ओळख आणि तीच त्यांची ताकदही होती. सत्यशोधकी जलशांच्या अस्तानं रिक्त झालेल्या महारी रक्तानं युगनायक आंबेडकरांच लक्ष वेधून घेतलं आणि त्यांनी बाबासाहेबांच्याच नावानं एक नवा कलाविष्कार जन्माला घातला, 'आंबेडकरी जलसा'! भीमराव धोंडीबा करडक नावाच्या एका संवेदनशील व दूरदृष्टी असलेल्या शाहीराने १४ जानेवारी १९३१ रोजी मुंबई येथे आंबेडकरी जलशाची मुहूर्तमेढ रोवली आणि एका नव्या सांस्कृतिक पर्वाला प्रारंभ झाला. 'माझ्या दहा सभा-मिटींगा आणि करडक मंडळीचा एक जलसा बरोबर आहे 'असा बाबासाहेबांनी ज्यांचा गौरव केला, ते करडक हेच होत. (सत्यशोधकी जलसा, आंबेडकरी जलसा यांच्या जन्माचे संदर्भात एक गंमतीदार योगायोग आहे. ज्या शाहीराने सत्यशोधक जलसा सुरू केला त्याचे नाव भीमराव होते, ज्याने आंबेडकरी जलसा सुरू केला त्याचे ही नाव भीमरावच होते आणि ज्यांचे नावे आंबेडकरी जलसाचा जन्म झाला त्या युगनायकाचे नावही भीमरावच होते) भीमराव करडकांनी आंबेडकरी जलशाची स्थापना केली आणि सागराला अनेक नद्या येऊन मिळाव्यात त्या प्रमाणे आंबेडकरी जलशांच्या अनेक नद्या महाराष्ट्रभर उगम पावत भीमसागराच्या दिशेने आणि ओढीने खळखळ वाहत वाहू लागल्या. या नद्यांनी आपल्या काठावरचा अस्पृश्य समाज सांस्कृतिक आणि वैचारिक पातळीवर संपन्न आणि समृद्ध केला.

जलसा की कलापथक : एक सम्यक चर्चा अशी ही जलशांची कूळकथा पुन्हा पुन्हा उगाळूनही माझ्या मनाला एक प्रश्न नेहमीच अस्वस्थ करीत असतो; तो म्हणजे या नव्या कलाप्रकाराला कोणतं संबोधन वापरणे अधिक उचित होईल. त्याला 'जलसा'म्हणावं की 'कलापथक'? त्याबाबत डॉ. भगवान ठाकूर म्हणतात, जलसा आणि कलापथक यातील सीमारेषा फार पुसटशी आहे. मला तसे वाटत नाही. त्यात मूलतः मोठा भेद आहे. तुम्ही म्हणाल ह्या कला प्रकाराचं आंबेडकरी सांस्कृतिक जगातील अस्तित्व जवळजवळ नामशेष होत असताना हा प्रश्न उकरून काढणे अप्रस्तुत आहे. प्रायतः सांस्कृतिक इतिहासाची चिकित्सा करण आणि त्यातून नव्या शक्यतांची पडताळणी करून पाहणे म्हणजे उकरून काढणे नव्हे. कारण हा प्रश्न नवा नाही. या प्रश्नांची मुळं थेट या कला प्रकाराच्या उगमाशी जाऊन भिडतात. आंबेडकरी जलशाच्या पहिल्या पिढीतील (१९३१ ते १९४६) शाहीर विश्वनाथ गायकवाड आणि मंडळींनी आणि दुसऱ्या पिढीतील (१९४६ ते १९५६) शाहीर गवई-मिसाळ भादोलेकर यांनी आपल्या संचाला 'जलसा नव्हे तर, कलापथक'म्हणून संबोधन हेतुतः वापरल होतं. पैकी विश्वनाथ गायकवाड (रेंजहिल्स) यांनी आपल्या संचाचे नामकरण 'नवमतवादी कलापथक' असे केले होते, तर गवई-मिसाळांनी आपल्या कलासंचाचे नामकरण 'आंबेडकरी ध्येयवादी कलापथक'असे केले होते. मला वाटते या दोन घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आंबेडकरी जलसा हे संबोधन तत्कालीन सर्वच शाहिरांनी स्वीकारले असले आणि पुढे फुले-आंबेडकरी साहित्यिकांनी, समीक्षकांनी, विचारवंतांनी त्यावर शिक्कामोर्तब केले असले तरी उपरोक्त दोन शाहिरांनी जो वेगळा विचार केला त्यांची किमान आज तरी चिकित्सा-चर्चा केली नाहीतर तो त्यांचेवर अन्यायच ठरेल. आणि म्हणून किमान 'जलसा' आणि 'कलापथक'यांची व्याख्या, त्यांचा आकृतिबंध, हेतू आणि साध्य यावर सम्यक चर्चा होणे अगत्याचे वाटते. त्यामुळेच हा चर्चा प्रपंच! डॉ. भगवान ठाकूर आपल्या 'आंबेडकरी जलसे' या ग्रंथात म्हणतात, 'जलसा' हा शब्द तमाशा या शब्दाप्रमाणेच अरबी भाषेतून आलेला दिसतो. शब्दकोशात त्याचा अर्थ गाण्या-बजावण्याची बैठक, गाण्याची मैफल (अ डळपसळपस झर्ऱ्ीं) असा दिलेला आहे.' यावरून हे स्पष्ट होते की, जलसा हा तमाशा सारखाच रंजनप्रधान आहे. तो प्रबोधन प्रधान विचार प्रधान नाही. गाणं बजावणं हाच त्याचा आत्मा आहे. या उलट कलापथक या संज्ञेची व्याख्या फार वेगळी आहे. मला वाटते गीत, संगीत, वक्तृत्व, नाट्य-अभिनय, व्यंग, विनोद, उपहास आणि विडंबन यांचे संयोगातून परिवर्तनाचा विचार पेरणारं एक अजब रसायन म्हणजे कलापथक ! माणसाच्या उत्थानाचा विचार कलात्मक पद्धतीने रंजनांचा ठसका देत साभिनय सादर केलेली कलाकृती म्हणजे कलापथक होय. यात रंजनाला नव्हे तर प्रबोधनाला प्राधान्य दिले जाते. यात केवळ तोंडी लावण्यापुरताच गीत संगीताचा वापर केला जातो. सारा भर परिवर्तनाचा विचार पेरणाऱ्या वगावर (फार्स) असतो. यात गाण्या-बजावण्यापेक्षा विचाराला अधिक महत्त्व दिलेले असते. आकृतिबंधाच्या संदर्भात विवेचन करायचं तर जलशात एक प्रमुख कवी, गायक, कलावंत असला त्याला, तबला, पेटीची साथ मिळाली की झाला जलसा उभा. कोरससाठी वेळेवर कुणालाही उभे करता येते. कलापथकाचा आकृतिबंध वेगळा आहे. त्यात किमान पाच कलावंत आवश्यक असतात. त्यात प्रत्येक कलावंत, गायक, वादक असावा लागतो. त्याला वक्तृत्व आणि अभिनयाची उत्तम जाण असावी लागते. मुख्यतः हा संच एकरूप एकजीव असावा लागतो. सारे कलावंत एका वैचारिक ध्येयाने झपाटलेले असतात. या ठिकाणी एका ऐतिहासिक घटनेची आठवण करून देणे समयोचित होईल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या कालखंडात निळूभाऊ, राम नगरकर, शाहीर अमरशेख, अण्णाभाऊ इत्यादी कलावंतांनी सेवादलाचे मार्फत प्रचारार्थ सादर केलेल्या शेकडो कार्यक्रमांना 'कलापथक'हेच संबोधन वापरलं होतं, जलसा नव्हे! 'जलसा' आणि 'कलापथक' यांच्यात हे असे मूलतः ठळक भेद आहेत. डॉ. ठाकूर म्हणतात, तसी पुसटशी रेषा नाही. ती अधिक यापुढे ठळक करीत आंबेडकरी जलशाऐवजी आंबेडकरी कलापथक असे संबोधन वापरणे अधिक समर्पक, सुसंगत आणि न्याय्य होईल. एकोणीसशे साठच्या दशकात जन्माला आलेल्या 'दलित'साहित्याला अलीकडे आपण आंबेडकरी साहित्य असे संबोधन वापरण्याची वहिवाट पाडलीच ना! आंबेडकरी कलापथक कालबाह्य झाले आहेकाय? अशा या पार्श्वभूमीवर प्रश्न उरतोच; आंबेडकरी कलापथक कालबाह्य झाले आहे काय? मला वाटते वर्तमान परिप्रेक्ष्यात या प्रश्नावर गंभीरपणे चिंतन झाले पाहिजे. कारण ज्या विषारी संस्कृतीच्या कराल जबड्यातून मुक्त होण्यासाठी आंबेडकरी शाहिरांनी जिवाचे रान करीत लढे दिले, तीच मनुवादी विकृती आज आपला फास आंबेडकरी संस्कृतीच्या गळ्याभोवती हळूहळू आवळीत आहे. आपला भवताल जातिवाद आणि धर्मांधतेने पिसाळून गेला आहे. देव-धर्म-अंधश्रद्धेला बळदेणारं पर्यावरण हेतुतः निर्माण करण्यात येत आहे. शाळा-महाविद्यालये मोडकळीस आणून मागासवर्गीयांना विद्येपासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र रचले जात आहे. विद्यापीठीय अभ्यासक्रमात ज्योतिषशास्त्राचा समावेश करून देवळातील पुजाऱ्यांची नवीन भरती करण्यासाठी शासनाचे वतीने पुजाऱ्यांचे प्रशिक्षण देणारे अल्पमुदतीचे प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. शासकीय नोकर भरती बंद करून कंत्राटी कामगारांच्या गुलामी फौजा निर्माण करण्यात येत आहेत. सभ्य संस्कृती राजकारणाचे तिनतेरा वाजले असून लोकशाही व्यवस्था पर्यायाने संविधानही धोक्यात आले आहे. लोकशाही शासन प्रणालीला मारक ठरणाऱ्या साऱ्या घटना जनतेला पटविण्यासाठी व त्याविरुद्ध पेटविण्यासाठी, त्यांच्यात विद्रोहाचे स्फुलिंग चेतविण्यासाठी आंबेडकरी जलशासारखे अन्य शस्त्र नाही आणि म्हणूनच ते शस्त्र पुन्हा परजण्याची वेळआली आहे. मात्र अभ्यासकांचे मते १९५६ मध्ये वा फार फार तर १९७०पर्यंत पूर्णतः आंबेडकरी जलसा नामशेष झाला. वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. आंबेडकरी कलापथक अल्पसंख्येने का होईना आजही जिवंत असल्याचे जाणवते. १९७० मध्ये शाहीर प्रभाकर गवईंच्या आकस्मिक निधनानंतर भादोलेकर हातपाय गळून बसले होते. पण भादोलेकरच ते. ते पुन्हा नव्या दमाने उठून पेटून उठले. त्यांच्यात डी. आर. सारखा नवा उमदा गडी सामील झाला. पुढे गवई मिसाळांच्या मार्गदर्शनाखाली शाहीर डी. आर. इंगळे यांनी सतत वीस वर्षे विदर्भ-मराठवाड्यात कलापथकाची धग सतत धगधगत ठेवली. १९९४-९५ मध्ये बुलडाण्याला आपण आंबेडकरी कलापथकांची स्पर्धाच आयोजित केली होती. त्यात दहा-पंधरा कलापथकांनी सहभाग नोंदविला. (चिखल्याचे कलापथक त्यातूनच उजळून निघाले) त्याप्रसंगी कलापथकाचं आदर्श मॉडेल म्हणून डी. आर. आणि जनार्दन गवई यांनी सादर केलेला 'सारे काही खुर्चीसाठी' हा फार्स आजही तितकाच ताजा, टवटवीत असून तो आजच्या वर्तमानाला कोरिलेट करतो. म्हणूनच भूतकाळात नव्हती इतकी आंबेडकरी कलापथकांची गरज निर्माण झाली आहे. मात्र, आज आपले आंबेडकरी शायर गाण्या-बजावण्यातच मश्गूल आहेत. बाबासाहेबांचा गुणगौरव करण्यातच सारी आंबेडकरी चळवळ सामावली आहे, असी त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आहे. आंबेडकरी जलशांचा भर ओसरल्यानंतर बैठ्या गायन पार्ट्या जन्माला आल्या. त्याला कव्वाली पार्ट्यांची जोड मिळाली. आज त्याच गायन पार्ट्यांचे भीमाचे गाणे गाण्याच्या नावाखाली तमाशाचे फड झाले आहेत. आपले पूर्वज तमाशा टाकून जलशात आले, आपले वर्तमान भीमशाहीर नवे तमासगीर झाले आहेत. ते लोकांना आंबेडकर समजून सांगण्यापेक्षा त्यांना नाचण्यास उद्युक्त करीत आहेत. लोकही गाण्याचा तालावर ठेका धरीत बेभान होऊन नाचत आहेत! यातही गंमत असी आहे की, महाकवी वामनदादांनी गायन पार्टीतून आपले गीतं सादर करताना स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण केली आणि तिची प्रतिष्ठा जन्मभर जपली. आजचे बहुतेक आंबेडकरी शाहीर स्वतःला वामनदादांचे शिष्य म्हणून मिरवीत बैठ्या मैफलीचा खेळखंडोबा करीत आहेत. एकेकाळी आंबेडकरी शाहिरांनी आंबेडकरी चळवळीचा गाडा मोठ्या ताकदीने खेचून आणला. ते कवी शाहीर आज कुठे आहेत? यावर भाष्य करताना एक कवी म्हणतो,

**बा भीमाचा गाडा जे ओढीत होते ।**
**त्यात शाहीर भीमाचे आघाडीस होते ।।**
**ते लपले कुठे आज कुठे दिसेना,**
**जे माणूस माणूस जोडीत होते ।।**

आघाडीस राहून भीमाचा गाडा ओढणारे, माणसं जोडणारे भीमशाहीर आज समाजाला हवे आहेत. खरे भीमशाहीर शोधून काढून पुन्हा आंबेडकरी कलापथके ठायी ठायी उभी राहिली पाहिजेत. तरच या देशाची लोकशाही वाचेल आणि संविधानही! बांधवानो, आंबेडकरी कलापथक कालातीत आहे. जोपर्यंत या जगाला आंबेडकरांची गरज आहे, तोपर्यंत आंबेडकरी कलापथकाचीही गरज आहे. म्हणूनच म्हणतो आंबेडकरी कलापथक कालबाह्य झाले नाही! कदाचित म्हणूनच बुलडाणा येथे होऊ घातलेल्या महाकवी वामन कर्डक साहित्य संमेलनात आंबेडकरी कलापथकाचे दोन संच आपले सादरीकरण करणार असल्याचे कळते! **(लेखक हे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता आहेत.)**

# राज्य घटनेला अभिप्रेत न्याय आणि वास्तव...

**पान४वरून...** स्थितीआव्हानात्मकआहे. आज देशातील ४० टक्के संपत्ती केवळ एक टक्के लोकांकडे असून देशातील एकूण कमाईच्या ६५ टक्के वाटा केवळ टॉपच्या १० टक्के लोकांकडे आहे. उरलेल्या ९० टक्के लोकांकडे केवळ १२ टक्के वाटा आहे आणि संविधानातील मार्गदर्शक तत्त्वानुसार सामाजिक कल्याण व मागास घटकांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी असलेल्या योजनांचा निधी कमी करून काही योजना बंद केल्या जात आहेत. त्यामुळे सर्वांना समान हक्क असले तरी, राजकीय शक्ती, संसाधने आणि निर्णय प्रक्रियेत असमानता, ध्रुवीकरण आणि काही गटांना वगळले जात असल्यामुळे आर्थिक न्याय कोसो दूर आहे. आजच्या काळात देशातील राजकीय समता केवळ घटनेच्या पानावर शिल्लक असून प्रत्यक्षात ग्रामपंचायत पासून तर लोकसभेपर्यंत सर्वच ठिकाणी घराणेशाहीचा अतिरेक झाला आहे. त्यामुळे राजकीय प्रक्रियेत गरीब, अल्पसंख्याक किंवा वंचित घटकांचा सहभाग नगण्य होत आहे. याशिवाय एक व्यक्ती, एक मत हे जरी खरं असलं तरी मतांची खरेदी-विक्री किंवा दबाव यामुळे मतदानाच्या समानतेच्या तत्त्वाला धक्का पोहचत असून निवडणुकीत पैशाचा प्रभाव आणि मोठ्या गटांना प्राधान्य दिले जात असल्यामुळे सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व संपत चालले आहे. लोकशाहीचे आधार स्तंभ असणाऱ्या संवैधानिक संस्थांवर सत्ताधाऱ्यांचा दबाव वाढला असून निवडणूक आयोग, ईडी सारख्या संस्था सत्ताधाऱ्यांच्या तालावर नाचविल्या जात आहेत, तर न्यायपालिका सरकारच्या चुकीच्या धोरणांना, जनहित विरोधी आणि मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या कायद्यांना, निवडणूक प्रक्रियेतील ईव्हीएमच्या गैरवापराला थांबविण्याचे धाडस करू शकत नाही. कार्यपालिका तर सत्ताधाऱ्यांची बटिक झाली असून काही अपवाद वगळता पत्रकारिता विकाऊ व भडवेगिरी करणारी झाली आहे. त्यामुळे देशात चाललेल्या हुकूमशाही आणि भांडवलदारांचे हित साधणाऱ्या सरकारच्या धोरणांचे वास्तव लोकांसमोर येत नाही. देशात खरोखर सामाजिक, आर्थिक व राजकिय न्यायाची स्थापना करायची असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वावर आधारित समाज व्यवस्थेचा पुरस्कार व त्यासाठी जातीव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि लोकशाही संस्थांचे बळकटीकरण आवश्यक आहे. पण आज संविधानातील मूल्ये पायदळी तुडवून हम करे सो कायदा अशी हुकूमशाही प्रबळ होत आहे, राज्यघटनेतील समाजवादी धर्मनिरपेक्ष हे शब्द वगळून राष्ट्राला हिंदू राष्ट्र घोषित करण्याचे प्रयत्न सुरू असून त्यासाठी सनातनी विचारांचे व मनुस्मृतीचे उदात्तीकरण केले जात आहे, लोकशाही राष्ट्रासाठी आवश्यक असलेले विरोधी पक्ष संपुष्टात आणून लोकशाहीचा गळा घोटला जात आहे आणि आम्ही भारताचे लोकं हताश, निराश व बेबस ठरत असून राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक आतंकवाद उघड्या डोळ्यांनी पाहत आहो हे वास्तव नाकारता येईल काय ? हा गंभीर प्रश्न आहे.

## राशी-भविष्य

**मेष:** आज तुम्ही आध्यात्मिक कामांमध्ये व्यस्त असाल. खोल विचार तुम्हाला या प्रयत्नात मदत करेल. तुमच्या शत्रूंपासून सावध रहा. आज कोणताही नवीन उपक्रम सुरू करू नका.

**वृषभ:** आज तुमचा व्यवसाय वाढण्याची शक्यता आहे. तुम्हाला सामाजिक क्षेत्रात यश आणि प्रसिद्धी मिळेल. आज तुम्हाला पैसे मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन:** आज तुम्ही मनोरंजन आणि आनंदात व्यस्त असाल. मित्र आणि कुटुंबासह आनंददायी वातावरण असेल. समाजात तुमचा आदर आणि कीर्ती वाढेल .

**कर्क:** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी असेल आणि तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत दर्जेदार वेळ घालवाल. आवश्यक कामांवर पैसे खर्च केले जातील, तरीही आर्थिक लाभासाठी हा दिवस चांगला आहे.

**सिंह:** आज तुम्हाला तुमच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडून पाठिंबा मिळेल. प्रेमसंबंध निर्माण होण्याची शक्यता आहे. तुम्हाला अस्वस्थ आणि अस्वस्थ वाटू शकते.

**कन्या:** आज गाडी चालवताना विशेष काळजी घ्या. कौटुंबिक तणाव वाढू शकतो किंवा वडिलोपार्जित मालमत्तेची समस्या उद्भवू शकते. यंत्रसामग्रीवर खर्च आणि मानसिक चिंता होईल.

**तूळ:** आज नवीन काम सुरू करण्यासाठी चांगला दिवस आहे. तुमची एखाद्या प्रिय व्यक्तीशी भेट होईल आणि तुमचे भाग्य वाढेल. सामाजिक आदर वाढेल.

**वृश्चिक:** आज तुमचे नियोजित काम पूर्ण झाले नाही तर तुम्हाला निराशा वाटू शकते. कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्यापासून टाळा. कौटुंबिक वातावरणात त्रास वाढेल.

**धनु:** आज उत्कटतेने किंवा आवेगात निर्णय घेतल्याने पश्चात्ताप होऊ शकतो. तुमच्या मनातील आणि हृदयातील गोंधळ शांत होईपर्यंत कोणत्याही विषयाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल कोणताही निर्णय घेणे टाळणे चांगले.

**मकर:** आज तुम्हाला तुमची प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत आणि संघर्ष करावा लागू शकतो. एकाच वेळी खूप कामे केल्याने त्रास होऊ शकतो. आज माकडांना केळी खायला द्या.

**कुंभ:** आज जामीनदार आणि आर्थिक व्यवहार टाळा. खर्च वाढतील आणि तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. कुटुंबाशी वाद होण्याची शक्यता आहे, म्हणून ते टाळा. एखाद्याशी गैरसमज झाल्यास भांडण होऊ शकते.

**मीन:** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर आहे. तुमच्या नोकरीत किंवा व्यवसायात उत्पन्न वाढेल. आज तुम्ही नवीन मित्र बनवाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 260



मरगळ
मितभाषी
रवरव
लवचिक
वनवास
वितराग
विसंगती
सामंजस्य
संकलन
संपादक
हलाहल

**पाच अक्षरी**
अज्ञातवास
गलितगात्र
गीतारहस्य
चलबिचल
चारमीनार
चित्रविचित्र
नोकरशाहि
परसदार
भारतरत्न
मनोकामना
वसतिगृह

**सहा अक्षरी**
जडजवाहिर
समुद्रमंथन

**अन्य अक्षरी**
कळत नकळत

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
आज्ञा
ईशा
कर
कुंज
गळ
गात
गाव
तप्त
ताज
तास
दिन
नशा
नष्ट
नीर
पात्र
पावा
भात
मत
मोर
रन
लाव्हा
वर
वसु
वर्ष
वाडी
साल
सुगी
संत
हल
हर्ष
क्षौर

**तीन अक्षरी**
आकांत
आवाज
ईशारा
करार
कलत्र
गवत
चरक
जवस
झुकांडी
तनय
तीतर
दानव
दामिनी
द्रविड
नकुल
नवरा
नादार
न्यूनता
पारधी
बोभाटा
मंथरा
यजन
रकम
रतन
शिकारा
सकल
सरण
सामंत
सावत्र
संचित

**चार अक्षरी**
अभिमन्यू
खडतर
चक्रवर्ती
चित्रावती
जनगण
जमदग्नी
झुगारणे
दिनकर
प्रतिकार
बोळवण

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 641



**–: आडवी विधाने :–**

1) कल्याण चिंतणारा
5) वडिलांचे वडील, आजोबा
8) सुवर्ण मंदिराकरिता सुप्रसिद्ध शहर
12) प्रबळ इच्छा
13) भाव, प्रत्येक
14) देश, राज्य
15) अरण्य, जंगल
17) नेमलेले खाणे, खुराक
18) तालुका
19) एक तंतु वाद्य
20) मनातील विचार, अभिप्राय
22) पृथ्वी
24) केवळ नावापुरता
26) मृदू, कोमल
28) शिजविलेले तांदुळ
29) वेगवेगळया रक्तगटाचे रक्त संग्रही ठेवणारी संस्था
31) वाजवीपेक्षा जास्त किमती असलेल्या वस्तू
33) आकृती, स्वरुप
35) नाटकाचा एक भाग, मांडी
36) धुणे
37) मृत्यू, मरण
38) जमीन, पृथ्वी
39) फुलाचा एकेक भाग
40) माराचे वळ, व्रण
41) आधार, मोठ्या व्यक्तिची शिफारस, ओळख
42) संदेह
43) पोलीस खात्यातील एक अंमलदार पद
46) अंग धुण्याचे एक साबण अत्पादन
48) कावळा
50) इच्छा
51) गाढव
52) आपला देश
54) ग्रंथातील किंवा भाषणातील उतारा
57) प्रधान
58) एखाद्याची आठवण करुन देणारे स्मृतिचिन्ह, खूण
61) याला धर, त्याला पकड अशी परिस्थिती
62) विचार, अभिप्राय
63) जनतेस योग्य न्याय देणारे ठिकाण
66) चर्म, चामडे
67) वस्तुंची खरेदी, विक्री
68) दैत्य, असूर
69) पृथ्वी
70) व्यवस्था लावणे, आटोपणे
72) पर्ण, विडा
73) दुसऱ्यावर वर्चस्व स्थापित करणे, उपहास करणे या अर्थाचा वाक्प्रचार
75) लहान मुलांच्या गळयात घालावयाचे काळ्या दोरीतील लॉकेट
76) चंद्र, रात्री फिरणारा
77) आपली उष्टी बोरे श्रीरामचंद्रास खाऊ घालणारी एक भिल्लीण

**–: उभी विधाने :–**

2) विचार, ध्यास
3) खालचा बूड
4) मुसलमानांचे थडगे
5) नेसावयाचे उंची रेशमी वस्त्र
6) सहाय्य
7) निकराचा हल्ला करतांना मराठे उच्चारित तो शब्द
8) दुर्गुण, वाईट चिन्ह
9) मेलेला
10) गवताची काडी
11) प्रज्वलित, तापलेले
15) इच्छा, वासना
16) नम्रतेने शीर झुकविणे
21) क्रिकेटच्या खेळात चेंडू अडविणारा
23) लहान
25) इच्छा, आकांक्षा
27) एक विदेशी मद्य प्रकार
28) ओझे, वजन
30) सैल सोडणे, मोकळीक देणे
32) कर्जाऊ रकमेच्या मोबदल्यात सावकारा जवळ ठेवण्यात येणारे जिन्नस
33) एक रागिणी
34) कानाच्या व डोळयाच्या मधली जागा
35) मृत्यूनंतर करण्यात येणारा अंतिम विधी
39) पायी जाण्याचा मार्ग
44) फिर्याद, शत्रुत्व
45) वाणी, जिव्हा
46) निलामी
47) शर्विलक
49) देवालयापुढे कथाकीर्तनासाठी केलेला मंडप
51) चोळीचे कापड
53) निमग्न, रमलेला
55) पुत्र, मुलगा
56) लग्न झाल्यानंतर बायकोच्या माहेरी राहणारा
57) वाळविणे
58) नकल, अनुकरण
59) लग्नारंभी वध पित्याने मुलगी वराकडे सोपविण्याचा विधी
60) रक्तवाहिनी
62) आपल्या मनाप्रमाणेच वागणे
64) वाहन
65) श्रीरामचंद्राची मुले
66) गावातील गप्पाटप्पा करणाऱ्या लोकांची सार्वजनिक जागा
69) अमंगल, भयंकर
70) यावेळी, याक्षणी
71) रममाण
72) वृक्षाच्या बुंध्याभोवती बांधलेला ओटा
74) ईश्वर, भाग्य (उर्दू)

( उत्तर पुढी अंकी )

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### तणावातून शिक्षक बँक कर्मचाऱ्याची आत्महत्या



**नांदगाव पेठ :** नांदगाव पेठ येथील रहिवासी व सध्या रहाटगाव येथे वास्तव्यास असलेले शशिकांत विनायकराव महल्ले (४६) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी उघडकीस आली असून या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.शशिकांत महल्ले हे अमरावती येथील शिक्षक बँकेत कार्यरत होते. मात्र नोकरीदरम्यान मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या आरोपाखाली त्यांना निलंबित करण्यात आले होते. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हेही दाखल होते. या सर्व प्रकरणांमुळे ते गेल्या काही महिन्यांपासून मानसिक तणावात असल्याची माहिती समोर येत आहे. गुरुवारी ते अचानक घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला; मात्र त्यांचा काहीही थांगपत्ता लागला नाही. दरम्यान, शुक्रवारी दुपारी रहाटगाव येथील वृंदावन सदनिका परिसरामागील, आरोग्य कॉलनीतील त्यांच्या निवासस्थानापासून अगदी जवळच असलेल्या एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला. ही बाब समजताच कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला.आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या घटनेचा सखोल तपास नांदगाव पेठ पोलीस करीत आहेत.

# आर्णीत वाढीव गृहकराचा भडका

## शेकडो तक्रारींवर २९ ला सुनावणी, स्थायी समितीविना सुनावणीला विरोध

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**आर्णी, दि. २६ :** नगर परिषदेने नुकत्याच लादलेल्या वाढीव गृहकरामुळे आर्णीकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या अवाजवी करवाढीविरोधात नागरिकांनी एकजूट दाखवत नगर परिषदेकडे शेकडो तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींवर येत्या २९ डिसेंबर रोजी सुनावणी होणार असली तरी, स्थायी समिती गठीत झाल्याशिवाय सुनावणी घेऊ नये, अशी आक्रमक भूमिका नागरिकांनी घेतली आहे. भारती शाळेजवळील ज्ञानमंदिरात २९ डिसेंबरला या तक्रारींवर सुनावणी प्रक्रिया पार पडणार आहे. मात्र, सध्या नगर परिषदेची स्थायी समिती अस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत घेतली जाणारी सुनावणी ही केवळ प्रशासकीय सोपस्कार ठरेल आणि जनतेला यातून न्याय मिळणार नाही, असा आरोप होत आहे. त्यामुळे आधी स्थायी समिती गठीत करावी आणि त्यानंतरच जनतेच्या तक्रारी ऐकून घ्याव्यात, अशी ठाम मागणी होत आहे. वाढीव गृहकराचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय आणि व्यापारी वर्गाला बसला आहे. प्रशासनाने जनभावनांची कदर न करता आडमुठी भूमिका घेतल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. प्रशासनाचा हा मनमानी कारभार भविष्यात अंगलट येऊ शकतो, अशी चर्चा आता शहरात जोर धरू लागली आहे.

### अन्यथा रस्त्यावर उतरणार!

'जनतेवर अन्यायकारक गृहकर लादून प्रशासन जबरदस्ती करत आहे. स्थायी समिती अस्तित्वात नसताना सुनावणी घेणे म्हणजे जनतेच्या डोळ्यात धूळफेक आहे. प्रशासनाने ही सुनावणी पुढे ढकलून ती स्थायी समिती गठीत झाल्यानंतरच घ्यावी, अन्यथा जनतेसोबत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल.'

- **गणेश हिरोळे,** माजी आरोग्य सभापती

## ५ लाखांची चोरी करणारा कंत्राटदार गजाआड

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २६ :** आर्णी रोडवरील एका हार्डवेअरच्या दुकानातून दिवसाढवळ्या ५ लाख ४२ हजार रुपयांची बॅग लंपास करणाऱ्या चोरट्याला अवधूतवाडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत बेड्या ठोकल्या आहेत. दिनेश भाऊराव मंडाले (३२, रा. तळेगाव भारी) असे अटक करण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण रोकड आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ६ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत साबीर हुसेन भारमल यांनी तक्रार दिली होती. २५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता आर्णी रोडवरील राणा प्रताप गेटजवळ असलेले त्यांचे 'भारमल हार्डवेअर' दुकान उघडत असताना, अज्ञात चोरट्याने काउंटरवर ठेवलेली पैशांची बॅग पळविली. या बॅगेत ५ लाख ४२ हजार २०० रुपये होते. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांनी तत्काळ तपासाचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखा आणि अवधूतवाडी पोलिसांच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे तपास करत दिनेश मंडाले याला २ तासांत ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून न्यायालयाने त्याला २७ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक सतीश चौरे, नंदकिशोर काळे, सपोनि श्रीकांत जिंदमवार, उपनिरीक्षक सुरज जगताप, आकाश माळगे व त्यांच्या पथकाने केली.

# ऊर्जानगर ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेमुळे कचऱ्याचे साम्राज्य; नागरिकांचा संताप

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**चंद्रपूर, दि. २६ :** ग्रामपंचायत ऊर्जानगरच्या दुर्लक्षामुळे समता नगर वार्ड क्रमांक १ तसेच साईनाथ सोसायटी परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत समता नगर येथील रहिवासी गौरव अजय मोहये यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करून तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत मार्फत १ ते २ दिवसाआड सफाई गाडी येते असे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात कचरा उचलला जात नाही. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरली असून डास व माश्यांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतकडे पुरेसे मनुष्यबळ व सफाईसाठी वाहने उपलब्ध असतानाही त्यांचा वापर करण्यात येत नाही. महागडी ई-सफाई गाडी केवळ दाखविण्यासाठी ठेवण्यात आली असून ती नंबर प्लेट काढून पाण्याच्या टाकी परिसरात लपवून ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. चालू अवस्थेतील वाहने वापरात न आणणे हा नागरिकांच्या कराच्या पैशांचा सरळ अपव्यय असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत नागरिकांनी या विषयावर प्रश्न उपस्थित केले असता सरपंच, सचिव, वार्ड सदस्य व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीने तात्काळ सर्व सफाई गाड्या वापरात आणून वार्डातील कचऱ्याची समस्या दूर करावी, अन्यथा या प्रकरणी गट विकास अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या प्रकरणावर ग्रामपंचायत प्रशासन काय भूमिका घेते, याकडे ऊर्जानगरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## नायलॉन मांजा वापरल्यास पालकांना ५० हजार, तर विक्रेत्यांना अडीच लाखांचा दंड: हायकोर्टाचा इशारा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अमरावती, दि. २६ :** मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंग खेळण्यासाठी नायलॉन मांजा वापरणाऱ्यांवर आणि त्याची विक्री करणाऱ्यांवर आता मोठी कारवाई होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजा संदर्भात अत्यंत कठोर पवित्रा घेतला असून, वापरकर्ते आणि विक्रेत्यांवर ५० हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंतचा दंड प्रस्तावित केला आहे. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने जाहीर सूचना प्रसिद्ध केली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना मोठा दंड भरावा लागणार आहे. न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार, जर एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्याच्या पालकांना ५० हजार रुपये दंड का ठोठावू नये, अशी विचारणा केली आहे. तसेच, प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजा वापरताना सापडल्यास त्यांनाही ५० हजार रुपये दंड भरावा लागेल. ज्या विक्रेत्यांकडे नायलॉन मांजाचा साठा सापडेल, त्यांना प्रत्येक उल्लंघनासाठी २ लाख ५० हजार रुपये दंड आकारण्याची सूचना न्यायालयाने दिली आहे. ज्यांना या प्रस्तावित दंडात्मक कारवाईविरुद्ध आपले म्हणणे मांडायचे आहे, त्यांना ५ जानेवारी २०२६ रोजी नागपूर खंडपीठासमोर हजर राहून आपले निवेदन सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. जर कोणीही हजर राहिले नाही, तर जनतेचा या दंडाच्या रकमेला आक्षेप नाही असे गृहीत धरून ही कारवाई अंमलात आणली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली आहे. सन २०२१ पासून नायलॉन मांजावर बंदी असूनही त्याचा सर्रास वापर सुरू असल्याने दरवर्षी अनेक निष्पाप नागरिकांचे प्राण जातात किंवा गंभीर दुखापत होते. या गंभीर समस्येची दखल घेत न्यायालयाने आता आर्थिक दंड लावून अंकुश ठेवण्याचे ठरवले आहे.

### सहकार क्षेत्रात जपली विश्वासार्हता



**आर्णी :** येथील अद्विता अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटीच्यावतीने नववर्षाचे औचित्य साधून संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उत्साहात करण्यात आले. संस्थेच्या मुख्य कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अतुल वाकोडे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, 'संस्थेने सहकार क्षेत्रात नेहमीच पारदर्शक कारभार आणि ग्राहकाभिमुख धोरणे राबवली आहेत. त्यामुळेच संस्थेची ग्राहकांमध्ये एक विश्वासार्ह आणि वेगळी ओळख निर्माण झाली आहे.' प्रकाशित करण्यात आलेल्या कॅलेंडरमध्ये संस्थेच्या कार्याचा आढावा, विविध सामाजिक उपक्रम आणि महत्वाच्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अंजली ड्रेसेसचे संचालक राजेश श्रीवास, नवनिर्वाचित नगरसेवक विशाल देशमुख, सचिन ठाकरे, गोपाल ठाकरे तसेच पत्रकार राजू इंगोले, परवेज बेग, मनोज माघाडे उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत शासकीय आश्रम शाळा देवाडाच्या विद्यार्थिनींचे घवघवीत यश



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. २६ :** बाल्लारपुर (जि. चंद्रपूर) येथील येथे दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी एसएनडिटी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या अंतर्गत महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर उपकेंद्र यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध १६ कनिष्ठ महाविद्यालये व शाळांमधील मुलींच्या चमूंनी सहभाग नोंदवून महाराष्ट्राच्या लोककलेचे समृद्ध दर्शन घडवले. पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध हालचाली आणि सुसंवादी संगीताच्या जोरावर सादर झालेल्या लोकनृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत शासकीय आश्रम शाळा, देवाडा येथील विद्यार्थीनींनी आपल्या दमदार व शिस्तबद्ध सादरीकरणाच्या जोरावर द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करणारे नृत्य सादर करत विद्यार्थिनींनी आपली कला, आत्मविश्वास आणि संघभावना यांचे उत्तम दर्शन घडवले. या नृत्य सादरीकरणासाठी उषा करडभुजे कला शिक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली किरण भालेराव संगणक शिक्षिका तसेच मार्गदर्शक व ज्येष्ठ व्याख्याते डॉ. अमित नाईक यांनी विद्यार्थीनींना सातत्यपूर्ण व शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच हे यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संध्या रिंगणे यांनी विद्यार्थीनींचे मनापासून अभिनंदन केले. तसेच या संपूर्ण उपक्रमासाठी सहकार्य करणारे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांचे आभार मानले. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास होतो व त्यांच्यात आत्मविश्वास वाढतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. या यशामुळे शासकीय आश्रम शाळा देवाडा या शाळेच्या शैक्षणिक बरोबरीनेच सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याचीही दखल घेतली जात असून परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# यवतमाळात 'उबाठा' चा घरचा आहेर

## ५८ पैकी शून्य जागा जिंकल्याबद्दल खासदारांचा होणार सत्कार!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २६ :** यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत शिवसेनेचा (उबाठा) सुपडा साफ झाला असून, ५८ पैकी एकाही ठिकाणी पक्षाचा उमेदवार निवडून आला नाही. या दारुण पराभवाचे खापर फोडत, 'खासदार संजय देशमुख यांनीच पक्षाचे 'अंडेही फुटू नये' यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली,' असा खोचक टोला सेनेचे दिनेश इंगळे यांनी लगावला आहे. खासदारांच्या या 'यशा'बद्दल त्यांचा गौरव करण्यासाठी उद्या सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असल्याची माहिती इंगळे यांनी शुक्रवारी (दि. २६) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेत बोलताना दिनेश इंगळे यांनी खासदार देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, 'खासदार देशमुख यांनी नगर परिषद निवडणुकीत स्वतःच्या पक्षातर्फे एकही उमेदवार निवडून येऊ नये, यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या या परिश्रमाला निवडणुकीत घवघवीत यश प्राप्त झाले असून, हे परिश्रम वाया जाऊ नयेत म्हणून आम्ही त्यांचा सत्कार करणार आहोत. ५८ जागांपैकी एकाही जागेवर यश न मिळाल्याबद्दल त्यांचा गौरव करणे आम्हाला क्रमप्राप्त वाटते.' युतीचा खेळखंडोबा आणि विश्वासघात निवडणुकीपूर्वी खासदार देशमुखांनी युती संदर्भात एक कमिटी स्थापन केली होती. त्यात जिल्हा संपर्कप्रमुख, जिल्हाप्रमुख आणि विधानसभा प्रमुख संतोष ढवळे यांचा समावेश होता. या कमिटीने काँग्रेससोबत बैठका घेतल्या आणि खुद्द खासदारांच्या आदेशाने युतीची घोषणा करणारी पत्रकार परिषदही झाली. त्या परिषदेला आमदार बाळासाहेब मांगुळकर, राष्ट्रवादीचे चंद्रकांत गाडे पाटील, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू देशमुख आदी उपस्थित होते. मात्र, त्यानंतर युती तोडल्याची माहिती आम्हाला विश्वासात न घेता परस्पर बाहेरून समजली. खासदारांनी कार्यकर्त्यांना अंधारात ठेवून हा 'विक्रम' घडवून आणला, असा आरोप इंगळे यांनी केला. या पत्रकार परिषदेला संतोष ढवळे, शहर प्रमुख अतुल गुल्हाने, मंदाताई गाडेकर, दिनेश इंगळे, राजू नागरगोजे, आशीष सावंतकर, रवी गजलवार, अनिल डिबरे, किशोर वानखडे, संतोष गंधे, अवधूत पवार, आशीष ढोले, ॲड. विनोद आसकर, प्रदीप भारकाडे, प्रज्वल, मानकर, नरेंद्र बाहेकर, उमेश गावंडे, नाना पिंपळकर, निळकंठ ठाकरे आदी उपस्थित होते.

### उद्या वसंतराव पुरके यांच्या उपस्थितीत 'सत्कार'

खासदार संजय देशमुख यांनी 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे वागत हा पराभव ओढवून आणला आहे. त्यांच्या या प्रयत्नांची प्रशंसा करण्यासाठी उद्या आयोजित सत्कार समारंभात माजी शिक्षणमंत्री वसंत पुरके यांच्यासह शहरातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत, असेही दिनेश इंगळे यांनी सांगितले.

### अनियंत्रित ट्रॅक्टर पुलावरून कोसळला



**उमरखेड :** तालुक्यात सध्या ऊस तोडणी आणि वाहतुकीची लगबग सुरू आहे. अशातच विडुळ-देवसरी मार्गावर चालगणी गावानजीक असलेल्या नाल्याच्या पुलावरून एक अनियंत्रित ट्रॅक्टर थेट खाली कोसळल्याची घटना शुक्रवारी (दि. २६) सायंकाळी घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून, मोठे नुकसान टळले आहे. ट्रॅक्टर पुलावरून खाली कोसळताच मोठा आवाज झाल्याने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. केवळ नशीब बलवत्तर म्हणून या भीषण अपघातातून कुणालाही दुखापत झाली नाही. मात्र, अपघातामुळे घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. यामुळे विडुळ-देवसरी रस्त्यावरील वाहतूक काही काळ खोळंबली होती.

**दक्षता** — कवडीमोल पतंगासाठी अनमोल जीव गमावू नका!

# चायनीज मांजामुळे जीवितहानी; पालक व समाजाने जबाबदारी घ्यावी

। विठ्ठल महल्ले ।



**अकोला, दि. २६ :** मकर संक्रांतीची चाहूल लागताच आकाशात रंगीबेरंगी पतंगांची रेलचेल सुरू झाली आहे. पतंग उडवण्याचा आनंद सर्वांनाच हवाहवासा वाटतो; मात्र या आनंदाला चायनीज मांजाचा घातक स्पर्श झाल्यास तो आनंद क्षणातच शोकांतिका ठरू शकतो. अलीकडील काही वर्षांत चायनीज मांज व प्लास्टिक पतंगांमुळे मानव, पशु-पक्षी आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. पूर्वी कागदी पतंग, बांबूची काडी आणि सुताचा धागा वापरून पतंग उडवले जात होते. त्यात कला होती, आनंद होता; पण धोका नव्हता. आज मात्र रेडिमेड प्लास्टिक पतंग, नायलॉन व चायनीज मांजामुळे पतंग उडवणे प्राणघातक खेळ ठरत आहे. अकोला पोलिसांनी चायनीज मांजाविरोधात कारवाईचा सपाटा लावला असला, तरी चोरीछुप्या मार्गाने या घातक मांजाची विक्री सुरूच आहे. यामुळे दरवर्षी अपघात घडत असून निष्पाप जीव गमावले जात आहेत. पतंग उडवण्यासाठी वापरण्यात येणारा चायनीज मांजा हा केवळ बेकायदेशीरच नव्हे तर अत्यंत प्राणघातक असल्याचे अनेक दुर्दैवी घटनांतून वारंवार सिद्ध झाले आहे. राखी किरण सोनोने यांच्या पतीच्या दुर्दैवी मृत्यूने या वास्तवावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. एका क्षणाच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त होते, हे या घटनेतून स्पष्टपणे दिसून येते. वैज्ञानिक दृष्टीने पाहता, चायनीज मांजा नायलॉन, काच व रासायनिक पदार्थांच्या मिश्रणातून तयार केला जातो. त्यामुळे त्याची धार अत्यंत तीक्ष्ण असून तो मानवी त्वचा, रक्तवाहिन्या तसेच विद्युत वाहिन्यांसाठीही अत्यंत घातक ठरतो. दुचाकीस्वार, पादचारी, पक्षी व जनावरांसाठी हा मांजा जीवघेणा धोका निर्माण करतो. समाजशास्त्रीय अंगाने विचार केला असता, सण-उत्सवांचा आनंद घेताना सामाजिक जबाबदारीचे भान राखणे अत्यावश्यक आहे. करमणुकीसाठी केलेली एक चूक इतरांच्या आयुष्यावर कायमचा आघात करू शकते, याची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. या पार्श्वभूमीवर सुज्ञ पालकांनी आपल्या पाल्यांवर योग्य संस्कार करणे, घातक चायनीज मांजाचा वापर रोखणे आणि पर्यावरणपूरक, सुरक्षित पर्याय स्वीकारण्यासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. तसेच प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी एकत्रितपणे जनजागृती मोहिमा राबवून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. राखी किरण सोनोने यांची ही वेदनादायक हाक केवळ एका कुटुंबाची व्यथा नसून संपूर्ण समाजासाठी गंभीर इशारा आहे. भविष्यात कोणत्याही कुटुंबावर अशी वेळ येऊ नये, यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे हाच या घटनेतून घेतलेला खरा धडा ठरेल.

**दुर्दैवी घटना :** चायनीज मांजामुळे कमावत्या पित्याचा मृत्यू : गत मकर संक्रांतीदरम्यान मोठी उमरी येथील रहिवासी, खाजगी इलेक्ट्रिशियन किरण सोनोने हे दुचाकीवरून जात असताना निमवाडी ते हुतात्मा चौक उड्डाणपुलावर चायनीज मांज त्यांच्या गळ्यात अडकला. गळ्याला गंभीर काप बसून रक्तस्राव झाल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, आई व दोन चिमुकली मुले असा परिवार असून, एका चुकीमुळे पूर्ण कुटुंब उघड्यावर पडले. समाजातील काही संघटनांनी मदतीचा हात दिला असला, तरी ती मदत अपुरी ठरत आहे.

**कवडीमोल पतंगासाठी बालकांचे जीव धोक्यात :** आजही गल्लीबोळात, मुख्य रस्त्यांवर तसेच राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर कटी पतंग मिळवण्यासाठी सैरावैरा धावणारी मुले दिसतात. यामुळे केवळ त्यांचाच नव्हे, तर वाहनधारकांचाही जीव धोक्यात येतो. ही मुले जाणूनबुजून असे करत नसून, त्यांना आवरण्याची जबाबदारी पालकांचीच आहे.

**चायनीज मांज का आहे घातक?**
नायलॉन व काचेचा वापर गळा, हात, चेहरा यांना गंभीर जखमा पक्षी व प्राण्यांचा मृत्यू पर्यावरणाला मोठी हानी कायद्याने प्रतिबंधित असतानाही विक्री सुरू चायनीज मांजाचा वापर कटाक्षाने टाळा.

**समाजासाठी आवाहन**
- चायनीज मांजाचा वापर पूर्णतः टाळा
- मुलांना रस्त्यावर धावण्यापासून रोखा.
- कागदी पतंग व सुताचा धागा वापरा संशयास्पद विक्रीची माहिती पोलिसांना द्या
- आनंद साजरा करा, पण जबाबदारीने मकर संक्रांतीचा सण आनंदाचा आहे, शोकाचा नव्हे. पतंग उडवा, पण
- चायनीज मांज नको.
- कवडीमोल पतंगासाठी अनमोल जीवन संपवू नका, हीच अपेक्षा.

## महत्त्वाचे

### फलंदाजीत फ्लॉप, पण रोहितने पकडलेल्या कॅचची जोरदार चर्चा

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्टार फलंदाज रोहित शर्मा विजय हजारे ट्रॉफी २०२५ स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात रोहितने दमदार शतकी खेळी केली होती. मात्र, दुसऱ्या सामन्यात त्याला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. फलंदाजी करताना तो स्वस्तात माघारी परतला. या सामन्यात फलंदाजी करताना तो गोल्डन डकवर बाद झाला. पण क्षेत्ररक्षण करताना त्याने भन्नाट झेल घेतला आहे, ज्याचा व्हिडिओ साध्य सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.गोष्ट जेव्हा मैदानावर क्रिकेट चाहत्यांचे मनोरंजन करण्याची येते तेव्हा, हिटमॅन नेहमीच पुढे असतो. पहिल्या सामन्यात त्याने चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडून क्रिकेट चाहत्यांचे मनोरंजन केले होते. या सामन्यात तो गोल्डन डकवर बाद झाला.

### रिंकू सिंगने उत्कृष्ट खेळी करत शतक झळकावले

**नवी दिल्ली :**विजय हजारे ट्रॉफीमध्ये भारतीय फलंदाज उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. यादरम्यान रिंकू सिंगची बॅट तळपली असून रिंकूने शानदार शतक झळकावलं आहे. उत्तरप्रदेश आणि चंदीगढ यांच्यातील सामन्यात कर्णधार रिंकू सिंगची बॅट तळपली, त्याच्या शतकाच्या मदतीने संघाने ५० षटकांत ३६७ धावांचा डोंगर उभारला आहे.रिंकू सिंगने अवघ्या ५६ चेंडूत त्याचं शतक पूर्ण केलं. यासह शतकी खेळी करत रिंकू सिंग नाबाद परतला. रिंकूने ६० चेंडूत ११ चौकार व ४ षटकारांच्या मदतीने १०६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. आगामी टी-२० विश्वचषक २०२६ साठी रिंकू सिंगची भारतीय संघात निवड झाली आहे. दरम्यान शतकी खेळीसह त्याने निवडकर्त्यांचा निर्णय अगदी योग्य असल्याचा पुन्हा एकदा सिद्ध केलं. रिंकू सिंगने विजय हजारे ट्रॉफीतील पहिल्या सामन्यात ४८ चेंडूत ६७ धावांची खेळी केली. तर दुसऱ्या सामन्यात त्याने नाबाद १०६ धावांची खेळी करत आपला फॉर्म कायम ठेवला. रिंकू सिंहची लिस्ट ए क्रिकेट व फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये ५० अधिक सरासरी आहे.

# दिप्ती शर्माने टी-२०मध्ये घडविला इतिहास

## भारताच्या पुरूष व महिला खेळाडूंमध्ये अशी कामगिरी करणारी पहिलीच गोलंदाज



**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**

भारताची अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माने टी-२० क्रिकेटमध्ये इतिहास घडवला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यात पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. तिसऱ्या सामन्यात दीप्ती शर्माने दुसरी विकेट घेत असा विक्रम आपल्या नावे केला आहे, जो भारताच्या पुरूष आणि महिला संघांमध्ये कोणताही खेळाडू करू शकलेला नाही.

दीप्ती शर्माची तब्येत ठिक नसल्याने ती दुसऱ्या सामन्यात खेळली नव्हती. पण तिसऱ्या सामन्यात तिला संधी मिळताच चमारी अट्टापटूला बाद करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकत श्रीलंकेला फलंदाजीसाठी पाचारण केलं. पण भारताच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी केल्याने श्रीलंकेचा संघ कसाबसा १०० धावांच्या पलीकडे पोहोचला.

दीप्ती शर्माने या सामन्यात २ विकेट्स घेत टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक १५० विकेट्स घेणारी भारताची पहिली गोलंदाज ठरली. भारताच्या महिला संघांमध्ये नाही तर पुरूष संघामध्ये कोणताच गोलंदाज टी-२० क्रिकेटमध्ये १५० विकेट्स घेऊ शकलेला नाही. दीप्ती शर्माने चमारी अट्टापटूला बाद केल्यानंतर मोठे फटके खेळणाऱ्या कविशा दिलहारीला झेलबाद करत १५० विकेट्सचा टप्पा गाठला.

दीप्ती शर्माने पुढे सामन्यात मालशा शेहानीला क्लीन बोल्ड करत तिसरी विकेट मिळवली. यासह दीप्तीने टी-२० क्रिकेटमध्ये १५१ विकेट्सचा पल्ला गाठला. दीप्तीने यासह टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या मेगन शूटची बरोबरी केली आहे. यासह मेगन शूट व दीप्ती शर्मा टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक १५१ विकेट्स घेण्याच्या यादीत पहिल्या स्थानी आहेत.

दीप्ती शर्माने १३१ सामन्यांमधील १२८ डावांमध्ये सर्वाधिक १५१ विकेट्स घेतल्या आहेत. दीप्तीने ४६३.५ षटकांमध्ये २७८३ चेंडू टाकत १३ मेडन षटकं टाकली आहेत. १० धावांमध्ये ४ विकेट्स ही तिची सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे.

## शतक हुकले, पण विराटची मोठ्या विक्रमाला गवसणी!

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**



विजय हजारे ट्रॉफी २०२५ स्पर्धेत विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे दिग्गज खेळाडू मैदानात उतरले आहेत. या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात दोघांनी दमदार शतकं झळकावली. मात्र, दुसऱ्या सामन्यात रोहित शर्माला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात विराट कोहलीने दमदार शतकी खेळी केली होती. विराट कोहलीने या सामन्यातही दमदार अर्धशतकी खेळी केली. या अर्धशतकी खेळीसह त्याने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. दिल्लीचा दुसरा सामना गुजरातविरुद्ध पार पडला. बंगळुरूतील सेंटर ऑफ एक्सेलेंसच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दिल्लीचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला होता. विराट तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने ६१ चेंडूत ७७ धावांची खेळी केली. या तुफानी खेळीदरम्यान त्याने १३ चौकार आणि १ षटकार मारला

दिल्लीकडून डावाची सुरूवात करण्यासाठी प्रियांश आर्य आणि अर्पित राणा ही जोडी मैदानावर आली होती. पण या जोडीला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. दिल्लीकडून विराट तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला.

या दमदार अर्धशतकी खेळीसह विराट कोहलीच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. या अर्धशतकी खेळीसह त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वोच्च सरासरी नोंदवली आहे. त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये ५७.८७ च्या सरासरीने धावा केल्या आहेत. या मोठ्या विक्रमात त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज मायकल बेवनचा विक्रम मोडून काढला आहे. मायकल बेवनने ५७.८६ च्या सरासरीने धावा केल्या होत्या.

## वैभव सूर्यवंशीला राष्ट्रपतींकडून खास पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**



१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आपल्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर क्रिकेट विश्वात आपल्या नावाचा डंका वाजवला. टी-२० क्रिकेटमध्येही त्याने लहान वयातच शतकांचा पाऊस पाडत विश्वविक्रम नावे केला आहे. २०२५-२६ च्या विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने बिहारसाठी १०९ धावांची वादळी खेळी केली आणि त्याच्या लिस्ट ए कारकिर्दीतील पहिलं शतक झळकावण्यात तो यशस्वी झाला. यानंतर आता त्याला राष्ट्रपतींकडून खास पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. आहे.

वैभवने अरुणाचल प्रदेशविरुद्ध विजय हजारे ट्रॉफीमधील सामन्यात ८४ चेंडूत १५ षटकार आणि १६ चौकारांसह १९० धावा केल्या आणि त्याचा स्ट्राईक रेट २२६.१९ होता. यासह बिहार संघाने लिस्ट ए क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारत वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. यानंतर त्याला आता दिल्लीत खास पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं, त्यामुळे तो दुसऱ्या फेरीतील सामन्याला मुकला आहे. अरुणाचल प्रदेशविरुद्ध इतक्या शानदार खेळीनंतर, वैभव आता विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेच्या २०२५-२६ च्या या हंगामात बिहारकडून खेळताना दिसणार नाही. वैभव सूर्यवंशी पहिल्या सामन्यानंतर दिल्लीसाठी रवाना झाला. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्याला विशेष पुरस्कार देण्यात आला, ज्याचा फोटो आता समोर आला आहे.वैभवला पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे आणि हा विशेष पुरस्कार २६ डिसेंबर रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केला गेला. यानंतर वैभव सूर्यवंशी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भेटीला देखील जाणार आहे. हा विशेष सन्मान स्वीकारण्यासाठी, वैभव पहिल्या सामन्यानंतर थेट दिल्लीला पोहोचला.वैभव त्यानंतर भारताच्या १९ वर्षांखालील संघात सामील होईल. भारताचा अंडर-१९ संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. ४ ते ९ जानेवारी दरम्यान तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी ३० डिसेंबर रोजी भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेला रवाना होईल. आगामी अंडर-१९ वर्ल्डकपच्या दृष्टीने ही मालिका महत्त्वाची असणार आहे.

## स्टीव्ह स्मिथने मोडला राहुल द्रविडचा सर्वात मोठा रेकॉर्ड!

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या अॅशेस कसोटी मालिकेतील चौथ्या कसोटी सामन्याला सुरुवात झाली आहे. हा सामना बॉक्सिंग डे कसोटी सामना आहे. मात्र पहिल्याच दिवशी दोन्ही संघातील गोलंदाज चमकले. तर फलंदाजांचा फ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या ऑस्ट्रेलियाचा डाव अवघ्या १५२ धावांवर आटोपला. तर धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडचा डाव अवघ्या ११० धावांवर संपुष्टात आला. यासह ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात पुन्हा एकदा आघाडी घेतली. यादरम्यान ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथने क्षेत्ररक्षण करताना २ झेल घेतले. यासह त्याच्या नावे एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे.

स्टीव्ह स्मिथच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंदऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथ हा स्लिपमधील सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षकांपैकी एक आहे. चौथ्या कसोटी सामन्यात त्याने क्षेत्ररक्षण करताना त्याने जॅक क्रॉली आणि बेन स्टोक्स यांचे झेल घेतले. यासह कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक झेल घेणाऱ्या विक्रमात त्याने भारताचा माजी खेळाडू राहुल द्रविडला मागे टाकलं आहे. राहुल द्रविडच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये २१० झेल टिपण्याची नोंद आहे. तर स्टीव्ह स्मिथने आता २१२ झेल घेतले आहेत. या यादीत अव्वल स्थानी असलेल्या जो रूटच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये २१४ झेल टिपण्याची नोंद आहे.क्षेत्ररक्षणासह स्टीव्ह स्मिथने फलंदाजीतही अनेक मोठे विक्रम आपल्या नावावर केले आहेत. पॅट कमिन्स बाहेर झाल्यामुळे स्मिथकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. २०१० मध्ये त्याला ऑस्ट्रेलियाकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली होती.



## झेल घेण्याच्या नादात मुंबईचा स्टार खेळाडू दुखापतग्रस्त

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**





विजय हजारे ट्रॉफी २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या दुसऱ्या फेरीतील सामन्यात मुंबई आणि उत्तराखंड हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यादरम्यान मुंबईचा सलामीवीर फलंदाज अंगकृष रघुवंशी झेल घेत असताना दुखापतग्रस्त झाला आहे. झेल घेताना त्याच्या मानेला आणि खांद्याला दुखापत झाली आहे. त्यामुळे त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आलं. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.मुंबईने उत्तराखंड संघासमोर विजयासाठी मोठे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करत असताना ३० वे षटक टाकण्यासाठी तनुष कोटीयन गोलंदाजीला आला. या षटकात फलंदाजी करताना सौरभ रावतने स्लॉग स्वीप मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अंगकृष रघुवंशी डीप मिडविकेटला क्षेत्ररक्षण करत होता. यादरम्यान त्याने झेल घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्याकडून झेल सुटला, पण या प्रयत्नात त्याच्या खांद्याला आणि मानेला गंभीर दुखापत झाली. दुखापत खाल्यानंतर तो मैदानावर बसून राहिला. त्यानंतर त्याला स्ट्रेचरच्या साहाय्याने मैदानाबाहेर घेऊन जाण्यात आलं.

विजय हजारे ट्रॉफीत विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या अनुभवी खेळाडूंना कमीत कमी २ सामने खेळणं बंधनकारक असणार आहे. रोहितने सिक्किम संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात १५५ धावांची दमदार खेळी केली होती. पण उत्तराखंड संघाविरुद्ध खेळताना रोहित गोल्डन डकवर माघारी परतला.

### मुंबईतील प्रसिद्ध हॉस्पिटल खरेदी करण्यासाठी रिलायन्सने लावली ४५० कोटी रुपयांची बोली

**मुंबई :**सेव्हनहिल्स हेल्थकेअरचे मुंबईतील प्रसिद्ध सेव्हनहिल्स हॉस्पिटल खरेदी करण्यासाठी रिलायन्स समूहाशी संबंधित एनके होल्डिंग्ज आणि ज्युपिटर हॉस्पिटल स्पर्धेत आहेत. या प्रकरणाची माहिती असलेल्या व्यक्तींच्या हवाल्याने इकोनॉमिक टाइम्सने वृत्त दिले आहे. मुंबईतील सेव्हनहिल्स हॉस्पिटल सुपरस्टार अमिताभ बच्चन यांची नात आराध्या बच्चनचा जन्म तिथे झाला, तेव्हा चर्चेत आले होते.

रिलायन्स समूहाशी संबंधित एनके होल्डिंग्ज कंपनीने सेव्हनहिल्स हेल्थकेअर खरेदी करण्यासाठी एक प्रस्ताव सादर केला आहे, असे उपरोक्त नमूद केलेल्या व्यक्तींनी सांगितले. दोन्ही बोली लावणाऱ्या कंपन्यांनी सुमारे ४५० कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला आहे, परंतु खरेदी रक्कम देण्याच्या पद्धतींमध्ये फरक आहे.ज्युपिटरने दिवाळखोरी न्यायालयाच्या मंजुरीनंतर ३० दिवसांच्या आत ४५० कोटी रुपयांची खरेदी रक्कम देण्याचा प्रस्ताव दिला आहे, तर रिलायन्सशी संबंधित एनके होल्डिंग्जने पाच वर्षांच्या कालावधीत ४५० कोटी रुपये देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.सेव्हनहिल्स हेल्थकेअरच्या मुंबईतील हॉस्पिटलचा मुंबई महानगरपालिकेशी जमिनीच्या नुकसानभरपाईवरून दीर्घकाळापासून कायदेशीर वाद सुरू आहेत. मार्च २०१८ मध्ये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणात प्रकरण दाखल झाल्याने आणि या वादांमुळे रुग्णालयाच्या विक्रीत अडथळा येत आहे.

# अमेरिकन उद्योगपतीने दिला २ हजार कोटींचा बोनस

**नवी दिल्ली: दि.२६ वृत्तसंस्था**



एका अमेरिकन उद्योगपतीने आपल्या ५४० कर्मचाऱ्यांना सुमारे २,१५५ कोटी रुपये (२४० दशलक्ष डॉलर्स) बोनस म्हणून दिले आहेत. यामुळे फायबरबॉन्ड या विद्युत उपकरणांसाठी कव्हर बनवणाऱ्या कंपनीचे माजी सीईओ ग्रॅहम वॉकर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांनी या वर्षाच्या सुरुवातीला आपली कंपनी ईटन कॉर्पोरेशनला १.७ अब्ज डॉलर्समध्ये (१५,२६५ कोटी रुपये) विकली होती. यानंतर त्यांनी विक्रीतून मिळालेल्या रकमेतील काही भाग कर्मचाऱ्यांना बोनस म्हणून देण्याचा निर्णय घेतला होता.

वॉल स्ट्रीट जर्नलच्या वृत्तानुसार, संभाव्य खरेदीदारांनी विक्रीतून मिळणाऱ्या रकमेपैकी १५ टक्के रक्कम कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवण्याचे मान्य करेपर्यंत वॉकर यांनी आपली कंपनी विकण्यास सहमती दिली नव्हती. जून महिन्यात प्रत्येक कर्मचाऱ्याला सरासरी ४,४३,००० डॉलर्सची (३.६८ कोटी रुपये) रक्कम पाच वर्षांच्या कालावधीत देण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.ज्या दिवशी कर्मचाऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले, त्या दिवशी काही कर्मचाऱ्यांना यावर विश्वासच बसला नाही, तर काहींना वाटले की त्यांची चेष्टा केली जात आहे. खात्यावर पैसे जमा झाल्यानंतर काही कर्मचाऱ्यांनी या पैशांचा वापर कर्ज फेडण्यासाठी, गाड्या खरेदी करण्यासाठी, कॉलेजची फी भरण्यासाठी किंवा निवृत्ती नियोजन करण्यासाठी केला आहे.बोनस मिळालेल्या कर्मचाऱ्यांपैकी एक असलेल्या लेसिया की यांनी, कंपनीने बोनस दिल्याबद्दल आपल्या माजी सीईओंचे आभार मानले आहेत. लेसिया की या कंपनीत १९९५ मध्ये वयाच्या २१ व्या वर्षी रुजू झाल्या होत्या. तेव्हापासून त्यांनी आपल्या कारकिर्दीत मोठी प्रगती केली आहे. त्या कंपनीत आता १८ लोकांच्या टीमचे नेतृत्व करतात. कर्मचाऱ्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात वाटप केलेल्या बोनसची बातमी व्हायरल होताच, सोशल मीडिया युजर्सनी उद्योगपती ग्रॅहम वॉकर यांच्या उदारपणाबद्दल आणि आपल्या विश्वासू कर्मचाऱ्यांच्या कंपनीसाठीच्या योगदानाची दखल घेतल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आहे.''त्यांना माझा सलाम. त्यांची ही कृती खूप दयाळू आणि उदारपणाची आहे'', असे एका युजरने म्हटले. तर दुसऱ्या एका युजरने म्हटले की, ''ही एका खऱ्या भांडवलदाराची गोष्ट आहे. या माणसाने अमाप संपत्ती कमावली आणि आपल्या कंपनीच्या विक्रीनंतरही आपल्या कर्मचाऱ्यांना कसा फायदा होईल याचाही विचार केला.




## नोकरीच्या शोधात अर्ज करणाऱ्या महिलांच्या संख्येत ३६ टक्के वाढ

**मुंबई : दि.२६ वृत्तसंस्था**

सरत्या २०२५ सालात नोकऱ्यांसाठी ९ कोटींहून अधिक अर्ज केले गेले जे २९ टक्क्यांची वार्षिक वाढ दर्शविते, तर नोकरी शोधणाऱ्या महिलांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असून, त्यांच्याद्वारे अर्ज करण्याचे प्रमाण सर्वाधिक ३६ टक्क्यांनी वाढले असल्याचे 'अपना डॉट को'च्या ताज्या अहवालाने गुरुवारी स्पष्ट केले. देशात दरवर्षी जवळपास १ कोटी तरुण नोकऱ्यांमध्ये नव्याने सामील होत असतात आणि तरुणांतील नवोदित प्रतिभांना भरती प्रक्रियेतूनच संधी मिळत असतात. 'इंडिया ॲट वर्क २०२५' अहवालानुसार. महानगरांपलीकडे अन्य छोट्या-मोठ्या शहरांमध्ये सेवा-केंद्रित भरतीचा विस्तार, महिला आणि करिअरची सुरुवात करणाऱ्या व्यावसायिकांचा वाढता सहभाग, तसेच डिजिटल रिक्रूटमेंट टूल्सचा मोठ्या प्रमाणावर झालेला वापर हा रोजगार बाजारपेठेतील २०२५ मध्ये बदललेल्या प्रवाहाची वैशिष्ट्ये ठरली.नोकरी शोधणाऱ्या महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. वित्तीय सेवा, प्रशासकीय सेवा, ग्राहक अनुभव आणि आरोग्यसेवा सहाय्यक पदांसाठी महिलांकडून करण्यात आलेल्या अर्जांमध्ये ४० टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवण्यात आली. सरकारचे नियतकालिक श्रम सर्वेक्षणाचे निष्कर्षही यास दुजोरा देतात, ज्यातून महिलांची कार्यबलातील उपस्थिती सातत्याने वाढत असल्याचे आणि अधिकाधिक महिला संरचित करिअर मार्ग असलेल्या औपचारिक भूमिकांकडे वळत असल्याचे स्पष्ट होते.

फ्रेशर्सचा कल सेवा क्षेत्राकडे भारतातील तरुणांनी रोजगार बाजारपेठेत सक्रिय आणि प्रभावी सहभाग नोंदवला आहे. सेवा आणि तंत्रज्ञान-सक्षम उद्योगांमध्ये तरुणांकडून सादर करण्यात आलेल्या अर्जांमध्ये १० टक्क्यांहून अधिक वाढ गत वर्षभरात झाली. २०२५ मध्ये फ्रेशर्सकडून २.२ कोटींहून अधिक ॲप्लिकेशन प्राप्त झाली, जी २०२४ च्या तुलनेत १० टक्के अधिक आहेत.

लवकरच मावळत असलेल्या २०२५ मध्ये 'अपना'च्या प्लॅटफॉर्मवर जॉब पोस्टिंगसची संख्या १४ लाखांपर्यंत पोहोचली, जी मागील वर्षाच्या तुलनेत १५ टक्के वाढ दर्शवते. लहान व मध्यम उद्योगांमधील डिजिटल स्वीकार, तसेच द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधील उद्योगांचा विस्तार यामुळे ही वाढ शक्य झाली.

## मेटा, ॲमेझॉन, ॲपल, मायक्रोसॉफ्ट, नेटफ्लिक्स आणि गुगलकडून वर्षभरात ३२ हजारांहून अधिक भारतीय कर्मचाऱ्यांची भरती

**नवी दिल्ली: दि.२६ वृत्तसंस्था**




तंत्रज्ञान क्षेत्रातील फेसबुक (मेटा), ॲमेझॉन, ॲपल, मायक्रोसॉफ्ट, नेटफ्लिक्स आणि गुगल (अल्फाबेट) या प्रमुख अमेरिकन कंपन्यांनी २०२५ या वर्षात भारतात एकत्रितपणे ३२ हजारांहून अधिक नवीन कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. मनीकंट्रोलने पडताळणी केलेल्या स्पेशालिस्ट स्टाफिंग फर्म एक्सफेनोच्या आकडेवारीनुसार, भारतातील बहुराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या कर्मचारीसंख्येत ही वार्षिक १८ टक्के वाढ आहे. यासह बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील भारतीय कर्मचाऱ्यांची संख्या २,१४,००० इतकी झाली आहे.

नोकरभरतीमधील ही वाढ वेगाने विस्तारत असलेल्या एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) क्षेत्रात भारतीय कर्मचाऱ्यांच्या तंत्रज्ञान प्रतिभेची वाढती मागणी दर्शवते. एक्सफेनोचे सहसंस्थापक कमल करंथ म्हणाले, ''२०२५ या वर्षासाठी या कंपन्यांच्या कर्मचारीसंख्येत झालेली वाढ ही गेल्या तीन वर्षांतील सर्वाधिक आहे.''कर्मचारीसंख्येत वाढ होऊनही अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्या सर्वसाधारण पदांऐवजी केवळ विशिष्ट पदांसाठीच भरती करत आहेत, असे टीमलीज डिजिटलच्या सीईओ नीती शर्मा यांनी सांगितले.२०२५ मध्ये मोठ्या टेक कंपन्यांची भरती प्रामुख्याने एआय/एमएल ऑपरेशन्स, इंजिनिअरिंग डेटा, ॲनालिटिक्स, क्लाउड, सायबर सिक्युरिटी आणि गव्हर्नन्स यांसारख्या नवीन डिजिटल कौशल्यांवर केंद्रित होती. टीमलीजच्या विश्लेषणानुसार, कर्मचारीसंख्येत वाढ मर्यादित असली तरी या पदांची मागणी जवळपास २५-३० टक्क्यांनी वाढली आहे.

''भारतीय कर्मचाऱ्यांची मागणी प्रामुख्याने पारंपरिक सपोर्ट फंक्शन्सऐवजी उच्च-मूल्याच्या, विशेष तंत्रज्ञान कौशल्यांवर केंद्रित आहे'', असे नीती शर्मा म्हणाल्या. दरम्यान, एक्सफेनोचे सहसंस्थापक कमल करंथ यांनी सांगितले की, एआयच्या वापराचा परिणाम अद्याप भरती प्रक्रियेत पूर्णपणे दिसून आलेला नाही.

## थोडक्यात



### अटल बिहारी वाजपेयी यांना विनम्र अभिवादन

**नागपूर:** नागपूर महानगरपालिकातर्फे दिवंगत पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांना जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.
मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनातील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून विनम्र अभिवादन केले.
याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी. प्रामुख्याने उपस्थित होत्या. उपायुक्त डॉ. रंजना लाडे, मेघना वासनकर, राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले,जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, प्रमोद हिवसे, शैलेश जांभुळकर आदी उपस्थित होते.

### 'एसएचआरपी' साठी बुधवार अखेरचा दिवस

**नागपूर :** राज्यातील प्रत्येक वाहनाला अनिवार्य असलेल्या 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट'साठी पुढील बुधवार हा अखेरचा दिवस नियोजित केलेला आहे.
महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाकडून याआधी ३० नोव्हेंबर ही शेवटची मुदत दिली होती. मात्र, शहरातील अर्धेअधिक वाहनांची अद्याप नोंदणीसुद्धा झाली नसल्याचे समोर आले आहे त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे आता ३१ डिसेंबरपर्यंत सदर प्रक्रिया कोणत्याही परिस्थितीत करावे लागणार आहे यानंतर कोणत्याही सवलतीची शक्यता नसून वाहतूक नियमांच्या पालनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या चालकांवर पोलिस आणि राज्य परिवहन कार्यालय दंडात्मक कारवाईचा बडगा उगारणार आहे. दरम्यान, राज्यातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासह वाहनचोरी आणि गुन्हे रोखण्यासाठी राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या प्रत्येक वाहनांना 'एचएसआरपी' नंबरप्लेट बंधनकारक केली आहे.

## निधन

### ज्ञानेश्वर धोटे

**नागपूर :** झिंगाबाई टाकळी



येथील रहिवासी ज्ञानेश्वरराव धोटे यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर मानकापूर घाट स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले.

### सुमन बैंगने

**नागपूर :** अवधुत नगर क्रमांक



दोन येथील सुमनबाई घनश्यामजी बैंगने यांचे निधन झाले त्या ७९ वर्षांच्या होत्या सुमन बैंगने यांच्या पार्थिवावर मानेवाडा घाट स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले त्यांच्या मागे दोन मुले, चार मुली असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# तीन दिवसांत ५ उमेदवारी अर्ज दाखल

## पक्ष-अपक्षांच्या हाती उरले तीन दिवस,सर्वांत जास्त अर्जांची उचल झोन क्रमांक १० मधून

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ : नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा बिगुल वाजला असला तरी, उमेदवारी अर्ज भरण्याकडे इच्छुकांनी पाठ फिरवल्याचे चित्र आहे. गेल्या तीन दिवसांत शहरातून तब्बल ५,५०७ अर्जांची विक्रमी उचल झाली असताना, प्रत्यक्ष दाखल झालेले अर्ज मात्र बोटावर मोजण्याइतकेच आहेत. आजवर केवळ ५ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. प्रमुख राजकीय पक्षांच्या याद्या अद्याप जाहीर न झाल्याने आणि मध्ये आलेल्या सुट्ट्यांमुळे अर्ज भरण्याची प्रक्रिया थंडावली असून, आता हातात अवघे तीन दिवस उरल्याने इच्छुकांची धाकधूक आणि राजकीय गणिते दोन्ही वाढली आहेत.**

नागपूर महानगरपालिका निवडणूक विभागाकडून २३ डिसेंबरपासून (मंगळवार) अर्ज वाटप आणि स्वीकृतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शहरातील १० झोनमध्ये ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, प्रक्रियेच्या पहिल्या दोन दिवसांत म्हणजेच मंगळवारी आणि बुधवारी एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. गुरुवारी नाताळची सुट्टी असल्याने कामकाज बंद होते. आज, शुक्रवारी तिसऱ्या दिवशी जेमतेम ५ उमेदवारांनी आपले नशीब आजमावत अर्ज दाखल केल्याची माहिती मनपा प्रशासनाने दिली आहे.

एकीकडे अर्ज भरण्यास निरुत्साह असताना, अर्ज नेण्यासाठी मात्र झुंबड उडाली आहे. पहिल्या दोन दिवसांत ४,१५७ अर्ज नेले गेले, तर आज हा आकडा ५,५०७ वर पोहोचला आहे. मनपाकडून हे अर्ज मोफत मिळत असल्याने, 'घेऊन तर ठेवू' या भावनेतून अनेकजण अर्ज नेताना दिसत आहेत. नवलाईने अर्ज घेणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. राज्य निवडणूक आयोगाने अर्ज भरण्यासाठी एकूण ८ दिवस दिले होते. त्यातील नाताळ आणि रविवारची सुट्टी वजा जाता आता इच्छुकांच्या हाती केवळ ३ दिवस उरले आहेत. भाजप, काँग्रेससह प्रमुख पक्षांनी अद्याप आपल्या उमेदवारांच्या याद्या घोषित केलेल्या नाहीत. त्यामुळे 'एबी फॉर्म' कोणाला मिळणार? हे निश्चित नसल्याने बंडखोरीच्या तयारीत असलेले अपक्ष आणि पक्षाचे इच्छुक उमेदवार वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहेत. शेवटच्या तीन दिवसांत झोन कार्यालयांवर प्रचंड गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




### मोफत अर्जांमुळे 'विक्रमी' उचल!

**मनपा प्रशासनाने उमेदवारी अर्ज मोफत उपलब्ध करून दिल्याने प्रत्येक झोनमध्ये अर्जांची विक्रमी उचल होत आहे. यात झोन क्रमांक १० आघाडीवर असून, येथून सर्वाधिक ७८८ अर्जांचे वितरण झाले आहे. त्याखालोखाल इतर झोनमध्येही गर्दी आहे, मात्र झोन क्रमांक १ मध्ये सर्वात कमी उत्साह दिसून येत आहे. अनेक इच्छुक केवळ कुतूहल म्हणून तर काही जण प्रतिस्पर्ध्यांची संख्या वाढवण्यासाठी अर्ज नेऊन ठेवत आहेत. कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यातही वेळ जात असल्याने प्रत्यक्ष अर्ज भरण्याची गती मंदावली आहे.**

# देहविक्रीचा पदार्फाश, महिला आरोपी अटकेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** पोलिस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या 'ऑपरेशन शक्ती' अंतर्गत विशेष पथकाने इमामवाडा परिसरात धाड टाकून देहविक्रय अड्ड्याचा पदार्फाश करण्यात आला. या कारवाईत महिलेला अटक करण्यात आली असून, पीडितेची सुटका करण्यात आली आहे.

माहितीनुसार, इमामवाडा ठाण्याच्या हद्दीतील सिरसपेठेतील एका नित्यानंद मंदिराजवळ राजश्री पांडुरंग बावनकुळे (वय ४६ वर्षे) ही राहत्या घरी देहव्यापाराचा अड्डा चालवत होती. २४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:०० ते रात्री ११:४० च्या दरम्यान पोलिसांनी या ठिकाणी सापळा रचून धाड टाकली. यावेळी आरोपी महिला प्रत्यक्षात देहव्यवसाय करवून घेताना रंगेहात सापडली. पोलिसांनी घटनास्थळावरून पीडित महिलेची सुटका केली असून, तिला सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. कारवाईत एकूण किंमत ११,६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी राजश्री बावनकुळे विरुद्ध इमामवाडा ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३(२)(३) आणि अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी आरोपीला मुद्देमालासह इमामवाडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही यशस्वी कारवाई पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, सह-पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, पोलिस उपायुक्त (डिटेक्शन) राहुल माकणीकर, सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे शाखा) अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात महिला पोलिस निरीक्षक ललिता तोडासे, सपोनि श्याम अंगथुलवार, पोहवा सचिन श्रीरामे, राम निरगुडवार, विलास चिंचुलकर, फराज खान, अश्विनी खोडवेवार, पल्लवी वंजारी यांचा समावेश होता.

## १३८ ग्रॅम एमडी जप्त

**नागपूर, दि. २६ :** 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत १३८ ग्रॅम एमडी जप्त; तिघे अटकेत. नागपूर पोलिसांच्या गुन्हे शाखेने 'ऑपरेशन थंडर' या विशेष मोहिमेअंतर्गत मोठी कारवाई करत १३८ ग्रॅम एमडी पावडरसह तिघांना गजाआड केले. शुक्रवारी पहाटे कोराडी हद्दीत गस्त घालताना पोलिसांना संशयास्पद कार आढळली. पाठलाग करून झडती घेतली असता आरोपींकडे विक्रीसाठी आणलेले एमडी सापडले. या कारवाईत पोलिसांनी १३८ ग्रॅम एमडी, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, तीन मोबाईल आणि इंडिका कार असा एकूण २० लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे शेख इरफान शेख इस्माईल (३६, यशोधरानगर), शहबाज अहमद शेख रियाज अहमद शेख (२२, यशोधरानगर) आणि अंकितकुमार लक्ष्मण वन्सकर (२२, रा. सिवनी, मध्यप्रदेश) अशी आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# मनपा आयुक्तांची 'स्ट्राँग रूम'ला भेट

## सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थांची तपासणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या प्रशासकीय तयारीला आता वेग आला आहे या अनुषंगाने मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी निवडणुकीसाठी अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'स्ट्राँग रूम'ची प्रत्यक्ष पाहणी केली.



मनपाद्वारे बचत भवन नॉर्मल स्कूल वसाहत परिसर सीताबर्डी येथे 'स्ट्राँग रूम' उभारण्यात आले आहे. विशेष म्हणजे,राज्य निवडणूक आयोगाद्वारे प्राप्त होणाऱ्या ईव्हीएम मशीन या ठिकाणाहून झोन निहाय केंद्रावर पाठवले जाणार आहेत. नागपूर मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. तसेच, १६ जानेवारी रोजी मतमोजणी केली जाणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित आणि निर्दोष पार पाडण्याच्या उद्देशाने आयुक्तांनी या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेची बारकाईने तपासणी केली. स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम मशीनची सुरक्षा, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे, विद्युत पुरवठा आणि आगीपासून संरक्षणासाठीची यंत्रणा यावर त्यांनी विशेष लक्ष दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., मुख्य अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त मंगेश खवले, कार्यकारी अभियंता मनोज गद्रे, कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड, कार्यकारी अभियंता संजय माटे, श्री. नवघरे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी स्वप्नील लोखंडे, राज चौधरी आदी उपस्थित होते.

## शोध पथकाची धडक कारवाई

**नागपूर, दि. २६ :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने शुक्रवारी (ता. २६) शहरात अस्वच्छता पसरवणारे आणि नियम मोडणाऱ्यांविरोधात धडक कारवाई केली. पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात पथकाने एकूण ५२ प्रकरणांची नोंद करून ३५,६०० रुपयांचा दंड वसूल केला. या कारवाईत हातगाड्या व स्टॉल्ससमोरील अस्वच्छतेसाठी १७ प्रकरणांत ६,८०० रुपये, तर रस्ते अडवल्याप्रकरणी १७ जणांकडून १७,००० रुपये दंड आकारण्यात आला. चिकन-मटन विक्रेते आणि गॅरेज चालकांकडून कचरा टाकल्याबद्दल प्रत्येकी २,००० रुपये वसूल केले. तसेच, रस्त्यावर बांधकामाचा मलबा टाकणाऱ्या एकाकडून ५,००० रुपये, दुकानदाराकडून ४०० रुपये आणि इतर उपद्रवासाठी १२ प्रकरणांत २,४०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

# ११ मित्रांवर गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** पाटणसावंगीतील एनजे फार्म्समधील बॅचलर्स पार्टीदरम्यान आदित्य गजानन मोहिते याच्या मृत्यूप्रकरणी खापा पोलिसांनी त्याच्या ११ मित्रांविरुद्ध निष्काळजीपणे मृत्यूला कारणीभूत असल्याचा गुन्हा दाखल केला. ॲड. परिक्षित गजानन मोहिते यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

जोएल (जुवेल) सिंग, पंकज निकस, अभय धाबर्डे, रवी फुकटे, पराग धांडे, प्रज्वल सहारे, रोशन रणदिवे, आकाश बागुल, हटसन मिसाळ, रिचर्ड साखरपेकर व निरंजन चितपल्लीवार अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.माहितीनुसार, आदित्यचा मित्र जुवेल याने १५ नोव्हेंबरला फार्म हाऊसमध्ये बॅचलर पार्टी दिली. जुवेल, आदित्यसह अन्य काही मित्रांचा समावेश होता. यादरम्यान रात्री आदित्यला उलट्या झाल्या. जुवेल व त्याच्या साथीदारांनी आदित्यच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष केले. डॉक्टर मित्रांनीही त्याला तपासले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी एकाने आदित्यच्या खोलीत जाऊन त्याला जागविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो उठला नाही. त्याने आदित्यचा भाऊ ॲड. परीक्षित यांना माहिती दिली. त्याच्या मित्रांनी आदित्यला कोराडी मार्गावरील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. परीक्षित यांनी पोलिसांत तक्रार केल्याने पोलिसांनी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. दरम्यान, आदित्यच्या मृत्यूमागे घातपात व निष्काळजीपणा असल्याचा आरोप त्याची आई प्रज्ञा यांनी केला होता. याबाबत पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्याकडे त्यांनी तक्रार दाखल केली होती.

## नियोजन असेही.....



**नागपूर : नागपुरात 'नवे नागपूर' तयार होतेय़ मेट्रो रेल्वे, मिहान सर्व आहे. त्याच वेळी राज्य परिवहन महामंडळाचे स्थानिक बससुविधांकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. गणेशपेठ बसस्थानकात शिरताना आणि बाहेर पडताना तोंडाशी अन्य वाहनांची झुंबड असते त्यामुळे एकीकडील मार्ग असा (छायाचित्र) बंद केला; परंतु त्यातूनही दुचाकीस्वारांनी ड्रम आडवे तिडवे करत मार्ग शोधला आहे.**

# मांढळ बसस्थानकाचा श्वास कोंडला

## एसटी आणि कार चालकाच्या वादात प्रवासी खोळंबले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कुही, दि. २६ :** कुही तालुक्यातील प्रमुख व्यापारी नगरी असलेल्या मांढळ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात वाहतुकीची समस्या गंभीर बनली आहे. फेरीवाल्यांच्या आणि दुकानांच्या अतिक्रमणामुळे गुरुवारी (दि. २५) दुपारी ३:३० वाजता येथे मोठी वाहतूक कोंडी झाली. यावेळी आंभोरा-उमरेड एसटी बस आणि एका कार चालकामध्ये झालेल्या वादाने प्रवासी तासनतास खोळंबले होते.



मांढळ हे बाजारपेठ आणि शिक्षणाचे केंद्र असल्याने येथे पंचक्रोशीतील नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने येतात. मात्र, बसस्थानक परिसरात आणि रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. शिवाय अवैध प्रवासी वाहने रस्त्यावरच उभी राहत असल्याने रस्ता अरुंद झाला आहे. गुरुवारी बसने कारच्या आरशाला धक्का दिल्याने झालेल्या वादाचे रूपांतर मोठ्या वाहतूक कोंडीत झाले. या बेशिस्तीमुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून चालावे लागते. यापूर्वी येथे अपघातही झाले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने येथील अतिक्रमण तातडीने हटवावे, अशी मागणी होत आहे.

# नागपूर विद्यापीठात 'वीर बाल' दिवसाचे स्मरण



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आज, शुक्रवारी 'वीर बाल दिवस' निमित्त शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांच्या बलिदासाचे स्मरण करण्यात आले.

याप्रसंगी माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर आणि कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली, सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी उपकुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांनी दोन्ही वीर बालकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाला प्रभारी अधीक्षक श्री. शैलेश राठोड यांच्यासह विद्यापीठाचे अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सरहिंद येथे २६ डिसेंबर १७०४ रोजी, धर्म बदलण्यास नकार दिल्याने मुघलांनी साहिबजादा जोरावर सिंग (९ वर्षे) आणि फतेह सिंग (६ वर्षे) यांना भिंतीत जिवंत गाडले होते. या बालकांच्या अतुलनीय धैर्याच्या आणि बलिदानाच्या गौरवार्थ २०२२ पासून हा दिवस देशभर 'वीर बाल दिवस' म्हणून पाळला जातो.

**परिसंवाद ...** स्टार्टअप व इन्क्युबेशन परिसंस्था विकासावर आयोजन

# महाविद्यालये बनावित कौशल्य विकासाचे केंद्र- कुलगुरू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ : महाविद्यालये कौशल्य विकासाची केंद्र बनावेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इन्क्युबीन फाउंडेशन यांच्या सहकार्याने देवग्राम येथील अंत्योदय इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे 'उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्टार्टअप व इन्क्युबेशन परिसंस्था विकास' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद पार पडला.**




यावेळी कुलगुरू डॉ. क्षीरसागर मार्गदर्शन करीत होत्या. कार्यक्रमाला डॉ. गुरुदास डांगरे (पुणे), प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे, सहसंयोजक तथा विद्यापीठाचे इन्क्युबिन फाउंडेशनचे संचालक डॉ. अभय देशमुख यांची उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप संस्कृती, संशोधन वृत्ती व समस्या-आधारित नवकल्पना रुजवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. उच्च शिक्षण संस्थांनी केवळ पदवी प्रदान करणाऱ्या न राहता नवोन्मेष, उद्योजकता व कौशल्य विकासाचे केंद्र बनावे असे त्या म्हणाल्या. नाविन्यपूर्ण आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. या परिसंवादात संसाधन व्यक्ती डॉ. गुरुदास डांगरे (पुणे) यांनी आपल्या सखोल, अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी मुख्य भाषणातून स्टार्टअपची संकल्पना, इन्क्युबेशन सेंटरची उभारणी, शासनाच्या विविध योजना, उद्योग-शिक्षण समन्वय तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी नवोन्मेषी संकल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी कोणत्या टप्प्यांतून जावे, याबाबत त्यांनी प्रभावी सत्रांद्वारे स्पष्ट दिशा दिली. कार्यक्रमाचे सहसंयोजक डॉ. अभय देशमुख, डॉ. संजय टेकाडे, डॉ. सुनीलकुमार नविन, डॉ. संजय धनवटे, डॉ. अजय कारखरे, डॉ. किशोर झिलपे, डॉ. रविंद्र सोनटक्के, डॉ. राजू खर्डे, डॉ. राजेंद्र माणिकपुरे तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून स्टार्टअप संस्कृती बळकट करण्याबाबत विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. डॉ. प्रणाली इंगोले यांनी संचालन केले. इन्क्युबेशन केंद्र संचालक डॉ. कल्याणी ठाकरे यांनी आभार मानले



## अटलबिहारी वाजपेयी यांना अभिवादन

**नागपूर, दि. २६ :** दिवंगत पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जयंतीनिमित्त (सुशासन दिन) महावितरणतर्फे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. महावितरणच्या काटोल रोड येथील विद्युत भवन येथे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी अटलजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केल. नागपूर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांच्यासह महावितरणचे अनेक अधिकारी आणि कर्मचारी यांनी अटलजींना अभिवादन केले.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ www.ajinkyabharat.com

## काँग्रेसचे अफरोज खान लोधी यांचा राजीनामा

**अकोला :** मनपा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि माजी उपाध्यक्ष अफरोज खान लोधी यांनी आपल्या पदाचा आणि प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. गेल्या २० वर्षांपासून पक्षासाठी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करूनही उमेदवारी नाकारली जात असल्याच्या भावनेतून त्यांनी पाऊल उचलले आहे. महानगर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वानखडे यांना पाठवलेल्या पत्रात लोधी यांनी पक्षांतर्गत सुरू असलेल्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. लोधी यांनी पत्रात थेट आरोप केला आहे की, पक्षाचे डॉ. झिशान हुसेन आणि आमदार साजीद खान पठाण यांनी संगनमत करून अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांना डावलण्याचे राजकारण सुरू केले आहे. जे उमेदवार आयत्या वेळी पक्षात आले आहेत, त्यांना उमेदवारी देण्याचे ठरले असून यामुळे जुन्या कार्यकर्त्यांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक ११ मध्ये बाहेरून आलेल्या उमेदवारांना संधी दिली जात आहे. स्वाभिमानाशी तडजोड न करता त्यांनी महानगर सचिव पदाचा आणि काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे.

### महत्त्वाचे

## डॉक्टरांवर प्राणघातक हल्ला



**अकोला :** शहरातील रामदासपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आयकॉन हॉस्पिटलसमोर डॉक्टरांवर प्राणघातक हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. अज्ञात संशयितांनी झालेल्या वादातून डॉक्टर संजय भूपेंद्र शर्मा (३६) यांच्यावर हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. या घटनेमुळे शहरातील वैद्यकीय क्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एम-२० एफयू ७८९९ क्रमांकाच्या वाहनातून आलेल्या अज्ञात संशयितांनी डॉक्टर संजय शर्मा यांच्याशी वाद घातला. वादाचे रूपांतर अचानक हाणामारीत झाले आणि संशयितांनी डॉक्टरांवर हल्ला केला. हल्ल्यात डॉक्टर शर्मा जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे समजते. हल्ल्यानंतर संशयितांनी घटनास्थळी आपली कार तशीच सोडून पलायन केले. या घटनेची माहिती मिळताच रामदासपेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळावरील वाहन ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणी डॉक्टर संजय शर्मा यांच्या तक्रारीवरून रामदासपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीसीटीव्ही फुटेज, वाहनाची नोंदणी आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## मुस्लीमबहुल वॉर्डांची जबाबदारी मित्रपक्षांवर; महायुतीत धुसफूस

# शिंदेसेनेसाठी '१२/४' चा फॉर्म्युला!

। पद्माकर आखरे ।

**अकोला, दि. २६ : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून, अकोल्यात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. आगामी १५ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या मतदानासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. मात्र, सत्ताधारी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. भाजपने मित्रपक्ष शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यासमोर अटींची भिंत उभी केली असून, विशेषतः मुस्लीमबहुल वॉर्डांची जबाबदारी मित्रपक्षांवर ढकलून आपली 'सेफ झोन' रणनीती स्पष्ट केली आहे.**




नागपूर येथे महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीनंतर अकोल्यासाठी जागावाटपाचा नवा फॉर्म्युला समोर आला आहे. शिंदेसेनेने शहरात वाढलेली ताकद आणि माजी नगरसेवकांचे इनकमिंग पाहता १८ जागांची मागणी केली होती. मात्र, भाजपने त्यांना केवळ १२ जागांची ऑफर दिली आहे. या ऑफरमध्ये '१२ पैकी ४' असा कळीचा मुद्दा आहे. या १२ पैकी ४ जागा शिंदेसेनेला मुस्लीमबहुल वॉर्डांमधून लढवाव्या लागणार आहेत. भाजपची मते कमी असलेल्या किंवा विजयाची खात्री नसलेल्या भागात मित्रपक्षांना उतरवून स्वतःचे संख्याबळ सुरक्षित ठेवण्याची ही खेळी असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

### २०१७ चे संख्याबळ आणि ६१चा आकडा

■ २०१७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ८० सदस्यीय महापालिकेत भाजपने एकहाती सत्ता मिळवत ४८ जागा पटकावल्या होत्या. त्यावेळी स्वतंत्र लढलेल्या शिवसेनेला ०८ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ०५ जागा मिळाल्या होत्या. आता हे तिन्ही पक्ष महायुतीच्या माध्यमातून एकत्र असल्याने, या ६१ जागांवर पुन्हा एकदा त्याच पक्षांचे उमेदवार उभे राहण्याची शक्यता आहे. विद्यमान ६१ जागा सोडून शिल्लक राहणाऱ्या १९ जागांसाठी महायुतीत रस्सीखेच सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप यापैकी बहुतांश जागा स्वतःच्या पदरात पाडून घेण्यासाठी आग्रही आहे. मात्र, बदलत्या राजकीय समीकरणानुसार, मुस्लिम बहुल प्रभागांमधील काही जागा शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सोडल्या जाण्याची शक्यता आहे.

### शिंदेसेना आणि राष्ट्रवादीची कोंडी

■ शिंदे गटाने हिंदुबहुल वॉर्डांतून उमेदवारी मागितली होती, मात्र भाजपने ही मागणी फेटाळून लावली आहे. याच धर्तीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वाट्यालाही केवळ ८ ते १० जागा येण्याची शक्यता असून, त्यांनाही मुस्लीमबहुल वॉर्डांचाच पर्याय दिला जात आहे. यामुळे महायुतीतील घटक पक्षांमध्ये अंतर्गत नाराजी वाढली असून, जागावाटपाचा पेच अद्यापही कायम आहे.

## १५८६ अर्जांची उचल; तीन अर्ज दाखल

### वंचित आणि अपक्ष उमेदवारांनी उघडले खाते



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** महापालिका निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झाला असून, आतापर्यंत तब्बल १५८६ उमेदवारी अर्ज इच्छुकांनी नेले आहेत. मात्र, अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेत कमालीची संथगती दिसून येत असून, आज शुक्रवारी केवळ तीनच उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले. २३ डिसेंबरपासून सुरू झालेली ही प्रक्रिया ३० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. आता केवळ चार दिवस शिल्लक राहिले असले, तरी मध्ये रविवारची सुटी येत असल्याने प्रत्यक्षात अर्ज भरण्यासाठी उमेदवारांकडे फक्त तीनच दिवस उरले आहेत. शुक्रवारी दाखल झालेल्या तीन अर्जांमध्ये प्रभाग क्र. ३ क मधून राजेश शिंगोकार यांनी खुला वर्गातून, तर प्रभाग क्र. १४ अ मधून महिला राखीव गटातून वंचित बहुजन आघाडीच्या राजेशनी सावळे यांनी अर्ज दाखल केला आहे. याच प्रभागातून (१४ क) प्रवीण वाहूरवाघ यांनी सर्वसाधारण गटातून अपक्ष म्हणून आपली उमेदवारी नोंदवली आहे. अर्ज विक्रीचा विचार करता, २३ डिसेंबरला ५०८, २४ डिसेंबरला ४६५ आणि आज २६ डिसेंबर रोजी ६१३ अशा एकूण १५८६ अर्जांचे वितरण झाले आहे. शुक्रवारी, सहा झोनमधून एकूण ३४३ उमेदवारांनी ६१३ नामनिर्देशन पत्रे सशुल्क प्राप्त केली आहेत. यामध्ये झोन क्र. १ मधून ६९ उमेदवारांना ९६ अर्ज,झोन क्र. २ मधून ४५ उमेदवारांना ८७ अर्ज, झोन क्र. ३ मधून ७७ उमेदवारांना ११६ अर्ज, झोन क्र. ४ मधून ४७ उमेदवारांना १११ अर्ज, झोन क्र. ५ मधून ६२ उमेदवारांना १२७ अर्ज तर झोन क्र. ६ मधून ४३ उमेदवारांना ७६ अर्ज नेली.

### पक्षीय हालचाली आणि इच्छुकांची धाकधूक

■ निवडणूक अर्ज भरण्याची मुदत केवळ तीन दिवस असतानाही, वंचितचा अपवाद वगळता एकाही मोठ्या राजकीय पक्षाने अद्याप आपली अधिकृत उमेदवारी जाहीर केलेली नाही. युती आणि आघाडी मधील जागावाटपाचा पेच किंवा उमेदवारांच्या निवडीबाबतचा सस्पेन्स कायम असल्याने इच्छुकांची मोठी घालमेल होत आहे. अनेकांच्या नजरा पक्षाच्या अधिकृत यादीकडे लागल्या आहेत.

### शेवटच्या दिवसांत उसळणार गर्दी

■ शनिवार, सोमवार आणि अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असलेला मंगळवार या दोन दिवसात राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांची अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तीनच दिवसाचा अवधी शिल्लक असल्याने आता प्रशासकीय यंत्रणाही सज्ज झाली असून उमेदवारांना वेळेत अर्ज भरण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे.

## आवास योजनेचा पहिला टप्पा ३१ डिसेंबरपासून बंद होणार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** सर्वांसाठी हक्काचे घर या मोहिमेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या पंतप्रधान आवास योजनेचा पहिला टप्पा ३१ डिसेंबरपासून बंद होणार आहे. योजनेचा दुसरा टप्पा मात्र नियमितपणे सुरू राहणार आहे. या निर्णयामुळे पहिल्या टप्प्यातील ज्या लाभार्थ्यांची कामे संथ गतीने सुरू आहेत, त्यांच्या चिंतेत भर पडली आहे.



अकोला महापालिका क्षेत्रात पंतप्रधान आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यात एकूण ७ हजार ६४० घरकुलांना मंजुरी मिळाली होती. त्यापैकी छाननीअंती ३ हजार ७८ घरकुले पात्र ठरली. या पात्र घरकुलांपैकी २ हजार ८५३ घरांचे बांधकाम पूर्ण झाले असून, उर्वरित घरकुलांची कामे सध्या विविध टप्प्यांवर सुरू आहेत. ९ लाभार्थ्यांनी अद्याप घरकुलाचे काम सुरूच केलेले नाही. योजनेतील लाभार्थ्यांना चार टप्प्यांत निधी दिला जातो. मात्र, गेल्या आठ महिन्यापासून शासनाकडून निधी प्राप्त न झाल्याने अनेक घरकुलांची कामे रखडली होती. नुकताच शासनाकडून ३ कोटी ५६ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाल्याने लाभार्थ्यांच्या खात्यात हप्त्याची रक्कम जमा करण्यात आली आहे. सद्यस्थितीत ८८ घरकुलांचे काम तिसऱ्या टप्प्यात, ५० घरकुलांचे काम दुसऱ्या टप्प्यात, तर २८ घरकुलांचे काम पहिल्या टप्प्यात सुरू आहे.

केंद्र शासनाने ३१ डिसेंबरनंतर पहिला टप्पा बंद केल्यास, या कामांसाठी मिळणारा निधीही बंद होण्याची शक्यता आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम धिम्या गतीने केले आहे, त्यांना उर्वरित अनुदानाचा टप्पा मिळण्यात तांत्रिक अडचणी येऊ शकतात. अशा परिस्थितीत जर राज्य शासनाने पुढाकार घेऊन हा निधी उपलब्ध करून दिला, तरच या लाभार्थ्यांना दिलासा मिळू शकेल. अन्यथा, कामाच्या प्रगतीपथावर असलेले अनेक लाभार्थी उर्वरित अनुदानापासून वंचित राहण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

## बाप झाला 'कसाई'! पोटच्या मुलीवर नराधम पित्यासह काका अन् शेजाऱ्याचा अत्याचार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** ज्या बापाच्या खांद्यावर बसून मुलीने जग पाहायचे, त्याच जन्मदात्या पित्याने आपल्या १२ वर्षांच्या चिमुकलीचे आयुष्य उद्ध्वस्त केल्याची अंगावर काटा आणणारी घटना अकोला जिल्ह्यातील अडसूळ (ता. तेल्हारा) येथे उघडकीस आली आहे. नराधम बापाच्या या कृत्यात पीडितेचा सख्खा काका आणि एका वासनांध वृद्ध शेजाऱ्यानेही हात मिळवणी केल्याने संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. शाळेतील एका समुपदेशन सत्रामुळे या सैतानी साखळीचा पर्दाफाश झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित १२ वर्षीय मुलगी दीर्घकाळापासून या नरकात यातना भोगत होती. घरात वडील आणि बाहेरून येणारा काका यांच्याकडून तिचे शोषण केले जात होते. एवढेच नव्हे, तर शेजारी राहणाऱ्या एका वृद्ध व्यक्तीनेही



या परिस्थितीचा फायदा घेत मुलीवर अत्याचार केला. या प्रकरणी पोलिसांनी पोक्सो सह विविध गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल केले असून, पोलीस उपनिरीक्षक निलेश ठाकरे या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.कुंपणानेच शेत खाल्ल्याचा'' हा प्रकार उघड झाल्याने माणुसकीचा शेवटचा दोरही तुटल्याची भावना व्यक्त होत आहे.नराधम आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### 'त्या' सत्राने वाचवले आयुष्य

■ या धक्कादायक प्रकरणाचा उलगडा एका शाळेतील मार्गदर्शन सत्रामुळे झाला. चाईल्ड लाईन आणि प्रशासनातर्फे आयोजित सत्रात पीडित मुलीने हिंमत एकवटली आणि मुख्याध्यापक गणेश ठाकरे यांच्याकडे आपली आपबीती सांगितली. मुलीचे ते भयानक अनुभव ऐकून उपस्थित सुन्न झाले. मुख्याध्यापक आणि चाईल्ड लाईनच्या महिला अधिकाऱ्यांनी तातडीने तेल्हारा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

### दोन नराधम गजाआड; काका फरार

■ तेल्हारा पोलिसांनी या प्रकरणी तातडीने पावले उचलत पीडितेचा वडील आणि शेजारील वृद्ध आरोपीला अटक केली आहे. मात्र, नराधम काका गेल्या २० दिवसांपासून फरार असून तो पुण्यात लपल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तपास अधिकारी निलेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली फरार आरोपीच्या अटकेसाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे.

## शिक्षक बदली प्रक्रियेत बोगस प्रमाणपत्रांचे पोस्टमार्टम

### आरोग्य उपसंचालकांकडून पडताळणीचे आदेश

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** प्रतिनिधी जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत बनावट दिव्यांग आणि वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या आधारे लाभ घेणाऱ्या शिक्षकांचे धाबे आता दणाणले आहेत. या प्रकरणाची गंभीर दखल घेत अमरावती विभागाचे आरोग्य उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांनी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना संशयास्पद प्रमाणपत्रांची मूळ कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. आता आरोग्य विभागामार्फत या प्रमाणपत्रांची ऑन द स्पॉट फेरतपासणी केली जाणार असून, दोषींवर कारवाईची टांगती तलवार आहे.

२०२५ च्या शिक्षक बदली प्रक्रियेमध्ये दिव्यांग आणि गंभीर आजार संवर्गातून अनेक शिक्षकांनी बदल्या लावून घेतल्या. मात्र, यामध्ये मोठ्या प्रमाणात बोगसगिरी झाल्याचा आरोप गणेश कुरई यांनी तक्रारीद्वारे




केला होता. पती-पत्नीमधील मुख्यालयाचे अंतर कमी दाखवण्यासाठी बनावट दाखले आणि खोट्या आजारांची प्रमाणपत्रे सादर करून सोयीच्या बदल्या केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

**कशी होणार पडताळणी?**

आरोग्य उपसंचालकांनी अकोला मंडळासाठी एक विशेष वैद्यकीय समिती गठीत केली आहे. या समितीमार्फत खालीलप्रमाणे कडक तपासणी केली जाईल: ज्या शिक्षकांच्या प्रमाणपत्रांवर आक्षेप आहे, त्यांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीसमोर प्रत्यक्ष हजर राहावे लागेल. मूळ अर्जाची प्रत, दिव्यांग प्रमाणपत्र, साक्षांकित प्रत, जुने वैद्यकीय अहवाल यांची तपासणी होईल. सादर केलेली प्रमाणपत्रे ऑनलाइन डेटाबेस आणि संबंधित रुग्णालयातील जुन्या रेकॉर्डशी पडताळून पाहिली जातील.

### दोषींवर कठोर कारवाईचे संकेत

■ यापूर्वी या प्रकरणात नेमलेल्या चौकशी समितीमधील दोन गटशिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल दिशाभूल करणारा आल्याने शिक्षणाधिकाऱ्यांनी पुन्हा फेरअहवाल मागवला होता. मात्र, आता आरोग्य विभाग स्वतः मैदानात उतरल्याने या प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. जर प्रमाणपत्र बोगस आढळले, तर संबंधित शिक्षकांवर निलंबनासह फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

## विकास ठप्प; जि.प.निवडणूक तातडीने जाहीर करा

### जि.प., पं.स. आजी माजी पदाधिकारी-सदस्य असोसिएशनची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** नगर परिषद, नगर पंचायतची निवडणूक पार पडल्यानंतर आता महापालिका निवडणुकीचीही रणधुमाळी सुरु आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक तातडीने घेण्यात यावी, अशी मागणी जिल्हा परिषद, पंचायत समिती आजी-माजी पदाधिकारी आणि सदस्य असोसिएशन केली आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य च्या पदाधिकाऱ्यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेतली.

१३ ऑक्टोबर रोजी जि.प., पं.स.च्या आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पडली होती. मात्र आरक्षणाची टक्केवारी ५० टक्के पेक्षा जास्त झाली.




दरम्यान जिल्हा परिषद, पंचायत समिती आजी-माजी पदाधिकारी आणि सदस्य असोसिएशनने निवडणुकीबाबत निवडणूक आयोगाला निवेदन सादर केले आहे.

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका रखडल्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम झाला असून अनेक विकास योजना टप्पे झाल्या असून नागरिकांचे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत, असे असोसिएशनचे म्हणणे आहे. शिष्टमंडळामध्ये कैलास गोरे पाटील ( सोलापूर), सुभाष घरत (माजी उपाध्यक्ष ठाणे), उदय बने (माजी उपाध्यक्ष,रत्नागिरी जिल्हा परिषद),शरद बुट्टे पाटील (माजी. सभापती पुणे जिल्हा परिषद),अमोल पवार ( उपसभापती, पंचायत समिती खेड),भारत शिंदे ( मा.सभापती सोलापूर) गोपाल कोल्हे (विदर्भ अध्यक्ष जिल्हा परिषद असोसिएशन) प्रभाकर सोनवणे ( माजी सभापती जळगाव) नितीन मकाते (जिल्हा परिषद सदस्य सोलापूर) अरुण बालघरे (जिल्हा परिषद सदस्य सांगली) शिवाजी मोरे जिल्हा परिषद सदस्य कोल्हापूर) विकास गरड, सुधाकर घोलप यांचा समावेश होता.

### असे आहेत फॉर्म्युले

■ आरक्षणाच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला होता. त्यानुसार आरक्षणाची टक्केवारी ५० पेक्षा कमी हवी. या निर्णयानुसार सर्वसाधारणसाठी पाच सर्कल (गट-मतदारसंघ) वाढण्याची तर ओबीसींकरिता १४ असलेले सर्कल ९ होण्याची शक्यता असल्याचे तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

■ प्रशासकीय सेवेतील तज्ज्ञांच्या मते पहिल्या फॉर्म्युल्यानुसार सध्या जि.प.चे ५२ सर्कलमधील अनुसूचित जातासाठीचे १२ व अनुसूचित जमातीसाठीचे ५ सर्कल कायम राहणार आहेत. उर्वरित ३५ सर्कलमधून ९ सर्कल ओबीसींसाठी राखीव होऊ शकतात.

■ दुसऱ्या फॉर्म्युल्यानुसार सध्या ओबीसीसाठी राखीव असलेल्या १४ सर्कलमधून ५ सर्कल सर्वसाधारण करून उर्वरित ९ सर्कलही ओबीसींसाठी राखीव करण्यात येतील. आता शासन, निवडणूक आयोगाकडून कोणत्या फॉर्म्युल्यानुसार आरक्षण सोडतीची प्रक्रिया होते, हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे. त्यानुसार महिलांसाठी जागा राखीव होतील.

### 'ॲग्रोटेक २०२५' कृषी महोत्सव, पुष्प प्रदर्शनी, पशुप्रदर्शन व चर्चासत्रांचे आयोजन

# राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनीचे आज उद्घाटन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** कृषी क्रांतीचे प्रणेते स्व. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या बहुप्रतीक्षित भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनी ''ॲग्रोटेक २०२५'' चे उद्घाटन आज, शनिवार २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्या शुभहस्ते होणार आहे.

दिनांक २७ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत विद्यापीठाच्या क्रीडांगणावर ही तीन दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनी, कृषी महोत्सव, पुष्प प्रदर्शनी, पशुप्रदर्शन व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.



उद्घाटन सोहळा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमास महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, तसेच कृषी व तत्सम क्षेत्रात कार्यरत केंद्र व राज्यस्तरीय संस्थांचे संचालक, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य आणि जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.यंदाच्या ''ॲग्रोटेक २०२५'' प्रदर्शनीत चार भव्य डोम उभारण्यात आले असून ५५० हून अधिक स्टॉल्स शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. यंदाच्या प्रदर्शनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वतंत्र डोममध्ये भव्य पुष्पप्रदर्शन तसेच शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणारे पशुप्रदर्शन, जे पाहुण्यांचे विशेष आकर्षण ठरणार आहे. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदरवाडे, सह विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे (नागपूर), राजेंद्र घोरपडे (अमरावती), विदर्भातील सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, आत्मा प्रकल्प संचालक, संशोधक, विभागप्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी वर्ग तन-मन-धनाने परिश्रम घेत आहेत.



## महत्त्वाचे

### मुख्याध्यापक स्नेह मिलन व कार्यगौरव सोहळा

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील मुख्याध्यापकांमध्ये समन्वय वृद्धिंगत करण्यासह सेवानिवृत्त मुख्याध्यापकांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने मूर्तिजापूर येथे 'मुख्याध्यापक स्नेह मिलन व सेवानिवृत्त मुख्याध्यापक कार्यगौरव सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात नवनियुक्त मुख्याध्यापक तसेच मुख्याध्यापक संघाच्या नूतन कार्यकारिणीचाही सत्कार करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम शनिवार, २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तिडके नगर येथील श्रीराम मंदिर येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष शत्रुघ्न बिरकड भूषविणार आहेत. विशेष अतिथी म्हणून शिक्षक आमदार किरण सरनाईक उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून अकोला जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद माहोरे, उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे, गटशिक्षणाधिकारी वैशाली रामटेके, शिक्षण विस्तार अधिकारी संजय मोरे व सुषमा लांडे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच प्रसिद्ध वऱ्हाडी कवी व महाराष्ट्र शासन व्यसनमुक्ती पुरस्कारप्राप्त राजेंद्र भटकर यांचा काव्य सोहळा आणि सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम मुख्याध्यापक संघ, मूर्तिजापूर तालुका यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून अध्यक्ष अरविंद कोकाटे व सचिव देवानंद मुसळे यांच्यासह सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

### बालकांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**बोरगाव मंजू :** स्थानिक बोरगाव मंजू येथील हिदाया इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, तसेच त्यांच्यातील उत्साह व आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने नुकत्याच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धांमध्ये संगीत खुर्ची, धावण्याची शर्यत आदी खेळांचा समावेश होता. नर्सरी ते एल.के.जी. पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या खेळांमध्ये सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना शाळेचे संचालक साबीर यांच्या हस्ते पदके देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन निदाफ शेख यांनी केले, तर आभार प्रदर्शन अर्शिया नाज यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हफजा शेख, रेहाना तसेच मौली अकबर यांनी सहकार्य केले. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी करा: जिल्हाधिकारी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २६ :** ''मुलींच्या जन्माबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे ही काळाची गरज असून बेटी बचाव, बेटी पढाओ ही एक सामाजिक चळवळ म्हणून राबविली पाहिजे. स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा आणि सोनोग्राफी केंद्रांची नियमित तपासणी करून अनियमितता आढळल्यास कठोर कारवाई करा,'' असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बेटी बचाव, बेटी पढाओ जिल्हा कृती दल व संनियंत्रण समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बेकायदेशीर गर्भलिंग निदान किंवा गर्भपाताची माहिती देणाऱ्या व्यक्तीस शासनाकडून १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. तसेच, अशा प्रकरणांत मदत करणाऱ्या महिलेसही १ लाख रुपये दिले जातील. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल. नागरिक १८००२३३४४७५ किंवा ८४५९८१४०६० या क्रमांकावर अथवा संकेतस्थळावर तक्रार नोंदवू शकतात.

शाळा आणि खाजगी शिकवणी परिसरात होणारी छेडछाड रोखण्यासाठी पोलीस विभागाने निर्भया पथक आणि ११२ हेल्पलाइनच्या माध्यमातून सजग राहावे.

ग्रामीण व शहरी भागात पालकांचे समुपदेशन करावे आणि शाळा-महाविद्यालयांत जनजागृती उपक्रम राबवावेत. घरकाम करणाऱ्या महिलांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती पत्रकांद्वारे गरजू पर्यंत पोहोचवावी.

या बैठकीत जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर सुधारणे, मुलींचे शिक्षण आणि आरोग्य या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी सादरीकरण केले. बैठकीला विविध विभागांचे अधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## देऊळगावात बिबट्याकडून बकरी फस्त; शेतकऱ्यांचे नुकसान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**देऊळगाव, दि. २६ :** पातूर वनविभागाच्या क्षेत्रातील देऊळगाव येथे शेतकरी काशीराम जंगलूजी उपर्वट यांच्या बकरीवर बिबट्याचा हल्ला झाला आहे. ही घटना २६ डिसेंबर, शुक्रवार रोजी घडली, आणि शेतकऱ्याला अंदाजे १२ ते १५ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले, असे त्यांनी सांगितले.

मागील महिन्यापासून या भागात बिबट्याचे दर्शन होत असून, शेतकरी आणि पाळीव जनावरांसाठी धोका निर्माण झाला आहे. बकऱ्या चरायला नेल्यावर, बिबट्याने एक मोठी बकरी उचलून नेली, ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा तणाव निर्माण झाला.

गावकऱ्यांनी पातूर वनविभागाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. त्यांनी बिबट्याचा बंदोबस्त करून परिसरात शेतकरी आणि पाळीव जनावर सुरक्षित राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरून काढावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

वनविभागाने ही घटना नोंद घेतली असून तपास सुरू आहे. गावकऱ्यांचे मत आहे की, जर बिबट्याविरोधात त्वरित उपाययोजना झाली नाही, तर शेतकरी आणि पाळीव जनावरांचा जीव धोक्यात राहणार आहे.

देऊळगाव येथे बिबट्याने शेतकऱ्याची बकरी फस्त केली. अंदाजे १२-१५ हजारांचे नुकसान झाले. गावकऱ्यांनी वनविभागाकडे तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. शेतकरी आणि पाळीव जनावर सुरक्षित राहण्यासाठी त्वरित उपाययोजना अपेक्षित आहे. तपास सुरू आहे.

## नायलॉन मांजा विक्री केल्यास अडीच लाखांचा दंड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २६ :** उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी नायलॉन मांजाच्या वापरावर आणि विक्रीवर कठोर निर्बंध घालण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने जिल्ह्यात व्यापक जनजागृती व कारवाईचे निर्देश दिले आहेत. नायलॉन मांजामुळे दरवर्षी अनेक नागरिक जखमी होत असून काही घटनांमध्ये मृत्यूही झाले आहेत. ही गंभीर बाब लक्षात घेता, मांजाचा वापर व विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याची गरज न्यायालयाने स्पष्ट केली आहे.

नायलॉन मांजावरील बंदीबाबत माहिती असूनही काही नागरिक व विक्रेते त्याचे उल्लंघन करीत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत, नायलॉन मांजाचा वापर करणारे तसेच त्याची विक्री करणारे यांना थेट जबाबदार धरले जावे, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदविले आहे. कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळावी, या दृष्टीने सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या सूचनेनुसार, अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास त्यांच्या पालकांवर ५० हजार रुपये दंड, तर प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजाचा वापर करताना आढळल्यास ५० हजार रुपये दंड आकारण्याचा प्रस्ताव आहे. तसेच नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या व साठा बाळगणाऱ्या विक्रेत्यांवर प्रत्येक नियमाच्या उल्लंघनासाठी २ लाख ५० हजार रुपयांचा दंड आकारण्याचा विचार करण्यात आला आहे. या संदर्भात उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे ५ जानेवारी २०२६ रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. प्रस्तावित दंडात्मक कारवाईविरोधात ज्यांना हरकती अथवा निवेदन सादर करायचे आहे, त्यांनी त्या दिवशी न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ठरावीक दिवशी कोणतीही हरकत सादर न झाल्यास, वरीलप्रमाणे दंडात्मक कारवाईस सर्वसामान्य जनतेचा आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिली आहे.

## नागी येथे तीन घरफोड्या; ९.३५ लाखांचा मुद्देमाल लंपास

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरूळपीर, दि. २६ :** मंगरूळपीर तालुक्यातील नागी येथे मंगळवारी (दि. २४) मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी तीन घरांवर धाडसी घरफोडी करत तब्बल ९ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. कुटुंबीय गाढ झोपेत असतानाच चोरट्यांनी दरवाज्यांचे कडी-कोयंडे तोडून घरात प्रवेश केला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोहन रामदास राऊत यांच्या घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर फोडून चोरट्यांनी ९० ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत अंदाजे ४ लाख ५० हजार रुपये) व ३० हजार रुपये रोख, असा एकूण ४ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

याच रात्री राजेश अमृतराव राऊत यांच्या घरातून ५६ ग्रॅम सोन्याचे दागिने (२ लाख ८० हजार रुपये) व ३ हजार रुपये रोख, तर प्रदीप ऊर्फ दीपक विठ्ठलराव राऊत यांच्या घरातून ३३ ग्रॅम सोन्याचे दागिने (१ लाख ६५ हजार रुपये) व ७ हजार ५०० रुपये रोख रक्कम चोरीस गेली.

घरफोडीची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल क्षीरसागर, ठाणेदार किशोर शेळके यांच्यासह श्वान पथक व ठसे तज्ज्ञांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## चौहट्टा येथे अटल बिहारी वाजपेयी जयंती साजरी

**अकोट :** भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती गुरुवारी (दि. २५ डिसेंबर) अकोट तालुक्यातील चौहट्टा येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी स्व. वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात भाजपा जिल्हा सरचिटणीस राजू नागमते यांनी स्व. अटलजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, लोकशाही मूल्यांप्रती त्यांची निष्ठा, सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन व राष्ट्रहितासाठी घेतलेले निर्णय यांचा उल्लेख केला. त्यांच्या विचारांतून आजच्या पिढीला प्रेरणा मिळते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास चौहट्टा मंडळ भाजपाचे अध्यक्ष विठ्ठल वाकोडे, राजेश नागमते, दादाराव पेटे, मधुकरराव पाटकर, दत्तू पाटील गावंडे, किशोर सरोदे, मोहन सावरकर, चेतन डोईफोडे, विनोद मंगळे, युवा मोर्चाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर झामरे, मिलिंद पाटील गायकवाड, मनीष मोडक, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### नॅशनल (आंबेडकर) व्हॉइस मीडिया फोरमच्या जिल्हाध्यक्षपदी चंदन जंजाळ

**बाळापूर :** नॅशनल (आंबेडकर) व्हॉइस मीडिया फोरमच्या जिल्हाध्यक्षपदी चंदन जंजाळ यांची निवड करण्यात आली आहे. बाळापूर येथील बुद्ध विहारात सोमवार, दि. २६ डिसेंबर रोजी आयोजित बैठकीत सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत संघटनेच्या जिल्हास्तरीय विस्ताराबाबत, मीडिया क्षेत्रातील पत्रकारांचे हक्क, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे तसेच संविधानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चंदन जंजाळ यांच्या सामाजिक व पत्रकारितेतील सक्रिय कार्याची दखल घेत त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. निवडीनंतर बोलताना जंजाळ यांनी संघटनेच्या माध्यमातून दलित, वंचित व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत निर्भीड पत्रकारितेसाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. या बैठकीस फोरमचे पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येळवण ग्रामपंचायतीतील विकासकामांची पाहणी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**येळवण, दि. २६ :** ग्रामपंचायत येळवण येथे शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत झालेल्या व सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करण्यात आली. अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम व अमरावती विभागाचे उपायुक्त राजू फडके यांनी विविध विकास प्रकल्पांना भेट दिली.

यावेळी नालंदा बुद्ध विहार, अनुसूचित जमातीचे सभागृह, ग्रामपंचायत ग्रंथालय, सीसीटीव्ही कॅमेरे, अंतर्गत रस्ते व नाल्यांची पाहणी करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी व नव्याने सुरू असलेल्या अंगणवाडी इमारतीची तपासणी करण्यात आली. ग्रामपंचायत प्रांगणात झालेल्या विशेष सभेत ग्रामस्थ, अधिकारी, कर्मचारी व बचत गट सदस्यांना मार्गदर्शन करण्यात आले. झालेल्या कामांचे कौतुक करत पुढील अभियानात अधिक नियोजनबद्ध सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास सरपंच काजल मडावी, उपसरपंच आम्रपाली, सदस्य वेणूताई चोरपगार, नंदा कुंबरे, नंदा सोनवणे, अनिल मोहिते, शेषराव शेंद्रे, निरंजन गडलिंग, ग्रामपंचायत अधिकारी गणेश शिरसाठ, कर्मचारी संजय वाढवे, किसन चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते राजेश देशमुख, डी. एम. घडली, नाजुकराव चोरपगार, प्रफुल मडावी, गौतम वाहूरवाघ, ग्राम महसूल अधिकारी प्रतिभा जायले, सहाय्यक ऋषिकेश टोबरे, समन्वयक सेरेकर, सीआरसी नलिनी टोबरे, ममता शेंद्रे, कोरडे ताई, मुख्याध्यापक काळे, शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका दर्शना चोरपगार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वप्नाला आकार देणारी जिद्द; लक्ष्मी चक्रनारायण पीएसआय पदावर विराजमान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २६ :** मूर्तिजापूर तालुक्यातील मानाचा तुरा खोवणारी कामगिरी करत, जामठी बु. येथील लक्ष्मी वेणुताई मच्छिंद्र चक्रनारायण यांनी पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदापर्यंत मजल मारली आहे. नुकत्याच महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे पार पडलेल्या दीक्षांत संचलन सोहळ्यात त्या अधिकृतपणे पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवेत रुजू झाल्या.

२०२१ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेतलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत यश मिळवल्यानंतर, लक्ष्मी चक्रनारायण यांनी तब्बल एक वर्षाचे खडतर आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. प्रशिक्षणानंतर झालेल्या पीएसआय सत्र क्रमांक १२६ च्या अंतिम परीक्षेत त्यांनी राज्यात सातवे स्थान मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

आपल्या यशाबद्दल बोलताना पीएसआय लक्ष्मी चक्रनारायण म्हणाल्या,हे यश सततच्या प्रयत्नांचे, कठोर मेहनतीचे आणि माझ्यावर विश्वास ठेवून पाठबळ देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आहे. ग्रामीण भागातून येऊन अनेक अडचणींवर मात करून त्यांनी मिळवलेले हे यश आज अनेक तरुणींसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. पीएसआय लक्ष्मी चक्रनारायण यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, शिस्त आणि आत्मविश्वास असल्यास स्वप्नपूर्ती नक्कीच शक्य आहे.

मूर्तिजापूर तालुक्यातून घडलेली ही कामगिरी निश्चितच युवा पिढीसाठी, विशेषतः तरुणींना, स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची नवी ऊर्जा देणारी ठरेल.

### निधन वार्ता

**महादेव पाटेकर**



**पळसोद :** पळसोद येथील ज्येष्ठ नागरिक तथा शिवाजी शिक्षण संस्था, अकोट येथील सेवानिवृत्त शिक्षक स्व. महादेव मुराजी पाटेकर (वय ६५) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शिक्षण क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ सेवा बजावली असून, त्यांच्या कार्याची आठवण सर्वत्र केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन मुली असा बराच आप्तपरिवार आहे. त्यांचा अंत्यविधी शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी राहत्या घरातून, पळसोद येथून होणार आहे.

**उपक्रम** | वनिकी महाविद्यालयात पक्षी निरीक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

# पक्षीकट्टा उपक्रमातून युवा पक्षीमित्रांना नवी दिशा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**पक्षीकट्टा हा उपक्रम पक्षी निरीक्षण, नोंदणी व संवर्धनाची जाणीव निर्माण करणारा ठरत आहे. ई-बर्डसारख्या डिजिटल माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर पक्षी अभ्यासाशी जोडण्याचे काम या उपक्रमातून होत आहे.**

**अकोला, दि. २६ :** स्थानिक पक्षीमित्रांची नियमित भेट घडवून आणणे, विविध ठिकाणी पक्षी निरीक्षण करून त्यांची शास्त्रीय नोंद ठेवणे तसेच नव्या पिढीला पक्षी संवर्धन चळवळीशी जोडणे, या उद्देशाने महाराष्ट्र पक्षीमित्र, अकोला व निसर्ग कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याला 'पक्षीकट्टा' हा उपक्रम राबविण्यात येतो. याच उपक्रमाचा द्विदशकी पक्षीकट्टा नुकताच वनिकी महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी वनिकी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. हरणे, प्राध्यापक डॉ. हर्षवर्धन देशमुख, निसर्गकट्टाचे संस्थापक अमोल सावंत तसेच महाराष्ट्र पक्षीमित्रचे अकोला जिल्हा समन्वयक डॉ. मिलिंद शिरभाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना डॉ. जयंत वडतकर यांनी पक्षी निरीक्षणाचे पर्यावरणीय, शैक्षणिक व संवर्धनात्मक महत्त्व स्पष्ट केले. 'पक्षीकट्टा' हा उपक्रम नव्या पक्षीमित्रांना घडविणारा असून तो राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राबविला गेला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात सहभागी सदस्यांनी वनिकी महाविद्यालयाच्या परिसरात विविध पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांची शास्त्रीय नोंद ई-बर्ड या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नोंदविली.

या पक्षीकट्ट्यात महाराष्ट्र पक्षीमित्र व निसर्गकट्टाचे सदस्य, तसेच वनिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल सावंत यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. मिलिंद शिरभाते यांनी केले.

## अवैध संबंधास नकार दिल्याच्या आरोपातून लोखंडी पाईपने हल्ला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २६ :** अवैध संबंध ठेवण्यास नकार दिल्याच्या रागातून एका व्यक्तीने महिलेच्या घरासमोर येत तिला व तिच्या पतीला लोखंडी पाईपने मारहाण केल्याची घटना २४ डिसेंबर रोजी सकाळी ९.५० वाजताच्या सुमारास घडल्याची तक्रार मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या हल्ल्यात फिर्यादीच्या पतीच्या डाव्या हाताच्या बोटाला फ्रॅक्चर झाल्याचे वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाले आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, ३३ वर्षीय महिलेच्या घरासमोर आरोपी राजेंद्र बापुजी गायकवाड (वय ४७, रा. अमडापूर, ता. चिखली, जि. बुलढाणा) हा लोखंडी पाईप घेऊन आला. फिर्यादीने त्याच्याशी कोणतेही संबंध ठेवण्यास नकार दिल्याने संतप्त झालेल्या आरोपीने फिर्यादी व तिच्या पतीवर पाईपने मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यावेळी आरोपीने शिवीगाळ करून धमकी दिल्याचाही आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादीचा जबानी रिपोर्ट, वैद्यकीय प्रमाणपत्र व साक्षीदारांच्या आधारे संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आशिष शिंदे करीत आहेत.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### सहा महिने कालावधीचे ग्रंथपालन प्रशिक्षण सुरू



**रिसोड :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयामार्फत मान्यताप्राप्त सहा महिन्यांचे सुधारित ग्रंथपालन प्रशिक्षण वाशिम येथे सुरू करण्यात येत आहे. जिल्हा ग्रंथालय संघ, वाशिम या संस्थेस शैक्षणिक सत्र २०२६ करिता हे प्रशिक्षण वर्ग चालवण्याची मान्यता मिळाली असून, जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत हे वर्ग चालणार आहेत. हे प्रशिक्षण केवळ शनिवार आणि रविवारी चालणार असून, याला वयाची कोणतीही अट नाही. कोणत्याही शाखेतील बारावी उत्तीर्ण विद्यार्थी यासाठी पात्र असून, मूळ प्रमाणपत्रे जमा करण्याची आवश्यकता नाही. इतर ठिकाणी शिक्षण घेत असलेले विद्यार्थी किंवा नोकरीतील कर्मचारीही या प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतात. हे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर शाळा, महाविद्यालये, रेल्वे, सार्वजनिक ग्रंथालये, आरोग्य विभाग आणि खाजगी कंपन्यांमध्ये ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, अभिलेखापाल किंवा ग्रंथालय परिचर यांसारख्या विविध पदांवर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. अशी माहिती प्रशिक्षण प्रमुख प्रभाकरराव घुगे यांनी दिली आहे.

### स्वाती देशमुखांचा ग्रामपंचायतीतर्फे गौरव



**कोडोली:** स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात २५ डिसेंबर रोजी महिला सक्षमीकरणाचा प्रत्यय देणारा एक हृद्य सोहळा पार पडला. अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रतिनिधी म्हणून कोडोली सेवा सहकारी सोसायटीच्या स्वाती देशमुख यांची अविरोध निवड झाल्याबद्दल, ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कोडोलीच्या सरपंच लक्ष्मी इंगोले यांनी स्वाती देशमुख यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित केले. एका महत्त्वाच्या सहकारी संस्थेवर महिला प्रतिनिधीची बिनविरोध निवड होणे, हा गावासाठी अभिमानास्पद क्षण असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.
या सोहळ्याला उपसरपंच गजानन राऊत, ग्रामपंचायत सदस्य निर्मला शिंदे, इंदिरा काळे, मिलिंद देशमुख, मारुती भवाळ तसेच सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष गजानन राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच सुरेश पवार, गजानन घुबडे, सुनील देशमुख, बलभीम खडसे, प्रवीण चव्हाण, आशिष इंगोले यांसह अनेक ग्रामस्थ व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्ह्यात २७ कृत्रिम वाळू प्रकल्प प्रस्तावित

वाशिम: नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून शासनाने एम-सँड (कृत्रिम वाळू) धोरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे. या धोरणांतर्गत वाशिम जिल्ह्यात कृत्रिम वाळू युनिट उभारण्यासाठी जिल्हा खनिकर्म विभागाकडे आतापर्यंत २७ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. भारतीय मानकांनुसार बांधकामासाठी एम-सँड सुरक्षित आणि योग्य असल्याचे आवश्यक प्रमाणपत्रही उपलब्ध झाले आहे. प्राप्त प्रस्तावांवर सध्या प्रशासकीय कार्यवाही सुरू असून, लवकरच जिल्ह्यात कृत्रिम वाळूचे उत्पादन सुरू होण्याची शक्यता आहे.

# उपाध्यक्षपदाचा ‘क्लायमॅक्स’ राजुभाऊंच्या कोर्टात!

## गेमचेंजर भूमिकेकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष!

। धनंजय कपाले ।

**वाशिम, दि. २६ : वाशिम नगर परिषदेच्या निवडणुकीत जनतेने भाजपचे अनिल केंदळे यांना नगराध्यक्षपदी निवडून देऊन आपला स्पष्ट कौल दिला आहे. मात्र, आता खरा पेच उपाध्यक्ष पदाच्या निवडीवरून निर्माण झाला आहे. आकड्यांच्या या अटीतटीच्या खेळात सत्तेचे पारडे फिरवू शकणारा एकच हुकमी एक्का सध्या मैदानात असून, ते नाव म्हणजे काँग्रेसचे दिग्गज नेते राजूभाऊ वानखेडे! राजूभाऊंनी जर आपली राजकीय चाल खेळली, तर वाशिमच्या इतिहासात कधीही न पाहिलेला चमत्कार घडू शकतो, अशी दाट चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**



गेल्या अनेक दशकांपासून वाशिमच्या राजकारणाची नाडी ओळखणारे राजू वानखेडे हे केवळ एक नाव नसून ती एक राजकीय संस्था मानली जाते. शहराच्या विकासकामांचा, विशेषतः गुंतागुंतीच्या पाणीपुरवठा योजनेचा त्यांना असलेला गाढा अनुभव ही त्यांची मोठी ताकद आहे. वाशिमपुढील प्रलंबित प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी सत्ताधारी भाजपला साथ देण्याचा निर्णय घेतल्यास शहराचा कायापालट निश्चित मानला जात आहे. भाजपसोबत हातमिळवणी केल्यास वानखेडे यांना स्थानिक आमदार आणि राज्यातील महायुती सरकारचे मोठे पाठबळ मिळेल. सत्तेच्या बळावर शहरासाठी कोट्यवधींचा निधी खेचून आणण्याची क्षमता त्यांच्यात आहे. सत्तेतून विकास हा विचार करून त्यांनी पाऊल उचलल्यास वाशिममध्ये काँग्रेस-भाजप युती हा एक ऐतिहासिक प्रयोग ठरू शकतो. जर-तरची समीकरणे धक्कादायक ठरू शकतात. वाशिमच्या या सत्तासंघर्षात आगामी काळात चमत्कार घडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. जर राजू भाऊ वानखेडे यांनी विकासाचा अजेंडा समोर ठेवून भाजपला पाठिंबा दिला, तर नगराध्यक्ष अनिल केंदळे यांना प्रशासकीय कामात एका अनुभवी नेत्याची साथ मिळेल. यामुळे सत्तेचे संख्याबळ बहुमताच्या पार जाऊन एम.आय.एम. सारख्या तिसऱ्या पक्षाची फारसी गरज उरणार नाही.

वानखेडेंनी सत्ताधारी आमदारांशी समन्वय साधल्यास राज्याच्या तिजोरीतून वाशिमच्या पाणीपुरवठा व इतर योजनांसाठी विक्रमी निधी उपलब्ध होऊ शकतो. हा निर्णय शहराच्या भविष्यासाठी गेमचेंजर ठरेल. राजू वानखेडेंच्या एका निर्णयामुळे महाविकास आघाडीच्या गोटात मोठी फूट पडू शकते आणि विरोधकांच्या रणनीतीचा चक्काचूर होऊ शकतो. भाजपच्या कोअर कमिटीतील प्रमुख नेते पुरुषोत्तम चितलांगे, आमदार श्यामभाऊ खोडे, राजू पाटील राजे आणि माजी आमदार विजयराव जाधव हे वानखेडेंच्या अनुभवाचा उपयोग सत्तेच्या स्थिरतेसाठी कसा करून घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संभाव्य हालचालींमुळे एम.आय.एम. आणि इतर लहान घटकांचे किंगमेकर होण्याचे स्वप्न भंगण्याची चिन्हे आहेत. ज्यांच्या नावाने विरोधकांना धडकी भरते, असा हा काँग्रेसचा हुकमी एक्का जेव्हा आपली चाल खेळेल, तेव्हा वाशिमच्या सत्तेचा इतिहास नवा वळण घेईल. निवडून आलेले नगराध्यक्ष अनिल केंदळे आणि अनुभवी चाणक्य राजू वानखेडे हे दोन ध्रुव विकासासाठी एकत्र आले, तर हा वाशिमच्या राजकारणातील सर्वात मोठा राजकीय भूकंप ठरेल. आता सर्वांच्या नजरा सत्तेच्या या क्लायमॅक्सकडे लागल्या आहेत!

**अकल्पित पण ऐतिहासिक!**

लोकांना प्रश्न पडेल की, काँग्रेस-भाजप युती हे शक्य आहे का? तर राजकारणात काहीच अशक्य नसते. यापूर्वी महाराष्ट्रात पुणे पॅटर्न असो वा काही स्थानिक संस्थांमध्ये विकासासाठी झालेली छुपी युती. राजकारणाने अनेकदा आपले रंग बदलले आहेत. राजू वानखेडेंचे राजकीय वलय इतके मोठे आहे की, त्यांच्या एका निर्णयामुळे काँग्रेस-भाजप ही अकल्पित युती वाशिममध्ये सत्तेचा नवा अध्याय लिहू शकते. जर असे झाले, तर हा बदल केवळ सत्तेसाठी नसून वाशिमच्या प्रगतीसाठी एक मास्टरस्ट्रोक ठरेल.

> स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर एक महिन्याच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन आघाडी नोंदवता येते. जर या दोन्ही काँग्रेस सदस्यांनी मिळून (१००% संख्याबळ) भाजपसोबत नवीन आघाडी केली, तर ते सुरक्षित राहू शकतात. मात्र, जर या दोघांमध्ये फूट पडली आणि फक्त एकाने भाजपला साथ दिली, तर काँग्रेस पक्षाच्या तक्रारीवरून जिल्हाधिकारी त्या सदस्याचे पद रद्द करू शकतात.
>
> **- ॲड. परमेश्वर शेळके,**
> कायदेशीर सल्लागार, वाशिम

### कायदा काय म्हणतो?

काँग्रेसचे फक्त २ सदस्य निवडून आले आहेत. २ सदस्यांच्या २/३ ची गणना केल्यास ती १.३३ येते, म्हणजेच किमान २ सदस्य एकत्र असणे आवश्यक आहे. जर फक्त एका सदस्याने बाजू बदलली, तर तो ५०% होतो (२/३ पेक्षा कमी). त्यामुळे तो सदस्य कायदेशीररीत्या अपात्र ठरू शकतो.

# १८ हजार शेतकरी पीक विम्याच्या प्रतीक्षेत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २६ :** खरीप हंगाम २०२५ मध्ये मानोरा तालुक्यातील १८,०६८ शेतकऱ्यांनी पीक विमा उतरवला होता. मात्र, अतिवृष्टीने पिकांचे प्रचंड नुकसान होऊनही अद्याप विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. प्रशासनाने येत्या ८ दिवसांत हा विमा न दिल्यास, तालुक्यातील शेतकऱ्यांसह तहसील कचेरीवर विराट मोर्चा काढला जाईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते तथा माजी वीज मंडळ सदस्य अनिल राठोड यांनी दिला आहे.
तालुक्यातील शेतकऱ्यांनी सुमारे २७,४३९ हेक्टर क्षेत्रासाठी २ कोटी १० लाख ७२ हजार ४७१ रुपये इतका विमा हप्ता (प्रिमियम) शासनाच्या तिजोरीत जमा केला आहे. खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले. एकीकडे पीक हातचे गेले असताना दुसरीकडे शासनाकडून मदतीची केवळ घोषणा झाली, पण प्रत्यक्ष रक्कम अद्याप मिळालेली नाही.
शासन व्यापारीधार्जिणे असल्याचा आरोप अनिल राठोड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे शासनाच्या धोरणांवर सडकून टीका केली आहे. ‘‘शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन खाजगी बाजारात विक्री केल्यानंतर शासनाने हमीभाव केंद्र सुरू केले. हा प्रकार म्हणजे केवळ व्यापाऱ्यांचे हित जोपासणारा आहे. चोहोबाजूंनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची सध्या प्रचंड होरपळ होत असून शासनाने आता त्यांचा अंत पाहू नये,‘‘ असे राठोड यांनी म्हटले आहे.
मुदतीत तोडगा न निघाल्यास आंदोलन अटळ विमा कंपन्या आणि प्रशासनाच्या दिरंगाईमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. येत्या आठ दिवसांत विम्याची रक्कम थेट बँक खात्यात जमा न झाल्यास, उद्धव ठाकरे सेनेच्या वतीने मानोरा तहसीलवर तीव्र निषेध मोर्चा काढला जाईल, असा निर्वाणीचा इशारा यावेळी देण्यात आला.

# डोंगरगावची शाळा वाचविण्यासाठी ग्रामस्थ एकवटले!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २६ :** एककीडे शासन संविधानातील कलम २१ अ अन्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देत असताना, दुसरीकडे कमी पटसंख्येचे कारण पुढे करून शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात सापडले आहे. मानोरा तालुक्यातील डोंगरगाव येथील जिल्हा परिषद शाळा बंद करून ती अभयखेडा शाळेला जोडण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र, हा निर्णय विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतणारा असल्याने ग्रामस्थांनी याविरोधात



आक्रमक पवित्रा घेतला असून, गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. डोंगरगाव येथील शाळा बंद करून विद्यार्थ्यांना १ किमी अंतरावर असलेल्या अभयखेडा येथील शाळेत जाण्यास सांगण्यात येत आहे. मात्र, या दोन्ही गावांच्या दरम्यान एक मोठा नाला असून त्यावर पूल नाही. पावसाळ्यात हा नाला ओसंडून वाहत असल्याने लहान बालकांना तो ओलांडून शाळेत जाणे अत्यंत जीवघेणे ठरू शकते. विद्यार्थ्यांच्या जीवितास असलेला हा संभाव्य धोका लक्षात घेता, डोंगरगावची शाळा तिथेच कायम ठेवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. शासनाने १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे समायोजन करण्याचा निर्णय घेतला असला, तरी भौगोलिक परिस्थितीचा विचार होणे गरजेचे आहे. जर ही शाळा बंद केली, तर डोंगरगावचे ग्रामस्थ आमरण उपोषण करतील, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर सरपंच वंदना अवधूत प्रधान, महेश बाबुलाल राऊत, संतोष मनवर, श्रीकांत राऊत, दत्तगीर गिरी, नंदकिशोर राऊत, गजानन राऊत आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

> डोंगरगाव शाळेत सध्या पहिली ते तिसरीपर्यंतचे चिमुकले शिक्षण घेत आहेत. ही शाळा अभयखेडा शाळेला जोडल्यास विद्यार्थ्यांना दररोज जीवघेणी पायपीट करावी लागेल. पावसाळ्यात नाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने संवेदनशीलतेने विचार करून ही शाळा डोंगरगाव येथेच कायम ठेवावी.
>
> **- महेश राऊत**
> माजी सरपंच

# नवनिर्वाचित नगरसेवक वकिलांचा कारंजा बार असोसिएशनतर्फे गौरव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. २६ :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा कारंजा बार असोसिएशनच्या वतीने भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यामध्ये ॲड. फिरोज शेकुवाले, ॲड. सुभान खेतीवाले व ॲड. मिलिंद खंडारे यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.
या कार्यक्रमात एक उल्लेखनीय बाब अधोरेखित करण्यात आली ती म्हणजे, ॲड. सुभान खेतीवाले व ॲड. मिलिंद खंडारे यांच्या कुटुंबातील महिलांनी नेतृत्व स्वीकारत नगरसेविका म्हणून विजय संपादन केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा हा



वाढता सहभाग लोकशाही बळकट करणारा आणि महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने मैलाचा दगड असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.
वकिलीचा अनुभव जनहितासाठी वापरणार
सत्काराला उत्तर देताना ॲड. फिरोज शेकुवाले यांनी बार असोसिएशनचे आभार मानले. ‘‘वकिली व्यवसायातील अनुभव आणि लोकप्रतिनिधी म्हणून मिळालेली जबाबदारी यांचा योग्य समन्वय साधून कारंजा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरी समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू,‘‘ असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अविनाश वैद्य होते. याप्रसंगी संघटनेचे पदाधिकारी, ज्येष्ठ व कनिष्ठ वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते. बार असोसिएशनने सर्व नवनिर्वाचित प्रतिनिधींच्या भावी जनहितकारी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. धम्मानंद देवळे यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी अनुभवले व्यवहारज्ञान; बाल आनंद मेळावा उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर जैन, दि. २६ :** आजचे शिक्षण केवळ पुस्तकी न राहता ते अनुभवाधारित असावे, या उद्देशाने शिरपूर शिक्षण संस्था संचलित अहिल्यादेवी इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘बाल आनंद मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहारज्ञान आणि उद्योजकतेचे धडे मिळाले.

विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने खाद्यपदार्थ, खेळणी आणि लघुउद्योगाशी निगडित वस्तूंचे स्टॉल्स लावले होते. वस्तूंची विक्री करताना ग्राहकांशी संवाद, पैशांचे नियोजन आणि नफा-तोटा यांसारख्या व्यावहारिक गोष्टींचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.



नर्सरी ते चौथीपर्यंतचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी या मेळाव्यात मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

यावेळी संस्थेचे प्राचार्य अनंत देशमुख यांनी सक्षम नागरिक घडवण्यासाठी अशा अनुभवाधारित उपक्रमांची आवश्यकता व्यक्त केली. तर मुख्याध्यापिका भगत यांनी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला.

केवळ मनोरंजन न राहता, स्वावलंबन आणि आत्मविश्वासाची बीजे रुजवणारा हा मेळावा शिस्तबद्ध आयोजनामुळे यशस्वी ठरला.

**गुणवंतांचा सन्मान!** | **संत संताजींच्या विचारांचा जागर**

# कारंजात तेली समाजाचा मेळावा उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. २६ :** समस्त तेली समाज बहुउद्देशीय संघटनेच्या वतीने तेली समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांचा जयंती महोत्सव आणि समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा २५ डिसेंबर रोजी स्थानिक महेश भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष तथा माजी खासदार रामदास तडस होते. महोत्सवाचे उद्घाटन आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थितीमध्ये उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, जिल्हाध्यक्ष शिवदास सूर्य पाटील, राष्ट्रीय संघटक सुभाष घाटे, प्रमिलाताई जिरापुरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल खोरगडे, डॉ. श्याम काटेकर, राजूभाऊ



गुल्हाने, नायब तहसीलदार अनिल वाडेकर आणि इतर मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार सईताई डहाके म्हणाल्या की, ‘‘तेली समाजाशी माझे घनिष्ठ संबंध असून, मी सदैव या समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे.

अध्यक्षीय भाषणात रामदास तडस यांनी समाजाच्या संघटनशक्तीवर आणि विकासावर भर दिला. तसेच सुभाष घाटे व राजूभाऊ गुल्हाने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा गौरव व आयोजकांचे परिश्रम या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे अध्यक्ष किरण क्षार, उपाध्यक्ष अतुल गुल्हाने, अतुल ढोरे, सचिव सुनील दहापुते, सहसचिव संदीप गढवाले, कोषाध्यक्ष विनय गुल्हाने यांच्यासह प्रवीण राठोड, गजानन झंझाट, अनिल सुडके, प्रशांत बिजवे, बाबुराव सरोदे, किशोर पाठे व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे अन्नदाते म्हणून गजानन गढवाले, राजेश गढवाले व तुषार गढवाले यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन झंझाट यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल सुडके सर यांनी केले. या सोहळ्याला तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनखेडा ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र संगणक परिचालक नेमा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. २६ :** तालुक्यातील किनखेडा ग्रामपंचायत येथे आयोजित विशेष ग्रामसभेत गावासाठी स्वतंत्र संगणक परिचालक नेमण्याची मागणी लावून धरण्यात आली. सध्या दोन गावांमिळून एकच परिचालक असल्याने शासकीय कामांत अडथळे येत असून नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामसभेत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.
विकसित भारत योजनेच्या प्रचार आणि प्रसारासाठी या विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी परिचालकाअभावी होणाऱ्या त्रासाचा पाढा वाचला. एकाच व्यक्तीकडे दोन गांवाचा कार्यभार असल्याने दाखले मिळण्यास उशीर होणे, ऑनलाईन कामांसाठी ताटकळत राहणे असे प्रकार घडत आहेत. गावाचा विस्तार आणि कामाचा व्याप पाहता किनखेडा ग्रामपंचायतीला स्वतंत्र संगणक परिचालक मिळणे गरजेचे असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.
नागरिकांच्या मागणीची दखल घेत ग्रामसभेने या विषयावर सविस्तर चर्चा केली आणि स्वतंत्र परिचालक नेमण्याबाबतचा ठराव एकमताने मंजूर केला. हा ठराव पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागाकडे पाठवण्यात येणार आहे.
यावेळी भगवानराव अवचार, दिलीपराव अवचार, ज्ञानेश्वर अवचार, सुरेश अवचार, अजय चाटसे, राहुल खंडारे, शिवाजी अवचार, गजानन गिरी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

महत्त्वाचे

## महिला सरपंचाला मारहाण

**बाळापूर :** बाळापूर तालुक्यातील गट ग्रामपंचायत चिंचोली गणू येथील महिला सरपंच वनमाला वाघ यांच्यावर मारहाणीचा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता सरपंच वाघ घरी जात असताना मंगेश विश्वनाथ डोईफोडे यांनी त्यांच्याशी वाद सुरू केल्याचे तक्रारीत सांगितले आहे. तक्रारीनुसार, डोईफोडे यांनी ग्रामपंचायत अंतर्गत त्यांच्या वडिलांच्या जागा स्वतःच्या नावावर करण्याची मागणी केली. सरपंचांनी नियमांनुसार आवश्यक कागदपत्रे मागितली, तेव्हा आरोपीने शिवीगाळ केली आणि तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे जर जागा नावावर केली नाही, तर जीव धोक्यात येऊ शकतो अशी धमकी दिल्याचे सांगितले आहे. या घटनेमुळे सरपंच पती-पत्नी भयभीत आहेत, असे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी बाळापूर पोलीस स्टेशनमध्ये मंगेश डोईफोडे यांच्याविरोधात भा.दं. वि. कलम १५१(२), १५२, ११५(२) आणि ३(५) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ग्रामस्थांनी या घटनेबाबत चिंता व्यक्त केली असून, सरपंचच्या सुरक्षेसाठी त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## ग्रामसभेत 'विकसित भारत जी राम जी' संकल्पनेवर चर्चा

**उमरा :** उमरा येथील ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवार (दि. २६ डिसेंबर २०२५) रोजी ग्रामसभा उत्साहात संपन्न झाली. ग्रामसभेत 'विकसित भारत जी राम जी' या संकल्पनेवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली. ग्रामसभेत ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत १२५ दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच वेळेत काम उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद असल्याचे ग्रामस्थांना स्पष्ट करण्यात आले. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अयुब होते. 'विकसित भारत जी राम जी' ही संकल्पना ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, उपजीविकेच्या संधी वाढवणे, शेतीपूरक पायाभूत सुविधा उभारणे तसेच शाश्वत मालमत्ता निर्माण करण्यावर भर देणारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. रोजगारासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश असल्याचे नमूद करण्यात आले. या संदर्भात केंद्र सरकारस्तरावर धोरणात्मक प्रक्रिया व चर्चा सुरू असल्याची माहितीही ग्रामसभेत देण्यात आली. या ग्रामसभेला ग्रामपंचायत सदस्य, संगणक ऑपरेटर, आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# सनगाव धरणात बुडून मामासह दोन सख्ख्या भाच्यांचा मृत्यू

### आपात्कालीन पथकाने शोधले तिन्ही मृतदेह; परिसरात हळहळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरूळपीर, दि. २६ :** तालुक्यातील सनगाव शिवारातील धरणात बुडून मामासह दोन सख्ख्या भाच्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सिद्धार्थ मोहन बनसोड (वय ३५), अंकुश राजेंद्र भालेराव (१६) आणि कार्तिक राजेंद्र भालेराव (१४) अशी मृतांची नावे आहेत. २५ डिसेंबर रोजी हे तिघेही मामा-भाचे सनगाव शिवारातील धरणावर गेले होते. मात्र, रात्री उशिरापर्यंत ते घरी न परतल्याने शोधाशोध सुरू झाली. धरणाच्या काठावर त्यांचे कपडे आढळून आल्याने ते पाण्यात बुडाल्याची शक्यता निर्माण झाली. स्थानिक स्तरावर शोध घेऊनही यश न आल्याने आसेगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामकृष्ण भाकडे यांनी पिंजर येथील संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाला पाचारण केले. माहिती मिळताच जीवनरक्षक दीपक सदाफळे यांच्या नेतृत्वाखालील पथक रेस्क्यू बोट आणि अत्याधुनिक साहित्यासह घटनास्थळी दाखल झाले. अवघ्या एका तासाच्या शोध मोहिमेनंतर दुपारी १:१० वाजेच्या सुमारास १५ फूट खोल पाण्यातून तिन्ही मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. पथकातील मयूर सळेदार, शेखर केवट, अतुल उमाळे यांच्यासह इतर सदस्यांनी या मोहिमेत परिश्रम घेतले.

या घटनेवर जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे आणि तहसीलदार सुधाकर अनासुने यांचे बारकाईने लक्ष होते. घटनास्थळावर पोलीस प्रशासनासह महसूल विभागाचे अधिकारी, तलाठी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर घटनेमुळे सनगाव परिसरात शोककळा पसरली असून, स्थानिक नागरिकांनी शोध पथकाच्या धाडसाचे आणि तत्परतेचे कौतुक केले आहे.

## प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री प्रकरणात महिलेवर गुन्हा दाखल



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिवरखेड, दि. २६ :** ऑपरेशन प्रहर अंतर्गत हिवरखेड पोलीसांनी प्रतिबंधित नायलॉन चायनीज मांजाची अवैध विक्री करणाऱ्या महिलाविरुद्ध गुन्हा दाखल केला. फिर्यादी पोहेकॉ विजय बाबाराव सोळंके यांना गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून पोलीस आणि दोन पंचांनी आरोपीच्या राहत्या घरी संभाजी नगर येथे रेड कार्यवाही केली.

तपासात असे आढळले की आरोपीने नागरिक व प्राणी यांच्या जिवाला धोका असतानाही, आर्थिक फायद्यासाठी प्रतिबंधित नायलॉन मांजा जवळ बाळगून विक्री केली. यावरून पोलीस स्टेशन हिवरखेड जि. अकोला येथे अपराध क्रमांक ३९५/२०२५ कलम ११०, २२३ भारतीय दंड संहिता व कलम ४, ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी महिलेला अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले करत आहेत. या कारवाईत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट आणि सहा. पोलीस अधीक्षक निखील पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. हिवरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन राठोड, पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, पोहेकॉ विजय सोळंके आणि इतर कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

## दोन दुचाकींचा अपघात; तिघे गंभीर जखमी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

रिसोड-वाशिम मार्गावर वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. पंजाबराव देशमुख हायस्कूलच्या परिसरातील वाहनांच्या वेगावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने पावले उचलावीत, अशी मागणी आता स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून अपघात नेमका कशामुळे झाला, याचा शोध घेत आहेत.

**रिसोड, दि. २६ :** रिसोड-वाशिम मार्गावर आज सायंकाळच्या सुमारास काळजाचा थरकाप उडवणारी अपघाताची घटना घडली. कबीर कुटी परिसरातील पंजाबराव देशमुख हायस्कूलसमोर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात तिन्ही दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून, यातील एकाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २६ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५:३० वाजेच्या सुमारास जेव्हा हा मार्ग वर्दळीचा असतो, तेव्हा दोन भरधाव दुचाकी एकमेकांवर आदळल्या. धडक इतकी जोरदार होती की, दोन्ही दुचाकींच्या दर्शनी भागाचा चक्काचूर झाला असून दुचाकीस्वार रस्त्यावर दूरवर फेकले गेले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली आणि जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यास मदत केली. या अपघातामध्ये शालिग्राम किसन सुरसे (वय ३४, रा. कवठा, ता. रिसोड), किशोर देविदास बेंद्रे (वय ३५, रा. रिठद, ता. रिसोड) आणि सुभाष रंगनाथ खके (वय ५५, रा. रिसोड) हे तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केले. मात्र, किशोर देविदास बेंद्रे यांच्या डोक्याला आणि शरीराच्या अन्य भागाला गंभीर इजा झाल्यामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना अधिक तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली पुढील उपचारांसाठी तातडीने वाशिम येथे हलविण्यात आले आहे. उर्वरित दोन जखमींवर रिसोड येथे उपचार सुरू आहेत.

## सोयाबीन खरेदी ग्रेडनुसार करा; अन्यथा २ जानेवारीला आंदोलन

### प्रगती शेतकरी मंडळाची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २६ :** यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन बियाण्याची गुणवत्ता खालावली आहे. त्यामुळे नाफेडमार्फत होणारी सोयाबीन खरेदी मोठ्या प्रमाणात रोडावली असून त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसत आहे. खुल्या बाजारात सोयाबीन कमी दरात खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सुमारे एक हजार रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.

कापूस खरेदी योजनेत सुपर, एफ.ए.क्यू. आणि फेअर अशा ग्रेडनुसार कापूस खरेदी केली जाते. हीच पद्धत सोयाबीन खरेदीसाठीही राबविण्यात यावी, अशी मागणी प्रगती शेतकरी मंडळ, मूर्तिजापूरचे अध्यक्ष राजू वानखडे यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी १९ डिसेंबर २०२५ रोजी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावत यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांची परिस्थिती अवगत केली होती. मात्र, अद्यापही यावर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

यामुळे संतप्त झालेल्या नाफेड नोंदणीकृत शेतकऱ्यांनी येत्या नवीन वर्षात, २ जानेवारी २०२६ रोजी, मूर्तिजापूर तालुक्यातील नाफेड खरेदी केंद्रावर ट्रॅक्टरद्वारे सोयाबीन आणून टाकण्याचा इशारा दिला आहे. हा इशारा उपविभागीय अधिकारी, मूर्तिजापूर यांच्या मार्फत पणन मंत्री जयकुमार रावत यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

"त्वरित निर्णय घ्यावा व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा," अशी ठाम मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. या मागणीला प्रगती शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजू वानखडे, जनमंच नागपूरचे तालुकाध्यक्ष प्रा. सुधाकर गौरखेडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष कैलास साबळे, युवा सेनेचे तालुका प्रमुख अभी पोलकट, न्यू यंग बॉयज फार्मर्स ग्रुपचे मुन्ना नाईकनवरे, नंदकिशोर बबानिया, अनिल देवगिरकर, सतीश सरोदे, पंजाबराव गावंडे, डॉ. भास्कर वडूरकर, गजानन काटे, प्रफुल्ल मालधुरे, संजय वानखडे, सागर मानकर, गोपाल तायडे, अरुण बोंडे यांच्यासह बहुसंख्य शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला आहे.

## ३० वर्षांनंतर उजळल्या महाविद्यालयीन आठवणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**स्नेहबंध १९९५: मैत्रीचा सुवर्णसोहळा**

३० वर्षांनंतर एकत्र आलेल्या १९९५ बॅचच्या मित्र-मैत्रिणींनी 'स्नेहबंध १९९५' निमित्ताने आठवणींचा खजिना खुला केला. हास्य, भावना, किस्से आणि गुरू-शिष्य स्नेहाने भागधारक भवन भारावून गेले. हा सोहळा मैत्रीची नवी उर्जा देणारा ठरला.

**मूर्तिजापूर, दि. २६ :** काळाच्या ओघात संसार, व्यवसाय व विविध जबाबदाऱ्यांमध्ये गुंतलेल्या १९९५ च्या बॅचमधील मित्र-मैत्रिणी तब्बल तीन दशकांनंतर एकत्र आल्याने मूर्तिजापूरात भावनिक व आनंददायी वातावरण निर्माण झाले. तिडके नगर येथील भागधारक भवन येथे आयोजित 'स्नेहबंध १९९५' या स्नेहमेळाव्यात ४४ माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गोडे होते. तर मार्गदर्शक म्हणून प्रा. पांडे, प्रा. दिनानाथ गायकवाड, प्रा. डॉ. गोपाल उपाध्ये व प्रा. डॉ. के. डी. गावंडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या गुरूजनांचा आणि शिष्यांचा हा अपूर्व संगम ठरला. बदलत्या काळात कितीही प्रगती झाली तरी माणुसकी, मूल्ये व मैत्री जपणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. ३० वर्षांनंतर विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक म्हणून पाहताना शिक्षकांच्या डोळ्यांत अभिमान दिसून येत होता.

यावेळी शारदा खोकले, कविता पोपळे, अर्चना उंबरकर, कुमुदिनी जोगी, अभिजित बन्नोरे, सतीश मोखडकर, कुंदन देशमुख, प्रा. मुकेश सरदार, संदीप जोशी व गजानन हरणे यांनी आपले मनोगत व्यक्त करून परिचय करून दिला. जुन्या आठवणी, महाविद्यालयीन किस्से आणि आयुष्यातील अनुभवांनी सभागृह भारावून गेले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. एल. डी. सरोदे यांनी प्रभावीपणे केले. समारोपप्रसंगी अर्चना गबर झोपाटेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सुनील पवार, माधव कुडतरकर, संजय खंडारे, बंडू पाटील घाटे व नितीन शिंदे यांनी सहकार्य केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगे बाबा यांच्या विचारस्मरणाने व गाडगे महाराजांच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## अकोटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेलेली 'सर्द की सरगम'



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हजारो रसिकांच्या साक्षीने सांस्कृतिक महापर्व**

**अकोट, दि. २६ :** अकोटच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा अभूतपूर्व आणि ऐतिहासिक संगीतमय महोत्सव 'सर्द की सरगम' अकोट शहरात पार पडला. अकोट मेलोडी ग्रुपच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाने फक्त शहरच नव्हे, तर महाराष्ट्राचे लक्ष वेधले. राज्याच्या विविध भागातून हजारो रसिकांनी हजेरी लावून अकोटला एका रात्रीसाठी सांस्कृतिक राजधानी बनवले. उत्स्फूर्त दाद, टाळ्यांचा गजर आणि रसिकांची उसळी कार्यक्रमस्थळी संगीतमय वातावरण निर्माण करत होती.

या ऐतिहासिक सोहळ्याचे विशेष आकर्षण नव्या नगरपरिषद निवडणुकीत अकोटच्या राजकीय इतिहासात नवा अध्याय लिहिणाऱ्या पती-पत्नी उमेदवार दिलीप बोचे आणि विजया बोचे यांचा भव्य सत्कार ठरला. तसेच शिवसेना शिंदे गटाचे विजयी उमेदवार डॉ. विशाल इंगोले आणि नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार कु. चंचल पितांबर वाळे यांचाही गौरव करण्यात आला. राजकारण आणि संस्कृती यांचा दुर्मिळ संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. पोलीस निरीक्षक अमोल माळवे आणि स्वाती माळवे, गजानन शेळके उपअधीक्षक, राजेश गुरव नायब तहसीलदार, किशोर जुनघरे पोलीस निरीक्षक (अकोट ग्रामीण) यांच्यासह प्रशासनिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या ऐतिहासिक सोहळ्याला नागपूर येथील सारेगामा फेम गायिका गौरी शिंदे यांचा मंत्रमुग्ध करणारा गायनाविष्कार ठरला. प्रवीण पुंडके यांच्या ओघवते सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला वेगळीच उंची मिळाली. अकोटच्या नामांकित हॉटेल श्रीहरी त पार पडलेल्या या भव्य सोहळ्याने शहरभर चर्चा सुरू केली आहे. रसिकांनी मनसोक्त आनंद लुटला, आयोजकांचे कौतुक भरभरून केले, आणि 'सर्द की सरगम' हा कार्यक्रम अकोटच्या सांस्कृतिक इतिहासात अजरामर ठरणार आहे.

**अकोटचा सांस्कृतिक सोहळा:**

'सर्द की सरगम'ने अकोटला सांस्कृतिक राजधानी बनवले; हजारो रसिक उपस्थित, राजकीय आणि सांगीतिक मान्यवरांचा गौरव, आणि नागपूर फेम गायिका गौरी शिंदे यांचा मंत्रमुग्ध करणारा गायनाविष्कार शहरात ऐतिहासिक उत्सवाची उधळण.

स्वच्छ भारत मिशन | कचरापेट्या केवळ शोभेपुरत्या

## लाखोंचा खर्च, व्यवस्थापन शून्य; ग्रामपंचायतीवर प्रश्नचिन्ह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**स्वच्छ भारत मिशनअंतर्गत उभारलेले कचरापेटी बॉक्स वापराअभावी निष्क्रिय ठरत आहेत. निकृष्ट दर्जाचे बांधकाम, अतिक्रमण व घंटागाडीच्या उपलब्धतेबाबत शंका उपस्थित होत असून, खर्चाच्या बिलांवर ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यावर ग्रामपंचायतने तातडीने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी होत आहे.**

**जानोरी मेळ, दि. २६ :** निंबा अंदुरा सर्कलमधील मोखाजानोरी मेळ गट ग्रामपंचायत अंतर्गत स्वच्छ भारत मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या समोर येत आहे. जानोरी मेळ येथे चार ठिकाणी तसेच मोखा गावात तीन ठिकाणी उभारण्यात आलेले कचरापेटी बॉक्स वापराअभावी केवळ शोभेच्या वस्तू ठरत असून, त्यावर मोठमोठ्या बाभळीच्या झाडांनी अतिक्रमण केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या बांधकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

या कामांसाठी ग्रामपंचायतमार्फत लाखो रुपयांची बिले अदा करण्यात आल्याची नोंद असून, ९९ हजार रुपयांची घंटागाडी, ६८ हजार रुपयांचे घनकचरा व्यवस्थापन, तसेच जिल्हा परिषद शाळेतील हॅन्डवॉशसह इतर कामांच्या बिलांमुळे नागरिकांच्या भुवया उंचावल्या आहेत. प्रत्यक्षात मात्र आजतागायत एकच घंटागाडी उपलब्ध असून, दुसरी घंटागाडी खरेदी केल्याचा दावा व प्रत्यक्ष स्थिती यामध्ये तफावत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ओला व सुका कचरा व्यवस्थापनाचे कोणतेही ठोस नियोजन नसल्याने कचरापेटी बॉक्सचा प्रत्यक्ष उपयोग होत नाही. बांधकाम होऊन वर्ष उलटले तरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक कर्मचारी नियुक्त करण्यात आलेला नाही. ग्रामपंचायतने ग्रामसभेमार्फत खर्च, बिले व नियोजनाची सविस्तर माहिती द्यावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. याशिवाय जानोरी मेळ व मोखा येथील जिल्हा परिषद शाळांकडेही दुर्लक्ष झाल्याचा आरोप आहे. मोखा येथील शाळेच्या परिसरात पावसाळ्यात विद्यार्थ्यांना पाण्यातून जावे लागते. यासाठी पंधराव्या वित्त आयोगातून पेव्हर ब्लॉक बसवावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दोन्ही गावांतील नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने साप व इतर जीवजंतूंचा धोका वाढला असून, २५ डिसेंबर रोजी एका नागरिकाच्या घरासमोर मोठा साप आढळून आला होता. दोन गावांसाठी केवळ एकच कर्मचारी असल्याने कामे रखडत असल्याचे चित्र असून, प्रत्येक गावासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावेत, तसेच घरपट्टी व पानपट्टी वसुलीबाबत नियोजन बैठक घेऊन नागरिकांना विश्वासात घ्यावे, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष घालून सर्व कामे दर्जेदार व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावीत, अन्यथा पुढील भूमिका ठरवली जाईल, असा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

# डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती उत्साहात

## सकारात्मकता ही कुठल्याही समस्येवर उत्तर शोधण्यासाठी क्षमता निर्माण करते

अजिंक्य भारत / प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२६ :** वेगळं नावलौकिक मिळवलेली संस्था म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे एक वेगळे नाव मराष्ट्रासह देशात आहे. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी याच ध्येयाने प्रेरित होऊन तळागाळातील जनतेला शिक्षण मिळाले पाहिजे या दृष्टीने या संस्थेची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत असलेल्या जिजामाता महाविद्यालयात डॉ. भाऊसाहेब पंजाबराव जयंती उत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलतांना डॉ.किरण पाटील म्हणाले की १८ ते २३ वय हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे असते. या वयोगटात झालेले संस्कार आणि शिक्षण हे विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलून टाकते. म्हणून महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना अधिक परिश्रम घेण्याची आवश्यकता असते. आणि यातूनच विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण होणे गरजेचे असते. आवड आणि संस्कार वृद्धिंगत करण्यासाठी मनातुन भावना पाहिजे. एखादी भूमिका बजावत असतांना स्वीकारणे या वयात विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी ३६० अंशाच्या डिग्रीतून विचार करणे आवश्यक असते या वयातच शिस्त जर लागली तर त्या तिथूनच आयुष्य हे चांगले घडू शकते. प्रामाणिकपणा हा प्रत्येकाने आपल्या अंगी जोपासला पाहिजे. परीक्षेत एखाद्या वेळी कमी गुण मिळाले तरी चालतील. पण ते मेहनतीचे असले पाहिजे. चांगला दृष्टिकोन असेल तर कोणीही शंभर टक्के यशस्वी होऊ शकतो. सकारात्मकता ही कुठल्याही समस्येवर




उत्तर शोधण्यासाठी क्षमता निर्माण करते. आणि क्षमता निर्माण झाली म्हणजेच यशस्वीता सोबत येतेच. शिक्षण घेत असतानाच व्यावहारिक दृष्टिकोन महत्वाचा असतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्यक्तिमत्व विकासासाठी होऊ कसा होऊ शकतो याचा विचार करा. त्या तंत्रज्ञानावर किती अवलंबून राहायचे ते ठरवावे लागेल. यातून होणाऱ्या विकासाचे फायदे तोटे समजून घेऊन आधुनिक तंत्रज्ञान सोबत वैचारिक दिशा ठरवून जीवनक्रम ठरवावा. सध्याच्या काळात सामाजिक आव्हाने काय आहेत? हे विद्यार्थ्यांनी समजून घेऊन त्या आपण काय योगदान देऊ शकतो याचाही विचार करणे आवश्यक आहे. देशाची ताकद म्हणजेच युवा आहे. शिक्षण ही एक वेगळी कला आहे ती आत्मसात करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. या सगळ्या सोबत कृतीची जोड ही आवश्यक आहे. स्वतःहून काहीतरी करावे हे वृत्ती निर्माण व्हावी लागते. चांगले नागरिक होऊन देशाच्या विकासात व सामाजिक कार्यात युवकांनी स्वतःला झोकून दिले पाहिजे. सध्याच्या विचलित काळात स्वतःला ओळखणे हे देखील आवश्यक आहे. यासाठी विपश्यना, साधना मेडिटेशन करणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींचा अवलंब करून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्वाचा विकास केला पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा विपरीत वापर न करता योग्य दिशेने मार्गक्रमण करून विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे. सामाजिक विकासातही विद्यार्थ्यांनी महत्वाचे योगदान दिले पाहिजे असे प्रभावी विचार डॉ. किरण पाटील यांनी जिजामाता महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती उत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून मांडलेत. याप्रसंगी कार्यक्रमाची अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन चांगोले हे होते. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, नवीन संशोधनात नवीन पिढी आली पाहिजे असा प्रयत्न महाविद्यालयाच्या वतीने सातत्याने करण्यात येतो. याच अनुषंगाने महाविद्यालयात विविध प्रकारचे अभ्यासक्रम उपलब्ध असून विविध कार्यशाळा व कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयात सातत्याने करण्यात येते. समाजाप्रती जागरूक असलेला विद्यार्थी व भाऊसाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन काम करणारी नवीन पिढी घडवण्याचे काम जिजामाता महाविद्यालय सातत्याने करत असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.याप्रसंगी विचारपीठावर संस्थेचे आजीवन सदस्य व महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड बाबासाहेब भोंडे, प्रा.जगदेवराव बाहेकर, अशोकराव पाटील, आजीवन सदस्य सत्यजीत राऊत, यांचेसह रवींद्र लहाने, आयक्यूएसी समन्वयक प्रा.डॉ. सुबोध चिंचोले, प्रा. डॉ. सुरेश गवई, प्रा.डॉ. जे. जे. जाधव, प्रा. डॉ. संतोष कुंभारे, प्रा. रामेश्वर बनकर, हे प्रामुख्याने उपस्थितीत होते.

# अल्पवयीनांच्या हाती दुचाकी दिल्यास थेट पालकावर गुन्हा!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.२६ :** शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अल्पवयीन मुलांकडून होणारी जीवघेणी स्टंटबाजी आणि त्यामुळे निर्माण होणारा अपघातांचा धोका लक्षात घेता पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. १८ वर्षांखालील मुला-मुलींना दुचाकी चालवण्यास देणाऱ्या पालकांवर थेट फौजदारी कारवाई करण्यात बेईल, असा इशारा ठाणेदार भूषण गावंडे यांनी दिला आहे.

शहरातील मुख्य रस्ते, गजबजलेले चौक तसेच शाळा, महाविद्यालये व खासगी शिकवणी वर्ग परिसरात अल्पवयीन मुले भरधाव वेगाने दुचाकी चालवत असल्याचे वारंवार येत आहे. निदर्शनास विशेषतः शाळा सुटण्याच्या वेळेत हे प्रकार वाढत असून पादचारी, महिला आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अल्पवयीन दुचाकीस्वार आढळून आल्यास केवळ त्या मुलांवरच नव्हे, तर संबंधित पालकांवरही मोटार बाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे ठाणेदार गावंडे यांनी स्पष्ट केले. कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा सामाजिक हस्तक्षेप पोलीस प्रशासन खपवून घेणार नसल्याचेही त्यांनी सांगितले. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी, महिला व विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण देण्यासाठी चिखली पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले असून पालकांनी आपल्या मुलांच्या हट्टापोटी त्यांना बाहने देऊन स्वतःच संकट ओढवून घेऊ नये व पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहनही ठाणेदार भूषण गावंडे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत घाणीचे साम्राज्य

**खामगाव :** तालुक्यातील दिवठाणा येथील गावासाठी वापरात असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत मोठ्या प्रमाणात घाण साचल्याने ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विहिरीतील पाणी दूषित होवू शकते. पाणी दुषित झाल्यास मोठ्या संख्येने नागरीक आजारी पडू शकतात. नागरिकांना शुद्ध पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. या विहिरीच्या पाण्यावर गावातील अनेक कुटुंबे अवलंबून असली तरी दूषित पाण्यामुळे आजार पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी गावातील काही नागरिकांनी आपल्या घरीच आरओ फिल्टर बसवले आहेत, तर काही नागरिकांना बाहेरगावावरून पाणी विकत आणावे लागत आहे. यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या गंभीर प्रकाराकडे ग्रामपंचायत दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केल्याची चर्चा आहे. पार्श्वभूमीवर विहिरीची तातडीने साफसफाई, पाणी शुद्धीकरण व निर्जंतुकीकरण करणे अत्यांत आवश्यक असताना कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. लवकरात लवकर विहिरीची स्वच्छता करून गावाला शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### दत्त जयंती उत्साहात साजरी

**बुलडाणा :** प्राचीन मंदिर असलेलं दत्त मंदिर संस्थान पुरबार गल्ली खामगांव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या उत्सवात सकाळ-संध्याकाळ आरती, भजन, कीर्तन, दत्त नाम जप करण्यात आला. सदर जयंती प्रसंगी अन्नदान करण्यात आले. यावेळी सभोवतालचा पूर्ण परिसर भक्तीमय झाला महिला मंडळाचे सहकार्य लाभले. या दत्त जयंतीच्या उत्सवामुळे सभोव होता. या दत्त सप्ताहकरिता सर्व दत्त भक्तांनी मोलाचे सहकार्य केले.

### गर्भाशय कर्करोग प्रतिबंधासाठी लसीकरण शिबिर

**मलकापूर :** स्थानिक लीलाधर भोजराज चांडक विद्यालय येथे २४ डिसेंबर रोजी अंकुर सीड्स नागपू यांच्या वतीने विद्यार्थीनींसाठी नजिक गर्भाशय प्रतिबंधासाठी लसीकरण कर्करोग विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित करण्यात आलेल्या विशेष लसीकरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दामोदर लखानी, प्रमुख उपस्थितांमध्ये अंकुर सिड्स प्रा. लि. चे प्रादेशिक व्यवस्थापक सुबोध मेहरील, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश उबरकार, इंडियन असोसिएशनचे मेडिकल सचिव डॉ. नितीन बऱ्हाटे, डॉ. रिया चोपडे, डॉ. सुदीप देशपांडे, नगर सहसंघचालक राजेश महाजन, नगर सेवा समितीचे कार्यवाह डॉ. जयंतराव राजूरकर, डॉ. राजेंद्र दीक्षित, शक्तीसिंह राजपूत, रमेश सदानी, डॉ. गिरीश टावरी, डॉ. डाबेराव, तसेच प्राचार्या डॉ. लड्डा, सौ. काळबांडे उपस्थित होते. यावेळी डॉ. राजेश उंबरकर यांनी आरोग्य विषयक महिलांना भेडसावणाऱ्या गंभीर व चिंताजनक आजारापैकी गर्भाशयाचा कर्करोग एक सांगून मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये लि. भो. चांडक विद्यालय, गो. वि. महाजन विद्यालय, सरस्वती कन्या शाळा व हिराबाई क. संचेती कन्या शाळेतील ४०५ विद्यार्थिनींचे यशस्वी लसीकरण करण्यात आले.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | ११०० - २३०० |
| गहू | २२५० - २४०५ |
| तुर | ४३०० - ६९२५ |
| हरभरा | ४००० - ५२०० |
| सोयाबीन | ३८०० - ५१५० |
| उडीद | ३२०० - ६००० |
| तीळ | ९५०० - ११००० |
| मका | १०२५ - १५६५ |

# गळफास घेऊन शेतकरी युवकाची आत्महत्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि. २६ :** येथील माळीपेठ मध्ये राहत असलेल्या एका शेतकरी युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. २४ डिसेंबर चे दुपारी तीन वाजता उघडकीस आली आहे. शाम जयराम अवचार वय ३० असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नांव आहे. टुव्हीलर मेकॅनिक होता

याबाबतची अधिक माहिती अशी की, येथील माळीपेठ भागात राहणारा तसेच व्यवसायाने टुव्हीलर मेकॅनिक असलेल्या श्याम जयराम अवचार या ३० वर्षीय तरुणाने लव्हाळा रोडवरील शेखर शुक्ल यांचे शेतातील लिंबाच्या झाडाला स्वतःला गळफास लावून आत्महत्या केली



आहे. दरम्यान सदर घटनेने खळबळ उडाली आहे. कर्जापायी असा टोकाचा निर्णय घेल्याचे बोलल्या जात आहे. घटनेची माहिती मिळताच साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे दुय्यम ठाणेदार गणेश डोईफोडे यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मेहकर येथे पाठविण्यात आला आहे. मृतकाचे मामा विजय हरिभाऊ जैवाळ यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

# अन्न नालीत फेकणाऱ्यांवर कारवाई होणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.२६:** शेतात धान्य पिकविण्यासाठी शेतकरी अहोरात्र मेहनत करतात. मात्र, त्याच अन्नाची नासधूस होवून ते नालीत फेकल्या जात असल्यामुळे सदर अन्न सडून रोगराई वाढण्याची शक्यता निर्माण होण्याची शक्यता पाहता, मोताळा तालुक्यातील तरोडा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ॲक्शन मोडवर येत गावात दवंडी देवून अन्न नालीत टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याचा आक्रमक पवित्रा घेतला आहे.

अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे अन्न केवळ पोट भरण्याचे साधन नाही. ते जीवन, उर्जा




आणि सृष्टीचा आधार आहे. अन्नाचा आदर करावा, ते वाया घालू नये.. पाहिजे तेवढेच घ्यावे योग्य प्रमाणात सेवन करावे, असे भारतीय संस्कृतीत सांगितलेले आहे. शेतात अन्न पिकविण्यासाठी शेतकरी अहोरात्र कष्ट करतात. मात्र, तरोडा गावात नाल्यांमध्ये कचरा आणि शिजविलेले अन्न टाकल्या जात असल्यामुळे रोगराई वाढण्याची शक्यता पाहता ग्रामपंचायत प्रशासन अधिकाऱ्यांनी २४ डिसेंबर रोजी दवंडीचे एक पत्राक जारी करीत शिजविलेले अन्न नालीमध्ये टाकू नये. जे नागरिक अन्न नालीमध्ये टाकतात. त्यामुळे रोगराई पसरल्यास अन्न टाकणाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे संकेत त्यांना दिले आहे. हा स्वच्छतेचा एक स्तुथ निर्णय असून या निर्णयाचे तालुक्यात कौतूक होत आहे. मात्र, रोगराई पसरल्यानंतर नालीत अन्न टाकणाऱ्यांना पकडण्याचे ग्रामपंचायत प्रशासनासमोर एक मोठे आव्हान राहिल, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त शोभायात्रा



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२६ :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष स्व. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त जिजामाता महाविद्यालयाच्यावतीने बुलढाणा शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत स्व.भाऊसाहेब देशमुख, मा जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषा साकारलेले विद्यार्थी शोभायात्रेचे आकर्षण ठरले. स्व.भाऊसाहेब देशमुख यांच्या शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करून पूजन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या शोभायात्रेचा समारोप जिजामाता महाविद्यालयात करण्यात आला.

# अटल बिहारी हे कणखर नेते - डॉ. मोहन बनोले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२६:** भारत रत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त शेगाव शहर व ग्रामीण भारतीय जनता पक्षाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. मोहन बनोले यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत मनोगत व्यक्त केले. अटल बिहारी हे कणखर, दूरदृष्टीचे आणि तत्वनिष्ठ नेते होते. तीन वेळा पंतप्रधानपद भूषवताना त्यांनी देशहिताला सर्वोच्च स्थान दिले. उत्कृष्ट वकृत्व, लोकशाही मूल्यांवरील निष्ठा आणि सर्वसमावेशक विचारधारेमुळे ते सर्वपक्षीय सन्मानास पात्र ठरले, असे डॉ. बनोले यांनी सांगितले.

भारतरत्न माजी पंतप्रधान



अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त शेगाव शहर व ग्रामीण भारतीय जनता पक्षाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच त्यांच्या जीवन व कार्याला उजाळा देण्यात आला. अटल बिहारी वाजपेयी (२५ डिसेंबर १९२४ १६ ऑगस्ट २०१८) हे भारताचे माजी पंतप्रधान, कवी, लेखक आणि पत्रकार होते. जनसंघाच्या स्थापनेपासून राष्ट्रीय राजकारणात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. तीन वेळा पंतप्रधान म्हणून त्यांनी भारताच्या राजकीय, आर्थिक आणि परराष्ट्र धोरणात महत्वाचे बदल घडवून आणले. त्यांच्या राष्ट्रसेवेसाठी त्यांना 'भारतरत' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# बुलढाणा आगारात ई-बसेस दाखल

**बुलडाणा दि.२६:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये आमुलाग्र बदल होत असून प्रदूषणमुक्त पर्यावरण मोहीम राबवण्याच्या दृष्टिकोनातून बॅटरीवर इलेक्ट्रिक चार्जिंग द्वारे चालणाऱ्या ई बसेस मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याच्या मुख्यालय असलेल्या बुलढाणा आगारांमध्ये १२ ई बसेस दाखल झाल्या असून त्या बसेसच्या सर्व घटकातील प्रवाशांनी या बससेवेचा लाभ घ्यावा असे प्रतिपादन आमदार संजय गायकवाड यांनी आज बुलढाणा बसस्थानक वर उद्घाटन प्रसंगी केले. बुलढाणा आगार व्यवस्थापक अमोल गडलिंग यांनी आयोजीत केलेल्या या उद्घाटन कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते शिंदे, स्वीय सहाय्यक श्रीकृष्ण शिंदे, विभाग नियंत्रक शुभांगी सिरसाट, विभागीय वाहतूक अधिकारी डीगांबर जाधवसह आदी उपस्थित होते.

# अनिकेत पवार मंत्री प्रतापराव जाधव यांनी केला सत्कार

**बुलडाणा दि.२६ :** अत्यंत गरीब परिस्थितीतून शिक्षण घेत येथील अनिकेत राजेश पवार याने सी. ए.ची परीक्षा प्रथम श्रेणी पास करून आपल्या यशाची चुणूक दाखविली. त्याच्या या यशाबद्दल केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी अनिकेतचा सत्कार केला.

अनिकेत राजेश पवार पुणे येथे उच्च शिक्षण घेत असून कौटुंबिक परिस्थितीचे भान ठेवत त्याने हे यश संपादन केले. वडील राजेश पवार यांनी अत्यंत काबाडकष्ट करून मुलांना शिक्षण दिले. चहाचे हॉटेल चालवून वेळप्रसंगी खारी ब्रेड विकून व खाणावळ चालवून आपला



कौटुंबिक प्रपंच चालविला, मात्र मुलांच्या शिक्षणात त्यांनी काहीही कमतरता पडू दिले नाही. वडिलांच्या या कष्टाची जाण ठेवून मुलगा अनिकेत याने आपले लक्ष्य अभ्यासात केंद्रित करून अशा गरीब परिस्थितीतही शिक्षण पूर्ण करून वडिलांच्या कष्टाचे चीज केले. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या यशाचे श्रेय तो आई-वडील यांना देतो.

केंद्रीय मंत्री नामदार प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड यांनी त्याचा कुटुंबासह सत्कार करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**आवाहन** रब्बी हंगामाची ई-पीक पाहणी सुरू

# शासकीय लाभासाठी शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करा - तहसीलदार दिवटे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेदुर्जन दि.२६:** रब्बी हंगाम २०२५-२६ साठी ई-पीक पाहणी ( ) नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली असून, तालुक्यातील शेतकऱ्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी आपली पीक नोंदणी विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे. राज्य शासनाच्या ई-पीक पाहणी प्रकल्पांतर्गत पिकांची अचूक माहिती संकलित करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या मोबाईल ॲपद्वारे ही प्रक्रिया राबविली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या पिकाची नोंद स्वतःच सातबारावर करता येणार आहे.

नोंदणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे : शेतकऱ्यांनी खालील तारखांची नोंद घेऊन आपली नोंदणी पूर्ण करावी: शेतकरी स्तरावरील नोंदणी १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ ,




सहाय्यक स्तरावरील पडताळणी २५ जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ ई-पीक पाहणी का महत्वाची आहे? तहसीलदार दिवटे यांनी स्पष्ट केले की, ई-पीक पाहणी ही केवळ एक नोंदणी नसून ती भविष्यातील अनेक लाभांसाठी आधार आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना अनेक अडचणी येऊ शकतात पीक विमा ( ): पीक विम्याच्या दाव्यासाठी ई-पीक पाहणीचा अहवाल महत्वाचा ठरतो, शासकीय अनुदानः विविध योजनांतर्गत मिळणारे अनुदान आणि नुकसान भरपाईसाठी ही नोंद आवश्यक आहे. तसेच पीक कर्जासाठी सातबारावरील पीक पेरा अद्ययावत असणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांसाठी सूचनाः शेतकरी आपल्या मोबाईलमधील ई-पीक पाहणी ॲपद्वारे स्वतः किंवा संयुक्त खातेदार असल्यास एकत्र येऊन पिकांची नोंद करू शकतात. ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक असून, यामुळे शेतकरी बांधवांना प्रत्यक्ष तलाठी कार्यालयात जाण्याची गरज उरणार नाही. ''शेतकरी बांधवांनी २४ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या रब्बी पिकांची नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून कोणत्याही शासकीय सवलती किंवा विम्यापासून त्यांना वंचित राहावे लागणार नाही. असे आव्हान सिंदखेड राजा तहसीलदार अजित दिवटे, यांनी केले आहे.

# पोटच्या चिमुरडींना मृत्यूच्या दारात ढकलून मातेने जीवनयात्रा संपविली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.२६:** संसार म्हटला की कुरबुरी आल्याच, पण या वादाचा शेवट इतका भीषण असेल असे वढव ग्रामस्थांना स्वप्नातही वाटलं नव्हतं. पतीसोबत झालेल्या एका क्षणाच्या वादातून निर्माण झालेल्या संतापाने आणि वैफल्याने एका २२ वर्षीय मातेचा बळी घेतला, तर दोन चिमुरड्यांना आयुष्यभराची न पुसणारी जखम दिली आहे. २४ डिसेंबरच्या दुपारी १२ वाजता दरम्यान ही घटना घडली.

वढव येथील कांचन अमोल सोनुने (वय २२ वर्षे) या तरुण विवाहीतेने २४ डिसेंबरच्या दुपारी आपल्या अवघ्या ३ वर्षांच्या आकांक्षा आणि ६ महिन्यांच्या प्रांजल, या काळजाच्या तुकड्यांना मृत्यूच्या फासावर लटकवले. ज्या हातांनी त्यांना मायेने थोपटून झोपवायचे, त्याच हातांनी त्यांच्या गळ्याला फास आवळताना त्या मातेच्या मनाची काय अवस्था झाली असेल, याचा विचार करूनच अंगावर काटा येतो. मुलींना फासावर लटकवल्यानंतर कांचनने स्वतःही गळफास लावून आपली जीवनयात्रा संपविली. एका हसत्याखेळत्या संसाराची राखरांगोळी अवघ्या काही मिनिटांत झाली. लोणार पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. या घटनेने ग्रामीण भागातील कौटुंबिक कलह आणि त्यातून निर्माण होणारे मानसिक आरोग्य यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. एक आई आपल्या पोटच्या गोळ्यांना मृत्यूच्या दारात कशी काय नेऊ शकते, या विचाराने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. दैव बलवत्तर म्हणून त्या वाचल्या नियतीला कदाचित त्या निष्पाप बालिकांचा बळी नको होता. फासावर लटकवल्यानंतर दोरी तुटल्याने किंवा निसटल्याने दोन्ही मुली खाली पडल्या. घराच्या बंद दरवाजाआड जेव्हा त्या चिमुरड्यांचा टाहो ऐकू आला, तेव्हा गावकऱ्यांनी धाव घेतली दरवाजा तोडून आत शिरलेल्या गावकऱ्यांसमोर जे दृश्य होते, ते पाहून कोणाचेही काळीज फाटेल असेच होते. समोर कांचनचा मृतदेह लटकत होता आणि खाली दोन्ही मुली गळ्यावर फासाचे वळ घेऊन मृत्यूशी झुंज देत रडत होत्या.

शून्य मिनिटाचा राग आणि आयुष्यभराचा वियोग २२ वर्षांचे वय म्हणजे जिद्द आणि स्वप्न पाहण्याचे वय. पण घरगुती वादातून आलेल्या टोकाच्या नैराश्याने एका कुटुंबाचा आधार हिरावला. आज आकांक्षा आणि प्रांजल सुरक्षित असल्या तरी, आई कुठे गेली?, या त्यांच्या प्रश्नाचे उत्तर नियतीकडेही नाही.

अजिंक्य भारत

# आपलं खामगांव



खामगाव,शनिवार, दि.२७ डिसेंबर, २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### स्वामी राघवेंद्रानंदजी महाराज यांचे प्रवचन

**खामगाव :** रामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था खामगाव यांच्या वतीने नांदुरा रोडवरील पारिख यांच्या नुतन कॉम्प्लेक्समध्ये २४ डिसेंबर २५ रोजी राम कृष्ण मठ नागपुरचे अध्यक्ष प.पू. स्वामी राघवेंद्रानंदजी महाराज यांचे प्रवचन संपन्न झाले. यावेळी स्वामीजींनी रामकृष्ण परमहंस. विवेकानंद, शंकराचार्य, गिता, सनातन धर्म प्रतिसाद मिळाल्याबद्दल स्वामीजींनी श्रोत्यांचे कौतुक आदि विषयांवर उद्बोधन केले. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फुर्त करून आभार व्यक्त केले. याप्रसंगी संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तसेच रामकृष्ण विवेकानंद भावप्रचार परिषदेचे राज्य समन्वयक डॉ. वाकडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी व भाविकांनी परिश्रम घेतले.

### घुसखोरांवर कारवाईची मागणी

**खामगाव :** सकल हिंदू समाज व युवा हिंदू प्रतिष्ठाण महाराष्ट्र यांच्या वतीने आज २६ डिसेंबर २५ रोजी उपविभागीय अधिकारी (महसुल) यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये अशा आशयाचे नमुद केले आहे की, बांगलादेशात हिंदूवर अत्याचार होत असुन दिपूचंद्र दास या युवकाची निघृण हत्या करण्यात आली. या घटनेचा निषेध करण्यात येत आहे. या कृत्यामुळे हिंदू समाजबांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे हिंदूंचे रक्षण करण्यासाठी भारत सरकारने ठोस पावले उचलावी. बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्यात यावी. तसेच दिपूचंद्र दास यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर रोहित पगारिया, योगेश डोईफोडे, मनिष छापरवाल, रविराज पाटील, विनायक निमसे, अमोलसिंह चंदेल, राहुल कळमकार आदिंच्या सह्या आहेत.

### इसमाची गळफास घेवून आत्महत्या

**खामगाव :** तालुक्यातील गवंढाळा येथील रहिवासी किशोर गणेश तायडे (३४) यांचा मागील सहा महिन्यापुर्वी अपघात झाला होता. अपघातात जायबंदी झाल्याच्या त्रासाला कंटाळून त्यांनी घरातील अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना काल २५ डिसेंबर २५ रोजी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी कमलेश गणेश तायडे यांनी हिवरखेड पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ भानासुसं नुसार मर्ग दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ. विठ्ठल चव्हाण करीत आहे.

### नगराध्यक्षा व सदस्यांचा सत्कार

**खामगाव :** हिंदुस्थान लिव्हर कामगार संघाच्या वतीने भाजपाच्या नवनिर्वाचीत नगराध्यक्षा सौ. अपर्णा फुंडकर, नगरसेवक तसेच हिंदुस्थान लिव्हर कामगार पतसंस्थेचे उपाध्यक्ष प्रशांत नायसे, कामगार संघटनेचे उपाध्यक्ष गोपाल पारखे यांच्या सुनबाई नगरसेविका सौ. शारदाताई पारखे यांचा कौटुंबिक सत्कार नुकताच पार पडला. यावेळी कामगार संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पर्यावरण दूत वंश गोंड यांच्या हस्ते वृक्षारोपण

### जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये शहिदांच्या नावाने वृक्षारोपण

**अजिंक्य भारत** / प्रतिनिधी

**संग्रामपूर दि. २६:** तालुक्यातील संग्रामपूर शहरातील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये ट्रि मॅन तथा पर्यावरण दुत वंश प्रवीण गोंड यांच्या हस्ते २४डिसेंबर रोजी शहिदांच्या नावाने वृक्षारोपण करण्यात आले. यापूर्वी सुद्धा ट्रिमॅन वंश गोंड याने जळगाव जामोद शहरात ५०० च्यावर झाडांचे वृक्षारोपण केले आहे. तालुक्यातील शहीद जवान प्रभाकरजी राजनकर, बाबुरावजी वानखडे पातुर्डा, विठ्ठल सोनाजी बारब्दे सगोळा, चंद्रकांत भगवंतराव भाकरे पातुर्डा या शहीद जवानांच्या नावाने जिल्हा परिषद हायस्कूल संग्रामपूर येथील लहान मुला-मुलींकडून वृक्षारोपण करण्यात आले.

तसेच ट्री मॅन वंशने संग्रामपूर पंचायत समिती कार्यालयात सुद्धा आतापर्यंत १०० झाडांचे वृक्षारोपण केले आहे तसेच पळशी झाशी गावामध्ये सुद्धा शहिदांच्या नावाने वृक्षारोपण केलेले आहे.



**पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र्यदिनी वंश गोंड यांचा केला होता गौरव**

ट्रि मॅन वंश गोंड याला पालकमंत्र्यांकडून गौरविण्यात आले होते. छोट्या वंश ने उन्हाळ्यात सीड बॉल तयार केले आणि पावसाळ्यात वृक्षाची लागवड यशस्वीरित्या केली. वड, पिंपळ, बेल, औदुंबर, अशोक, कडुलिंब अशा ५०० हुन अधिक वृक्षांचे रोपण जळगाव जामोद शहरामध्ये विविध सार्वजनिक ठिकाणी त्याने वृक्षारोपण केले होते. ह्या त्याच्या कार्याची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी वंश प्रवीण गोंड याचा स्वातंत्र्यदिनी सत्कार केला होता त्यावेळी जिल्हाधिकारी किरण पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, आमदार संजय गायकवाड उपस्थित होते. व वंश यांचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी त्यावेळी केले होते.

संग्रामपूर येथे जि प हायस्कूलमध्ये शहीद जवान यांच्या नावाने जे वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी गौतम मारोडे केंद्रप्रमुख राठोड सर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश गावंडे हे उपस्थित होते.

## नायलॉन मांजाविरोधात कठोर दंडात्मक कारवाई

### पालक, प्रौढ व्यक्तींना ५० हजारांचा तर विक्रेत्यांना २.५० लाखांचा दंड प्रस्तावित, ५ जानेवारीला सुनावणी; निवेदन,आक्षेप सादर करण्याचे आवाहन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि. २६:** नायलॉन मांजाच्या वाढत्या वापरामुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कडक भूमिका घेतली आहे. न्यायालयाने सुमोटो जनहित याचिकेमधील २४ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नायलॉन मांजाच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी पुन्हा एकदा कठोर निर्देश दिले असून, त्यानुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून सर्वसामान्य जनतेसाठी सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे.

सन २०२१ पासून नायलॉन मांजावर बंदी असूनही प्रत्यक्षात फारसा बदल झालेला नाही. आजही सर्रासपणे नायलॉन मांजाचा वापर सुरू असल्याने दरवर्षी अनेक नागरिक जखमी होत आहेत, तर काहींना जीवही गमवावा लागत आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. नायलॉन मांजाचा वापर करणारे तसेच त्याची विक्री करणारे विक्रेते बंदीबाबतच्या नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, न्यायालयीन आदेशांची व्यापक प्रसिद्धी प्रमुख वृत्तपत्रांतून झालेली असल्याने, या धोकादायक मांजाच्या परिणामांबाबत सर्वांना माहिती आहे. या पार्श्वभूमीवर, मा. उच्च न्यायालयाने कठोर कारवाईपूर्वी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या वतीने सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे. या सूचनेनुसार, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्याच्या पालकांना ५० हजार रुपयांचा दंड न्यायालयात जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्या व्यक्तीला न्यायालयात ५० हजार रुपयांचा दंड जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, तसेच नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या विक्रेत्याकडून साठा जप्त झाल्यास, प्रत्येक उल्लंघनासाठी न्यायालयात २ लाख ५० हजार रुपयांचा दंड जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, अशा सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ जानेवारी २०२६ रोजी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे होणार आहे. ज्यांना प्रस्तावित कारवाईविरोधात निवेदन सादर करायचे आहे, त्यांनी सुनावणीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यान कोणीही हजर न राहिल्यास किंवा निवेदन न सादर केल्यास, नायलॉन मांजाच्या वापरकर्त्यांकडून व विक्रेत्यांकडून दंड वसूल करण्यास सर्वसामान्य जनतेचा कोणताही आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल, असेही सूचनेत नमूद करण्यात आले.

## रब्बी हंगामासाठी ई-पीक पाहणी प्रक्रिया सुरू

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**लोणार दि.२६ :** हंगाम २०२५-२०२६ साठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार ई-पीक पाहणी मोबाईल अॅपद्वारे पीक नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णयानुसार तसेच महसूल विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही कार्यवाही राबविण्यात येत आहे.

राज्यात संकल्पनेंतर्गत हंगामी पिकांची अचूक माहिती संकलित करण्यासाठी ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप मोबाईल अॅप विकसित करण्यात आले आहे. या अॅपच्या माध्यमातून शेतकरी स्वतः तसेच सहाय्यक स्तरावर पिकांची नोंदणी करता येणार आहे. रब्बी हंगामासाठी पीक नोंदणीची प्रक्रिया १० डिसेंबर २०२५ पासून सुरू झाली आहे. शेतकरी स्तरावरील पीक नोंदणीचा कालावधी १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ असा असून, सहायक स्तरावरील नोंदणीचा कालावधी २५ जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. लोणार तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाच्या सूचनेनुसार आपल्या मोबाईलद्वारे ई-पीक पाहणी अॅपचा वापर करून विहित मुदतीत पीक नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रविंद्र जोगी व तहसीलदार भूषण पाटील यांनी केले आहे.

## उसरा-चालठाणा जाणारी बस वेळेवर पाठवा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**जळगाव दि.२६ :** बस स्थानका अंतर्गत मौजे उसरा-चालठाणा जाणाऱ्या बसचा वेळ सा.५.०० वाजता निश्चीत असुन ती बस कधीच वेळेवर लागत नसल्यामुळे शाळेकरी विदयार्थ्यांना विशेषतः मुलींना घरी पोहचण्यास मोठा रात्र होत आहे. ज्यामुळे पालकांची चिंता वाढली असुन विदयार्थ्यांना मानसीक व शारिरीक त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता जळगाव जामोद आगाराने उसरा-चालठाणा ही बस त्वरीत शाळेच्या वेळ पाहून पाठवावी.

तसेच विदयार्थ्यांना रात्र होण्याच्या आतच त्यांच्या घरी



पोहचता यावे याकरिता आपण बसचे नियोजन करून नियमीत बस सूरु ठेवावी तसेच दर शनिवार ला उसरा-चालठाणा फाट्यावर बस थांबत नसल्यामुळे विदयार्थ्यांना वेळेवर शाळेत जाता येत नाही परिणामी काही विदयार्थ्यांना खाजगी वाहनाने जिवघेणा प्रवास करावा लागत आहे याचा परिणाम विदयार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. सदर मागण्या ह्या रास्त असुन विद्यार्थ्यांच्या न्याय हक्काच्या आहेत त्यामुळे त्या तात्काळ मान्य करून पालक व विदयार्थ्यांना सहकार्य करावे अन्यथा पालकांना सोबत घेवुन तिव्र आंदोलन करण्यात येइल याची नोंद आगाराने घ्यावी असा ईशारा युवा आंदोलक अक्षय पाटील यांच्या वतीने देण्यात आला.

## 'श्रीं'चे मंदिर ३१ डिसेंबरला दर्शनासाठी रात्रभर खुले

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२६ :** नववर्षाच्या स्वागतासाठी तसेच वर्षाच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधत संत गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणात भाविक खामगाव येथे दाखल होत असतात. या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच दर्शनाची सुविधा सुरळीतपणे मिळावी यासाठी श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार ३१ डिसेंबर २०२५ रोजी श्रींचे मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे. दरवर्षी नववर्षाच्या पूर्वसंध्येला आणि नववर्षाच्या पहिल्या दिवशी श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळते. याच पार्श्वभूमीवर संस्थान प्रशासनाने योग्य नियोजन करत भाविकांसाठी हा निर्णय घेतला आहे. ३० डिसेंबर २०२५ रोजी दशमी तिथी असल्याने या दिवशी श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघणार आहे. या परिक्रमेमुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होणार असून भाविक मोठ्या संख्येने सहभागी होण्याची शक्यता आहे. तसेच ३१ डिसेंबर २०२५ रोजी पुत्रदा भागवत एकादशी असून या दिवशीही दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय वर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच १ जानेवारी २०२६ रोजी गुरुवार येत असल्याने या दिवशीही श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघणार आहे.

## पाणीपुरवठा योजना बंद; संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**लाखनवाडा दि.२६:** गावांमधील दलित वस्तीतील पाणीपुरवठा केल्या पाच दिवसापासून बंद असल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी दलित वस्तीतील नागरिकाचे हाल होत आहे याबाबत सविस्तर वृत्तांत असे की लाखनवाडा २२ गाव पाणीपुरवठा योजना गेल्या पाच दिवसापासून बंद असल्यामुळे दलित वस्तीतील नागरिकाचे हाल होत आहे.

लाखनवाडा परिसरातील अनेक गावात नागरिकांना पाणीपुरवठा २२ गाव नळी उमेदवारी करण्यात येते विशेष म्हणजे लाखनवाडा गावचा ५० टक्के पेक्षा जास्त भाग हा केवळ याच पाणीपुरवठा योजनेवर अवलंबून आहे कारण हा भाग खळखळ असल्यामुळे नाही त्यामुळे कोणतेही प्रकारचा पाणीपुरवठ्याची व्यवस्था या दलित वस्तीमध्ये नाही परिणामी नागरिकांना पाण्यासाठी वन वन भटकावे लागत. विजेचा दाब कमी असल्यामुळे पाच दिवसापासून पाणीपुरवठा बंद असल्याचे समजते तरीसुद्धा संबंधित अधिकारी कोण कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली दिसत नाही. वस्तीत पाहता पाणीपुरवठा अत्यांत महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे युद्ध पातळीवर प्रयत करून पाणीपुरवठा सुरू करण्यात आवश्यक आहे परंतु तशा प्रकारची कारवाई होताना दिसत नाही. गेल्या अनेक दिवसापासून जल जीवन योजनेअंतर्गत प्रत्येक गावात पाणीपुरवठा करण्याकरता पाईपलाईन टाकण्याचे आधी आहे. परंतू मोठा बाजार करून सुरू झालेले या जर जीवन योजनेचा मात्र सध्या थंड अवस्थेत पडलेले आहेत त्यामुळे या योजनेच्या नागरिकांना आतापर्यंत पाणी मिळालेले नाही तरी संबंधित अधिकाऱ्याने याकडे लक्ष देऊन लाखनवाडा २२ गाव पाणीपुरवठा योजना तात्काळ सुरू करावी अशी जनतेची मागणी आहे.

## शिवाचार्य महाराज यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.२६:** डॉ . अल्हाज असद बाबा मेमोरियल ट्रस्ट यांच्या वतीने २५ डिसेंबर रोजी जिवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पुरस्कार महाराष्ट्रातील सामाजिक कार्यात योगदान लाभलेल्या जेष्ठ नागरिकांना देण्यात आला आहे.

यामध्ये साखरखेर्डा येथील श्री पलसिध्द महास्वामी मठाचे मठाधिपती वेदांतचार्य शिवाचार्यरत सिध्दलिंग शिवाचार्य महाराज यांचाही




जिवन गौरव पुरस्कार देऊन जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. सिध्दलिंग शिवाचार्य महाराज यांच्या वतीने मठाधिपती सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज यांनी हा पुरस्कार स्वीकारला आहे. सिंदखेडराजा येथील अल्हाज असद बाबा मेमोरियल ट्रस्ट ही सामाजिक कार्यात अग्रेसर संस्था असून दरवर्षी सिंदखेडराजा येथे आरोग्य शिबीर आयोजित करून गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार केले जातात. यावर्षी सुध्दा कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात येते यावेळी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यासह राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष अॅड नाझेर काझी, बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ सुकेश झवर, डॉ. अमजदखान पठाण, अयाज खान पठाण उपस्थित होते.

**राजकारण** सत्तेबाहेर असूनही राजकीय वजन अबाधित ठेवण्यात राहुल बोंद्रे यशस्वी

## समान नगरसेवक निवडीमुळे भाजपचा विजय ठरतोय काठावरचा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि.२६ :** केंद्रात व राज्यात सत्ता असतानाही विधानसभा निवडणुकीत चिखलीत भाजप पक्ष दमदार कामगिरी करु शकला नाही. २०१९ मध्ये श्वेताताई महाले पहिल्यांदा आमदार पदी निवडून आल्यानंतर २०२४ ची विधानसभा निवडणूक त्यांना सोपी जायाला हवी होती. मात्र या निवडणुकीत काँग्रेसच्या राहुलभाऊ बोंद्रे यांचा फक्त १५०० मतांनी पराभव झाला. आताही नगरपालिका निवडणुकीत केंद्रात व राज्यात सत्ता, तसेच खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा झाल्यानंतर चिखलीकरांनी नगरअध्यक्ष पदासाठी जरी भाजपला कौल दिला असला तरी नगरसेवक निवडीच्या बाबतीत समान प्रमाण ठेवले आहे. यावरुन सत्तेबाहेर असूनही राजकीय वजन अबाधित ठेवण्यात राहुलभाऊ बोंद्रे यशस्वी झाल्याचे पाहायला मिळते, हे विशेष..!

चिखलीत काँग्रेसने



**अल्पसंख्याक मतदारांचा कौल ही काँग्रेसलाच..**

भाजपकडून मुस्लिम समाजाच्या पाच उमेदवारांना उमेदवारी देण्यात आली होती. तर काँग्रेसने ६ जणांना निवडणूक रिंगणात उतरवले होते. यात काँग्रेसचे ४ उमेदवार विजयी झाले आहे तर प्रभाग ३ ब ची जागा अवघ्या ३२ मतांनी पडली आहे. तर भाजपच्या फक्त एका मुस्लिम उमेदवाराला विजय संपादन करता आला. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला फायदा व्हावा म्हणून मुस्लिम उमेदवारांना उभे करण्यात आले होते अशी चर्चा गावभर पसरली आहे. एकंदरीत सर्वधर्म समभाव, सर्वांना सोबत घेऊन चालण्याच्या धोरणामुळे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुलभाऊ बोंद्रे सत्तेबाहेर राहूनही जनाधार कायम ठेवण्यात अग्रेसर ठरले आहेत.

निवडणूक प्रचारासाठी कुठलीही मोठी सभा घेतली नाही. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ अर्ज भरण्यासाठी आले तेही बोंद्रे कुटुंबियांच्या स्नेहापोटी. त्यानंतर काँग्रेसने कुठलीच मोठी सभा घेतली नाही. संपूर्ण भिस्त संभाळली एकट्या जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुलभाऊ बोंद्रे व त्यांच्या स्थानिक सहकाऱ्यांनी. मात्र भाजपकडून नगरपालिका निवडणुकीसाठी खुद्द मुख्यमंत्र्यांना बोलवण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी विकासाच्या डबल इंजिनचे आवाहन करुन चिखलीतील जागा जिल्ह्यात सर्वात जास्त मताधिक्यांनी निवडून द्या, अशी हाक दिली. मात्र या हाकेला चिखलीकरांनी प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळाले नाही. चिखली करांनी नगरअध्यक्ष पदाच्या उमेदवाराला जिल्ह्यातून सर्वात जास्त लिड दिलाच नाही. तर भाजपचे १३, काँग्रेस महाविकास आघाडीचे १३ असे समसमान नगरसेवक निवडून देऊन फडणवीसांच्या हाकेला खो दिला. प्रभाग निहाय विश्लेषण लक्षात घेतले तर राहुलभाऊ बोंद्रे यांच्या प्रभागातून नगरअध्यक्ष पदाचे काँग्रेसचे उमेदवार काशिनाथ आप्पा बोंद्रे यांना ५०० मताचा लीड देत काँग्रेसचे दोन्ही नगरसेवक निवडून आले. तर काशिनाथ आप्पा यांना त्यांच्या प्रभागात ७०० मतांचा लीड आहे व तिथेही काँग्रेसचे दोन्ही नगरसेवक निवडून आले. आमदार श्वेता महाले व पंडीतराव देशमुख यांच्या स्वतः च्या प्रभागातही काँग्रेसचे नगरसेवक निवडून आल्याने काँग्रेसचा जनाधार यावरुन अधोरेखित होतो.

## कुणबी समाज सोयरीक पुस्तिका सोहळ्यात दिनदर्शिकेचे विमोचन




**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२६:** कुणबी समाजाच्या सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय देणारा कुणबी समाज सोयरीक पुस्तिका विमोचन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात साप्ताहिक कुणबी समाज दूतच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या २०२६ च्या दिनदर्शिकेचे नियोजन व थाटात निमंत्रण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय कुणबी सेवा मंडळाचे प्रभारी अध्यक्ष राजू आढे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, भाजपा सोशल मीडिया महाराष्ट्र संयोजक सागर फुंडकर, साप्ताहिक कुणबी समाज दूतचे मुख्य संपादक अनिल खोडके, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. संध्या वाघोडे, वामन मानकर, दयाराम वानखडे, अनंतराव भारसाकळे , नागपूर, चांगदेव कळसकार, पुणे, चंद्रशेखर पांडे गुरुजी, केदार ढोरे, किशोर मोरोकार, गजानन ढोरे, प्रदीप वानखडे, अरुण भगत, रामेश्वर जोहरी, ज्ञानेश्वर इंगळे, रघुनाथ कौलकार, वाल्मीकराव ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. साप्ताहिक कुणबी समाज दूतच्या वतीने गेल्या दोन दशकांपासून दरवर्षी समाजोपयोगी व माहितीपूर्ण अशी दिनदर्शिका प्रकाशित करण्यात येते. या दिनदर्शिकेमध्ये तिथी, सण-उत्सव, वार, धार्मिक व सांस्कृतिक माहिती, समाजातील मान्यवर नेत्यांचे शुभेच्छा संदेश, वाढदिवस आदी वैविध्यपूर्ण माहितीचा समावेश असतो. ही दिनदर्शिका संपूर्ण राज्यभर वितरित करण्यात येते. या उपक्रमामुळे समाजात एकोपा, माहितीचा प्रसार आणि सामाजिक सलोखा वाढीस लागतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# बंजारा तांड्यांना आता स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा

## जिल्ह्यातील ४९ प्रस्तावांना जिल्हा समितीकडून मंजुरी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** शासन निर्णयानुसार बंजारा /लमाण तांड्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करणे व सामुहिक विकासाच्या विविध मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संत सेवालाल महाराज बंजारा/ लमाण तांडा समृध्दी योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्यामध्ये महसुल दर्जा प्राप्त व शासन निर्णयातील तरतुदीनुसार लोकसंख्या असलेल्या तांडा वस्ती येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे व महसुल दर्जा देणेस पात्र असलेल्या तांड्याना महसुली गावाचा दर्जा/तांडा देणे या सदंर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय समिती अध्यक्ष आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शासकिय व अशासकिय समिती मधील सदस्यांची दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे बैठक पार पडली.

या बैठकीत जिल्हातील ४९ बंजारा/लमाण तांड्यांना महसूल गाव घोषित करण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. तांडयांना महसूली गावांचा दर्जा देण्यासाठी महसूल मंत्री यांनी वेळोवेळी आढावा बैठका घेतल्या. तसेच येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हा समितीस मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सदर प्रकरणात वैयक्तीक लक्ष घालून पाठपुरावा केला व त्याप्रमाणे ४९ प्रस्तावास जिल्हा समितीने मंजुरी दिली.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा परिषद प्र. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदिप पवार, घनसावंगी तहसिलदार पूजा वंजारी, बदनापूर प्र. तहसिलदार अतुल बने, जाफराबाद गटविकास अधिकारी देविदास मगर, मंठाचे गटविकास अधिकारी एस व्ही गगनशेने, परतुर गटविकास अधिकारी आर. एल. तांगडे, घनसावंगी गटविकास अधिकारी ऐश्वर्या चितारी, अंबड सहाय्यक गटविकास अधिकारी समीर जाधव, विस्तार अधिकारी आर. तट्टू, अशासकीय सदस्य उद्धव पवार,अर्जुन राठोड, गणेश राठोड यांची उपस्थिती होती.

राज्यातील बंजारा लमाण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या संत सेवालाल महाराज बंजारा/ लमाण तांडा समृद्धी योजना अंतर्गत तांड्यांना स्वतंत्र महसूल गाव घोषित करण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत आज जालना तालुक्यातील १२, बदनापूर तालुक्यातील ०५, अंबड तालुक्यातील ०६ व मंठा तालुक्यातील २६ अशा एकूण ४९ प्रस्तावावर चर्चा करण्यात आली व ते नियमाप्रमाणे मंजूर करुन शासनाकडे सादर केले जाणार आहेत. विविध तालुक्यांतील पात्र तांड्यांचे प्रस्ताव, त्यांची लोकसंख्या, मूलभूत सुविधा, प्रशासकीय निकष तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेण्यात आला. महसूल गाव घोषित करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, अहवाल आणि पूर्तता बाबींची तपासणी करून पुढील कार्यवाहीबाबत निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हास्तरावर एकूण ७८ प्रस्ताव प्राप्त झाले असून, ज्या प्रस्तावांमध्ये त्रुटी किंवा कागदपत्रांची कमतरता आहे, ती तातडीने पूर्ण करुन प्रस्ताव पुन्हा सादर करणेबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहे. यापुढेही महसूल मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रस्ताव लवकरात लवकर प्राप्त करून घेऊन शासनास सादर करण्यात येतील. असेही सांगितले.

**महसूली गावांचा दर्जा देण्यासाठी मंजूर झालेले तांडे**

काकडा, वसारामनाईकतांडा, पारेगाव, सेवागडतांडा, वडगाव, अमृनाईकतांडा, पवारतांडा, वखारी, वखारी तांडा,मानेगाव खा., मानेगाव वाडीतांडा,मानेगाव खा., मानेगाव वाडीतांडा,वडीवाडी,वडीवाडी तांडा, पत्रातांडा, सेवालाल नगर,नेर,काळामाथा तांडा,तिमानाईक तांडा, नेर तांडा तुपेवाडी, काळूनाईक तांडा, वसंतनगरतांडा,गोकुळवाडी,गोकुळवाडी तांडा, बावणेपांगरी,गोकुळनगर तांडा, गारवाडी तांडा, रुई,महाराजा तांडा, श्रीराम तांडा,मसई, मसई तांडा -१, सोनक पिंपळगांव, सोनक पिंपळगांव तांडा,बोरी,बोरी तांडा,गोंविद पूर,लालवाडी तांडा,मंठा, दहीफळ खंदारे, बुगानाईक तांडा, कानफोडी, श्रीरामतांडा,कानफोडी तांडा,पिंपरखेडा खराबे,वसंतराव नाईक नगर, पिंपरखेडा तांडा, किर्ला,किर्लातांडा, अंभोडा कदम, सेवालाल नगर, दहा,दहातांडा,वझर सरकटे,वझर सरकटे तांडा,ढोकसाळ,भासुनाईक तांडा,टोकवाडी,टोकवाडी तांडा,केहाळ वडगाव, जयरामनगर नाईक तांडा,नायगाव प्र बामणी,नायगाव तांडा,पांगरी बु.,पांगरी बु तांडा(योगानंद बापूनगर), माहोरा, माहोरा तांडा,तळणी, वसंतनगर, केंधळी, केंधळी तांडा, बेलोरा,बेलोरा तांडा,लावणी,लावणी तांडा,आकणी,आकणी तांडा,पांगरी खु.,किसन नाईक तांडा,आर्डा तोलाजी,आर्डा तोलाजी तांडा,सोनुनकरवाडी,पांगरीबु. शिवार.

## महत्त्वाचे

### मंठा महामार्गावरील कुंटणखान्यावर छापा

**जालना :** जालना-मंठा महामार्गावरील सावरगाव (हडप) शिवारातील हॉटेल साईच्छा येथे सुरू असलेल्या कुंटणखान्यावर मौजपुरी पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. हॉटेल मालकासह व्यवस्थापकास अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून ९२,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयात हजर केले असता या आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. जालना तालुक्यातील रामनगरजवळील मंठा रोडवरील सावरगाव हडप परिसरात असलेल्या साईच्छा हॉटेलवर कुंटणखाना सुरू असल्याची माहिती मौजपुरी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे कारवाई करण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी पडताळणीसाठी आले होते.

### न्यायदान कक्षात ग्राहकांना मार्गदर्शन

**जालना:**राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या न्यायदान कक्षात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार ग्राहकांना मिळालेल्या हक्कांची माहिती ज्येष्ठ विधिज्ञ तथा अखिल भारतीय ग्राहक पंचायत व देवगिरी प्रांत सदस्य अ‍ॅड. डी. पी. पाटील यांनी दिली. अ‍ॅड. व्ही. जी. चिटणीस व अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे विधी सल्लागार अ‍ॅड. एम. जी. सोनुने यांनीही कायद्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोगाच्या अध्यक्षा अपर्णा काटे तर सदस्य उदय दळवी, प्रबंधक मिलिंद पाखले आणि संजय चंद्रहास उपस्थित होते. जिल्हा वकील संघातील वकील अ‍ॅड. दीपिका घावले, आर. जी. यादव, अ‍ॅड. नंदकिशोर गौशिक, अ‍ॅड. रोशन गोलेच्छा, अ‍ॅड. अरुण पैठणे यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन अ‍ॅड. वसीम रफिक शेख यांनी केले.

### नवीन नियमाने वाढवला संभ्रम

**जालना:**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांच्या उत्तरपत्रिकेत मोठे बदल केले आहेत. आयोगाने यासंदर्भात अधिकृत संकेतस्थळावर याची माहिती जाहीर केली आहे. या बदलानुसार, आता कोणताही पर्याय न निवडल्यास उमेदवारांचे २५ टक्के गुण वजा केले जाणार आहेत. हा नवा नियम १ मार्च २०२६ पासून लागू होणार आहे. दरम्यान, एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहीत नसल्यास पाचवा पर्याय निवडणे बंधनकारक असेल. कोणताही पर्याय न निवडल्यास २५ टक्के गुण वजा केले जाणार आहेत.

# पीककर्ज व किसान क्रेडीट कार्डसाठी पोर्टलद्वारे अर्ज करण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २६ :** जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज, किसान क्रेडीट कार्ड तातडीने व सुलभ पध्दतीने उपलब्ध व्हावे आणि शेतकऱ्यांना बँकेत वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज प्रक्रिया जालना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. तरी शेतकऱ्यांनी जनसमर्थ पोर्टलवर नोंदणी करुन पीककर्ज व किसान क्रेडीट कार्डसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी स्वत : अथवा सेतू, महा ई सेवा, सीएससी केंद्राच्या सहाय्याने 'जनसमर्थ' पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावा. आवश्यक माहिती, कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी झाल्यानंतर अर्ज संबंधित बँकेकडे ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात येईल आणि बँकेकडून नियमानूसार तात्काळ कारवाई करावी. अशा सुचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हा अग्रणी बँक, सर्व राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकांचे शाखा व्यवस्थापक व नोडल अधिकारी यांना पत्राद्वारे दिल्या आहेत.

प्रत्येक बँक शाखेने जनसमर्थ अर्जासाठी नोडल अधिकारी नियुक्त करुन अर्ज प्राप्त होताच तात्काळ पडताळणीची प्रक्रिया करावी. पात्र प्रकरणांना प्राधान्य देवून किमान कालावधीत शक्य असल्यास त्याच दिवशी निर्णय देण्याचा प्रत्यन करावा. प्राथमिक पडताळणीनंतरच अर्ज पुढे पाठविण्यात येत असल्याने एकाच कागदपत्रासाठी वारंवार हरकती टाळाव्यात. अर्जात त्रुटी असल्यास नेमकी त्रुटी स्पष्टपणे प्रणालीद्वारे कळवावी. जिल्ह्यातील सेतू, महा ई सेवा, सीएससी केंद्राने शेतकऱ्यांना नोंदणी, अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड, अर्जस्थिती तपासणे आदि बाबींमध्ये मदत करावी. तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांनी जिल्हा अग्रणी बँकेच्या समन्वयाने तालुकानिहाय मोहिमेचे वेळापत्रक तयार करुन प्रसिध्द करावे. जनसमर्थ पोर्टलची ग्रामपंचायत, कृषी कार्यालय, बँक शाखामार्फत व्यापक जनजागृती करण्यात यावी. अंमलबजावणीत अडचण असल्यास तात्काळ जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक व संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रत्येक आठवड्याला प्राप्त अर्ज, प्रक्रिया अर्ज, मंजूर अर्ज, प्रलंबित प्रकरणे कारणासह प्रगती अहवाल सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा. अशा सुचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या आहेत. लाभासाठी शेतकऱ्यांजवळ शेतकरी आयडी, आधार व आधार लिंक मोबाईल क्रमांक, बँक खाते तपशील, पासबुक, किसान क्रेडीट कार्ड व पीककर्ज नियमानूसार जमीन व पीक तपशिल, पॅनकार्ड तसेच बँकेने आवश्यक ठरविलेले इतर दस्तऐवज आदि कागदपत्रे असणे गरजेचे आहे.

### समरीन नाज मिर्झा यांनी स्वीकारला नगराध्यक्षपदाचा पदभार

**भोकरदन :** नवनिर्वाचित नगराध्यक्षा समरीन नाज वसिम बेग मिर्झा यांनी भोकरदन नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा शुक्रवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आ. चंद्रकांत दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी नगरपरिषद सभागृहात प्रवेश केला. याप्रसंगी नगरपरिषदेचे नगरसेवक, मुख्याधिकारी तायडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी वर्गाकडून त्यांचं स्वागत करण्यात आले. नगरपरिषद सभागृहात मुख्याधिकारी श्री.तायडे यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# दारू पिण्यास पैसे न दिल्याने पतीने केला पत्नीचा खून

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जाफराबाद, दि. २६:** जाफराबाद तालुक्यातील देऊळझरी शिवारात घडलेल्या धक्कादायक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने चिडलेल्या नवऱ्याने स्वतःच्या पत्नीचा शेतात काम करत असताना प्राणघातक हल्ला करून खून केल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना दिनांक बुधवारी सायंकाळी सुमारे ३.३० वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत संगीता काशिनाथ जारे (वय ४५) या शेतात कुटुंबासह काम करत होत्या. यावेळी दारू पिण्यासाठी पैसे मागितले असता पत्नीने नकार दिल्याने नवरा काशिनाथ संतोष जारे (वय ५०) याने संतापाच्या भरात पत्नीवर हल्ला करून तिचा जागीच खून केला. या प्रकरणी मृत महिलेचा मुलगा पवन काशिनाथ जारे (वय २५) यांनी पोलिसात फिर्याद दिली असून मामा विष्णू त्रिंबक गोरे यांनी देखील तक्रार

नोंदवण्यासाठी उपस्थिती लावली. जाफराबाद पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे.

# कुटुंब नियोजन शिबिरात बेडअभावी महिलांची हेळसांड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** तालुक्यातील सेवली प्राथमिक आरोग्य केंद्रात बुधवारी जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ३६ महिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मात्र, शस्त्रक्रियेनंतर रुग्णांसाठी पुरेशी बेड व्यवस्था नसल्याने महिलांना जमिनीवर गाद्या टाकून झोपावे लागल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना आवश्यक असलेली विश्रांती आणि सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना आरोग्य केंद्रातील अपुऱ्या व्यवस्थेमुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांत नाराजीचे वातावरण निर्माण झाले. या प्रकाराबाबत संतप्त नातेवाइकांनी आरोग्य प्रशासनाकडे तक्रार देण्यासाठी गुरुवारी जिल्हा परिषदेत धाव घेतली. मात्र, नाताळाच्या सुटीमुळे जिल्हा परिषद कार्यालय बंद असल्याने त्यांची तक्रार दाखल होऊ शकली नाही.दरम्यान, याप्रकरणी शुक्रवारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन संबंधितांवर कारवाई व आरोग्य केंद्रातील सुविधा सुधारण्याची मागणी करण्यात आली आहे. आरोग्य केंद्रातील अशा हलगर्जीपणामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

### अंतरवाली सराटीतील मंदिरात दिवसा चोरी

**घनसावंगी :** अंतरवाली सराटी येथील विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात गुरुवारी भरदिवसा चोरी झाली. दुपारी मंदिराच्या पाठीमागील भिंतीवरून तीन अज्ञात चोरट्यांनी प्रवेश केला. कुलूप तोडून विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तीच्या गळ्यातील मणी, मंगळसूत्र चोरून नेले.

गावातील महिलेने चोरांना पाहिल्यावर आरडाओरडा केली. यामुळे चोरटे मंदिरातून पसार झाले. त्यामुळे दानपेटी सुरक्षित राहिली. गोंदी पोलिसांनी मंदिरातील चोरीचा पंचनामा केल्याचे महंत रवींद्र महाराज जोशी यांनी सांगितले.

# अडीच हजारांची लाच घेणारा मोटार वाहन निरीक्षक जेरबंद

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** ट्रक चालकाकडून अडीच हजारांची लाच घेताना सोलापूर जिल्ह्यातील नांदणी येथे गुरुवारी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोटार वाहन निरीक्षकाला ताब्यात घेतले.

तक्रारदार ट्रकचालक असून गुजरात - चेन्नईदरम्यान मालवाहतूक करतात. नांदणी येथील महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील आरटीओचे चेकपोस्ट आहे. तेथील मोटार वाहन निरीक्षक तानाजी शिवाजी धुमाळ याने तक्रारदाराकडून दोन हजारांची लाच घेतली. शिवाय परत येताना वाहन पास करण्यासाठी पुन्हा तीन हजारांची लाच मागितली. त्यामुळे तक्रारदाराने २४ डिसेंबरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर गुरुवारी तानाजी धुमाळ यांच्या सांगण्यावरून खाजगी व्यक्ती अमोल अण्णासाहेब पाटील (वय ५०, रा. अवंतीनगर, शिवाजीनगर सोलापूर) याला नांदणी येथील महाराष्ट्र कर्नाटक सीमेवर पंचासमक्ष वाहन पास करण्यासाठी अडीच हजारांची लाच स्वीकारताना पकडले. त्याच्याजवळील रोख ११ हजार ८१० रुपये, मोबाईल, दोन अंगठ्या, चेन असा मुद्देमाल जप्त केला. तानाजी धुमाळ यालाही ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलिस उपअधीक्षक बी. एस. जाधवर, अंमलदार गजानन घायवट, भालचंद्र बिनोरकर, गणेश चेके, संदीप लहाने, मनोहर भुतेकर, गजानन कांबळे, शिबलिग खुळे, अमोल चेके यांनी केली. पुढील तपास पोलिस करत आहेत.

## निधन वार्ता

### गंगाबाई भगत यांचे निधन



**जालना :** येथील प्रसिध्द मल्ल स्व. किशनलाल वस्ताद भगत यांच्या पत्नी श्रीमती गंगाबाई किशनलाल भगत (वय ७५) यांचे २५ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दीर, एक मुलगा, सून, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. माजी नगराध्यक्षा सौ. भारती भगत यांच्या मोठ्या जाऊ तर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष चंपालाल भगत यांच्या मोठ्या वहिनी होत्या. त्यांच्या पार्थिवावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गौरव** जालन्याच्या व्यापारी महासंघातर्फे सत्कार

# जितेंद्र अग्रवाल यांचा १०० किमी धावण्याचा विक्रम

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २६ :** राजस्थानमधील जयसलमेर येथे आयोजित १०० किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेत जालना येथील व्यापारी जितेंद्र अग्रवाल यांनी अवघ्या १३ तास ५४ मिनिटांत शंभर किलोमीटर अंतर पूर्ण करून उल्लेखनीय विक्रम प्रस्थापित केला.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने विजय विलास येथील बँक्वेट हॉलमध्ये त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात राजस्थानमधील लोंगेवाला चौकी येथे भारतीय सैन्याच्या १२० जवानांनी दाखवलेल्या अतुलनीय शौर्याच्या सन्मानार्थ दरवर्षी ही मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात येते. देशभरातून नामांकित धावपटू या स्पर्धेत सहभागी होतात. यावर्षीच्या स्पर्धेत जालना येथील व्यापारी जितेंद्र अग्रवाल यांनी सहभाग घेत विक्रमी कामगिरी करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

सत्कार समारंभात बोलताना जितेंद्र अग्रवाल यांनी १०० किलोमीटर अंतर धावण्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा आणि तयारीचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी व्यापारी वर्गाला चालणे व धावणे याबाबत उपयुक्त टिप्स देत नियमित व्यायाम, धावण्याचे महत्त्व, संतुलित आहार आणि पुरेशी विश्रांती यावर भर दिला. धावण्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि मानसिक तणाव कमी होतो, असे त्यांनी नमूद केले. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास विविध आजारांना सामोरे जावे लागते, याची जाणीवही त्यांनी करून दिली. शेवटी आरोग्य हीच खरी संपत्ती आहे हा संदेश देत सर्वांना नियमित व्यायाम करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे महानगर प्रमुख भास्कर आबा दानवे, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे महासचिव शाम लोया, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, महासचिव संजय दाड, विनोद कुमावत, सुभाष देवीदान, इंद्रचंद तवरावाला, अर्जुन गेही, सीए गोविंदप्रसाद मुंदडा, विनोद पवार, राजेश कामड, लक्ष्मीनारायण मानधना, विजय बगडिया, मोहन इंगले, प्रमोद गंडाल, क्रेडाई संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पवार, चेतन मराठे, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल, संजय अग्रवाल, योगेश पाटनी, वासुदेव देवडे, योगेश ठक्कर, दिलीप अग्रवाल, राजू सेठ जैन, पवन करवा, सुशील मेहरा, अच्युतराव कदम, इमरान भाई यांच्यासह जालना शहरातील मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते.

# भरधाव ट्रकने दुचाकीला चिरडले

## एक ठार, एक जखमी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** जालना शहराकडून भोकरदनकडे जाणाऱ्या एका भरधाव ट्रकने (क्र. टी. एन.-३०, बी. डब्ल्यू.-५९३७) समोरून येणाऱ्या मोटारसायकलला (क्र. एम.एच. २१, बी.डब्ल्यू. ४२८१)जोरदार धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाल्याची घटना गुरुवारी रात्री ७.३० वाजेच्या सुमारास घडली.

बावणे पांगरी शिवारातील कुक्कुटपालन केंद्रासमोर झालेला हा अपघात एवढा भीषण होता की, मोटारसायकलचा पूर्णतः चुराडा होऊन एकजण जागीच ठार झाला आहे. तर एकजण गंभीर जखमी झाला.

या अपघातात ठार झालेल्या मोटारसायकलस्वाराचे नाव सुखदेव रामचंद्र धोंगडे (वय ४५) असून, त्यांच्यासोबत पाठीमागे बसलेले कृष्णा श्रावण पवार (वय ३२) हे गंभीर जखमी झाले आहेत.

मयत व जखमी हे दोघेही चित्तोडा (ता. बदनापूर) येथील आहेत.

गंभीर जखमीला जालना येथील खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

अपघातानंतर जालना-भोकरदन महामार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात ठप्प झाली होती.

चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलीस उपनिरीक्षक सय्यद अफसर, पोलीस हवालदार जितेंद्र तागवाले, अनिल चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मयत व जखमींना मदतकार्य करून, वाहतूक कोंडी सुरळीत केली.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, शनिवार दि. २७ डिसेंबर २०२५

## थोडक्यात

### ट्रेन्ड मॉलसमोरून दुचाकी लंपास

**अमरावती :** तहसील कार्यालयानजिक ट्रेन्ड मॉलसमोर उभी करून ठेवलेली एमएच २७ झेड २६६१ क्रमांकाची दुचाकी किंमत अंदाजे ३० हजार अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी अनिल महादेव जायले वय ५६, रा. शिराळा यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास कोतवाली पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलीस करीत आहे.

### ऑटोरिक्षा उलटून तीन जखमी

**अमरावती :** चालकाने ऑटोरिक्षा भरधाव व निष्काळजीपणाने चालविल्याने उलटून अपघात घडला. यात ऑटोरिक्षातील तीन प्रवाशी जखमी झाले. अमरावती ते चांदूरबाजार मार्गावरील नांदूरानजिक पुलाजवळ हा अपघात घडला. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून ऑटोरिक्षा चालक संजय सुर्यवंशी याच्याविरूध्द वलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलीस करीत आहे.

# आयारामांची चांदी; निष्ठावंताची मात्र कोंडी

## महानगरपालिका निवडणूक रणसंग्राम ■ सर्वच पक्षांत सुप्त संघर्ष

अजिंक्य भारत |प्रतिनिधी
संजय देशमुख/सुनिल तळोकार

**अमरावती, दि. २६ : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात नगरपालिका, नगरपरिषदेच्या निवडणूका आटोपल्या आहेत.तर दुसऱ्या टप्प्यात महापालिका निवडणूकीची धामधुम सुरू झाली आहे.यानंतर तिसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थेवर सत्ता मिळविण्यासाठी 'विनिंग मेरिट'ला महत्व दिले जात आहे.विजयी होऊ शकणारे; मग ते कोणत्याही पक्षाचे असू देत त्यांना उमेदवारीसाठी रेड कार्पेट अंथरले जात आहे. यामुये निष्ठावंतांत नाराजी उमटत आहे. सर्व राजकीय पक्षांत आयात विरुध्द निष्ठावंत असा सुप्त संघर्ष पहावयास मिळत आहे.**



सर्वच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये इच्छूकांच्या संख्या लक्षणीय वाढली आहे.भाजप, कॉंग्रेस, उध्दवसेना, शिंदेसेना, राष्ट्रवादी अजित पवार, राष्ट्रवादी शरद पवार यांच्यासह स्थानिक आघाड्यांमध्येही उमेदवारीसाठी मोठया प्रमाणावर हालचाली सुरू आहेत.पक्ष बदल, गुप्त भेटी, मुलाखती, समीकरणांची जुळवाजुळव आणि संभाव्य यादी, यामुळे राजकीय वातावरण अक्षरश- तापले आहे. निवडणूक जिंकणे हाच मुख्य निकष मानत पक्षांनी 'सक्षम आणि निवडून येऊ शकणारा उमेदवार' हे सूत्र स्वीकारले आहे. परिणामी गेली २० ते २५ वर्ष पक्षाशी प्रामाणिक राहिलेले संघटनात्मक काम करणारे कार्यकर्ते बाजूला पडत असल्याची भावना बळवात आहे.

### अनेकांचे दोन तीन पक्षांशी संधान

निवडणुकीची चाहुल लागताच पक्ष बदलविण्याचे प्रमाण वाढले आहे.काही इच्छूकांनी उमेवारी मिळविण्यासाठी पक्षांमध्ये उड्या मारल्या असून अनेकांनी एकाच वेळी दोन ते तीन पक्षांची सपर्क ठेवला आहे. पक्षनिष्ठपेक्षा राजकीय अतित्वाला आणि विजयाची खात्री महत्वाची ठरत असल्याचे चित्र दिसते. यामुये स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून आम्ही पक्षासाठी आयुष्य झिजविले;मग आमचे चुकले काय ?असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

### जिंकण्याच्या जातीय गणिताला प्राथमिकता

पक्षांची उमेदवारांच्या घेतलेल्या मुलाखतीमध्ये संघटनात्मक योगदानापेक्षा जिंकल्याच्या गणितालाच अधिक प्राथमिकता दिली जात आहे.त्यामुये अनेक अनुभवी कार्यकर्ते नाराज झाले असून काही ठिकाणी बंडखोरीची चर्चा ऐकू येत आहे. उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष म्हणून लढवण्याची तयारीही काही निष्ठावंतानी केली आहे.

### संघर्षाचा परिणाम निकालावर

या अंतरगत संघर्षाचा थेट परिणाम निवडणुक निकालांवर होण्याची शक्यता आहे. निष्ठावंत अपक्ष म्हणून उभे राहिल्यास मतविभाजन अटळ ठरणार असून त्याचा फटका अधिकृत उमेदवारांना बसू शकतो. याची जाणीवर असूनही पक्ष नेतृत्वाला तातडीचा विजय अधिक महत्वाचा वाढत असल्याचे दिसते.

### उमेदवारांचा 'बॅकअप' प्लॅन

अनेकजण ज्या पक्षातून उमेदवारी मिळण्याची शक्ता कमी वाटते.तेथून बाहेर पडत दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याचे प्रमाण वाढले आहे.काही ठिकाणी तर कालपर्यत एकमेकांवर टिका करणारे नेते आज एकाच व्यासपीठावर दिसत आहे.'बॅकअप प्लॅन' तयार केला आहे.एखाद्या पक्षातून तिकीट न मिळाल्यास तातडीने दुसऱ्या पक्षात प्रवेश करून उमेदवारी मिळविण्याची रणनिती आखली जात आहे. त्यामुळे पक्षनिष्ठेपेक्षा निवडणुक जिंकणे हा प्रमुख निकष ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

# भाऊसाहेबांच्या १२७ व्या जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात आज देवाभाऊंचा सत्कार

## मुख्यमंत्री फडणवीसांचा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' देवून सन्मान

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणारा या वर्षीचा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार २०२५ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना त्यांच्या राजकीय, सामाजिक सांस्कृतिक कार्यासाठी देण्यात येणार आहे. पुरस्कराचे स्वरूप रूपये पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या आज दि. २७ डिसेंबर २०२५ ला आयोजित १२७ व्या जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात या पुरस्काराने मुख्यमंत्र्यांना सन्मानित करण्यात येणार असून त्यांनी या समारंभाला उपस्थित राहून पुरस्कार स्वीकारणार आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना देशमुख म्हणाले श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात जयंती उत्सवाचा मुख्य समारंभहोणार असून महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्यसभा सदस्य खा. डॉ. अनिल बोंडे, अमरावतीचे खा. बळवंत वानखडे, विधान परिषद सदस्य आ. संजय खोडके, आ. सौ. सुलभा खोडके, आ. प्रताप अडसड, आ. रणधीर सावरकर या सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित राहतील. जयंती उत्सवाच्या मुख्य समारंभात खासदार शरदचंद्र पवार दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार २०२५ आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील पुरुष शेतकऱ्याला स्व. शरद जोशी पुरस्कार उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्कार असे दोन पुरस्कार देखील वितरीत करण्यात येतील. रोख रु.१,११,१११/- (रुपये एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे या दोन्ही पुरस्काराचे स्वरुप आहे. निवड समितीतर्फे लवकरच या दोन्ही कृषी पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्यात येईल.

श्रीमती विमलाबाई देशमुख (वैद्यकीय शिक्षण) अभ्यासवृत्ती, क्रांतीज्योतीकर, सावित्रीबाई फुले (कृषी शिक्षण) कस्तुरबा अभ्यासवृत्ती आणि कस्तु कन्या शाळेतील १० व्या वर्गातील खेळाडू विद्यार्थिनी कु. भक्ती गजानन चौधरी हिला क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय प्राविण्याबद्धल डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार देखील या सोहळ्यात प्रदान करण्यात येतील. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य



भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने दि.१८ ते २७ डिसेंबर २५ पर्यंत नि:शुल्क कृत्रिम अंगारोपण जयपूर फुट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सर्व ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड.जे. व्ही. पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सर्व हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा. सुभाषराव बनसोड, संस्थेचे सचिव डॉ. वि. गो. ठाकरे, स्वीकृत सदस्य सर्व प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, विजय ठोकळ, डॉ. पी. एस. वायाळ, डॉ. अमोल महल्ले उपस्थित होते.

# आम्ही म्हणतो 'गौमाता, प्रत्येक अंगणात तुळसीमाता'च्या जयघोषाने दुमदुमली इंद्रपुरी

## फ्रेन्ड्स ऑफ ट्रायबल सोसायटी व वनबंधु परिषदेने काढली पायी रॅली

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** मेळघाटातील आदिवासीबहुल भागात शिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून समाजोन्नतीचा ध्यास घेणाऱ्या एकल विद्यालय अभियानाची माहिती जनसामान्य पर्यंत पोहोचविण्या साठी फ्रेन्ड्स ऑफ ट्रायबल सोसायटी व वनबंधु परिषद, अमरावती चॅप्टरच्या वतीने बुधवारी शहरातून भव्य पायी रॅली काढण्यात आली. आम्ही म्हणतो गौमाता, प्रत्येक अंगणात तुळसीमाता..., भारत माता की जय... अशा घोषणांनी शहर दुमदुमून गेले.

स्थानिक वॉलकट कंपाउंड येथील धर्मदाय कॉटन फंड येथे आयोजित एकदिवसीय कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ४ वाजता पायी रॅलीने झाली. संपादक प्रवीण आहूजा यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी वनबंधु परिषद अमरावती चॅप्टरचे संस्थापक अध्यक्ष लप्पीसेठ ऊर्फ चंद्रकुमार जाजोदिया, अध्यक्ष ओमप्रकाश नावंदर, सचिव सुमित कलंत्री,



कार्यकारी अध्यक्ष दिलीपभाई पोपट, महिला समिती अध्यक्ष आशा लड्डा, सचिव राजश्री निखरा यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

या रॅलीत मेळघाटातील आदिवासी भागात कार्यरत सुमारे ३३० आचार्य (शिक्षक) सहभागी झाले होते. महिला आचार्य केशरी व हिरव्या रंगाच्या साड्यांमध्ये तर पुरुष आचार्य पांढऱ्या वस्त्रात दिसून आले. रॅलीच्या अग्रभागी 'जय वीर हनुमान' ध्वज धारण करणारा ध्वजवाहक होता. त्यामागे पारंपरिक वाद्यांच्या तालावर सादर होणारे कोरकू आदिवासी नृत्य हे रॅलीचे मुख्य आकर्षण ठरले. धर्मदाय कॉटन फंड येथून सुरू झालेली रॅली चौधरी चौक, चित्रा चौक, प्रभात चौक, सरोज चौक, जवाहर गेट, जयस्तंभ चौक, मालवीय चौक मार्गे पुन्हा धर्मदाय कॉटन फंड येथे समाप्त झाली. सरोज चौकात कार्यकारी अध्यक्ष दिलीपभाई पोपट यांच्या वतीने सर्वांना पेढा मिठाईचे वाटप करण्यात आले. रॅलीनंतर रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

### या भागातील आचार्यांचा सहभाग

या पायी रॅलीत बैरागड, बिजुधावडी, सावलीखेड, हरीसाल, पोपटखेडा, साद्राबाडी, बोराळा, हातरू, काटकुंभ, टेंबुसोंडा, बिहाली तसेच मोगर्दा गावातील आचार्य सहभागी झाले होते. विशेष म्हणजे मोगर्दा येथील आचार्यांनी विद्यार्थ्यांसह एकल विद्यालयाची प्रतिकृती झांकीच्या स्वरूपात सादर करून आदिवासी भागात शाळा कशा पद्धतीने चालविल्या जातात याचे प्रभावी सादरीकरण केले.

# क्षितिज आठवलेला सॉफ्टबॉल राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २६ :** नुकत्याच वेस्ट बंगाल येथे पार पडलेल्या वरिष्ठ गट राष्ट्रीय सॉफ्ट बॉल क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक प्राप्त झाले असून सदर महाराष्ट्र संघात महाविद्यालयाची सॉफ्ट बॉल खेळाडू क्षितिज आठवले हिचा सहभाग होता.

प्राप्त यशासाठी क्षितिजाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. व्ही. कोरपे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग तसेच सर्व महाविद्यालयीन घटकातर्फे व नवसारी येथील सामाजिक कार्यकर्ते रवी वानखेडे, दिनेश जांभुळकर जितेंद्र काळे, जवंजाळ सर ॲड. अचल कोल्हे, गजानन व्यवहारे, प्रशांत महल्ले, सूनील जावरे यांनी कु. क्षितिजाच्या निवासस्थानी जाऊन अत्यंत भावस्पर्शी कौटुंबिक सत्कार




केला व तिच्या भाविक क्रीडा प्रवासासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आई संगीताताई वडील राजेश आठवले यांना पण खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# आठ तासांच्या भारनियमनाने शेतकरी त्रस्त!

## कमी व्होल्टेज व वारंवार अडखळ्यामुळे मुळे रब्बी पिकांवर संकट

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धारणी, दि. २६ :** धारणी तालुक्यातील दिया फीडरवर गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या ८ तासांच्या भारनियमनामुळे, तसेच कमी व्होल्टेज व दर ५-५ मिनिटांनी होणाऱ्या ट्रिपिंगमुळे शेतकरी अक्षरश: हैराण झाले आहेत. खरीप हंगामात अतिवृष्टी आणि पिकांना मिळालेल्या कमी दरांमुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर आता रब्बी पेरणीनंतर विजेच्या लपंडावामुळे मोठे संकट ओढावले आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, ८ तासांच्या ठराविक भारनियमनानंतरही अवघ्या एक तासापुरतीच वीज मिळत आहे. मागील दोन दिवसांपासून रात्रीच्या वेळी वीज अत्यंत कमी क्षमतेने (डिम) येत असल्याने मोटार पंप चालू शकत



नाहीत. पाण्याअभावी रब्बी पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. विशेष म्हणजे ही समस्या फक्त दिया फीडरपुरती मर्यादित आहे. आजूबाजूच्या इतर फीडरवर एवढे दीर्घ भारनियमन करण्यात येत नाही. अतिरिक्त भार व विस्कळीत वीज वितरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र, संबंधित अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही त्यांनी सांगितले. स्थानिक लोकप्रतिनिधी व वीज विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अतिरिक्त भार कमी करून फीडरची क्षमता वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. धारणी तालुक्यातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, ना लोकप्रतिनिधी, ना जबाबदार अधिकारी प्रत्यक्ष येऊन परिस्थितीचा आढावा घेत आहेत.

### वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा

विदर्भ हा भाग आधीच शेतकरी आत्महत्यांसाठी बदनाम आहे. अशा परिस्थितीत वीज विभागाची ही उदासीनता म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखे असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. दिया फीडरसह संपूर्ण धारणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, या गंभीर समस्येवर ठोस पावले उचलून कृषी कामांसाठी आवश्यक वीजपुरवठा तत्काळ सुरळीत करण्यात यावा, जेणेकरून रब्बीची पिके वाचवता येतील.



अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, शनिवार दि. २७ डिसेंबर २०२५



## थोडक्यात

### चाकूने मारून केले जखमी

**अमरावती :** लालखडी परिसरातील इमामनगरातील मैदानात व्हॉलीबॉलची जाळी काढण्यावरून वाद होवून एकावर चाकूने हल्ला चढविला. मो. आदील मो. शकीर वय २२, रा. लालखडी असे जखमी युवकाचे नाव आहे. तर सलमान खान सोहल खान रा. लालखडी असे चाकूहल्ला करणाऱ्याचे नाव आहे. २४ डिसेंबर रोजी घडलेल्या या घटनेत तक्रारीनुसार नागपुरी गेट पोलीस ठाण्यात आरोपीविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची धाड

**अमरावती :** शहरात वेगवेगळया ठिकाणी देशी दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाडी घाली आरोपींनी ताब्यात घेत मुद्देमाल हस्तगत केला. बडनेरा हद्दीत एका महिलेला ताब्यात घेत तिच्या जवळून ९६० रूपयांच्या देशी दारू बॉटल्स जप्त केल्या. नरेंद्र इंगळे याला ताब्यात घेत त्याच्याजवळून १३०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. धम्मपाल स्थूल याला ताब्यात घेत त्याच्याजळवून ११०० रूपयांचा माल जप्त केला. उमेश इंगळे याला पकडून एक हजार रूपयांच्या दारू बॉटलस जप्त केल्या. याप्रकरणी सर्वावर कलम ६५ ई मदाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### जुगार खेळणाऱ्यावर कारवाई

**अमरावती :** वलगाव पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी धाडी घालून आरोपींना ताब्यात घेत मुद्देमाल हस्तगत केला. गजानन शंकर माहोरे यांच्यासह ११ जणांना ताब्यात घेत त्यांच्याजवळून जुगार साहित्यासह रोख असा २.४५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तर दुसऱ्या एका घटनेत विलास लोखंडे याला ताब्यात घेत जुगार साहित्यासह १६६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील विनायक बावणे हा पसार झाला. या घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलीस करीत आहे.

### वाहतुकीस अडथळा करणाऱ्यांवर कारवाई

**अमरावती :** सार्वजनिक रस्त्यावर नाश्ताच्या हातगाड्या, वाहने उभे करणे, गॅस सिलिंडचा धोकादायक वापर करणे, वाहन सुसाट चालविणे, वाहतुकीस अडथळा निर्माण करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी पोलिसांनी गस्तीदरम्यान कारवाई केली.

# विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान

### कुलगुरूद्व डॉ.शरद गडाख आणि डॉ.विलास खर्चे यांचे आंबा लागवडीचे आवाहन | 'शिवाजी'च्या आंबा परिषदेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**अमरावती, दि. २६ :** विदर्भात आंब्याचे क्षेत्र वाढायला भरपूर वाव असून केशर आंब्याला देशविदेशात मोठी मागणी आहे. एकात्मिक शेती पद्धतीत आंबा फार मोठे उत्पादन देऊ शकतो. विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान आहे त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांनी आंब्याची लागवड मोठ्या प्रमाणात करावी, असे आवाहन डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित आंबा परिषदेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे हे होते.महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य मोरेश्वर वानखडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजानन पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्था सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, प्राचार्य डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ उदघाटन सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित होते.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेने राष्ट्रीय कृषी प्रदर्शनी नंतर दरवर्षी कृषी संबंधीचा जो उपक्रम हाती घेतला आहे तो अत्यंत स्तुत्य असून नुसती परिषद न घेता प्रत्यक्ष प्रात्यक्षिक ही संस्था परिसंवादाचे वेळी देते हे महत्त्वाचे असल्याचे सांगून डॉ.गडाख यांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या अतिसघन आंबा लागवड परिषदेच्या उदघाटन सोहळ्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे नवनियुक्त कुलगुरू डॉ.विलास खर्चे आणि डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

परिषदेचे मुख्य संयोजक व श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर देशमुख यांनी प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे स्वागत केले. उदघाटन सोहळ्याचे संचालन डॉ.राजेश मिरगे यांनी केले तर कृषी विद्याशाखा, रुरल इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अभय ढोबळे यांनी आभार मानले. जे. डी.सांगळूद्कर महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या चमूने डॉ.राजेश उमाळे व डॉ.सुरेंद्र होजे यांच्या नेतृत्त्वात स्वागतगीत व गौरवगीत सादर केले.श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाला आंबा परिषदेच्या आयोजनात शिवाजी कृषी महाविद्यालय, शिवाजी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी विद्याशाखा, रुरल इन्स्टिट्यूट आणि जनता कृषी विद्यालय यांचे सहकार्य लाभले. या परिषदेला विविध वक्तयांनी मार्गदर्शन केले.सुमारे दोन हजार शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला.

> आपला देश कृषिप्रधान देश असून महाराष्ट्र हे कृषीच्या संदर्भात अग्रगण्य राज्य आहे आपल्या राज्याची हार्टीकल्चर राज्य म्हणून ओळख आहे, असे प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ.विलास खर्चे म्हणाले.एकचएक पिक पद्धतीमुळे जमिनीचे आरोग्य खालावले असून हवामान बदलाचा देखील शेतीवर परिणाम होत आहे.त्यामुळे पिक बदल आवश्यक आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्था अगदी योग्यवेळी हा उपक्रम घेत असून ही अत्यंत अभिनंदनीय आहे,
>
> **डॉ.विलास खर्चे**
> **कुलगुरू**

> आज कृषिप्रधान देश आहे असे म्हणूनच आपण समाधान मानायचे का? असा सवाल करत कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी शेतीचे उत्पादन ६० टक्क्यावरून चार टक्क्यावर आल्याचे सांगितले.कृषीचे उत्पन्न वाढल्या शिवाय भारताचा जी.डी.पी वाढणार नाही, असेही ते म्हणाले.संस्था भाऊसाहेबांच्या शेतीच्या संदर्भातील विचारांना बांधील असून त्या दृष्टीने कार्य करीत आहे. आमच्या कृषी महाविद्यालयांनी कृषी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग सुरु केले आहेत. पुढच्या वर्षी पुन्हा भव्य कृषी प्रदर्शनी घेण्याचा संस्थेचा मानस आहे,असेही त्यांनी सांगितले.
>
> **हर्षवर्धन देशमुख**
> **अध्यक्ष**

# पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत पिंपरीत विविध उपक्रमांचे आयोजन



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पापळ, दि. २६ :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायत पिंपरी निपाणी दिनांक २० डिसेंबर रोजी गावामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले त्यामध्ये सर्वप्रथम गाडगे महाराज यांच्या फोटोचे पूजन करून गावामध्ये स्वच्छता अभियान राबवण्यात आले संपूर्ण गावाची स्वच्छता करण्यात आली त्यानंतर रक्तदान शिबिर घेण्यात आले गावातील युवकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले, त्याच बरोबर गावातील लोकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले, आरोग्य केंद्र पापड येथील टीमने गावातील लोकांचे आरोग्य तपासणी केली, त्याच बरोबर महिला बचत गटाची मिटिंग घेऊन महिलांना लघु उद्योग करण्यास प्रेरित करण्यात आले त्याचबरोबर गावामध्येजीवन सुरक्षा विमा कॅम्प घेऊन प्रधानमंत्री सुरक्षा विमा अंतर्गत गावातील महिलांचा ग्रामपंचायत ने विमा काढला त्याचबरोबर प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा प्रधानमंत्री जनधन योजना सुकन्या योजना इत्यादी विम्याची माहिती देण्यात आली . यावेळी इंडियन बँक चे कर्मचारी हजर राहून त्यांनी महिला व लोकांचा विमा काढला व त्यांना वीमा संदर्भात माहिती देण्यात आली बचत गटांच्या महिलांना स्वतंत्र बसण्याकरता व मीटिंग घेण्याकरता ग्रामपंचायत च्या वतीने त्यांचे स्वत:चे कार्यालय देण्यात आले. या कार्यालय उद्घाटन गटविकास अधिकारी नांदगाव खंडेश्वर स्नेहल शेलार यांनी केले. त्याचबरोबर प्रफुल्ल बोथरा हेमंत बोथरा यांनी गावाला प्रवेश द्वार दिले. या प्रवेशद्वाराचे पूजन तालुका गटविकास अधिकारी स्नेहल शेलार म्याडम व प्रफुल्ल भाऊ बोथरा, सरपंच योगिता रिठे यांनी केले त्यानंतर गावातील शासकीय सेवे मध्ये लागलेल्या मुलाचा शाल श्रीफळ व शिलड देऊन सत्कार करण्यात आला पवन खडसे, वायरमन, आकाश नगराळे, राज्य राखीव दल, समता दुर्योधन सवई बँक कर्मचारी, अंकुश रिठे वनरक्षक या मुलाचा सत्कार गटविकास अधिकारी स्नेहल शेलार यांच्या हस्ते करण्यात आला. सायंकाळी सात वाजता सत्यपाल महाराज यांचे शिष्य संदीप पाल महाराज यांचा समाज प्रबोधन व जनजागुती चा कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता किर्तना तून गावाच्या विकासाकरिता असणारे मापदंड यावर सखोल कीर्तनाद्वारे माहिती देण्यात आली याकरिता पंचायत समिति स्तरावरून पंचायत समिती गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार, सरपंच योगिता विशाल रिठे, उपसरपंच पुष्पा प्रगणे, सचिन रिठे, प्रफुल्ल बोथरा, गणेश रिठे, प्रतीक रिठे, गणेश धामणे, सुजाता डोंगरे, दीपिका रिठे, पुष्पा बाई रिठे, शमी पठाण, संदीप डोंगरे, ग्रामपंचायत अधिकारी विक्रम पिसे, किशोर सानप, बारदिवे, उगले व गावातील नागरिक उपस्थित होते

# नवसारीचे दोघे बनले पोलीस उपनिरीक्षक

अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**नवसारी, दि. २६ :** काल नवसारी गावाकरिता खूप आनंदाचा दिवस होता काल नवसारी गावाला दोन पोलीस उपनिरीक्षक लाभले श्री अक्षय राजू कुडवे व कु. माधुरीताई वानखडे हे नाशिक इथून प्रशिक्षण पूर्ण करून नवसारी आपल्या गावी आले आम्ही नवसारी मित्रपरिवार व नातंलगाने या सर्वांनी दोघांचे पण जंगी स्वागत करून विजय मिरवणूक काढण्यात आली सावित्री आईला हार अर्पण करून नंतर नवसारी बौद्ध विहार येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले व ती मिरवणूक पूर्ण नवसारी महात्मा फुले नगर इथून त्यांच्या निवासस्थानी संपुष्टात आली त्याकरिता मिरवणुकीचा सर्व भार रविभाऊ वानखडे करन भाऊ गायकवाड दिनेशभाऊ जांबुळकर ॲड.अचल कोल्हे गजाननभाऊ व्यवहारे प्रशांत भाऊ महल्ले जितेंद्र काळे सूनिल जावरे भारत गवई भारत कांबळे ज्ञानेश्वर नितनवरे व गावातील महिला व पुरुष व खास करून तरुण युवा युवती हजर होत्या आम्ही सर्वांनी दोन्हीही पोलीस उपनिरीक्षकांना पुढील आयुष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व नवसारी गावातील तसेच परिसरातील प्रत्येक लोकांचा आनंद व उत्साह हा नवसारी मित्र मंडळांचा असेल एवढी आम्ही लोक शब्द देतो.

# विकास विद्यालय येथे 'वार्षिक स्नेहसंमेलन' सोहळा साजरा

### २२ ते २४ डिसेंबर पर्यंत विविध स्पर्धांसह शालेय कार्यक्रमाचे आयोजन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**अंजनगाव बारी, दि. २६ :** अंजनगाव बारी येथून जवळ असलेल्या न्यु ग्रामीण विकास शिक्षण संचालीत विकास विद्यालय पार्डी (देवी)येथे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सोहळ्याचा मनापासून आनंद घेतला. दि.२२ रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून न्यू ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव पिसे, उद्घाटक सुरेशराव वाघमारे (शिक्षणाधिकारी योजना, जि.प.अमरावती) प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सुरेशराव भेंडे, संस्थेची सचिव पांडुरंगजी बांडाबूचे, सदस्य मधुकरराव ढेंबरे, संतोषराव ठाकरे तसेच प्राचार्य संतोष परांजपे हे उपस्थित होते. सुरेशराव वाघमारे यांनी कठीण परिस्थितीतून विद्यार्थ्यांनी यशाची पायरी कशी गाठायची याबाबत सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचलन मंगेश धरमखेले, आभार प्रदर्शन विजय कुलसंगे यांनी केले. त्यानंतर गीत गायन स्पर्धा झाली या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सरपंच अक्षय मेश्राम तर प्रमुख अतिथी म्हणून सुनील पाटील, रक्षणा सरदार माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य पार्डी व सुमनबाई मेश्राम या उपस्थित होत्या. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने गीत गायनाला प्रतिसाद दिला व आपली कला सादर केली.

कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी पालक सुद्धा उपस्थित होते. दि २४ रोजी शेतकरी सुखी व्हावा या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पार्डी येथील पोलीस पाटील नितीन बेंडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी 'शेतकरी सुखी व्हावा.! या विषयावर अनेक विद्यार्थ्यांनी आपले वक्तृत्व सादर केले आणि शेतकऱ्यांबद्दल चांगले वक्तव्य केले. दि.२४ रोजी दुपारी दोन वाजता समारोपीय कार्यक्रम झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष सुरेशराव भेंडे, प्रमुख अतिथी म्हणून अनिता गवई भारती प्रकल्प संचालिका या उपस्थित होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य डॉ. जीवन सवाई, गजानन ठाकरे, प्रा. सतीश राऊत तसेच विद्यालयाचे प्राचार्य संतोष परांजपे हे उपस्थित होते यावेळी मार्गदर्शन करताना अनिता राऊत यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे भविष्याच्या दृष्टीने आवश्यक असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालक संघपाल सरदार तर आभार प्रदर्शन टापरे यांनी केले या कार्यक्रमाला विद्यालयातील शिक्षक प्रवीण शेलोकर, गोपल डांबरे, मंगेश धरमखेले, विजय कुलसंगे, शिक्षिका किरण मानकर, मेघाली सावळे, संगीता शेलोकार, पल्लवी तसरे, मोहन धोटे, गौरी पिंगळे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते तसेच गावातील पालक वर्ग सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते विद्यालयाच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

### उद्रेक | केंद्र सरकारकडे तातडीने हस्तक्षेपाची अपेक्षा, दीपू दाससाठी न्यायाची मागणी

# बांग्लादेशातील हिंसाचाराने शहरात उसळला रोष

### राजकमल चौकात विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाच्या नेतृत्वात आंदोलन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी







**अमरावती, दि. २६ :** बांग्लादेशातील अल्पसंख्याक हिंदूंवरील हिंसाचाराच्या निषेधार्थ आज दुपारी अमरावतीतील राजकमल चौकात सैंकडो नागरिक एकत्र आले. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या नेतृत्वाखाली आयोजित या आंदोलनात उपस्थित कार्यकर्त्यांनी पडोसी देशातील घटनांविरोधात तीव्र नार्यांची झंझावात घालून वातावरण तणावपूर्ण केले.

आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी हातात केशरी ध्वज उंचावत बांग्लादेशात जमावाने मारण्यात आलेल्या दीपू दाससाठी न्याय मिळावा, अशी ठाम मागणी केली. त्यांनी केंद्र सरकारकडे तातडीने प्रभावी हस्तक्षेप करण्याचीही अपेक्षा व्यक्त केली. आंदोलनात उपस्थित नेते व कार्यकर्त्यांनी बांग्लादेशातील हिंसाचाराविरोधात ठळक घोषणाबाजी केली, तसेच सोशल मीडियावर आंदोलनाचे छायाचित्र व व्हिडिओ प्रचंड प्रमाणात प्रसारित केले.

भाजपाचे स्थानिक नेते डॉ. अनिल बोंडे, जिल्हा अध्यक्ष अनिल साहू, बजरंग दल महानगर संयोजक त्रिदेव डेडवाल, दीपक पाठक महाराज, श्रीरंग वडनेरकर यांसह अनेक सामाजिक व राजकीय नेते आंदोलनात उपस्थित होते. शिवसेना व भाजपाचे काही निवडणूक इच्छुक उमेदवारही या आंदोलनात सहभागी झाले, ज्यामुळे आंदोलनाला अधिक गती आणि दृश्यात्मक प्रभाव लाभला. क्रिसमसच्या सुट्टीमुळे सरकारी, अर्ध सरकारी कार्यालये व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही आंदोलनात सहभाग नोंदवला. कार्यकर्त्यांनी फोटो व व्हिडिओ टिपत आंदोलनाचा प्रचार केला. याव्यतिरिक्त आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी बांग्लादेश सरकारवर दबाव टाकण्याची मागणी केली. स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, धर्म व मानवतेच्या नावाखाली घडत असलेल्या या अत्याचाराला अमराव तीतील नागरिक दुर्लक्ष करणार नाहीत. संपूर्ण आंदोलनात उपस्थित कार्यकर्त्यांची संख्या सुमारे हजाराहून हजाराहून अधिक होती. त्यांनी संघटित पद्धतीने नारेबाजी करत, बांग्लादेशविरोधी घोषणांद्वारे आपल्या रोषाची जाणीव दाखवली. अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत म्हटले पाहिजे, कीयाचार हिंदूवरला होता असलेला मिळणे आवश्यक आहे. राजकमल चौकातील हे आंदोलन फक्त निषेधच नव्हे, तर एक जागरूकता मोहीम म्हणूनही पाहिले गेले. हिंदू समाजातील प्रत्येक घटकाने आपली भूमिका बजावली, तरुण कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. सामाजिक माध्यमांवर या आंदोलनाचे फोटो व व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले, ज्यामुळे राज्यात आणि देशभरात या घटनेची प्रतिक्रिया वाढली आहे. विशेष म्हणजे, बांग्लादेशातील घटनांमुळे मानवाधिकार, धार्मिक समानता आणि अल्पसंख्याकांचे संरक्षण याबाबत जागतिक पातळी-वरही चर्चा उभी राहिली आहे. आंदो-लनकत्यांनी सांगितले की आपला आवाज मोठा करावा लागेल, अन्यथा हे अत्याचार थांबणार नाहीत.

# श्री पंचकृष्ण गोरक्षण व चॅरिटेबल ट्रस्ट चिंचखेडतर्फे पंचवतार उपहार महोत्सव

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**चिचखेड, दि. २६ :** चिंचखेड ता. जि. अमरावती येथे श्री पंचकृष्ण गोरक्षण व चॅरिटेबल ट्रस्ट चा वतीने आयोजित श्री पंचवतार उपहार महोत्सव व अभिष्टचिंतन सोहळा बुधवार,२४ डिसेंबर रोजी अत्यंत भक्तिभाव व मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प.पू.प.म. बिडकर बाबा होते व कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष प.पू.प.म. करंजकर बाबा होते. महाराज प.पू.प.म. पुसदेकर बाबा तसेच यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच समाजसेवक मा श्री चंद्रकुमार उर्फ लप्पीभैया जोजोदिया जी व विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प.पू.प.म. बिडकर बाबा विराजमान होते, तर उद्घाटन व मार्गदर्शन प.पू.प.म.श्री कारंजेकर बाबा होते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. मान्यवरांच्या हस्ते अभिष्टचिंतन, सत्कार व धार्मिक विधी पार पडले. या प्रसंगी उपस्थित संत-महंतांनी आपल्या प्रवचनातून समाजात सदाचार, गोसंवर्धन, सेवा व भक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. पंचवतार उपहार महोत्सवाचा लाभ मोठ्या संखेने भाविकांनी घेतला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रम मध्य अखिल भारतीय महानुभाव पंत चे अध्यक्ष कारंजेकर महाराज जी नि पन सर्वाना धन्यवाद दिला आणि समाजसेवा साथी चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैया आशीर्वाद दिला बोले अपली गौ सेवा अशी चालू राहु दया. अमरावती चे लोकप्रिय समझा सेवक लप्पीभैया नि पन आपल्या भाषण मध्य सर्वांचे आभार मानले आणि माझा संयोग अस रहना हे पन संगीतल। कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गोरक्षण ट्रस्टचे अध्यक्ष श्री शंतनु सतीशराव इंगोले तसेच संपूर्ण ट्रस्टी पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी उपस्थित, संदीप जुनघरे, अमोल ठाकरे, सचिन गावंडे, अभिजीत काळबांडे, वैभव मोंढे, हर्षद अडसोड, निखिल बुरघाटे, ऋषिकेश चांगोले, प्रणव धसकट, अक्षय इंगोले ,अमोल इंगोले, प्रतीक इंगोले सर्व मान्यवरांचे व भाविकांचे आभार मानले.

## थोडक्यात

### वृद्धाला दुचाकीची धडक

**राळेगाव :** शेतातून घरी पायी परतणाऱ्या वृद्धाला भरधाव दुचाकीने मागून धडक दिल्याने ते जखमी झाले. ही घटना वाटखेड ते राळेगाव रोडवर कनक वर्मा यांच्या शेताजवळ घडली. फिर्यादी शंकर तुकाराम राऊत (६७, रा. राळेगाव) हे रस्त्याने जात होते. त्यावेळी आरोपी चंद्रभान शेळके (रा. राळेगाव) याने आपल्या दुचाकीने (एमएच २९ एएल ६८४९) त्यांना जोरदार धडक दिली. याप्रकरणी राळेगाव पोलिस ठाण्यात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मंदिरातील दानपेटी फोडली

**शिरपूर :** मंदिरासमोर ठेवलेली दानपेटी फोडून चोरट्यांनी सात हजार रुपये लंपास केले. ही घटना गोपाळपूर (वरझडी) देवस्थान येथे घडली. फिर्यादी नानाजी कानोबाजी चिडे (६५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २१ ते २३ डिसेंबर दरम्यान अज्ञात चोरट्याने दानपेटीचे कुलूप तोडले. त्यातील अंदाजे सात हजार रुपयांची रोकड चोरून नेली. याप्रकरणी शिरपूर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कायदेविषयक जनजागृती शिबीर उत्साहात

**यवतमाळ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय आणि लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबीर पार पडले. अध्यक्षस्थानी प्राधिकरणाचे सचिव दीपक दाभाडे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. विजया घाडगे उपस्थित होत्या. यावेळी ॲड. घाडगे यांनी हिंदू विवाह कायदा, वारसा हक्क, दत्तकविधान आणि स्त्री भ्रूणहत्या यावर सविस्तर मार्गदर्शन केले. मृत व्यक्तीच्या मालमत्तेवरील कायदेशीर हक्क कसा मिळवावा, याची माहिती त्यांनी दिली. दीपक दाभाडे यांनी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी कायद्याचे ज्ञान आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. प्राचार्य दुर्गेश कुंटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण वाघमारे यांनी केले, तर आभार श्रीमती गाडे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १५० शेतकरी मदतीपासून वंचित, दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करा, अन्यथा तहसील कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

# तीळ उत्पादक शेतकऱ्यांची मुख्यमंत्र्यांकडे धाव

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बाभूळगाव, दि. २६ : तालुक्यातील राणी अमरावती येथील दीडशेहून अधिक तीळ उत्पादक शेतकरी प्रशासकीय अनास्थेमुळे हक्काच्या नैसर्गिक आपत्ती मदतीपासून वंचित राहिले आहेत. एप्रिल-मे २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे मोठे नुकसान होऊनही, तत्कालीन कर्मचारी वर्गाच्या निष्काळजीपणामुळे एकही शेतकरी मदत यादीत समाविष्ट होऊ शकला नाही. या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून, थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धाव घेत न्यायाची मागणी केली आहे.**



बाभूळगाव : तहसील कार्यालयात निवेदन देताना राणी अमरावती येथील नुकसानग्रस्त शेतकरी.

राणी अमरावती आणि परिसरात जानेवारी २०२४-२५ या हंगामात शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने उन्हाळी तीळ पिकाची लागवड केली होती. पीक जोमदार असतानाच एप्रिल आणि मे महिन्यात निसर्गाची अवकृपा झाली. अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला. शासनाच्या नियमानुसार नैसर्गिक आपत्तीत ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्यास शेतकरी मदतीस पात्र ठरतात. विशेष म्हणजे, बाभूळगाव तालुक्यातील बहुतांश गावांना शासनाची मदत मिळाली आहे. अगदी राणी अमरावतीला लागून असलेल्या लगतच्या गावांमध्येही नुकसानभरपाई जमा झाली आहे. मात्र, केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे याच गावातील सुमारे १५० शेतकरी मदतीपासून वंचित राहिले आहेत. शेतकऱ्यांवर झालेल्या या अन्यायाविरोधात आता गाव एकवटले आहे. कलीमोद्दीन काझी, आरिफ खान, सोनाली दोडके, श्रीकृष्ण परोपटे, इमरान काझी, विजय हाडेकर, रामभाऊ उमरतकर, ज्ञानेश्वर कुंडे, शुभम तीखे, सतीश मेंढे यांच्यासह दीडशे शेतकऱ्यांनी प्रशासनाला जाब विचारला आहे. वारंवार विनंत्या करूनही न्याय मिळत नसल्याने त्यांनी आपल्या मागण्यांचे सविस्तर निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पालकमंत्री संजय राठोड, आमदार डॉ. अशोक उईके, जिल्हाधिकारी विकास मीना आणि तहसीलदार मीरा पागोरे यांना सादर केले आहे. शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### पंचनामे झाले, पण अहवाल गहाळ?

**महसूल आणि कृषी विभागाने घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचे पंचनामे केले होते, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, तत्कालीन पटवारी कापसे आणि कृषी सहाय्यक पाटील यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या कर्मचाऱ्यांनी पंचनाम्याचा अंतिम अहवाल वेळेवर तहसील कार्यालयात सादर केला नाही किंवा वरिष्ठांना पाठवला नाही, ज्यामुळे शेतकरी यादीतून वगळले गेले. या हलगर्जीपणामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना फटका बसला असून संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.**

### न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण

**शासकीय मदत हा शेतकऱ्यांचा हक्क असून तो प्रशासनाच्या चुकीमुळे नाकारला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध आता फुटला आहे. शासनाने या निवेदनाची तत्काळ दखल घेऊन नुकसानभरपाई जमा न केल्यास, कोणत्याही क्षणी बाभूळगाव तहसील कार्यालयासमोर 'आमरण उपोषण' करण्यात येईल, असा कडक इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.**

### शेजारच्या गावांत मदत!

**बाभूळगाव तालुक्यातील याच नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या इतर अनेक गावांमध्ये शासनाची मदत पोहोचली आहे. अगदी राणी अमरावतीला लागून असलेल्या गावातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसानभरपाईची रक्कम जमा सुद्धा झाली आहे. यावरून हे सिद्ध होते की, शासनाकडून निधी मंजूर झाला आहे आणि तो वितरीतही झाला आहे. मात्र, केवळ स्थानिक पातळीवरील कर्मचाऱ्यांनी (तलाठी/कृषी सहाय्यक) वेळेत यादी न पाठवल्याने राणी अमरावती गाव मदतीपासून वंचित राहिले आहे.**

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती

### भाजप कार्यकर्त्यांकडून अभिवादन




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**मारेगाव, दि. २६ :** भारतीय जनता पक्षाच्या मारेगाव तालुका शाखेच्या वतीने गुरुवारी (दि. २५) देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली. येथील प्रभाग क्रमांक १२ मधील अटल बिहारी वाजपेयी चौकात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच त्यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी भाजपचे तालुकाध्यक्ष अविनाश लांबट, ज्ञानेश्वर चिकटे, तालुका सरचिटणीस प्रशांत नांदे, शहराध्यक्ष अनूप महाकुलकर, अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष इफ्तेखार शेख, मारोती राजुरकर, नागोराव ठाकरे, तुषार बदकी, संतोष दानखडे, केशव मुंघाटे, जांबुवंत खंगार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## घाटंजीत 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा जागर; बालविवाह मुक्तीसाठी घेतली शपथ

### गिलानी महाविद्यालयात सोशल मीडियाच्या वापरावरही मार्गदर्शन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. २६ :** मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि बालविवाह, स्त्री भ्रूण हत्या यांसारख्या अनिष्ट प्रथा रोखण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. याच उद्देशाने 'बालविवाह मुक्त महाराष्ट्र १०० दिवस' कार्यक्रमांतर्गत तालुका बाल संरक्षण समिती आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने घाटंजी येथील गिलानी महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी वंदना नानोटे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून संरक्षण अधिकारी माधुरी पावडे, गटशिक्षणाधिकारी प्रज्ञा पाटील, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रियांका राऊत, ॲड. दाते मॅडम, प्रा. माहुरे सर, सागर विटाळकर आणि विस्तार अधिकारी मस्के उपस्थित होते. पालकांच्या कष्टाची जाण ठेवा यावेळी मार्गदर्शन करताना वंदना नानोटे म्हणाल्या, "बालविवाह हा मुलींना प्रगतीपासून वंचित ठेवतो. त्यामुळे प्रत्येक समाजातील मुलींनी शिक्षण घेतलेच पाहिजे. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी." सोशल मीडियाचा वापर जपून करा गटशिक्षणाधिकारी प्रज्ञा पाटील यांनी आजच्या डिजिटल युगातील आव्हानांवर भाष्य केले. "तरुण पिढीने सोशल मीडियाचा वापर अतिशय जपून केला पाहिजे. स्वतःची सुरक्षा सर्वप्रथम स्वतः करावी आणि गरज पडल्यास शासकीय यंत्रणेचे सहकार्य घ्यावे," असे आवाहन त्यांनी केले. माधुरी पावडे यांनी 'बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६' या कायद्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थ्यांनी 'बालविवाह मुक्त भारत' करण्याची सामुदायिक शपथ घेतली. याच दरम्यान बालकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने तालुका बाल संरक्षण समितीची बैठकही पार पडली.

## आंबेझरी-खंडणी जंगल परिसरात 'कोंबड बाजारा'ला उधाण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**मारेगाव, दि. २६ :** तालुक्यातील खंडणी आणि आंबेझरी जंगल परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून पोलिसांची नजर चुकवून अवैध 'कोंबड बाजार' (जुगार) जोरात सुरू आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची चिंता वाढली असून हा अवैध प्रकार तत्काळ बंद करण्याची मागणी यवतमाळ जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण रोगे यांनी केली आहे.

सध्या खरीप हंगामातील पिके घरात येत आहेत. अशातच या भागात कोंबड बाजार भरत असल्याने गुन्हेगारी वृत्तीचे लोक जमा होत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांना त्रास होत असून शेतातील कापूस चोरीच्या घटना वाढण्याची दाट शक्यता आहे. यावर्षी अतिवृष्टीमुळे आधीच शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत, त्यात या अवैध धंद्यांमुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे मारेगाव पोलिसांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कोंबड बाजार तातडीने बंद करावा, अशी मागणी प्रवीण रोगे यांनी भ्रमणध्वनीद्वारे पोलिसांकडे केली आहे.

## नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

### यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेचा उपक्रम



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २६ :** यवतमाळ जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संस्थेच्या वतीने नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत विजय मिळवलेल्या वृत्तपत्र विक्रेते आणि स्नेही नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. मंगळवारी (दि. २३) सकाळी ७ वाजता हा सोहळा पार पडला.

कष्टाची कामे करत वृत्तपत्र वितरकांनी निवडणुकीत यश मिळवले आहे. यात वार्ड क्रमांक ५ मधून आकाश परतेकी आणि वार्ड क्रमांक १० मधून नीरज वाघमारे हे वृत्तपत्र विक्रेते विजयी झाले आहेत. तसेच संघटनेचे स्नेही असलेले वार्ड १६ चे शेख चांद आणि वार्ड १७ चे भारत ब्राह्मणकर यांचाही यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी संस्थेला भविष्यात सर्वतोपरी मदत करण्याची तयारी दर्शवली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंदे, सचिव किरण कोरडे, मार्गदर्शक मदन केळापुरे, उपाध्यक्ष राजू हनवते, प्रवीण आगलावे, संतोष शिरभाते, धर्मेंद्र मुणोत, किशोर भेदरकर, विजय हनवते, कमलनयन कोठारी, श्रीपाद तोटे, अभिजित ठाकरे यांच्यासह सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्रीराम खत्री यांनी केले, तर आभार किरण कोरडे यांनी मानले.

### अल्पमुदतीच्या कौशल्य प्रशिक्षणासाठी प्रवेश सुरू

**यवतमाळ, दि. २६ :** जिल्ह्यातील १८ शासकीय आयटीआय आणि ६ तांत्रिक विद्यालयांमध्ये अल्पमुदतीच्या रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. जानेवारी ते मार्च २०२६ या दुसऱ्या टप्प्यासाठी हे प्रवेश दिले जात आहेत. यात सोलर एनर्जी, डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, सीसीटीव्ही, इलेक्ट्रिक व्हेईकल सर्व्हिस अशा नवयुगीन अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रशिक्षणासोबतच व्यक्तिमत्व विकास आणि स्वयंरोजगारासाठी शासकीय कर्ज योजनांचे मार्गदर्शनही मिळणार आहे. इच्छुक उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा जवळच्या शासकीय आयटीआय अथवा तांत्रिक विद्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास विभागाने केले आहे.

## चिंचोली आश्रमशाळेत विद्यार्थिनींसाठी आरोग्य शिबिर; इनरव्हील क्लबचा स्तुत्य उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. २६ :** येथील इनरव्हील क्लब, दिग्रस अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी आणि आरोग्यधाम हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने चिंचोली (क्र. २) येथील स्व. उत्तमराव देशमुख आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थिनींसाठी आरोग्य मार्गदर्शन व मोफत औषध वाटप शिबिर पार पडले. डॉ. श्याम जाधव (नाईक) यांच्या संकल्पनेतून राबविलेल्या या शिबिराचा शाळेतील ३२५ विद्यार्थिनींनी लाभ घेतला.

यावेळी सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. कल्पना जाधव यांनी विद्यार्थिनींना किशोरवयीन आरोग्य, संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता आणि ॲनिमिया (रक्तक्षय) याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच, विद्यार्थिनींना रक्तवाढीसाठी आवश्यक औषधे आणि मल्टिव्हिटॅमिन टॅब्लेटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला इनरव्हीलच्या अर्चना पाटील, ज्योत्स्ना मानकर, दिग्रस अर्बनच्या शाखाधिकारी संगीता बिजमवार, मयुरी भाकरे, माध्यमिक मुख्याध्यापक नितीन आडे, प्राथमिक मुख्याध्यापक व्ही. पी. गायके, पूनम कदम आणि किरण कदम उपस्थित होते. मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# जातनिहाय जनगणनेमुळेच देशाचा सर्वांगीण विकास शक्य

### प्रा. आर. डी. शिंदे : १९३१ नंतर गणना नाही, ओबीसी विकासापासून वंचित; यवतमाळात 'स्मृती पर्वा'चा जागर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**





**यवतमाळ, दि. २६ :** "भारताच्या समग्र विकासाच्या संकल्पनेत इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गाचे मागासलेपण दूर करणे अत्यावश्यक आहे. अचूक आकडेवारीअभावी ओबीसी समाज मुख्य प्रवाहापासून दूर फेकला गेला आहे. त्यामुळे ओबीसींना विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी 'जातनिहाय जनगणना' होणे काळाची गरज आहे," असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ ओबीसी विचारवंत प्रा. आर. डी. शिंदे (नांदेड) यांनी केले.

येथे आयोजित 'महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पर्व २०२५' कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय पिछडा शोषित संघटन (नवी दिल्ली) आणि ओबीसी जनमोर्चा, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रा. शिंदे पुढे म्हणाले, "ब्रिटिश काळात १९३१ मध्ये देशात शेवटची जातनिहाय जनगणना झाली होती. स्वातंत्र्यानंतर अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांची जनगणना दर दहा वर्षांनी झाली, मात्र ओबीसी प्रवर्गाची जनगणना जाणीवपूर्वक टाळण्यात आली. आकडेवारीच नसल्यामुळे ओबीसींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचे वास्तव चित्र समोर येत नाही. परिणामी, त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात आणि धोरणे आखण्यात अडचणी येतात."या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सलोखा पॅनलचे अध्यक्ष गोविंद चव्हाण होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास काळे यांनी केले. त्यांनी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जनगणनेबाबत मांडलेली भूमिका विषद केली. तर डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी 'स्मृती पर्व प्रक्रिया आणि मानवतावाद' या विषयावर बीजभाषण करताना समाज परिवर्तनाची दिशा स्पष्ट केली. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सुनीता काळे, अशोक मोहुरले, प्रा. दीपक वाघ, इंजि. दीपक बोरगामवार, देवराव जिपकाटे, विनोद इंगळे, प्रा. सविता हजारे आणि नांदेडचे बी.पी.एस.एस. अध्यक्ष सतीश चंद्र शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विशाखा येवतकर यांनी केले, तर आभार राहुल पाचघरे यांनी मानले. उपस्थितांचा परिचय मायाताई गोरे यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी शशिकांत लोळगे, संजय बारी, डॉ. संजय ठाकूरकर, नरेंद्र भांडारकर, प्रफुल खेडकर, ज्ञानेश्वर रायमल, ॲड. अरुण सांगळे, माधुरी फेंडर, नीता दरणे, वैशाली फुसे, अनिता गोरे, भावना गुल्हाने, कल्याणी मादेशवार, माधवी पंचबुद्धे, उषा सोनटक्के, शालिनी पिंपळकर, ललिता वाघ, कमल खंडारे, शालिनी शिरभाते, अनिता मेहता, शुभांगी गुल्हाने, अनिल जिपकाटे, नरेंद्र रामेकर, शालिनी मडवे, रूपाली ठाकरे, शीतल दिघडे, वनिता ठाकरे, वंदना डगवार आणि सोशल मीडिया प्रतिनिधी शुभांगी मालखेडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**जाहिरनामा**

मी मोहम्मद इसराईल मोहम्मद इसमाईल जाहीर करतो कि माझ्या शैक्षणिक कागदपत्रावर माझे नाव मोहम्मद इसराईल म. इसमाईल असे असून माझ्या इतर कागदपत्रावर म्हणजे आधार कार्ड व pan कार्ड वर माझे नाव मोहम्मद इसराईल मोहम्मद इसमाईल असे असून माझे नाव या कागदपत्रानुसारच म्हणजे मोहम्मद इसराईल मोहम्मद इसमाईल मु.पो. कलगाव तालुका दिग्रस जिल्हा यवतमाळ असे राहील.





**महामानवांना विनम्र अभिवादन...**

**यवतमाळ :** नगरपरिषदेच्या निवडणुकीत मिळालेल्या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक विजयानंतर पदाचा अहंकार न बाळगता महामानवांच्या विचारांचा वारसा जपत... मुंबईहून परतताच क्रांतीसूर्य बिरसा मुंडा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून कृतज्ञतापूर्वक नतमस्तक होताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके. या वेळी सोबत राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, नवनिर्वाचित नगरसेवक आणि कार्यकर्ते.

## बाभूळगावात मुख्याधिकाऱ्यांच्या मनमानीविरुद्ध नागरिकांचा एल्गार

### शहर कडकडीत बंद!; 'खोटे गुन्हे मागे घ्या, मुख्याधिकाऱ्यांना निलंबित करा'ची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बाभूळगाव, दि.२६ :** बाभूळगाव नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी डॉ. पी. एस. सोटे यांच्या कथित मनमानी कारभाराविरुद्ध शहरात शुक्रवारी संतापाची लाट उसळली. संघर्ष समितीच्या सदस्यांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्यावे आणि जाचक वाढीव कर आकारणी रद्द करावी, या मागण्यांसाठी बाभूळगाव संघर्ष समितीने पुकारलेल्या 'शहर बंद'ला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून १०० टक्के पाठिंबा दर्शवला. नागरिकांनी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला.

मुख्याधिकाऱ्यांच्या वर्तणुकीचा निषेध करत त्यांना तत्काळ निलंबित करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार दिलीप बदकी यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. या आंदोलनात शेकडो नागरिक आणि महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. भारतमाता चौकात झालेल्या सभेत माजी नगराध्यक्ष बाळासाहेब गौरकार, विद्यमान नगरसेवक व गटनेते अनिकेत पोहोकार, नगरसेवक चंद्रशेखर परचाके, अभय तातेड, विलास खोडे, रामदास वातकर, मामा शुक्ला, सचिन माटोडे, चंद्रशेखर अडेकार, बाबा खान, जावेद राज, सचिन इंगोले, मंगला चन्ने, मेहरून, प्रशांत मेघे यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या कारभारावर सडकून टीका केली. रवींद्र काळे यांनी संचालन केले.



### नेमके प्रकरण काय आहे?

**नगरपंचायतीने २०२५-२६ ते २०२८-२९ या चार वर्षांसाठी वाढीव कर मूल्यांकन प्रस्तावित केले आहे. यासाठी नागरिकांना नोटिसा पाठवून ८ ऑगस्टपर्यंत लेखी हरकती (आक्षेप) मागविल्या होत्या. २३ डिसेंबरला या हरकतींवर सुनावणी आयोजित करण्यात आली होती. यासाठी मालमत्ताधारक आणि त्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र, मुख्याधिकारी डॉ. सोटे यांनी नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी, थेट पोलिस ठाणे गाठले. त्यांनी संघर्ष समितीचे सदस्य नगरसेवक अभय तातेड, धरमचंद छल्लाणी आणि इतर काही नागरिकांविरुद्ध खोटे गुन्हे दाखल केले, असा संघर्ष समितीचा आरोप आहे.**

### मुख्याधिकाऱ्यांवर गंभीर आरोप

**'मुख्याधिकारी शहरात राजकारण करत आहेत. विकासासाठी काम करण्याऐवजी नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल करत आहेत. नगरपंचायतीमधील गैरप्रकारांना त्यांची मूक संमती आहे,' असा घणाघाती आरोप बाभूळगाव संघर्ष समितीने निवेदनातून केला आहे. ही तक्रार दिशाभूल करणारी आणि जाणीवपूर्वक केल्याचे त्यांनी म्हटले आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, पोलिस अधीक्षक आणि तहसीलदार यांना पाठवण्यात आल्या आहेत.**

## महागाव बाजार समितीत भाजपला 'शिंदे' सेनेकडून धोबीपछाड!

### १५ विरुद्ध शून्य मतांनी अविश्वास ठराव मंजूर; सभापती गुलाबराव जाधव पायउतार



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ विनोद कोपरकर**

**महागाव, दि.२६:** महागाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सत्तासंघर्षात अखेर भाजपला मोठा धक्का बसला आहे. सभापती गुलाबराव लोभा जाधव यांना आपल्या पदावरून पायउतार व्हावे लागले आहे. आज झालेल्या विशेष सभेत १५ संचालकांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने १५ विरुद्ध शून्य मतांनी हा ठराव मंजूर झाला. या निकालामुळे बाजार समितीवरील भाजपची पकड सैल झाली असून, शिवसेना (शिंदे गट) चे संचालक रवी पवार यांनी निर्णायक बाजी मारल्याचे चित्र आहे. लवकरच ते सभापतीपदावर आरूढ होतील, असे संकेत सूत्रांकडून मिळत आहेत.

यापूर्वी अडीच वर्षांपूर्वी महागाव नगरपंचायतीत काँग्रेस-शिवसेना महाविकास आघाडीने भाजपची सत्ता उलथवून लावली होती. त्यानंतर आठवड्यापूर्वी उमरखेड नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेसप्रणीत जनशक्ती पॅनलने भाजपचा दणदणीत पराभव केला. त्या पाठोपाठ आज महागाव बाजार समितीतही भाजपची नाचक्की झाली असून, राजकीय समीकरणांमध्ये हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे. महागाव कृषी उत्पन्न बाजार समितीत 'अर्थकारण' आणि सेस वसुलीच्या मुद्द्यांवरून सभापती व संचालकांमध्ये दीर्घकाळापासून तीव्र मतभेद होते. गतवर्षी बाजार समितीची सेस वसुली कर्मचाऱ्यांकडून काढून काही संचालकांकडे देण्यात आली होती. या प्रक्रियेत नियमबाह्य पद्धतीने खासगी लोकांचा हस्तक्षेप झाल्याचा आरोप असून, सेस वसुलीत गैरव्यवहार झाल्याची चर्चा होती. तेव्हा सभापती गुलाबराव जाधव यांनी आपली खुर्ची वाचविण्यासाठी या निर्णयाला संमती दिल्याचे बोलले जात होते. यंदा मात्र सेस वसुलीची जबाबदारी पुन्हा कर्मचाऱ्यांकडे न देता उटी येथील एका संचालकाकडे सोपविण्यात आली. त्यांनी पारदर्शक पद्धतीने वसुली करून ही रक्कम बाजार समितीच्या हितासाठी वापरल्याने काही संचालकांचा आर्थिक कोंडमारा झाला. याच पार्श्वभूमीवर नाराज संचालकांनी सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला. घोडेबाजारामुळे समीकरणे बिघडू नयेत म्हणून १५ संचालक मागील दहा दिवसांपासून बाहेर 'टूर'वर होते. मतदानाच्या अवघ्या अर्धा तास आधी हे संचालक बाजार समिती कार्यालयात दाखल झाले.

**कोण कोण होते विरोधात?**

अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान करणाऱ्या संचालकांमध्ये रामेश्वर करपे, गजेंद्र देशमुख, किशोर देशमुख, वासुदेव नेवारे, विनोद राऊत, कृष्णराव राऊत, निरंजन धनगर, रवी पवार, उकंडा राठोड, पुंडलिक भुरके, परमेश्वर जाधव, विजय कृष्णापुरे, रितेश पुरोहित, विनोद भगत आणि पुष्पा ठाकरे यांचा समावेश होता. सभापती गुलाबराव जाधव, सुनीता गावंडे आणि अंबादास विभटे हे संचालक गैरहजर राहिले. सभेचे कामकाज पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी पाहिले.

## महत्वाचे

### साडेपाच लाखांची रोकड लंपास

**यवतमाळ :** आर्णी रोडवरील राणा प्रताप गेट जवळ असलेल्या भारमल हार्डवेअर दुकानातून चोरट्याने ५ लाख ४२ हजार रुपयांची रोकड असलेली बॅग पळवली. ही घटना २५ डिसेंबर रोजी सकाळी घडली. फिर्यादी साबीर हुसेन भारमल (६२) हे दुकानात असताना एका ग्राहकाला सिमेंट देण्यासाठी गोडाऊनकडे गेले. त्यानंतर दुसऱ्या ग्राहकाला सुट्टे पैसे देण्यासाठी त्यांनी काऊंटरवर पाहिले असता पैशांची बॅग गायब होती. चोरट्याने नजर चुकवून ५,४२,२०० रुपयांची बॅग लांबवली.

### तीन फोटो चौकातून दुचाकी चोरी

**यवतमाळ :** शहरातील तीन फोटो चौक परिसरातील चिकनच्या दुकानाशेजारी उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना २१ डिसेंबर रोजी दुपारी घडली. फिर्यादी मोरेश्वर नारायण उईके (४४, रा. उमरसरा) यांनी आपली हिरो होंडा प्लेजर (एमएच २९ एई ८२३७) येथे पार्क केली होती. काही वेळाने परत आल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. या दुचाकीची किंमत २१ हजार रुपये आहे.

### रेती तस्करावर गुन्हा दाखल

**बाभूळगाव :** वर्धा नदीपात्रातून अवैध रेती उपसा करणाऱ्यावर बाभूळगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. राऊत सावंगी शिवारात ही कारवाई करण्यात आली. आरोपी शोहेब उर्फ मुन्ना पटेल अहेमद खान बशीर (४५, रा. आलेगाव) याने नदीपात्रातून विनापरवाना ४ ब्रास रेतीचे उत्खनन केले. यातील ३ ब्रास रेती नदीकाठी साठवून ठेवली होती, तर १ ब्रास रेती चोरून नेली. एकूण २२ हजार रुपयांच्या या रेती चोरीप्रकरणी बाभूळगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दिनेश खांडेकर यांचे निधन



**पुसद:** गेल्या २५ वर्षांपासून निर्भीड पत्रकारिता आणि समाजकार्याचा वसा जपणारे येथील ज्येष्ठ पत्रकार दिनेश खांडेकर यांचे शुक्रवारी (दि. २६) सकाळी ११ वाजता कर्करोगाच्या दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या दोन वर्षांपासून ते मृत्यूशी झुंज देत होते, मात्र आज त्यांची ही झुंज अपयशी ठरली. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून नेहमीच सामान्यांचे प्रश्न मांडले. नि:स्वार्थ वृत्तीने त्यांनी 'जीवलग मित्र मंडळा'च्या माध्यमातून मोठा लोकसंग्रहजमवला होता. त्यांच्या जाण्याने पुसदच्या पत्रकारिता क्षेत्रावर आणि सामाजिक चळवळीवर शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## छापेमारीत ३० लीटर गावठी दारू जप्त

### फुलसावंगीत महागाव पोलिसांची तीन अड्ड्यांवर कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**फुलसावंगी, दि. २६ :** ख्रिसमसच्या दिवशी अवैध दारू विक्रीला चाप लावण्यासाठी महागाव पोलिसांनी विशेष मोहीम राबविली. या अंतर्गत फुलसावंगी आणि भिकूनगर परिसरात तीन ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी सुमारे ३० लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. या कारवाईत तीन जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

बुधवारी (दि. २५) सायंकाळी आणि रात्री ही कारवाई करण्यात आली. यामध्ये भिकूनगर येथील दत्ता मेघाजी राठोड (४५) याच्या घरातून १५ लिटर (किंमत १५०० रु.), फुलसावंगी येथील आशा वसंता ढाले (५०) हिच्याकडून ७ लिटर (किंमत ७०० रु.), तर शेख मुजीर शेख अब्दुल (४३) याच्या घरातून ८ लिटर (किंमत ८०० रु.) दारू जप्त करण्यात आली. एकूण ३ हजार रुपयांचा हा मुद्देमाल आहे. ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल सुहास कायटे आणि नाईक कैलास मुकाडे यांच्या पथकाने ही कामगिरी केली. तिन्ही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास सुहास कायटे करीत आहेत.



## निवडून येताच 'तो'नगरसेवक भिडला कामाला

### स्वच्छतेला दिले सर्वोच्च प्राधान्य; यवतमाळच्या राजकारणात डॉ. नीरज वाघमारेंचा नवा आदर्श

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२६ :** यवतमाळ नगर परिषद निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शहरात सध्या सत्तेची समीकरणे जुळविण्याचे वारे वाहत आहेत. उपाध्यक्षपद किंवा स्वीकृत सदस्यत्वाची 'लॉटरी'लागावी यासाठी अनेक नवनिर्वाचित नगरसेवक नेत्यांच्या उंबरठ्यावर 'लॉबिंग' करण्यात व्यस्त आहेत. मात्र, या सर्व राजकीय गदारोळापासून दूर राहत, प्रभाग क्रमांक १० चे नवनिर्वाचित नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी विजयाच्या दुसऱ्याच दिवशी हातात झाडू आणि सफाई कामगारांची फौज घेऊन स्वच्छतेच्या कामाला सुरुवात केली आहे.

यवतमाळ शहरात गेल्या काही काळापासून स्वच्छतेचा प्रश्न अत्यंत जटील बनला होता. प्रशासकीय राजवटीत स्वच्छतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने शहराला घाणीचा विळखा पडला होता. विशेषतः वाघमारे यांच्या प्रभागातील नेताजी नगर, अंबा नगर, वैशाली नगर, माधव नगर आणि करीम नगर यांसारख्या भागांत नाले तुंबणे आणि कचऱ्याचे ढीग साचणे नित्याचे झाले होते. डॉ. वाघमारे यांनी निवडणूक लागण्यापूर्वीच सामाजिक बांधीलकीतून स्व:खर्चाने या भागात घंटागाडी सुरू केली होती आणि नाले उपसण्यासाठी कामगार नेमले होते. त्यांच्या या सातत्यपूर्ण कामाची पोचपावती म्हणूनच मतदारांनी त्यांना भरघोस मतांनी निवडून दिले. निवडून आल्यावर अनेकजण सुस्तावतात, या समजाला छेद देत डॉ. वाघमारे यांनी त्वरित प्रभागाचा दौरा केला. त्यांनी केवळ पाहणी केली नाही, तर तत्काळकामगारांमार्फत सफाई मोहिमेला गती दिली. अवघ्या काही दिवसांत अर्ध्या प्रभागातील गटारे आणि कचऱ्याचा प्रश्न त्यांनी मार्गी लावला आहे. आजच्या राजकीय वातावरणात निवडून आल्यानंतर अनेक नगरसेवक पार्ट्या आणि देवदर्शनात मग्न असतात. अशा काळात डॉ. वाघमारे यांच्यासारखा लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष जमिनीवर उतरून काम करत असल्याने, 'इतरांनी केवळ राजकीय भेटीगाठीत वेळ न घालवता डॉ. वाघमारेंचा आदर्श घ्यावा,' अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. वंचित बहुजन आघाडीने त्यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात तीन जागा जिंकून खाते उघडले असून, त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे पक्षाची प्रतिमा उंचावली आहे.



**'निवडून येणे हा केवळराजकीय प्रवासाचा प्रारंभ आहे, अंत नाही. जनतेने ज्या विश्वासाने मला निवडून दिले, त्या विश्वासाला पात्र ठरणे हे माझे पहिले कर्तव्य आहे. स्वच्छता हा आरोग्याचा पाया असून माझ्या प्रभागाला 'आदर्श प्रभाग'बनविणे हेच माझे ध्येय आहे.'**

**-डॉ. नीरज वाघमारे,**
**नवनिर्वाचित नगरसेवक, यवतमाळ.**

## अखेर यवतमाळच्या नाट्यगृहाला महात्मा फुलेंचे नाव

### अनेक वर्षांचा लढा यशस्वी; राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीचा पाठपुरावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२६ :** यवतमाळच्या नाट्यगृहाला अखेर 'महात्मा जोतिराव फुले नाट्यगृह' असे नाव देण्यात आले आहे. यासाठी अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागली. या निर्णयामुळे नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.

नाट्यगृहाच्या नामकरणाचा ठराव २००७ मध्ये मंजूर झाला होता. तत्कालीन नगरसेविका सुवर्णा अराठे यांनी मागणी केली होती. नगरसेवक दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले होते. त्यावेळी बाळासाहेब चौधरी नगराध्यक्ष होते. मात्र, नामफलक लावण्यास विलंब होत होता. राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष सुनयना येवतकर (अजित पवार गट) यांनी सतत पाठपुरावा केला. त्यांनी पालकमंत्री संजय राठोड, माजी मंत्री मदन येरावार, संपर्क मंत्री अशोक उईके यांच्याकडे वारंवार विनंती केली. तसेच उपोषण व आत्मदहनाचा इशारा सुद्धा दिला होता. अखेर प्रशासनाने याची दखल घेतली. प्रशासकीय पत्रात नुकताच नाट्यगृहाचा उल्लेख 'महात्मा फुले नाट्यगृह'असा करण्यात आला होता. त्यानंतर वेगाने हालचाली झाल्या. नाट्यगृहाच्या गेटवर आणि आत नामफलक लावण्यात आले. या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. यावेळी सुनयना येवतकर यांच्यासह मनोज गोरे, राजू गोटफोडे, मनोज भबुतकर, करुणा भबुतकर, सुषमा बडो, मृणाल पकोडे, वैशाली खरतडे, राणी यादव, सपना गावडे, शीतल गावडे, प्रशांत बोराडे, विलास महाले, विलास हेगडे, दुर्गेश चपेडिया, सतीश रोकडे, महेश डिके, समर्पण यवतकर, अर्चित घावड व अर्जुन घावडे यांच्यासह अनेक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.






**'अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नाट्यगृहाला नाव मिळाले आहे. ठरावाप्रमाणे महात्मा फुले यांचे नाव लागले. याचे मोठे समाधान आहे. यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने सहकार्य केले. सर्वांचे मनापासून आभार.'**

**-सुनयना येवतकर,**
**जिल्हा महिला अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)**

## भरधाव दुचाकी स्लीप झाल्याने तरुण ठार

### डोर्लीजवळील भीषण अपघात

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. २६ :** तालुक्यातील डोर्ली गावाजवळ असलेल्या घाटंजी-पारवा महामार्गावर दुचाकीचा भीषण अपघात होऊन एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना २५ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्रतीक विजय मंगाम (२६, रा. कुंभा टाकळी, ता. मारेगाव) असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो २५ डिसेंबरला सकाळी आपल्या एमएच ३४ केडी ९६३७ क्रमांकाच्या दुचाकीने झटाळा गावाकडे जात होता. दरम्यान, डोर्ली शेतशिवारात संजय गाढवे यांच्या शेताजवळ असलेल्या रस्त्यावरील वळणावर प्रतीकचे दुचाकीवरील नियंत्रण अचानक सुटले. हा अपघात इतका भीषण होता की, त्यात प्रतीकचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी सुरेश येंगुनवार आणि प्रेमानंद जंगठे करीत आहेत.

